RUN BY... SUBHEDAR RAMJI AMBEDKAR EDUCATION SOCIETY, WARDHA

**MAHATMA JYOTIBA FULE**
**COLLEGE OF SOCIAL WORK, YAVATMAL**

(College Code : 442)

(AFFILIATED TO SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY,

Rajratan Nagar, Dhamangaon Road, Yavatmal - 445001(M.S.) Ph. 07232-240536, 2402371 E-mail: mjfcswytl@gmail.com Website: www.mjfcsw.edu.in

Ref: NAAC 2023/ MLD/Cr-3.3.1 Date-29/08/2023

| | |
|---|---|
| **Criteria 3.3.1** | **Number of research papers published per teacher in the Journals notified on UGC care list during the last five years** |
| **Findings of DVV** | Provide Link landing to the research paper Provide Link to the journal website. Provide URL of the content page in case print journal. |
| **Response/ Clarification** | **As per clarification, all link to journal website is updated in data template. Also, the scanned copies of research papers with title, authors name, affiliating institute and ISSN number is attached year wise (Appendix I)** |

IQAC Coordinator
Mahatma Jyotiba Fule College of Social Work Yavatmal-445001

Mahatma Jyotiba Fule College of Social Work 442 Yavatmal

Principal
Mahatma Jyotiba Fule College of Social Work Yavatmal

Scanned with OKEN Scanner

# Appendix I

# 2017-18

UGC Approved Jr.No.43053

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

October 2017, Issue-34, Vol-01

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

28) Performance Analysis of Regional Rural Banks in India
Dr. Ch. Srinivas, A. Srinivas, Karimnagar || 137

29) Impact of Stress on employees performance
Dr. Y. R. Thorat, Pune || 141

30) Emerging Trend of Retail Trade in India
Dr. J. D. Wadate, Amravati. || 144

31) Magnitudes of Drug Addiction and the Connection with Crime
Dr. Bharatji Upadhyay, Almora || 147

32) HISTORIC AND POLITICAL REVIEW OF LANDHAURA RIYASAT
Dr. Sonia S. kaushik , uttrakhand || 150

33) 'भटका - विमुक्त समाज व संस्कृती'
प्रा. समीर आबनावे, जि. पुणे. || 156

34) अष्टपैलु व्यक्तिमत्व लाभलेले प्र. के. अत्रे
प्रा. क्षीरसागर प्रशांत बब्रुवान, बीड || 158

35) लोकसाहित्य प्रयोजनाचा एक चिकित्सक अभ्यास
श्री.अनिल हनमनलु मुनगेलवार, जि.नांदेड || 160

36) श्री तुकाराममहाराजांच्या गाथेतील दशावतार
डॉ. शाम नेरकर, परळी || 162

37) उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुदेशन गरजांचा तुलनात्मक अभ्यास
डॉ. यादव हरी सनेर, जि.धुळे || 166

38) बालकामगार आणि बालकाचे मानव अधिकार
सहा. प्रा. दिपक आर. आटे, यवतमाळ || 169

39) मुक्तिबोध के काव्य में बिम्ब योजना
प्रा. डॉ. रामकृष्णा बदने, जि. नांदेड || 173

40) संस्कृत साहित्य में सदाचार
श्रीमती बिन्दु देवी, हरि || 175

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

38

# बालकामगार आणि बालकाचे मानव अधिकार

**सहा. प्रा. दिपक आर. आटे**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क
यवतमाळ

***********

**बालक/बालमजूर कोण ?**

भारतीय राज्यघटनेच्या २४ व्या कलमान्वये १४ वर्षाखालील कोणत्याही व्यक्तीला बालक संबोधण्यात येते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावानुसार १८ वर्षाखालील कोणत्याही व्यक्तीला बालक म्हणून संबोधण्यात आलेआहे. तसेच त्यांच्या प्रकृतीवर, नैतिकतेवर दुष्परीणाम करतील अशा गुलामगिरी, वेश्याव्यवसाय, वा कोणत्याही अवैध कार्यामध्ये त्यांच्या समावेशनास बंदी घालण्यात आली आहे. आंतराष्ट्रीय संघटनेनुसार ज्या मुलावर सतत प्रौढ व्यक्तीची जबाबदारी असते. जी मुले त्यांच्या शारिरीक मानसिक विकासाला मारक ठरेल अशा वातावरणात कमीमोबदल्यास काम करतात. जी मुले आपल्या कुटूंबाला दुरावलेली असतात व जी मुले स्वतःच्या उज्वल भविष्यासाठी पारखी झलेली असते अशी सर्व मुले बालकामगार होय.

बालकामगार कायदा १९८६ नुसार १४ वर्षाखालील मुलाना कामावर ठेवणाऱ्या व्यक्तीवर कारवाई होते तर बालन्याय अधिनियमानुसार १८ वर्षाखालील मुलांना कामावरठेवणे गुन्हा आहे.

**बालकामगाराचे प्रकार :-**

- अदृश्य बालकामगार
- निर्वासीत बालकामगार
- सालगडी बालकामगार
- रस्त्यावरील बालकामगार
- उत्पादीत क्षेत्रातील बालकामगार

**युनिसेफ ने बालकामगाराचे ३ गटात विभाजन केले.**

- कुटूंबातील बालकामगार
- कुटूंबात रहाणारे परंतू घराबाहेर काम करणारे बालकामगार
- कुटूंबाबाहेरील बालकामगार

**बालमजुरीचे कारणे:-**

**1) [illegible]-** पालकांचे आत्यंतितक दारिद्रय या मुलांच्या विकासात गुंतवणूक करु शकत नाही. इतकेच नव्हे तर काही दारिद्रय कुंटूंबे मुलांचा साभाळ, मुलांचे पालन पोषन करु शकत नाही, उलट तीच मुलांच्या कमाईवर अवलंबून राहतात.

**२) वेतन पध्दती:-** पौढ कामगांरांना दिल्या जाणा-या वेतन म्हणजे त्यांच्या कुटूंबियांच्या जीवन निर्वाह विषयक किमान गरजा भागविण्या इतपत मिळाले तर त्यांच्या मुलांना कमावण्यासाठी कुठे पाठवावे लागणार नाही.

**३)मालकाच्या सोयीचे:-** पहिले म्हणजे बालकामगारांना कमी वेतन देऊन जास्त काम करुन घेता येते. दुसरे म्हणजे बालकामगारां पुढे संप वगैरेसारखे औद्योगिक अशांततेचे प्रश्न उद्‌भवत नाहीत. तिसरे म्हणजे काही कामाचे स्वरुप असे असते की, ते काम मुलेच जास्त व्यवस्थित करु शकतात.

**४) निरक्षरता आणि अज्ञान:-** कमी उत्पन्न असलेल्या लोकांमध्ये शैक्षणिक वातावरणाची उत्सुकता दिसत नाही आणि ते स्वतः ही अशिक्षीत असतात. त्यामुळे ते मुलांना शिक्षण देण्यास असमर्थ ठरतात. अशांच्या मुलांना मजूर म्हणून काम केल्याशिवाय पर्याय उरत नाही.

**५) अनिष्ट कौटुंबिक परिस्थिती:-** मानवी निवासासाठी सर्वथैव अयोग्य अशी, अपुरा उजेड, हवा, प्रकाश असणरी घरे, कौटुंबिक ताण-तणाव, पालकांचे विभक्त राहणे, पालकांनी त्याग करणे, छळणे, आजारपण, कमावत्या कर्त्या व्यक्तीचा मृत्यू, शारीरिरक व्यंग इ. कारणे पण बालमजुरी मागे असतात.

**मालकाचा दृष्टीकोन :-**

बालकामगार हया प्रथेला मालक मंडळीकडून प्रोत्साहन दिले जाते कारण बालकामगार प्रौढ कामगारा इतकेच काम करतात. परंतू त्यांना कमी वेतन देता येते शिवाय बालकामगार संघटीत होवू शकत नाही त्यामुळे बहुसंख्य मालकाचा दृष्टीकोन बालकामगाराना कामावर ठेवून जास्त नफा कमविने हा असतो. चौदा वर्षा खालील मुलांकडून काम करवून घेणे बालकामगार कायद्यानुसार गुन्हा असला तरी त्याच्या कचाटयातून सही सलामत सुटलेल्या मालकाची संख्या सरकारनेच मुंबई हायकोर्टात मान्य केले आहे. १९८६ पासून नोंदवलेल्या प्रकरणात अवघे ५९ प्रकरणातच मालक दोषी आढळून आले आहे.

**मानव अधिकार :-**

मानव म्हणून जन्म घेताच मनुष्याला जे अधिकार मिळतात



Scanned by CamScanner

ते मानव अधिकार होय. प्रत्येक व्यक्तीला स्वतःची सुरक्षा, जगण्याचा आणि त्यासाठी त्याच्या प्राथमिक गरजा, अन्न, वस्त्र, निवारा पूर्ण करण्याचा अधिकार आहे. तसेच माणसाला व्यक्तीमत्व विकसीत करणसाठी शिक्षण, सामाजिक जीवन, सांस्कृतीक तसेच मानसिक विकास प्राप्त करण्याचा अधिकार आहे.

भारतात १९९३ मध्ये Protection of Human Rights Act अमलात आला. त्या अंतर्गत राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना १९९४ मध्ये करण्यात आली. राज्यस्तरावर मानव अधिकार आयोग व कोर्ट सुरू झाले.

मानव अधिकार मनुष्याला जीवन जगतांना जे अडथळे येतात ते दूर करून शांती आणि बंधुभाव निर्माण करतो.

**बालहक्काचा जाहीर नामा :-**

बालकाचे जन्मजात हक्क घोषित करणारा जाहीरनामा संयुक्त राष्ट्रांनी २० नोव्हेंबर १९५९ रोजी प्रस्तुत केला. जगातील सर्व बालकांचा सर्वांगीन विकास साधून त्यांना समृध्द व सुखी जीवन उपलब्ध व्हावे हा जाहीर नाम्याचा हेतू आहे.

संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्काच्या बौध्दिक घोषणेमध्ये घोषित केल्याप्रमाणे प्रत्येक मनुष्य हा सर्व हक्क व स्वातंत्र्ये मिळविण्यास पात्र आहे. त्याबाबतीत जात, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय वा अन्य मतप्रणाली, राष्ट्रीय व सामाजिक उत्पत्ती, मालमत्ता, जन्म वा अन्य दर्जा हयांचा विचार केला जाणार नाही. शारिरीक मानसिक अपरिपक्वतेमुळे बालकाची अधिक काळजी व संगोपण करावे लागते. त्याचप्रमाणे त्यांना कायदयाचेहीसंरक्षण दयावे लागते. बालकाच्या प्रसवपूर्व व प्रसवोत्तर स्थितीचा विचार करण्यात येतो अशाप्रकारे बालकाची योग्य ती काळजी व निगा घेण्याची तरतूद १९२४ च्या बालसबंधीच्या जिनीव्हा घोषणेमध्ये समाविष्ट करण्यात आले.

**तत्वे :-**

१. बालहक्काच्या जाहीरनाम्यात समाविष्ट केलेले सर्व हक्क प्रत्येक बालकाला जात, वर्ण लिंग, भाषा, धर्म, राजकीय वा अन्य मतप्रणाली, राष्ट्रीय वा सामा. उत्पत्ती, मालमत्ता इ. विचार न करता मिळावयास हवेत.

२. बालकाला विशेष संरक्षण मिळावे बालकाचा शारिरीक मानसिक, नैतिक, आध्यात्मिक व सामा.दृष्टीने विकास होऊ शकेल अशा संधी सुविधा त्याला कायद्याने वा अन्य मार्गाने उपलब्ध करावयास हव्यात.

३. जन्मापासून बालकाला नाव व राष्ट्रीयत्व मिळण्याचा हक्क आहे.

४. बालकाला सामा. सुरक्षेचे सर्व लाभ मिळावयास हवेत.

५. शारिरीक, मानसिक किंवा सामा. दृष्या अपंग असलेल्या बालकाला विशेष प्रकारची वागणुक शिक्षण देण्यात येऊन त्यांनी विशेष प्रकारची काळजी घेण्यात यावी.

६. अनाथ व निराधार बालकाची विशेष काळजी वाटणे आणि त्यांना आधार देणे हे समाजाचे व शासनाचे कर्तव्य आहे.

७. बालकाना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळणे आवश्यक आहे.

८. बालकाला सर्वप्रथम संरक्षण व सहाय्य मिळणे आवश्यक आहे.

९. क्रुरता पिळवणूक व दुर्लक्ष या सर्व प्रकारापासून बालकांना संरक्षण मिळावयास हवे.

१०. जातीय, धार्मिक वा अन्य प्रकारचा भेदभाव उत्पन्न करणाऱ्या प्रवृत्तीपासून बालकाचे संरक्षण करावे.

**मराठी विश्वकोष**

**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ मुंबई.**

संयुक्त राष्ट्र संघटने १९८९ बालक संदर्भातील करार स्वीकारला त्याव्दारा सर्व बालकांना मूलभुत मानवीहक्क मिळण्याच्या अधिकार आहे. जसे जिवीताचा अधिकार, शारिरीक आणि बौध्दिक सुप्त गुणांचा विकास करण्याचा अधिकार, त्यांच्या विकासावर घातक परिणाम होईल अशा प्रभावापनासून संरक्षणाचा अधिकार, कौटुंबिक सांस्कृतीक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार हया कराराप्रमाणे बालकाच्या हक्काच संरक्षण करण्यासाठी शासनान त्या देशातील मुलांना आरोग्य सेवा, शिक्षण, कायदेशिर आणि सामाजिक सेवा पुरवणं बंधनकारक आहे.

**जगण्याचा अधिकार -**

जगण्याचा अधिकारात प्रत्येक मुलाला खालील अधिकार आहेत.

जीवीताचा आणि विकासाचा.

समाधानकारक आणि आवश्यक राहणीमान मिळण्याचा.

प्राप्त करू शकणा-या उत्कृष्ठ आरोग्याचा दर्जा आणि परिणामकारक आरोग्य सेवा मिळण्याबाबत.

अंपग बालकांना विशेष सेवा पुरविण्यात याव्या ज्याव्दारे



Scanned by CamScanner

त्यांचा आत्मसन्मान, प्रतिष्ठ्र जोपासली जाईल ते स्वावलंबी राहतील.

सामाजिक सुरक्षितता आणि बालसेवा सुविधा.

**विकासाचा अधिकार -**

मोफत प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि व्यावसायिक प्रयिाक्षणाची उपलब्धता.

असे शिक्षण जे त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास, उपजत गुण, मानसिक शारिरीक कार्यक्षमता पूर्ण करून मुक्त समाज जीवनात त्यांना एक कार्यक्षम नागरिक बनवू शकेल.

शिक्षण अशा भावनेचं जे समजावेल शांतता/शोषिक्ता आणि समानता.

फुरसनीच्या वेळी खेळ आणि संधी, सांस्कृतीक आणि कलात्मक कार्यक्रमात भाग घेण्याची.

**संरक्षणाचा अधिकार -**

गंभीर परिस्थितीत संरक्षणाचा अधिकार.

जेव्हा बालक कायदयाच्या विरूध्द जातात किंवा कायदयाचा कपाटयात सापडतात.

शोषणाच्या स्थितीत जसं बालमजुरी, अमली पदार्थाचा गैरवापर, लैगिक शोषण/निंदा, विक्री, मालाची ने आण, अपहरण.

इतर कोणत्याही भेदभाव पासून संरक्षणाचा अधिकार.

**सहभागाचा अधिकार -**

बालकाच्या जीवनावर परिणाम कारणाऱ्या सर्व बाबीं मध्ये भाग घेण्याचा अधिकार.

त्यांचे दृष्टीकोन एकविण्याच्या आणि इतरांनी ते गंभीरपणे घेण्याचा अधिकार.

अभिव्यक्ती स्वांतत्र्याचा अधिकार.

विचार सद्विवेक बुध्दी आणि धर्माच स्वांतत्र्य.

विवधि स्त्रोताकडून माहिती मिळण्याच स्वातंत्र्य.

बालकांना वरील सर्व अधिकार आहेतच ह्या व्यतिरिक्त विविध कायदयाव्दारे भारत सरकारने कायदयामध्ये बालकाचे वयाबाबत वेगवेगळी भुमिका मांडली आहे.

**बालविवाह प्रतिबंधक कायदा - २००६**

या कायदया मुलीचं वय १८ वर्ष आणि मुलांच वय २१ वर्ष मांडण्यात आले.

**कारखाना कायदा - १९४८ (Factories Act-१९४८)**

१४ वर्षाखालील बालकांना कोणत्याही कारखान्यात काम करण्याची परवानगी नाही. १५ ते १८ वर्ष वयोगटातील केवळ अशा मुलांना कारखान्यामध्ये काम करण्याची परवानगी आहे. ज्यांनी मान्यता प्राप्त डॉक्टराकडून तंदुरूस्तीचा प्रमाणपत्र मिळवल आहे. १५ ते १८ वर्ष वयोगटातील मुल ४१/२ तासपेक्षा जास्त काम करू शकणार नाही.

**APPRENTICES ACT - १९६७**

कुठल्याही व्यक्तीस शिकावू कामगार म्हणून काम करण्यासाठी बालकाचे वय १४ पेक्षा कमी नसाव आणि त्यांना आवश्यक ती शैक्षणिक आणि शारिरीक क्षमता प्राप्त केलेली असावी.

**MINES ACT - १९५२**

१८ वर्ष वयापेक्षा कमी वयाच्या कोणत्याही व्यक्तीला खाणीमध्ये किंवा तत्सम ठिकाणी काम करण्यास परवानगी नाही.

**ARMY HEADQUARTER RGLATIONS**

सेनेमध्ये प्रवेश मिळविण्याचं वय १६ ते २५ वर्ष आहे. ज्या व्यक्तीची निवड १६ व्या वर्षी होते. त्यांना प्राथमिक लष्करी प्रशिक्षण २१/२ वर्षाच्या कालावधीकरीता देण्यात येते. त्यानंतर सेवेत नियमित करण्यात येते.

**INDIAN CONTRACT ACT - १८७०**

१८ वर्ष वयाखालील व्यक्तींना या कायदयान्वये करार करण्याचा अधिकार नाही.

**बालकामगार प्रतिबंध व नियमन कायदा - १९८६**

या कायदयामध्ये १८ व्यवसाय व ६५ प्रक्रिया मध्ये बालकांना कामावर येण्यास मनाई आहे.

**CONSTITUTION OF INDIA - (९३rd Amentment)**

कलम २१ (अ) नुसार सरकारवर कायदयानं ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच शिक्षण पुरविण्याची जबाबदारी आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम ४५ नुसार सरकारवर ६ वर्षापर्यंत मुलांचे संगोपन करण्याची आणि त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आहे.

राज्यामध्ये लागु असलेल्या बालमजुरी प्रतिबंधक कायदयाची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नसल्याने बालमजुर आणि बालकाच्या विविध समस्यांत वाढ होत आहे. आज उपहारगृह, चहाटपरी, कारखाने, औद्योगिक वसाहत, चित्रपटगृह अशा अनेक ठिकाणी बालकामगाराचा भरणा दिसून येते कारण त्यांच्यावर शासनाव्दारा



Scanned by CamScanner

निशुल्क शिक्षण, मोफत गणवेश, पोषण आहार इ. विद्यार्थ्यांना देवूनही अशिक्षीत आईवडील मुलांना शिकविण्यापेक्षा कामावर पाठवितात. जेणेकरून कुटुंबाच्या प्राथमिक गरजापूर्ण होतील. कुशाग्र बुध्दीकरिता बालकाने स्वस्थ राहणे महत्वाचे आहे. त्याकरिता खेळणे, व्यायाम करणे मुलांच्या शारिरीक व सामाजिक विकासासाठी लाभप्रद आहे पण धोकादायक कामाच्या ठिकाणी केलेल्या कामामुळे, अति श्रमामुळे त्यांची शारिरीक व मानसिक वाढ योग्य होत नाही त्यामुळे त्यांचे बालपणच हरवून जाते.

**निष्कर्ष :-**

भारतातील दारिद्राची समस्या ही न सुटणारी समस्या आहे. एका रात्रीत ही समस्या सुटणार नाही. जोपर्यंत भारतात दारिद्रय आहे तोपर्यंत दारिद्रयाशी निगडित बालकामगरासारख्या समस्या राहणारच. याच दष्टीकोनातून या समस्येकडे पाहिले पाहिजे असे विचारवंतांचे मत आहे. त्यासाठीच बालकामगाराच्या समस्येचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न न करता बालकामगारांचे जीवन, कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुसहय करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी त्यांचे कामाचे तास, कामाचे स्वरुप, रजा, सुटया इ. निश्चित करणे, किमान वेतनाची शाश्वतीदेणारे, शैक्षणिक, आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन देणे, मुल्यांकणाविषयक कार्यक्रम राबविणे, मर्यादित किंवा छोटया कुटुंबाच्या मूल्याचा प्रसार करणे, कौटुंबिक प्रश्नाविषयी प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांचा सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे इ. उपायाचा अवलंब मोठया प्रमाणात केला पाहिजे.

तसेच अधिकाराचे पालन केल्या न गेल्यास मानविय अधिकार कायद्यानुसार गुन्हा दाखल करता येते. त्यामुळे बालमजुरीचे प्रथेचे निर्मुलन होईल पण सध्या परस्थितीमध्ये सुध्दा बालमजुर मोठ्या प्रमाणात दिसुन येतात. कुपोषन सारख्या समस्या त्यांना भेडसावत आहे त्यासाठी, मानवधिकाराचे योग्य पालन होवुन त्याचा फायदा बालमजुराला मिळाला पाहिजे त्यासाठी सामाजिक संघटनांनी सुध्दा अशा अवस्था मधुन बालकांना सोडविण्याकरिता मदत करणे आवश्यक आहेत. असे झालेतरच ख-या अर्थाने मानव अधिकाराचे खऱ्या हक्कव्दारे बालकांना न्याय मिळु शकेल.

**संदर्भग्रंथ सूची**

मीणा कान्ता - बाल श्रम जनजातीय शोषण के सयामाजिक-आर्थिक आयाम आदि. पब्लीकेशन, जयपूर

Swan B.K. - Child Labour in India

Vinod Nangia Dattsons - J. Nehru Marg, Sadar, Nagpur

कृतीदल सदस्याकरिता मार्गदर्शीका - यशदा मानव विकास केंद्र यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे

सकाळ वृत्तपत्र - ४ डिसेंबर २०१२

लोकमत वृत्तपत्र - १२ जुन २०११

□□□



Scanned by CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

UGC Approved
Jr.No.62759

Oct. To Dec. 2017
Issue-20, Vol-01

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

39) भारतीय राजनीति की दिशा एवं दशा का एक अध्ययन
डॉ.आयशा अहमद, डॉ.प्रमोद यादव || 162

40) धुळे शहरातील बाल मजुरांच्या समस्या
प्राचार्य , डॉ. यादव हरी सनेर || 166

41) भारतीय ऐतिहासिक एवं वर्तमान परिदृश्य में पंचायत में महिला प्रतिनिधित्व
डॉ० नीशू कुमार, लण्ढौरा, हरिद्वार || 169

42) शासकीय एवं अशासकीय उच्चतर माध्यमिक विद्यालयों के छात्र–छात्राओं की सामाजिक....
आस्था जौहरी एवं डॉ. अशोक शर्मा, ग्वालियर (म.प्र.) || 177

43) शेतकरी आत्महत्या आणि मानवधिकार
सहा. प्रा. दिपक आर. आटे, यवतमाळ. || 180

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
हर्षवर्धन पब्लिकेशन प्रा.लि.
मु.पो.लिंबागणेश, ता.जि.बीड पिन : ४३११२६ (महाराष्ट्र)
harshwardhanpubli@gamil.com, vaidyawarta@gmail.com
सर्व प्रकारच्या शैक्षणिक व संदर्भ ग्रंथांचे प्रकाशक आणि वितरक



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned by CamScanner

आवशत्ति में उच्च १३ मध्य, ८७ एवं निम्न की आवशत्ति ५० है जबकि अपेक्षित आवशत्ति ५० उच्च की, ५० मध्य की एवं ५० ही निम्न में आयी है। ग² सूत्र द्वारा २७.३८ परिणाम आया है। तालिका में ०.०५ स्तर पर २ कि का मान ५.९९१ है और ०.०१ स्तर पर ९.२१ है। गणना किया गया ग² का मान इन दोनों से अधिक है, अतः सार्थक है। यह परिकल्पना असत्य सिद्ध होती है।

अर्थात् अशासकीय उच्चतर माध्यमिक विद्यालयों में अध्ययनरत् छात्राओं की सामाजिक–आर्थिक स्थिति का उनकी शैक्षणिक उपलब्धि पर सार्थक प्रभाव पड़ता है।

**सुझाव :**

विद्यार्थियों की सामाजिक–आर्थिक स्थिति के साथ–साथ उनकी अभिवशत्ति या व्यक्तित्व पर भी अध्ययन किया जा सकता है।

विद्यार्थियों की परिवार के सदस्यों की शिक्षा एवं व्यवसाय एवं उनके का जन्म क्रमांक के आधार पर भी अध्ययन किया जा सकता है।

छात्र स्वयं को विकसित करके समाज एवं राष्ट्र का विकास कर सकता है एवं अपनी शैक्षिक उपलब्धि को उत्तम कर सकता है।

विद्यार्थी को अपनी सामाजिक–आर्थिक स्तर को पहचान कर उसके अनुसार ही जीवन जीना चाहिए।

**संदर्भ**

१. अग्रवाल, सन्ध्या (२००७–२००८), शिक्षा मनोविज्ञान, विजय प्रकाशन मन्दिर, वाराणसी।

२. ऋषिश्वर, विनय (२०११–२०१२), विशिष्ट आवश्यकता वाले बच्चों की शिक्षा तथा निर्देशन एवं परामर्श, अग्रवाल पब्लिकेशन्स, आगरा।

३. कपिल, एच.के. (२००४), अनुसन्धान विधियाँ, एच.पी. भार्गव बुक हाऊस, आगरा।

४. कपिल, एच.के. (२०११), सांख्यिकी के मूल तत्व, श्री विनोद पुस्तक मन्दिर, आगरा।

५. कुमार, संजीव (२००८), विशिष्ट शिक्षा, जानकी प्रकाशन, पटना।

६. भार्गव, आर. एवं आराधना (२०१२), विशिष्ट बालक तथा माता–पिता की शिक्षा, एच.आई.बी.एस., आगरा।

**43**

# शेतकरी आत्महत्या आणि मानवधिकार

**सहा. प्रा. दिपक आर. आटे**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क
यवतमाळ

************

**गोषवारा(ABSTRACT )**

शेतकरी आत्महत्या ही माणवी हक्का समोरील एक गंभीर अशा प्रकारची समस्या आहे. कारण शेतकरी व शेतकरी आत्महत्या ग्रस्त कुटूंबातील व्यक्तिंना मानवी हक्कापासुन दुर रहावे लागते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात ज्या अनेक हक्कांचा अंर्तभाव केलेला आहे. त्यापैकी अनेक हक्काचा लाभ गरीब शेतकरी लोक घेवू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. मानवाच्या काही आवश्यक किंवा प्राथमिक गरजा असतात. ज्या परिस्थितीत मानवाला आपल्या या आवश्यक किंवा प्राथमिक गरजा भागविणे शक्य होत नाही त्या परिस्थितीला 'दारिद्रय' असे म्हटले जाते अशी शेतक–यांची दारिद्रयाची स्थिती निर्माण होण्यासाठी नापीकी, शासनाचे उदासीन धोरण, फसवे पॅकेज आणि फसवे कृषी मुल्य आयोग, बॅकांची कर्जासाठी टोलवाटोलवी, पिकविम्यातुन फसवाफसवी, चौकशीच्या फेरात अडकलेले प्रकरणे, सांस्कृतिक पार्श्वभूमी, भ्रष्टाचार, उद्योगाचा अभाव इ. घटक कारणीभुत असतात. यातून कौटुंबिक कलह, व्यसन, कर्जबाजारीपणा आणि शेवटी शेतकरी आत्महत्या अशा समस्या निर्माण होतात. मानवाच्या निवनात वरिल समस्या निर्माण झाल्यामुळे अनेक व्यक्तींना मानवी हक्कापासून दूर करण्यासाठी व्यक्तीगत व सामुहिक प्रयत्नाची गरज असते. त्यासाठी नवनविन उपाय योना शोधून त्याचा अवलंब करणे आवश्यक असते. शेतकरी आत्महत्या समस्येची निव्रता कमी करण्यासाठी कृषी क्षेत्राचा विकास करणे पाणि व विजेची मुबलकता,



Scanned by CamScanner

शासनाचे दिर्घकालीन योजना, शेतीमालाला हमी भाव, आडत, हमाली, दलालीवर नियंत्रण, तंत्रज्ञानाचा वापर, विकास योजनेचे विकेंद्रीकरण करणे. इ.वरिल उपाय योजनाची काटेकोरपणे व प्रभावीपणे अमलबजावणी केल्यास शेतकरी आत्महत्यामच्या समस्येपासून मुक्ती मिळविता येईल व शेतक—यांना त्यांच्या मानवी हक्काचा आस्वाद घेता येईल त्यामुळे शेतकरांच्या सर्वांगिण विकास साधण्यास हातभार लागले.

**प्रस्तावना (Introduction)**

मानवी हक्कापासु वंचित राहीलेल्या व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करून घेणे षक्य होत नाही किंवा मानवी हक्क नाकारण्यात आले तर 'मानव' या नात्याने तिच्या जिवनात अनेक कमतरता व उणिवा निर्माण होतात म्हणुन मानवी हक्क हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक आहेत असे वंचित रहावे लागल्यामुळे कोणत्याही देशामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. त्यापैकी शेतकरी आत्महत्या ही एक महत्वपुर्ण समस्या आहे.

शेतकरी आत्महत्या संपूर्ण देशाला भेडसावणारी प्रमुख समस्या आहे तर विदर्भ हे तर शेतकरी आत्महत्याची राजधानीच झाली आहे. याला इतरही राज्य अपवाद नाही परंतु त्यांच्या तुलनेत महाराष्ट्र आणि त्यातही विदर्भात शेतक—यांच्या आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे.

**मानवी अधिकाराचा अर्थ :—**

**रॅण्डहाउस विश्वकोश—**

मानव अधिकार म्हणजे व्यक्तील जन्माने प्राप्त झालेले अधिकार, जे व्यक्तील सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

**रॅण्डमहाऊस विश्वकोश**

मानव अधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले अधिकार, जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

**रॅण्डमहाऊस विश्वकोश—** मानव अधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले अधिकर, जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

**मॉरिस कॅटसन:—** मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून त्यांचे उल्लगन राज्यालाही करता येत नाही.

**इवार्किनः**

मानव अधिकार हे मानवाला प्राप्त झालेले असे अधिकार आहेत, की ज्यांचे सार्वजनिक हितासाठीदेखील राज्याकडून उल्लंघन होऊ शकत नाही.

**मॉरिस कटसन :**

मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून त्यांचे उल्लगन राज्यालाही करता येत नाही.

**मानवाधिकार आदर्श संकल्पना :**

समाजामध्ये आदर्श वास्तवामध्ये आणण्यासाठीच, योग्य दिशेने वाटचाल करण्यासाठीच ठेवली जातात. प्राचीन काळी गौतम बुद्धाने, वर्धमानाने, मध्ययुगात बसवेश्वर, कबीर तर आधुनिक काळात म.फुले, म.गांधी व डॉ. आंबेडकरांनी धर्माच्या माध्यमातून सांगितलेली आदर्श ही मानवतावादासाठीच, मानवी हक्काच्या रक्षणासाठीच सांगितली आहेत. परंतु मानव मूळातच स्वार्थी, महत्वाकांक्षी प्राणी असल्याने त्याने नेहमीच ही मानवतावादी तत्वे, आदर्श बाजुला ठेवून स्वस्वार्थ साधला आहे. त्यामूळेच प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या दुसऱ्याचे शोषण, अन्याय करून दुसऱ्याचे अधिकार हिरावलेले आहेत. त्यामूळे घटनेच्या कायदयाच्या माध्यमातून या तत्वानां अधिष्ठान देण्याचा प्रयत्न आधुनिक काळात होत आहे. युनोच्या (UNO) कलम १, १३, ५५, ५६, ६२, ७३ व ७५ नुसार भेदाभेदाशिवाय सर्वांना मानवी हक्क प्राप्त करून देण्याची जबाबदारी निश्चित केली आहे. त्यानुसार निश्चित केलेली जवळपास ३० मापदंड कमिअधिक प्रमाणात भारतीय राज्यघटनेने स्विकारली आहेत. राज्यघटनेच्या कलम भाग तीन मधिल कलम १२ ते ३५ पर्यंत मूलभुत हक्काची चर्चा केली आहे. यातील बहुतांश मापदंड आदर्श स्वरूपाची आहेत ही आदर्श मुल्य वास्तवात येणे किंवा आणणे अत्यंत महत्वाचे आहे.

**मानवाधिकार**

माणसाला माणूस म्हणून जगू देण्याचा अधिकार

न्याय म्हणजे मानवाधिकार

एखादे कार्य करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या कायद्याशी किंवा

घटनेशी सुसंगत असा विशेषाधिकार

मानवाच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक मुल्यधारित प्रणाली म्हणजे

मानवाधिकार होय.

**आत्महत्या म्हणजे काय**



Scanned by CamScanner

आत्महत्या मृत्युचा असा एक प्रकार आहे ज्यात बळी जाणारी व्यक्ति सकारात्मक किंवा नकारात्मक क्रियेच्या द्वारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्वतः मृत्यूला कवटाळते.

**शेतकरी आत्महत्या निकष**

**१. आवश्यक गरजांची पुर्तता न होणे**

व्यक्तिच्या प्राथमिक गरजेच्या पुर्ततेवरही गरीबीचे निकष ठरविले जातात. गरज ही मूलत सापेक्ष कल्पना असली तरीही अन्न वस्त्र निवारा व आरोग्य या मानवाच्या अत्यंत मूलभूत गरजा समजल्या जातात. त्यात अलिकडे शिक्षणाचाही समावेश केला जातो. एकूण शेतक—याला आपल्या कुटूंबाच्या आवश्यक गरजांची पुर्तता करणे शक्य होत नाहीकारण निसर्गावर अवलंबून शेती, पारंपारिक शेती, नापिकी, सावकारी कर्ज, इ. कुटूंब दारिद्र्य रेषेखाली जिवन जगत आहे.

**२. सकस आहार**

व्यक्तिचे आरोग्य चांगले राहण्यासाठी तिला चौरस आहाराची मिळणे गरजेचे असते. व्यक्तिपरकव्यायाम किंवा कष्ट आणि अन्य गोष्टी यामुळे तिच्या शरीराची झीज होते. ती भरून काढण्यासाठी व्यक्तीला अन्नात काही ठराविक उष्मांक मिळणे आवश्यक असते. परिस्थितीमुळे अशा प्रकारचा चौरस आहार घेणे शक्य होत नाही यामुळे शेतक—यांत निर्माण होणारी उदासिनता आणि यातून उद्भवणा—या शेतकरी आत्महत्या म्हणजेच उत्पादन करणारा या जगाचा पोशिंदाच स्वतः उपाशी पोटी आपले जिवन जगत आहे.

**३. दरडोई उत्पन्न :**

किमान आवश्यक गरजा भागविण्यासाठी आवश्यक तेवढे व्यक्तींचे मासिक उत्पन्न आहे काय या आधारावर ती सदृढ शेतकरी ठरविल्या जाते. विदर्भात एका वर्षाचा खर्च आणि उत्पन्न याचा विचार केल्यास प्रत्येक एकरात कापुस या पिकाला साधारणता ८७५० इतका वार्षिक खर्च येतो तर खर्च वजा करता एका एकरात विदर्भातील शेतक—याला निव्वळ नफा ३२५० रूपये होतो. विदर्भातील अल्पभुधारक शेतक—यांचा विचार केल्यास त्याचे वार्षिक उत्पन्न फक्त शेतीचे सरासरीसह विचार केल्यास ३५,००० ते ४०,००० रूपया पैक्षाही उत्पन्न कमी आहे. यामुळे कुटूंबाचे पालन पोषण होणे शक्य नाही अश्या वेळेस कुठलेही मार्ग उपलब्ध नसल्यास शेवट कदाचीत आत्महत्या हाच मार्ग शेतक—यांन पुढे दिसतो.

**शेतकरी आत्महत्या कारणे**

खर्चावर आधारीत उत्पन्नाचे भाव नसणे नापिकी

निसर्गावर अवलंबुन शेती

शेत मजुरीच्या वाढलेल्या किंमती

पारंपारीक शेती पद्धती

सावकारी कर्ज : व्यसन

किटकनाशकांचे वाढलेले भाव.

खत-बि-बियाण्यांचे वाढते भाव.

वीज आणि पाणी यांची कमतरता

सरकारचे कृषीकेंद्रावर नियंत्रण नसणे

**शेतकरी आत्महत्यामागील कारणे:—**

खर्चावर आधारीत उत्पनाचे भाव नसणे/ नापिकी.

निसर्गावर अवलंबुन शेती

शेत मजुराची वाढलेली किंमत

परंपारीक शेती पध्दती

सावकारी कर्ज/व्यसन

रासायनीक खत, बियाणे, किटकनाशके यांचे वाढलेले भाव

सरकारचे कृषी केंद्रावर नियंत्रण नसणे

वीज आणि पाणि यांची कमतरता

**शेतकरी आत्महत्यांचे मानवी हक्कांवर होणारे परिणाम**

शेतकरी आत्महत्याचा मानवी हक्कांशी आतिशय जवळचा संबंध आहे. कारण दारिद्र्याच्या, कर्जबाजारीच्या खाईत खितपत पडलेल्या शेतक—यांना त्याचा लाभ घेता येत नाही आणि जिवण जगण्याच्या अधिकारापासून ते वंचित राहतात.

**१. शेतकरी प्राथमिक मूलभूत सुविधांपासून वंचित:—** आपल्या विदर्भातील शेतक—यांच्या परिस्थीचा विचार केल्यास आजही तो पारंपारिक शेतीवर अवलुबून आहे तो आधुनिक तंत्रापासून दूर आहे. सावकारी पाशामुळे, सरकारचे कृषीकेंद्रावर नियंत्रण नसणे, खर्चावर आधारित उत्पनाचे भाव नसणे यामुळे आजही त्याला आर्थिक स्वातंत्र नाही.परिस्थिती विचारात घेता केवळ शेतक—यांना साभान्य मुलभुत गरजापासुनही वंचित



Scanned by CamScanner

व्हावे लागते। उदा.शेतक—यांचा मुलांना शिक्षणच काय तर पोटभर अन्नापासुनही वंचित राहावे लागते. अनेक शेतक—यांना झोपडपट्ट्यांतुन वास्तव्य करावे लागते. अशा अभागी शेतक—यांनामुलभुत सुविधांपासुनही वंचित राहावे लागते असे समाज घटक राजकीय हक्काचा विचारही करण्याच्या अवस्थेत नसतात.

**२. शेतकरी आर्थिक शोषणाचे बळी :** राज्यातील सर्व नागरिकांना हक्क व स्वातंत्र्य यांचा समानतेने लाभ मिळविण्यासाठी काही किमान स्तरावरील आर्थिक समानतेची आवश्यकता असते. ज्या समाजात मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता असते तेथे कनिष्ठ वर्गातील लोक आर्थिक शोषणाचे बळी ठरतात. या शेतकरी वर्गातील कुटूंबांना दहंती, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक अशा सर्व प्रकारच्या हक्कांपासून वंचित राहावे लागते.

**३. शेतक—यांच्या दृष्टीने सर्व हक्क केवळ कागदावरच :** सर्व मानव जन्मतः स्वतंत्र व समान आहेत असे संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्क जाहिरनाम्यात तत्व सांगितले आहे, परंतू गरिबीचे चटके वसत असलेल्या शेतक—यांच्या दृष्टीने या स्वातंत्र्याला व समानतेला काहीच अर्थ नसतो. जॉर्ज आर्वेलच्या मार्फत सांगायचे झाले तर, समाजाच्या स्तरातील लोकांपेक्षा काहीजण समान असतात. सर्व प्रकारचे हक्क व सवलती समाजातील काही मूठभर किंवा मोजक्या लोकांच्या वाटयाला येतात. अद्यापही विदर्भातील शेतक—यांना २४ तास विज पुरवठा नाही, कालवे आहे पण त्याला वर्षेनी वर्ष पाणिच नाही, सावकारी कायद्या आहे पण सावका—यांच्या पाशातुन शेतकरी मुक्त नाही, बॅंका आहेत पण वेळेवर कर्ज उपलब्ध नाही इ. याच तुलनेत पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा या प्रदेशात संपुर्ण सुविधा आहेत. या वरूनच राज्यघटनेने दिलेले हक्क विदर्भातील शेतक—यांनसाठी फक्त कागदावरच लागु होतात.

**४. शेतक—यांच्या दारिद्रय स्थितीमुळे अनेक कुटूंबाला मानवी हक्कांपासून वंचित रहावे लागते :** संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्काविषयीच्या जाहीरनाम्यात असे नमुद करण्यात आले आहे की, प्रत्येकाला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि व्यक्तीगत सुरक्षिततेचा, सर्व माणसे जन्मतः स्वतंत्र व समान आहेत. सर्वांना समान हक्क व प्रतिष्ठा वहेत. जाहीरनाम्यात पुढे असेही म्हटले आहे की, प्रत्येकाला काम करण्याचा व आपल्या इच्छेनुसार व्यवसाय निवड करण्याचा अधिकार शिक्षणाचा मालमत्तेचा इ.ही तत्वे मानवी हक्कांच्या दृष्टीने कितीही आदर्शवत असली तरी गरिबीत खितपत पडलेल्या शेतक—यांना आणि त्याच्या कुटूंबियांना या हक्काचा लाभ घेणे शक्य होत नाही.

**५. व्यक्तिमत्व विकासाला बाधा :** प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीय विकासासाठी हक्क आवश्यक असतात. पण ज्या लोकांना गरिबीमुळे हक्कांचा लाभ घेता येत नाही. त्याच्या व्यक्तिमत्व विकासात अडसर निर्माण होतो. त्यामुळे त्यांना मानवी जिवनाचा चांगल्या प्रकारे लाभ घेता येणार नाही. म्हणूनच गरिबीत जीवन जगणाऱ्या शेतक—यांचा सर्वांगीण विकास साधने कधीही शक्य होत नाही. मनुष्यप्राणी या नात्याने जीवनातील जी सुखे व्यक्तीच्या वाटयाला आली पाहिजेत असे आपण गृहीत धरतो, ती सुखे शेतकऱ्यांच्या वाटयाला कधीच येत नाही.

**शेतकरी आत्महत्या निर्मुलनाचे उपाय**

दारिद्र्यामुळे माणवी जिवनावर विपरित परिणाम होऊन त्यातून अनेक समस्या निर्माण होतात या दारिद्र्याच्या समस्यातुन मुक्ती मिळविण्यास व्यक्तिगत सामुहिक प्रयत्नाची गरज असते. त्या काही प्रभावी उपाय योजना करने व त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक असते. शेतक—यांच्या समस्यांच्या निर्मुलनासाठी पुढीलप्रमाणे काही उपाय योजना करता येतील.

**१. कृषीक्षेत्राचा विकास करणे :** निसर्ग निर्मित शेतजमिनीत वाढ करणे शक्य नसले तरी आधुनिक तंत्रज्ञाचा वापर करून उत्पादनात वाढ करणे. शेतीचा विकास झाल्यास शेतीसंबंधित व्यवसायांना प्रोत्साहन मिळेल व दारिद्रयाचे प्रमाण कमी होईल.

**२. लोकसंख्येला आळा घालणे :** वाढती लोकसंख्या हा विकसनशील देशा समोरील सर्वात मोठा प्रश्न आहे व त्यामुळे दारिद्रयाची समस्या तिव्र होते. तेव्हा लोकसंख्या स्थिरावली तर स्वाभाविक दारिद्रयाला आळा बसेल.

**३. रोजगाराची निर्मिती :** शेती संबंधीत रोजगाराच्या अधिकाअधिक संधी निर्माण करणाऱ्या लघु उद्योग, कुटीर उद्योग यांना अधिक प्रोत्साहन देवून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर विशेष भर देणे.

**४. न्याय वितरण व्यवस्था :** देशाच्या विकासाठी आणि शेतक—यांच्या दारिद्रय निर्मुलनासाठी व मानवी हक्काच्या प्रतिष्ठापने साठी उत्पादित माल, राष्ट्रीय संपत्ती व विकासाचे फायदे सर्व समाजातील इकालच्या स्तरापर्यंत पोहचणे आवश्यक असते. त्याशिवाय दारिद्रय निर्मुलन होवू शकणार नाही.

**५. काळया पैशाची समाप्ती :** खोटे उत्पन्न दाखवून कर



Scanned by CamScanner

कुकून निर्मान झालेला गैरहिशोबी पैसा म्हनजे काळा पैसा होय. श्रीमंत व्यापारी उद्योगपती, उच्चपदस्थ व्यावसायिक, चित्रपट अभिनेते इ. खोटे उत्पन्न दाखवून मोठ्या प्रमाणावर कर वाचवितात हा काळा पैसा राष्ट्रीय उत्पनात जमा केला तर तो शेतक—यांच्या समस्यांचे निर्मुलन करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**६. बेकारी नष्ठ करने :** बेकारी व दारिद्र्य यांचा अगदी जवळचा संबध आहे. आजही ग्रामीन भागातील लोक हंगामी ४ ५ महिने वगळता बाकी दिवस बेकार असतात. म्हणून ग्रामीन भागात लोकासाठी लघू व कूटीर उद्योग रोजगाराभिमुख ग्रामीण विकास योजना निर्मान करून बेकारी नष्ट केली पाहिजे म्हणजे स्वाभाविकच शेतक—यांच्या स्थीतीत सुधार होईल.

**७. विकास योजनांचे विकेंद्रीकरण :** शासन पातळीवर शेतक—यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी विविध योजना सुरू केल्या जातात परंतू त्या योजना प्रत्यक्षात गरजु पर्यंत पोहचत नाही. तेव्हा शासकीय योजनाचे लाभ शेवटच्या गरजू लोकांपर्यंत पोहचतील तेव्हाच शेतक—यांच्या समस्या कमी होईल यासाठी योजनाचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक असते.

**निष्कर्ष :**

शेतकरी आत्महत्या ही माणवी हक्का समोरील एक गंभीर अशा प्रकारची समस्या आहे कारण शेतकरी आत्महत्याउंनस्व जगातील अनेक शेतकरी आणि त्याच्या कुटूंबातील व्यक्तींना मानवी हक्कापासुन दूर राहावे लागते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्काच्या जाहिरनाम्यात त्या अनेक.हक्काचा आर्तभाव केलेला आहे त्यापैकी अनेक हक्कांचा लाभ गरीब शेतकरी वर्ग घेवू शकत नाही ही वस्तूस्थिती आहे. परंतू कोणतीही समस्या कायमस्वरूपी नसते फक्त त्यासाठी गरज आहे ती शेतक--यांचे दारिद्र्य निर्मुलनासाठी व्यक्तीगत, समाजाने, स्वंयमसेवी संस्थानी, संघटनानी सामुहिक पातळीवर प्रयत्न करून प्रभावी उपाय योजना करणे व त्याची काटेकोर अमलबजावणी केल्यास शेतकरी आत्महत्या या समस्यापासुन मुक्ती मिळून माणवी हक्कांचा लाभ घेता येईल.

परंतु हे खरे असले तरी एकूण लोकसंख्ये पैकी शेतक—यांची संख्या अधिक असून सुध्दा आज त्यांच्या गळ्याला दोराचा फास आहे. संयुक्त राष्ट्रसंघ जागतीक स्तरावरून शेतकरी आत्महत्या संदर्भात कार्य करीत असेल, भारत सरकार न्यायालय, मानव अधिकार आयोग यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करत असले तरी लक्षावधी शेतकरी आपल्या जिवन जगण्याच्या नैसर्गिक हक्कापासुन, मानवी हक्कापासुन वंचीत आहेत हे सत्य आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची:**

पाटील व्ही.बी., ''मानवी हक्क'' के सागर पब्लिकेशन्स, पुणे.

क—हाडे बी. एम., भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापूरे ऑन्ड कं पब्लिसर्स नागपूर

भोळे भा.ल., भारतीय राज्यव्यवस्था, पिंपलपूरे ॲण्ड कंपनी पब्लिसर्स नागपूर

लोटे रा. ज., भारताचे शासन व राजकारण, पिंपळापुरे ऑण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

पांगुळे—बारहाते नंदा, आत्महत्या वैदर्भीय बळीराज्याच्या—आर. बी. प्रकाशन, नागपूर.

International Law and Human Rights Edition -17, 2010



Scanned by CamScanner

Issue-48, Vol-02 April- 2018 ISSN 2394-5303

# Printing Area®

International Multilingual Refereed Research Journal




Editor
Dr.Bapu G.Gholap

14) AN EMPIRICAL STUDY ON FINANCIALPPERFORMANCE ....
**HETAL JITENDRA WAGHELA Gujarat** || 71

15) Agricultural Marketing: Its Challenges and Opportunities in India
**Prof. Dattatray Vishwas Nalage, Dist. – Kolhapur** || 79

16) The Problem of Trafficking of Women and Children in India : Analytical Study
**Mrs. Bhagyashri Amit Dhumale, Washim** || 84

17) शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये शेतीपूरक व्यवसायाचे योगदान
सुभाष राजेन्ना बुध्देवार, प्रा.डॉ.टि.व्ही.पोवळे,नांदेड || 92

18) गोपाळ गणेश आगरकरांच्या सामाजिक व राजकीय विचारांची प्रासंगिकता
प्रा.श्रगिरे बालाजी सायांना, नांदेड || 96

19) स्त्री मुक्तिगाथेचा प्रत्यय देणारा काव्यसंग्रह - 'हिरवे ऋतू उतरवून'
**प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा. बिभिषण देशमुख, उस्मानाबद.** || 98

20) वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी मराठी वृत्तपत्रांनी दिलेला लढा व नवाकाळ वृत्तपत्रांची भूमिका
घोलप उर्मिला सुभाष,मुबई. || 101

21) संत भर्गिवान्नबाबांचे अंधश्रध्दा न्रिर्मूलन्न ार्य
**राहुल बळीराम जायभाये** || 106

22) महाराष्ट्रातील पाणी टंचाई आणि पानी फाउंडेशन
डॉ. गणेश आर. गाडेकर, यवतमाळ || 109

23) मानवी अंतर्मनातील गूढ संवेदना म्हणजे 'विध्वरूप': जगदीश पाटील
**प्रा.डॉ.शशिकांत पाटील,जालना** || 113

24) भारताचे सीमावर्ती देश: परस्पर संबंध
सहा. प्रा. कल्याण आश्रु वरळे, बीड || 117

25) लक्ष्मण गायकवाड यांच्या साहित्यातील सामाजिक चित्रण
प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे, जि.बीड || 119

26) आंबेडकरी सत्याग्रहाचे समाजावरील परिणाम
प्रा. डॉ. कातळे सुरेश अंबादास, लातूर || 124


https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

अंधश्रध्दा आणि चमत्कारावर विश्वास नव्हता.

४) संत भगवानबाबांनी सत्य आणि अहिंसा ही तत्त्वे प्रस्थापित करुन आपल्या समाजप्रबोधन कार्याला वेगळं वळण दिले होते.

## संदर्भसुची


१) गित्ते गंगाधर, मुलनिवासी संत भगवानबाबा सानप महाराज आणि वारकरी संतांचे आंदोलन, मुलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे प्र.आ. २०११ पृ. ६१

२) तत्रैव पृ. ६२

३) तत्रैव पृ. ६०

४) बोडखे जनार्धन, श्रीसंत भगवानबाबा दसरा विशेषांक २०१२, पाथर्डी पृ. ३०

५) तत्रैव पृ. ३०

६) मिसाळ भ.वा., राजयोगी श्रीसंत भगवानबाबा - सर्वांगिण चरित्र २०१३ पृ. १३७

७) तत्रैव पृ. १३८

८) गित्ते गंगाधर, मुलनिवासी संत भगवानबाबा सानप महाराज आणि वारकरी संतांचे आंदोलन, मुलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे २०११ पृ. ६३

९) पुरी दि.स., वंजारी समाज परिचय व विकास पुस्तिका, माहिती प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी प्र.आ. २०१५ पृ. ४६


❐ ❐ ❐

22

# महाराष्ट्रातील पाणी टंचाई आणि पानी फाउंडेशन


डॉ. गणेश आर. गाडेकर
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज
ऑफ सोशल वर्क, यवतमाळ


***********

पाण्याचा दुष्काळ ही आपल्या महाराष्ट्रातीलच नाही तर संपूर्ण देशातील महत्वाची समस्या बनली आहे. मागील अनेक वर्षापासून महाराष्ट्र हा पाण्याच्या दुष्काळाख्राली आहे. मराठवाड्याचे जर दृश्य आपण डोळ्यासमोर घेतले तर एक-एक कळशी पाण्यासाठी महिला व मुले पाण्यासाठी पायपीट करताना डोळ्यासमोर दिसतात.

२०१२ साली टी. व्ही. सर सत्यमेव जयते या कार्यक्रमाची सुरुवात झाली. सत्यमेव जयते या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशातील अनेक सामाजिक समस्यांचा मागोवा घेण्यात आला. फक्त देशातूनच नव्हे तर जगभरातून असंख्य लोक टी. व्ही. आणि इंटरनेटच्या माध्यमातून या कार्यक्रमाशी जोडले गेले. कार्यक्रमात मिळणाऱ्या सूचना नुसार अनेकांनी कामे केली होती.

सत्यमेव जयते कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्न मांडण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आलेल्या सूचना व उपयांमुळे लोकांमध्ये बदल दिसून येऊ लागले. सदर कार्यक्रमामुळे होणाऱ्या बदल व परिवर्तनाविषयी अनेक बातम्या त्यांना कळू लागल्याने सत्यमेव जयतेची टीम अतिशय आंनदी झाली. यातून त्यांच्या लक्षात आले की लोकांना परिवर्तनाची गरज आहे.

म्हणून त्यांनी पाणी टंचाई या समस्येवर काम करण्याचे ठरविले. पाणी टंचाई ही एक अशी समस्या आहे जी सगळीकडे दिसून येते. गाव असो वा शहर पाणी समस्या मात्र सर्वत्र आहे. येणाऱ्या दिवसात पाणीविषयी काय परिस्थिती असेल याचा विचार सुध्दा करता येत नाही. खास करुन गावात कारण जिथे पाणी नाही तिथे शेती नाही. अनेक स्त्रियांचा दिवसभरातील जास्तीत

जास्त वेळ पाणी आणण्यासाठी जातो. अनेक मुलांच्या शाळेला वेळ टँकरची वाट पाहण्यात जाते. पाणी टंचाईच्या या जीवघेण्या परिस्थितीला कंटाळून अनेकजण गाव सोडून शहराकडे जात आहेत.

जागतिक स्तराचा विचार केला असता भारत देश पाण्याच्या बाबतीत गरीब नाही, अन्य देशाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. तरी देखील आपल्या देशामध्ये पाणी टंचाईची भीषण समस्या का जाणवते याचा विचार करण्याची गरज आहे.

यावर पानी फाऊंडेशनच्या टीमने बराच अभ्यास केला. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक खेड्यापाड्यांना भेटी दिल्या. शेती या विषयातील तज्ञ अशा अनेक लोकांची भेट घेतली. या तज्ञाकडून अडचणी जाणून घेतल्या. या अभ्यासामुळे असे लक्षात आले की, ही समस्या मानव निर्मित आहे. केवळ एकटा निसर्ग यासाठी जबाबदार नाही. अभ्यासानुसार अशी काही गावे आहेत जी कोरडवाहू क्षेत्र असूनही हिरवीगार आहेत. ना सरकार या गावासाठी वेगळी व्यवस्था करते ना इथे जास्त पाऊस पडला होता.

राळेगणसिध्दी, हिवरेबाजार यासारख्या गावामध्ये शेतकरी वर्षभरात तीन पिके घेतात. पण आजुबाजुच्या गावामध्ये मात्र पिण्याच्या पाण्याचे टँकर येतात, मग लक्षात आले की, इतर गावांच्या तुलनेत या गावामध्ये मोठा फर होता तो म्हणजे गावाच्या लोकांनी एकमेकांमधले हेवेदावे बाजुला ठेवून पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी एकत्र आले. समाजात अनेक कारणांमुळे पडलेल्या भेगा भरल्या गेल्या त्यामुळे तिथे पाणी टिकले या सगळ्या गावांनी एकत्र येऊन आपल्या गावामध्ये अत्यंत कमी खर्चात होणारे जलसंधारण आणि पाणलोट क्षेत्राचे काम केले होते. या कामाचा परिणाम म्हणजे तेथील भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली. या गावावर पडलेल्या पाण्याचा एकही थेंब वाहून न जाता, पावसाच्या पाण्याला कोणत्या ना कोणत्या मार्गाने साठवून ठेवले गेले. हे काम प्रत्येक गाव, प्रत्येक शहरात करता येण्यासारखे आहे. प्रत्येक गाव हिरवेगार व समृध्द होऊ शकते. कारण हे काम तांत्रिकदृष्ट्या अत्यंत सोपे आणि कमी खर्चाचे आहे. पानी फाउंडेशनच्या टीमने केलेला अभ्यास शासनसोबत शेअर केला, महाराष्ट्राला पडलेला पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले हे कळल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी या कार्याला मदत करण्योच आश्वासन दिले. यासोबतच बऱ्याच संस्था, शेतकरी, उद्योगपती, तज्ञ तसेच सेलीब्रेटीज हे सोबत आले. अशा प्रकारे पानी फाउंडेशनची सुरुवात झाली, पाणी टंचाई कायमची सोडविणे हे या संस्थेचे ध्येय आहे.

महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी आमीर खान व किरण राव यांनी २०१६ मध्ये ना नफा तत्वावर पाणी फाउंडेशन या कंपनीची स्थापना केली. सुरुवातीला पाणी फाउंडेशन फक्त महाराष्ट्रातील पाण्याच्या समस्येवर काम करीत असे. महाराष्ट्र सरकारने गावपातळीवर पाणलोट व्यवस्थापन करण्यासाठी जलयुक्त शिवार हा महत्वाकांक्षी उपक्रम सुरु केला आहे. या माध्यमातून स्थानिक पातळीवर जलसंधारणाचे काम सुरु आहे. या कामांना एका वेगळ्या पध्दतीचा दृष्टिकोन देण्याचे काम पाणी फाउंडेशनने केले आहे.

पाणी फाउंडेशनच्या मते, पाण्याची समस्या सोडविण्याची सर्वात मोठी शक्ती आणि क्षमता लोकांमध्येच आहे. एकदा का ही क्षमता जागृत झाली तर पाण्याचं संकट दूर करण्याच्या प्रयत्नांना गती येईल.

**पाणी फाउंडेशन तीन प्रमुख आघाड्यांवर काम करते.**

१. प्रेरणा : लोकांना याची खात्री पटायला हवी की स्थानिक पातळीवर पावसाचं पाणी वाचवणं हाच जलसुरक्षेचा खात्रीशीर मार्ग आहे. शेतकरी, उद्योगपती, लहान-मोठा प्रत्येक नागरिक या चळवळीचा एक भाग झाला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या मनात ही भावना रुजली पाहिजे की या कामात माझी एक महत्वाची भूमिका असणार आहे आणि ती मी सहज आणि हसत खेळत पार पाडू शकणार आहे. यासाठी पाणी फाउंडेशन जनसंपर्काच्या प्रत्येक माध्यमाचा व डिजिटल मिडीयाचा वापर करत लोकांचं मनोरंजनातून शिक्षण करेल त्याद्वारे त्यांना प्रेरित करेल आणि या चळवळीशी त्यांच एक भावनिक नातं प्रस्थापित करेल.

२. प्रशिक्षण : पाणी फाउंडेशन प्रत्येक गावातील पाच लोकांना पाणलोट व्यवस्थापनाचं प्रशिक्षण देण्याचं काम करील. या संपूर्ण प्रक्रियेत साधारण अडीच लाख लोक हे प्रशिक्षण पूर्ण करतील. या प्रशिक्षणाचे दोन प्रमुख घटक असतील.

अ) पाणलोट विकास आणि जलसंवर्धन योजनांचे तांत्रिक प्रशिक्षण

ब) आपापल्या गावातील पाणलोट योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गावातील सर्व लोकांची एकजुट घडवून आणणारे सक्षम नेतृत्व निर्माण करणे.

३. व्यासपीठ : तज्ञ लोकांकडून मार्गदर्शन शासकीय मदत लोक समुहाकडून निधींचं संकलन सत्यमेव जयते वॉटर कप - २

…ा २०१७ मध्ये संपन्न झाला. यामध्ये महाराष्ट्रातील ३० तालुके सहभागी होते. ८ एप्रिल ते २२ मे २०१७ या दरम्यान ही स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्रातून १३०० पेक्षा जास्त गाव सहभागी झाली होती. यातून जी गावे पाणलोटाच योग्य काम करेल त्यांना बक्षिसे होती. राज्यस्तरावर प्रथम पारितोषिक ५० लाख, द्वितीय पारितोषिक ३० लाख व तृतीय पारितोषिक २० लाख होते व तालुक्यातील सर्वोत्कृष्ट गावाला १० लाख असे बक्षिसे होती.

सत्यमेव जयते वॉटर कप - २ मध्ये नागपूर विभागातून फक्त आर्वी तालुक्याचा सहभाग होता. आर्वी तालुक्यातील ५२ गावांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. यातील काकडदरा या गावाला राज्यस्तरावरील प्रथम पारितोषिक (५० लाख रुपये) प्राप्त झाले.

काकडदरा या गावाने सतत ४५ दिवस काम करुन लोकसहभागातून गावात संपूर्ण जलसंधारणाचे काम केले. या दरम्यान या गावात अशी काय जादू झाली की गावाने एकत्र येऊन काम केले.

**साहित्य परिक्षण :**

दरवर्षी महाराष्ट्रातील हजारो गावांना दुष्काळाची झ ळ बसते.

लाखो आयुष्य पाण्याच्या दुर्भिक्ष्याने उध्वस्त होतात.

परंतु हा दुष्काळ प्रामुख्याने निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे.

विकेंद्रीत जलसंधारण हा दुष्काळावर मात करण्याचा वैज्ञानिक उपाय आहे.

गावकऱ्यांच्या सामुहिक कष्टातूनच हे साध्य करता येईल.

संवादाच्या माध्यमातून जनमाणसाला जागृत करणे आणि प्रशिक्षणातून सक्षम करणे हे पाणी फाउंडेशनचे ध्येय आहे.

महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सुरु झालेली लोकचळवळ ..... पाणी फाउंडेशन

पाणी फाउंडेशनने १ मे रोजी मराठवाड्यातील चार गावांमध्ये 'चला गावी' मोहीम आयोजित केली आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत ही मोहीम दुष्काळमुक्तीसाठी राबविण्यात येणार आहे. यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील ०२ व बीड आणि लातूर जिल्ह्यातील प्रत्येकी एका गावाचा समावेश करण्यात आला आहे.

सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धेत सहभागी असलेली गावे जलसंधारणाच्या कामासाठी आणि दुष्काळमुक्तीसाठी सर्व एकत्र येऊन मेहनत घेत आहेत. गावांचा हा उत्साह पाहुन वेगवेगळे सिने अभिनेतेही यात आपला सहभाग नोंदवत आहेत. अभिनेता अमिरखानने पत्नी किरण राव सह निलंगा तालुक्यात एक दिवस गावांना भेट दिली. शहरातील नागरिकांनी सहभागी होऊन गावात श्रमदान करावे, असे आवाहन पाणी फाउंडेशन आणि अमिरखान यांच्या मार्फत करण्यात येत आहे. (हिंदू इंडिया) m.marathi.eenduindia.com ३०.०४.२०१७

दुष्काळाचा सामना करीत असलेल्या महाराष्ट्रातून पाणीटंचाईच संकट कायमचं दूर व्हावं हे स्वप्न उराशी बाळ्गून अभिनेता आमीर खान एक 'परफेक्ट' योजना घेऊन मैदानात उतरले आहे. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून राज्य सरकारच्या जलयुक्त शिवार योजनेशी सांगड घालून हा 'जलसागर' करण्याची घोषणा आज आमीरने केली. m.maharashtratimes.com १७ Feb. २०१६

राज्यातील दुष्काळग्रस्त गावांना संजीवनी देणाऱ्या आणि लोकचळवळ झालेल्या जलयुक्त शिवार ला प्रसिध्द अभिनेता अमिर खान यांच्यासह बडे उद्योगपती मुकेश अंबानी, कुमारमंगलम, बिर्ला, सुप्रसिध्द क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आदींचीही सक्रिय साथ लाभली आहे. या योजनेचा प्रचार आणि शास्त्रीय प्रशिक्षण दिले जाणार आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येकी एका दुष्काळग्रस्त तालुक्यातील एकूण ३५० गावांची निवड केली जाणार असून उत्कृष्ट काम करणाऱ्या गावांना तब्बल ५० लाख, ३० लाख आणि २० लाख रुपयांचा जल पुरस्कार दिला जाणार आहे.

दुष्काळ व पाणीटंचाईमुळे हजारो शेतकरी व नागरिकांचे हाल नेहमी होत असतात. त्यामुळे आमीर यांनी पाणी प्रश्नावर काम करण्याची इच्छा होती. जलयुक्त शिवार योजनेद्वारे सहा हजार २०० गावांमध्ये सुरु असलेले काम आणि या योजनेतील बारीकसारीक तपशील आमीर खान, सत्यमेव जयते चे दिग्दर्शक सत्यजित भटकळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी अभ्यासले. राळेगणसिध्दी, हिवरेबाजारआदि ठिकाणचे प्रयोगही पाहिले. त्यानंतर पाणी फाउंडेशनची मुहूर्तमेढ रोवल्याचे आमिर खान यांनी सांगीतले. www.loksatta.com १८.०२.२०१७

महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी आमीरखान आणि किरण राव यांनी २०१६ साली स्थापन केलेली पानी फाउंडेशन ही एक ना-नफा तत्वावर काम करणारी (not-for-profit) कंपनी आहे. पानी फाउंडेशनमध्ये सत्यमेव जयतेच्या

कोअर टीमचा समावेश आहे. पानी फाउंडेशनचे सी. ई. ओ. आहे सत्यजित भटकळ (दिग्दर्शक सत्यमेव जयते) आणि सी. ओ. ओ. रीना दत्ता.

भारतात पाणी ही मोठी समस्या आहे आणि संधीही. पाण्याच्या दुर्भिक्षाने अनेक आयुष्यांची अक्षरक्षः वाताहत होते तर पाण्याच्या मुबलकतेनं प्रत्येक मानवी आयुष्यात अनेक सामाजिक आणि आर्थिक सुसंधी निर्माण होतात. ज्या गावात मुबलक पाणी असेल त्या गावातील लोकांची शैक्षणिक पातळी उच्च असते. आणि ती लोक पाण्याची टंचाई असलेल्या गावांच्या तुलनेत अधिक आरोग्यसंपन्न, दीर्घायू आणि भक्कम आर्थिक स्थितीत असतात. (www.panifoundation.in)

पाण्याची राज्यात समस्या फार गंभीर असून या प्रश्नावर लोकसहभागातून मात करता येऊ शकते. म्हणून आम्ही पाणी फाऊंडेशनच्या वतीने राज्यात सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा आयोजित केली आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील वरुड, कोरेगाव (सातारा), अंबेजोगाई (बीड) या तीन तालुक्यातील गावांमध्ये स्पर्धा सुरु केली असून स्पर्धेत सहभागी गावांसाठी पाणी फाऊंडेशनच्या वतीने एक कोटी रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. राज्य टंचाईमुक्त होईपर्यंत पाणी प्रश्नावर सतत काम करीत राहील अशी भावना पाणी फाऊंडेशनचे संस्थापक अमिर खान याने अमरावती येथे व्यक्त केली.

श्रमदानाविषयी आमीर खान याने बोलून दाखवले होते. त्यानुसार काल येथे येऊन त्याने लोकांसोबत श्रमदान केले. आमिर खान याने वाठोडा गावच्या पाझर तलावात श्रमदान करुन तलावातील गाळ काढला. आमिर खान पुढे म्हणाला की, यावर्षी ३ तालुक्यात तर पुढील वर्षी ३० तालुक्यात आणि त्यापुढील वर्षी ३०० तालुक्यात ही स्पर्धा घेण्यात येईल. राज्य पूर्णपणे टंचाईमुक्त होईपर्यंत आम्ही ही स्पर्धा घेतच राहू. या स्पर्धेत सहभागी होणाज्या प्रत्येक गावात जलसंवर्धनाचे उपक्रम राबविले जाणार असल्याने प्रत्येकच गाव विजेता ठरेल. (राज्य टंचाईमुक्त होईपर्यंत काम करणार पाणी फाऊंडेशन - आमिर खान https://www.majhapaper.com ६.५.२०१६)

पाणी टंचाईचा सातत्याने सामना करताना आपले गाव पाण्यासाठी स्वयंपूर्ण व्हावे यासाठी 'सत्यमेव जयते' कार्यक्रमांतर्गत वॉटरकप स्पर्धेमध्ये सहभागी होऊन संपूर्ण गाव जलयुक्त करण्याचा अभिनव उपक्रम वर्धा जिल्ह्यातील अतिदुर्गम अशा संपूर्ण आदिवासीबहुल काकरदरा या गावाने यशस्वीपणे राबवला आहे. यासोबतच आर्वी तालुक्यातील २२ गावांनीही वॉटरकप स्पर्धेमध्ये सहभागी होऊन पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. जलदेवतेचे गाव म्हणून काकरदरा हे गाव संपूर्ण राज्यात ओळखले जात आहे. 'सत्यमेव जयते' या कार्यक्रमांतर्गत वॉटरकप स्पर्धा राबविण्यासाठी आर्वीचे सुमित वानखेडे तसेच त्यांच्या युवा सहकाऱ्यांनी केलेल्या दिड महिन्याच्या अथक प्रयत्नानंतर २२ गावात जलसंधारणाची विविध कामे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. यासाठी गावातील सरपंच व ग्रामस्थांचा सहभाग मिळाल्यामुळे लोकसहभागातून करावयाच्या विविध कामांना चांगला प्रतिसाद मिळाला. या संपूर्ण उपक्रमाची प्रेरणा ठरली ते गाव म्हणजे काकरदरा.

गावात पडणारा पावसाचा थेंब अडवून ग्रामस्थांनी श्रमदानाने उभ्या केलेल्या जलसंधारणाच्या उपचारामुळे पहिल्याच पावसात हे गाव पाणीदार ठरले आहे. ग्रामदेवता म्हणून जलदेवतेची प्रतिस्थापना ही या गावाचे वैशिष्ट्य ठरले आहे. वॉटरकप स्पर्धेच्या अंतिम निवडीमध्ये आपले गाव निश्चित आघाडीवर राहील हा आत्मविश्वास येथील ग्रामस्थांना आहे. जलयुक्त शिवारासोबतच गाव स्वच्छ व पर्यावरणमुक्त राहावे यासाठी प्रत्येक घरातून वाहणाज्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ७० शोष खड्डे खोदण्यात आली. तसेच विहीर पुनर्भरण व रचनांच्या दुरुस्तीची तीन कामे पूर्ण करतानाच गावात वृक्षारोपण करण्यासाठी चारशे खड्डे खोदून तेथे वृक्षारोपण करण्यात आले. (योजना, ऑगस्ट २०१७)

### संदर्भग्रंथ सूची


लोकराज्य, ऑगस्ट २०१७ पृ. ३२

m.marathi.eenduindia.com ३०.०४.२०१७

m.maharashtratimes.com १७ Feb. २०१६

www.loksatta.com १८.०२.२०१७

www.panifoundation.in

https://www.majhapaper.com ६.५.२०१६


❑ ❑ ❑

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta
UGC
Jr.No.62759
UGC Approved Refereed Journal

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal

Issue-22, Vol-10 April to June 2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

14) Use of Open-source software in Library Service
**Anant M. Thorat** || 68

15) A study of Rural Development by Strategy for Poverty ......
**Dr. Radha Bhushsan Yaday** || 75

16) RURAL TOURISM DEVELOPMENT
**Zahra Shafia** || 83

17) INTRUSION DETECTION AND PREVENTION BY IASP TO IN .....
**Begum Sabera** || 87

18) आदिवासी समुदाय विकास : वनहक्क कायदा (२००६) आणि समाजकार्य मध्यस्थी
**डॉ. गणेश आर. गाडेकर, यवतमाळ** || 96

19) मानवाधिकार व भारतातील दहशतवाद
**डॉ. संगीता एस. भुयार** || 100

20) संशोधन कार्यात ग्रंथपालाची भूमिका
**प्रा. सतीश ज. पिसे, जि. चंद्रपूर** || 101

21) भारतातील जलसिंचनाचा विश्लेषणात्मक अभ्यास
**डॉ. कारभारी बबनराव दिवटे** || 104

22) १९८० ते १९९१ या काळातील मराठी ग्रामीण कादंबरी : एक दृष्टीक्षेप
**प्रा. डॉ. कालिदास गुडदे** || 107

23) भारतीय स्त्रीवादाची परंपरा व स्वरूप
प्रा. डॉ. जगताप यु.एस. || 109

24) नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय भूमि उपयोजन : एक भौगोलिक अभ्यास
**प्रा. डॉ. यु. एस. कानवटे** || 112

25) केतन पिंपळापुरे यांची कविता : आस्वाद आणि मीमांसा
प्रा.डॉ. सुरेश दयाराम खोब्रागडे || 115

26) डॉ. आंबेडकर के महिला विषयक विचार
**डॉ. राजश्री भामरे** || 122

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

of secure multicast in wireless networks was less studied. The security aspects in multicast routing protocols relay on either routing specific security like routing structure management and data forwarding or security related to application specific like data confidentiality and authenticity.

## 11 References:


A. Perrig, R. Canetti, D. Song, and J.D. Tygar, "Efficient and Secure Source Authentication for Multicast," Proc. Network and Distributed System Security Symp. (NDSS '01), 2001.

B. Awerbuch, D. Holmer, C. Nita-Rotaru, and H. Rubens, "An On- Demand Secure Routing Protocol Resilient to Byzantine Failures," Proc. ACM Workshop Wireless Security (WiSe '02), 2002.

B. Awerbuch, R. Curtmola, D. Holmer, C. Nita-Rotaru, and H. Rubens, "ODSBR: An On-Demand Secure Byzantine Resilient Routing Protocol for Wireless Ad Hoc Networks," ACM Trans. Information and System Security, vol. 10, no. 4, 2007.

D. Bruschi and E. Rosti, "Secure Multicast in Wireless Networks of Mobile Hosts: Protocols and Issues," Mobile Networks and Applications, vol. 7, 2002.

E. Royer and C. Perkins, Multicast Ad-Hoc On-Demand Distance Vector (MAODV) Routing, Internet draft, July 2000.

E.L. Madruga and J.J. Garcia-Luna-Aceves, "Scalable Multicasting: The Core-Assisted Mesh Protocol," Mobile Networks and Applications, vol. 6, no. 2, 2001.

J. Dong, K. Ackermann, B. Bavar, and C. Nita-Rotaru, "Mitigating Coordinate Attacks against Virtual Coordinate Based Routing in Wireless Sensor Networks," Proc. First ACM Conf. Wireless Network Security (WiSec), 2008.


❑❑❑

**18**

# आदिवासी समुदाय विकास : वनहक्क कायदा (२००६) आणि समाजकार्य मध्यस्थी


**डॉ. गणेश आर. गाडेकर**

महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क यवतमाळ


************

मानवाची भ्रमंती अवस्था संपुष्टात आल्यानंतर माणूस कोठे ना कोठे तरी स्थिर होऊ लागला. जगाच्या कोणत्या ना कोणत्या तरी भुभागावर मानव आपले पाय रोवून स्थिरावू लागला. काहीनी खेड्यांमध्ये तर काहीनी औद्योगिकीरण झालेल्या शहरामध्ये आपले स्थान मिळविले. सतत प्रयत्नशील असणा-या मानवाने उदरनिर्वाहाची विविध साधने शोधून काढली व निश्चित अशी साधने गवसल्यावर त्याच्या आयुष्याला स्थिरता लाभली. परंतु मानव समाजाच काही भाग हा अगदी आदि अनादी काळापसून जंगलातच वास्तव्यास आहे. अशांना आदिवासी समाज म्हणतात.यांचे उदरनिर्वाह हा संपूर्णतः जंगलावर अवलंबून आहे. जंगलातील मध, डिंक, मोहफुले, फुले, फळ व औषधी वनस्पती, कंदमुळे गोळा करणे, मेंढी पालन, मासेमारी तसेच स्थलांतरित शेती हा वननिवासी आदिवासींच्या उपजिविकेचे साधन होय. त्यांना आपल्या गरजा पूर्ण करण्याकरिता जंगलावरच अवलंबून राहावे लागते. जंगल हेच त्यांचे घर आहे व इथेच त्यांच्या गरजा पूर्ण होतात. त्यामुळे आदिवासी हा जंगलावर म्हणजेच वनावर अवलंबून आहे.

अनुसुचित जमातीच्या संरक्षणार्थ स्वातंत्र्यपुर्व काळात अनेक कायदे करण्यात आले. १९८४ चा भुसंपादन कायदा व १९२७ चा भारतीय वन्य कायदा परंतु हे कायदे आदिवासींना संरक्षण देवु शकत नाही. हे कायदे अस्तित्वात असून देखील वनखात्याचे कार्य कायद्यास अनुसरून नव्हते. ब्रिटीश काळापासूनच आदिवासींवर एक प्रकारे अन्यायाच झाल्याचे दिसून येते. आदिवासी, वनवासी, जंगलनिवासी समाजाची पिळवणूक, शोषण करण्यात आले त्यामुळे त्यांच्यावर ऐतिहासिक अन्यायच झाला. हा अन्याय दूर करण्याकरिता शासनाने २००६ मध्ये आदिवासी व इतर वननिवासी करिता "अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) २००६, नियम २००८, सुधारित नियम २०१२" कायदा पारित केला.

केंद्र शासनाने २००६ मध्ये अनुसूचित जमाती व पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) कायदा केला. या कायद्याचे नियम जानेवारी २००८ ला लागू केले व ६ सप्टेंबर २०१२ रोजी सुधारित नियम जाहीर झाले. वनहक्क कायदा आणि सुधारित नियमांच्या आधारे महाराष्ट्र शासनाने हा शासन निर्णय घेतला आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश वनस्त्रोतांचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन आणि व्यवस्थापन करणे असा आहे. या कायद्याने अनुसुचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांना कायद्याने वैयक्तिक वनहक्क व सामुहिक वनहक्क असे दोन हक्क देण्यात आलेले आहे. वनहक्क प्रक्रिया सुरु व मान्य करण्यासाठी ग्रामसभेद्वारा ग्राम वनहक्क समिती गठित करण्यात येते ही समिती ग्रामसभेतील सदस्यांमधून किमान १० व कमाल १५ सदस्यांची मिळून गठित करण्यात येते.

परंतु शासकिय वनखात्यांचा अथवा अन्य खात्याचा कर्मचारी या समितीत नसतो. समितीची निवड करुन याच सदस्यांमधून अध्यक्ष व सचिवाची निवड करून त्यांच्या नावाच्या यादीसह ठराव ग्रामसभेमध्ये संमत केल्या जाते व हा ठराव उपविभागीय अधिका-यांकडे पाठविला जातो. वनहक्क समिती मध्ये २/३ सदस्य अनुसूचित जमातीचे व किमान १/३ महिला सदस्य असावयास हवे. त्याचप्रमाणे वनहक्काची प्रक्रिया मान्य झाल्यानंतर सामुहिक वनहक्काचे व्यवस्थापन, संवर्धन, संरक्षण व पुर्ननिर्माण करण्यासाठी नियम ४(१), (ड) नुसार ग्रामसभेद्वारा सामुहिक वनहक्क समिती गठित करण्यात येते. ही समिती आपल्या कार्याच्या बाबतीत ग्रामसभेला जबाबदार असते. ही समिती गावआराखडे, विहिर, तलाव यांचे आराखडे तयार करुन घेते. समितीमध्ये अध्यक्ष, सचिव, खजिनदार असे मुख्य तीन पद असतात. अध्यक्ष हा अनुसुचित जातीचा असणे आवश्यक आहे. या तीन पदामध्ये कोणतेही एका पदाकरिता मध्ये महिला अनिवार्य आहे. या समितीमधील सदस्य संख्या ५ किंवा ११ असणे आवश्यक आहे.

ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली या समितीने कार्य करावयाचे असते. आदिवासी आणि इतर परंपरागत वननिवासी यांच्या फायद्यासाठी सामुहिक वनसंपत्तीचे निरंतर संवर्धन व व्यवस्थापन करणे, गावाच्या क्षेत्रातील जमीन, पाणी आणि वन यांचा परिणामकारक आराखडा बनवायचा आहे. सामुहिक वनजैविक विविधता यांचे रजिस्टर ठेवायचे, या नैसर्गिक साधन संपत्तीच्या व्यवस्थापनातून प्राप्त होणारा महसुल तसेच सामुहिक वनहक्का मार्फत गाव विकासाकरिता मिळणारा निधी बँक खात्यामार्फत संनियंत्रित करावयाचे असते. तसेच वैयक्तिक हक्काचे दावे वनहक्क धारकांच्या पुराव्यांची तपासणी करणे. दावे दाखल करणे, वनहक्क कायदा, शासन निर्णय आणि धोरण यांची माहिती ग्रामसभेला देऊन प्रशिक्षण देण्याचे कार्य या वनहक्क समितीला करावयाचे असते.

राज्य शासनाने हा शासन निर्णय जाहीर करून खरे तर केंद्रीय वनहक्क कायद्यांच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी अत्यंत स्वागतार्ह पाऊल उचलले आहे. २००८ सालच्या नियमात स्पष्ट म्हटले आहे की ग्रामसभेतील सर्व वनहक्कधारकांना वन व्यवस्थापनेचे दिलेले अधिकार अंमलात आणण्याच्या दृष्टीने, वन्यजीवन धन व जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी जी समिती गठीत करण्यात येते ती म्हणजे वनहक्क समिती होय. या समिती मार्फत वनहक्क कायदा अंमलबजावणी करण्याचे कार्य सुरू होते.

आदिवासी व इतर पारंपरिक वननिवासी यांचे पारंपरिक वनहक्क मान्य करण्यासाठी वनहक्क कायदा अस्तित्वात आला आहे. परंतु वैयक्तिक वनहक्क हा वैयक्तिक स्वरुपाचा हक्क असल्याने त्याचा योग्य पाठपुरावा व्यक्तिगतरित्या केल्या जातो आणि या कायद्याने वनजमीन वहती करीत असलेल्या व्यक्तीलाच लाभ होतो हा चुकीचा गैरसमज असल्याने सामुहिक वनहक्काची मागणी गाव पातळीवरुन फारशी होत नाही. सामुहिक वनहक्कात फक्त स्मशान भूमी, खेळाचे मैदान, धार्मिक स्थळांसाठी जागा आणि शासकीय सुविधांच्या बांधकामाकरिता जागा दिल्या जाते हा देखील गैरसमज जनसामान्यात रुढ असल्याने सामुहिक वनहक्काचा खरा अर्थ आणि त्याची व्याप्ती यांचे महत्व नागरिकांना फारसे जाणवत नसल्याचे दिसून येते.

परंतु आजची पर्यावरणाची बदलती स्थिती पाहता निसर्गात होणारे बदल प्रखरपणे जाणवत आहे. यामध्ये प्रामुख्याने दिवसेंदिवस पृथ्वीचे वाढणारे तापमान, अवकाळी पाऊस, पावसाळ्यात पाऊस वेळेवर न येणे, एकीकडे दुष्काळ तर दुसरीकडे पुर या सर्व परिस्थितीचे एक प्रमुख कारण म्हणजे साधन संपत्तीचा, गौण वनउपज, नागरीकरण, शहरीकरण करण्यासाठी जंगलाचा अमर्याद वापर आणि नष्ट होत चाललेली जैव विविधता आहे. त्यामुळे सर्व परिस्थिती बदलविण्यास व पर्यायाने पुर्वापार स्थिती निर्माण करायची असेल तर आपण सर्वांनी नैसर्गिक जैव विविधतेचे संवर्धन, संरक्षण व पुर्ननिमाण करण्याची गरज आहे.

**समाजकार्य मध्यस्थी :**

वनहक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता समाजकार्याचे देखील योगदान असणे आवश्यक आहे. वनहक्क कायदा अंमलबजावणी करीत असताना शासनाकडून अनेक गोष्टीकडे दुर्लक्ष होताना दिसून येते. लोकांचा सहभाग मिळत नाही. लोक प्रशासनावर अविश्वास दार्खवित असतात. अशावेळी प्रशासनाला लोकसहभाग मिळवून कार्य करण्यात अडचणी निर्माण होत असतात. त्यावेळी लोक आणि प्रशासन या दोघांमधील दुवा बनण्याचे कार्य समाजकार्य करीत असते. प्रशासन प्रत्येक वेळेस लोकांच्या अडचणी दूर करुन

त्यांच्यापर्यंत सोयी पोहचविण्यात समर्थ नसल्याने या दोन घटकांमध्ये समन्वय साधण्याचे कार्य समाजकार्य करीत असते.

वनहक्क कायद्याची जनजागृती करुन लोकांना त्यांच्या अधिकार व कर्तव्याची माहिती पुरविण्याचे कार्य समाजकार्याद्वारे करता येते. प्रशिक्षण देणे, लोकसहभाग मिळविणे, येणा-या अडचणी / समस्या सोडविण्यास मदत करुन योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्य समाजकार्याद्वारे केल्या जाऊ शकते. वनहक्क कायद्याविषयी असणारे गैरसमज दूर करण्यात समाजाकार्याची मदत होते. कारण शासनविषयीचा असलेला राग / गैरसमज हा बऱ्याच काळापासून आदिवासी समाजात बघण्यात येतो. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनावर त्यांचा विश्वास तयार होण्यात बराच काळ लागेल ती विश्वासर्हता निर्माण करण्याचे कार्य समाजकार्यामार्फत करण्यात येऊ शकते. त्यातून प्रशासनाच्या प्रत्येक सोयी सुविधा ही त्या लोकांपर्यत पोहचण्याचे कार्य होईल. अशाप्रकारे समाजकार्याची मध्यस्थी वनहक्क कायदा अंमलबजावणीत आवश्यक आहे असे दिसते.

**संदर्भ साहित्याचा आढावा :**

**१) दैनिक वृत्तपत्र लोकमत, १५ जून २०१६** च्या अंकामध्ये वनहक्क दावे कच-याच्या ढिगा-यात या शिर्षकांतर्गत लाखांदूर येथील वृत्तप्रकाशीत झालेले आहे. त्यानुसार अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी, वनहक्कांची मान्यता बद्ध कायदा २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२ अंतर्गत लाखांदूर तालुक्यातील अतिक्रमणधारकांची प्रकरणे मागील अनेक दिवसांपासून साकोली येथील उपविभीय कार्यालयात कच-याच्या ढिगा-यात फेकली गेल्याने हितसंबंध जोपासणा-यांची प्रकरणे बाहेर काढली जात असल्याचा आरोप जि. प. सदस्य रमेश डोंगरे यांनी केला असल्याचे दिसून येते. रमेश डोंगरे यांनी त्यासंदर्भात अनेक दिवसांपासून एकही मंजुर प्रकरण तहसील कार्यालयात येत नसल्याचा कारणावरुन साकोली येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात जाऊन भेट दिली असता प्रकरणे कच-यांच्या ढिगा-यात फेकली असल्याचे चित्र जि. प. सदस्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितली. आर्थिक देवाण घेवाण करुनच नंतर त्या त्या व्यक्तीची प्रकरणे निकाली काढल्या जात असल्याचा प्रकार उघडकीस आला असल्याची स्थिती वृत्तपत्राच्या संदर्भाने पुढे येत. (दैनिक लोकमत : २०१६)

**२) लोकसत्ता मासिक, सप्टेंबर २०१५ च्या अंकामध्ये वनहक्क कायदा :** प्रश्न अंमलबजावणीचा या शिर्षकांतर्गत लेखक प्रतिभा शिंदे यांचा लेख प्रकाशीत झालेला आहे. त्यानुसार राज्यात वनहक्क कायद्याची अंमलबजावणी जिल्हापरत्वे वेगवेगळी आहे. नंदूरबार जिल्ह्यात या कायद्यानुसार ३९६१५ दावे दाखल करण्यात आले आहेत. मात्र यापैकी ३०९३१ दावे नामंजूर करण्यात आल्याने आदिवासी समुहांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. नंदूरबार हा राज्यातील सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यात या कायद्यानुसार एकूण ४७२ ग्रामस्तरीय वनाधिकार समित्या गठीत झाल्या आहेत. या सर्व समित्यांनी मंजूर करून पाठविलेले दावे उपविभागीय समितीने एवढ्या मोठ्या प्रमाणात फेटाळून लावण्याची कारणे स्पष्ट केलेली नाही. असे दिसून येते. दावे विहित नमुन्यात दाखल करणे, लिहिणे या दाव्यांच्या तपासणीची कार्यवाही त्याचे दस्तऐवजीकरण याबाबत गावसमित्यांना ही योग्यप्रशिक्षण न दिल्याने अनेक ग्रामसमित्यांना दावे दाखल करुन घेताना व त्याचे दस्तऐवजीकरण करताना असंख्य अडचणी आल्या. ब-याच ठिकाणी महसूल कर्मचा-यांनीच गावसमित्यांच्या नावाखाली परस्पर कार्यवाही पूर्ण केल्याने अनेक दावेदारांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे या जिल्ह्यातील आदिवासींना न्याय देणा-या या कायद्याच्या अंमलबजावणीच्या प्रश्नाविषयीच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राज्यातील इतर जिल्ह्यात हीच परिस्थिती आहे. अशी स्थिती लेखाच्या संदर्भातून पुढे येते. (लोकसत्ता : सप्टेंबर २०१५)

**३) दैनिक वृत्तपत्र सामना, १० मार्च २०१६** च्या अंकामध्ये पुन्हा ऐतिहासिक अन्यायाकडे या शिर्षकांतर्गत लेख प्रसारित झालेले आहे. त्यानुसार ब्रिटीशांच्या राजवटीत वनकायद्यानुसार देशातील जंगले आणि वनजमिन यावर सरकारी मक्तेदारी प्रस्थापित करुन आदिवासी आणि इतर वननिवासी समुहांच्या मूलभूत मालकी हक्कावरच गदा आणली. स्वातंत्र्यानंतरही ही परिस्थिती कायम होती. इंग्रजांनी १८६४ मध्येच वन कायदा केला आणि वनविभागाची निर्मिती झाली. पुढे हा कायदा बदलून १९२७ सालचा हिंदूस्थानी वन कायदा तयार झाला. या सर्व कायद्यांचा उद्देश वनांवर आणि वनजमिनीवर सरकारची मक्तेदारी पकड ठेवणे हा होता. या सर्व काळात जंगलात जे पुर्वीपासून राहणारे लोकसमूह होता त्यांच्यावर मोठा अन्याय झाला, २००८ मध्ये संसदेने वनहक्क कायदा पारित केला. या कायद्याच्या प्रस्तावनेतच म्हटले आहे की, या समाजावर स्वातंत्र्य पूर्वकाळात आणि नंतरही जो ऐतिहासिक अन्याय झाला त्याचे परिमार्जन करुन त्यांचे पारंपरिक हक्क पुन:स्थापित करण्यासाठी संसद हा कायदा करत आहे. या कायद्यात शेती करण्याचे व घर बांधण्याचे वैयक्तिक हक्क मान्य केले तसेच जंगल जैवविविधतेच्या संवर्धनाचे, रक्षणाचे, पुनःनिर्माणाचे व्यवस्थापनाचे सामूहिक हक्क मान्य केले. त्यानुसार वनहक्क कायदा गावाजवळच्या जंगलाची मालकी, रक्षणाची जबाबदारी आणि त्यांच्या व्यवस्थापनाचे हक्क गावाला देतो, मात्र यासाठी गावाने दावा करण्याइतपत कायद्याची माहिती त्या गावाला असते का ? आणि तो

दावा मंजुर करण्यइतपत कायद्याची महिती त्या गावाला असते का ? आणि तो दावा मंजुर करण्यासाठी प्रशासनाच यंत्रणाही तत्पर असावी लागते दोन्ही बाजूंनी वेग कमी असल्यामुळे कायदा लागू होऊन आठ वर्षे झाली. तरीही राज्यात काही पात्र गावापैकीच काहीसे गावानाच असे हक्क मिळाले आहे. अजुन ही प्रक्रिया अपूर्णच दिसून येते. असल्याची स्थिती या लेखाच्या संदभांतून पुढे येते. (दै. सामना: २०१६)

**४) दैनिक वृत्तपत्र सकाळ, १२ मार्च २०११** च्या अंकामध्ये जंगल अधिकाराच्या लढाईला आदिवासी रस्त्यांवर या शिषकांतर्गत निजामपूर येथील वृत्त प्रकाशित झालेले आहे. त्यानुसार वर्षानुवर्षे जंगलात राहणारे आणि जंगल जोपासणारे आदिवासी व अन्य परापरागत निवासी समुह यांचा जंगलावर अधिकार नव्हता. त्या विरुद्ध देशातील सर्व संघटनांनी आंदोलने केली आणि हा कायदा सरकारला करणे भाग पाडले. या कायद्याची अंमलबजावणी राज्य सरकारने तीन वर्षापूर्वीपासून सुरु केलेली असली तरी सध्या ही प्रक्रिया पूर्णपणे थंडावली असल्याचे दिसून येते सरकारच्या वेळखाऊ पणाचा फटका रायगड जिल्ह्यासह राज्यातील हजारो आदिवासींना बसला आहे. असे जनआंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयक श्रीमती उल्का महाजन यांनी सकाळ वृत्तपत्रास सांगितले. की, उपविभागीय पातळीवर पोहचलेल्या २ लाख ८८ हजार वनहक्क दाव्यांपैकी तब्बल एक लाख सात हजार (५९%) दावे फेटाळले गेले आहेत. एकूण दाव्यांपैकी केवल १ लाख ९ हजार (३२%) दाव्यांना मान्य करण्यात आले आहेत. परिणामी अनेक वर्षे वहीवाटीत असलेल्या क्षेत्रातुन आता त्यांना हाकलले जात आहे तसेच सामुहिक दावे दाखल करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न होत नसल्याची स्थितीवृत्ताच्या संदर्भाने पुढे येते. (दैनिक सकाळ : २०११)

**५) दैनिक वृत्तपत्र लोकमत ९ ऑगस्ट २०१४** च्या अंकामध्ये वनहक्काच्या प्रतिक्षेत आदिवासी या शिर्षकांतर्गत पिंपळगांव (सडक) येथील वृत्तप्रकाशित झालेले आहे. त्यानुसार केंद्रशासनाने अंमलात आणलेला आदिवासी व पारंपरिक वनहक्क कायदा प्रभावी अंमलबजावणीमुळे व प्रशासनाच्या गलथानपणामुळे धुळखात पडला असून यामुळे आदिवासी व पारंपरिक वनहक्क धारक अधिका-यांच्या महरबाणीची प्रतिक्षा करीत आहे. वनहक्क कायदा २००८ मध्ये अंमलात आला. या अंतर्गत ग्रामस्तरावरील समित्यामार्फत पाठविलेले ठराव उपविभागीय व जिल्हास्तरीय समित्यांनी परिक्षण करुन वनहक्क धारकांना त्यांच्या जमिनीचे पट्टे व सात-बारा द्यावयाचे होते. परंतु अधिका-यांच्या हयगयीमुळे मागील आठ वर्षांत ग्रामसमित्यांच्या ठरावावर कोणताही कार्यवाही न करता गरीब आदिवासीना व इतर पारंपरिक वननिवासींना वनहक्क कायद्यांच्या अधिकारपासून व त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित ठेवले जात असल्याची स्थिती वृत्ताच्या संदर्भानेपुढे येते. (दैनिक लोकमत : २०१४)

**६) कल्पवृक्ष आणि वसुंधरा यांच्या सहकार्याने OXFAM INDIA** ने वनहक्क कायद्याअंतर्गत सामुहिक वनहक्क यांच्या अंमलबजावणीच्या कार्याचा अहवाल सादर केला आहे. त्यानुसार यवतमाळ जिल्ह्यातील GSTM अंतर्गत ३२ गावांमध्ये ५ गावांमध्ये दावे दाखल झाले आहेत. त्या गावांमध्ये चिंचघाट, आवलगाव, धाबादी, बोरगांव- बांधी आणि पवनार शिर्षक प्राप्त गावे आहेत. मारेगांव व झरीजामणी तालुक्यातील २३ सामुहिक वनहक्क दावे जानेवारी २०१५ मध्ये मंजुर झाले आहेत व त्यांचे शिर्षक वितरण प्रलंबित आहेत. (Citizen.report २०१५ - fra.og.in visited १३/१०/२०१६)

**७) TERI ( THE ENERGY and Resources institule)** द्वारे महराष्ट्र राज्य शासनाला सादर केलेल्या अहवालात महाराष्ट्रातील वनहक्क कायदा आणि हवामानातील मर्मभेदी बदलांची अंमलबजावणी आणि वननिवासी समुदायाचा अभ्यास करण्यात आला. त्यात महाराष्ट्र शासनाला शिफारसी केल्या आहेत.पुढील प्रमाणे...

महाराष्ट्र राज्य शासनाने आदिवासी कामकाज मंत्रालय भारत सरकारस पत्र लिहावे की, १४६६८ हेक्टर वनक्षेत्राच्या प्रस्तावित जंगल अधिनियम प्रस्तावाचा फेर विचार करावा. जे वनहक्क कायदा २००६ च्या तरतुदी विरुद्ध आहे.

हरितगृह वायु उत्सर्जन हे वनहक्क कायदा २००६ च्या तरतुदी विरुद्ध आहे. त्याकरिता उपशमन उपक्रम सोडविण्यासाठी योग्य अंमलबजावणी करावी.

(TERI - September२०१४-wwww. mahaforest.nic.in visited १३/१०/२०१६)

**८) आदिवासी कामकाज मंत्रालय भारत सरकारच्या वतीने जुलै २०१६** मध्ये वनहक्क कायदा २००६ च्या अंमलबजावणीबाबत माहिती सादर करण्यात आली. त्यानुसार ३१/०७/२०१६ पर्यंत संपूर्ण भारतात वनहक्काचे एकुण ४१,८२,८०६ दावे भरण्यात आले त्यात वैयक्तिक वनहक्काचे ४०,७२,२४१ दावे होते तर सामुहिक वनहक्काचे १,१०,५६५ दावे होते. महाराष्ट्र राज्याचा विचार केला असता एकुण वनहक्काचे दावे ३,५५,६०६ होते वैयक्तिक वनहक्काचे ३,४६,६५३ दावे व सामुहिक वनहक्काचे ८,९५३ दावे होते. त्याच प्रमाणे पारित वनहक्क दावे भारतात ३१/०७/२०१६ पर्यंत १६,८४,६२७ होते त्यात वैयक्तिक वनहक्क दावे १६,४०,१६० व सामुहिक वनहक्काचे दावे ४४,४६७ होते. महाराष्ट्रात पारित केलेले वनहक्कचे दावे एकुण १,१०,२५० त्यात वैयक्तिक वनहक्क दावे १,०६,०६३ तर सामुहिक वनहक्काचे दावे ४,१८७ होते. त्याच बरोबर वनहक्क प्राप्त जमिनीचे वाटप एकुण भारतात १,०२,१३,९४९.२० एकर त्यातील वैयक्तिक

वनहक्क यात ५६,६८,५९१ एकर व सामुहिक वनहक्कात ४६,४५,३५८ एकर वनजमिनीचे प्रमाणपत्र देण्यात आले. महाराष्ट्रात एकुण १६,२४,०६५.९९ एकर वनजमीचे वनहक्क प्रप्त प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. त्यात वैयक्तिक वनहक्कामध्ये २,३१,४२१.२१ एकर तर सामुहिक वनहक्कासाठी १३,९२,६४४.७८ एकर जमिनीचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहेत.

(आदिवासी कामकाज मंत्रालय भारत सरकार - Tribal.nic.in- visited १२/१०/२०१६)

### संदर्भ सूची :

दैनिक लोकमत, १४ जुन २०१६, वनहक्क दावे कच-याच्या ढिगा-यात ......

लोकसत्ता, सप्टेंबर २०१५ लेखक - प्रतिभा शिंदे, लोकसंघर्ष मोर्चा तळोदा) वनहक्क कायदा : प्रश्न अंमलबजावणीचा.

दै. सामना, २०१६, लेखक- मिलिंद थत्ते, पुन्हा ऐतिहासिक अन्यायाकडे.

दैनिक सकाळ, १२ मार्च २०११, जंगल अधिकाराच्या लढाईला आदिवासी रस्त्यांवर.

दैनिक लोकमत, ९ ऑगस्ट २०१४, वनहक्काच्या प्रतिक्षेत आदिवासी.

fra.org.in visited १३/१०/२०१६

www.inahaforest.nic.in visited १३/१०/२०१६

tribal.nic.in visieed १२/१०/२०१६.

❑❑❑

19

# मानवाधिकार व भारतातील दहशतवाद

डॉ. संगीता एस. भुयार
या. द. व देशमुख महाविद्यालय तिवसा.

**********

मानवाधिकार व दहशतवाद हे राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुद्दे आहेत या दोन्ही संकल्पना एकमेकांपासुन भिन्न आहे. मानवाधिकाराचा मार्ग हा शांततेचा तर दहशतवादाचा मार्ग हा हिंसात्मक आहे. आज २१ व्या शतकात दहशतवादामुळे मानवाधिकाराचे होत असलेले उल्लघंन अनेक जागतिक समस्यापैकी एक गहन अशी समस्या आहे. यांची दाहकता महासत्ताक देशापासुन ते अविकसित राष्ट्रांपर्यंत व्यापलेली आहे. भारतामध्ये दहशतवादाची सुरुवात आणि मानवाधिकाराचे होत असलेले उल्लघंन १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट, कश्मीर मधिल विधानभवनावरील बॉम्बस्फोट, अक्षरधाम मंदिरावरील हल्ला, २६/११च्या दहशतवादी हल्ला अनेक ठिकाणी दहशतवाद्यांनी हिंसाचार घडवुन माणसाच्या जीवन जगण्याच्या नैसर्गिक अधिकाराचे हनन केले आहे.

### मानवी अधिकाराची संकल्पना:-

मानवाधिकार हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असुन ते मानवास जन्मतः प्राप्त होतात. मानवी हक्कानुसार सर्व व्यक्ती समान असुन निसंगाने प्रत्येक व्यक्तीला प्रदान केलेला हक्क कुणीही हिरावुन घेवु शकत नाही. ग्रीन च्या मते, "मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाहय परिस्थिती म्हणजे हक्क होय. " तर लॉस्की च्या मते, "मानवी हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती की ज्या शिवाय व्यक्ती स्वतःचा सर्वांगीण विकास करुण घेणे शक्य होत नाही."

संयुक्त राष्ट्रसंघाने १० डिसेंबर १९४८ साली मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहिरनामा प्रसिध्द करुन मानवी हक्कांचे संरक्षण जतन व सवर्धन करण्याच्या दृष्टिने पाऊल टाकले आहे. संयुक्त राष्ट्रसंटनेने ३० कलमी जाहिरनामा प्रसिध्द करुन आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय असे अनेक ठराव केले. मानवी अधिकाराच्या जाहिरनाम्यातील बहुतांश तत्वांच्या समावेश राज्यघटनेत केला आहे राज्यघटनेच्या माध्यमातुन मुलभुत मानव अधिकारांना संरक्षण दिले आहे

# 2018-19


Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)
ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCItPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL
AJANTA
Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - I
IMPACT FACTOR / INDEXIN
2018 - 5.5
www.sjifactor.com
Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | स्त्री पुरुष असमानता वास्तविकता आणि दुष्परिणाम<br>**सहा. प्रा. डॉ. तक्षशिला मोटघरे** | ११०-११५ |
| २८ | सावित्रीबाई फुले व स्त्रि शिक्षण<br>**प्रा. डॉ. चुन्निलाल प. साखरवाडे** | ११६-११७ |
| २९ | महिलांच्या शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या प्रनेत्या : सावित्रीबाई जोतीराव फुले<br>**डॉ. गंगाधर रामराव भुक्तर** | ११८-१२२ |
| ३० | सावित्रीबाई फुले यांच्या साहित्यातील मानवता धर्म<br>**प्रा. डॉ. नरसिंग पिराजी कुडकेकर** | १२३-१२७ |
| ३१ | सावित्रीबाई फुले आणि महिलांचे सक्षमिकरण<br>**प्रा. डॉ. माया बापूराव मसराम** | १२८-१३१ |
| ३२ | सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कवितेतील आशयाचा आढावा<br>**डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहीणार** | १३२-१३५ |
| ३३ | क्रांतीज्योती सावित्री : एक जीवनसंघर्ष<br>**प्रा. कु. दिपीका गोपाल हटवार** | १३६-१३९ |
| ३४ | सावित्रिबाई फुले यांच्या कवी व काव्यविषयक दृष्टीकोन<br>**प्रा. सिद्धार्थ कुंडलिक इंगोले** | १४०-१४३ |
| ३५ | श्री चक्रधर कालीन स्त्री जीवन<br>**प्रा. डॉ. माधुरी मनोहरराव पाटील** | १४४-१४७ |
| ३६ | सावित्रीबाई फुले स्त्री शिक्षण<br>**डॉ. प्रदिप शा. ढोले** | १४८-१५१ |
| ३७ | सावित्रीबाईची कविता : जीनानुभवाची अस्सल अभिव्यक्ती<br>**डॉ. अलका गायकवाड** | १५२-१५७ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २७. स्त्री – पुरुष असमानता वास्तविकता आणि दुष्परिणाम

**सहा. प्रा. डॉ. तक्षशिला मोटघरे**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ.

**प्रस्तावना**

भारतातील लिंग असमानता हे पुरुष आणि स्त्रिया यांच्यातील आरोग्य , शिक्षण , आर्थिक आणि राजकीय यांचा उल्लेख करते. लिंग असमानता आणि त्याची सामाजिक कारणे भारताच्या लिंग गुणोत्तरावर ,स्त्रीच्या आरोग्य आणि आर्थिक परिस्थितीवर परिणाम करतात. तसेच असमानता हा एक मुद्दा आहे. ज्यामध्ये स्त्री आणि पुरुष यांच्याशी तो संबधीत आहे. स्त्री– पुरुष असमानता याबाबत आजही भयावह स्थिती आहे. सामाजिक समस्या या सार्वत्रिक असल्या तरी प्रत्येक समाजात समस्याचे स्वरूप सारखे नसते. त्यातीलच स्त्री–पुरुष असमानता ही एक समस्या असली तरी त्याचे कमी अधिक प्रमाण हे विविध समाजानुसार दिसून येते. भारताची स्थिती त्याला अपवाद नाही. भारतात स्त्रीचे स्थान मोठ्या गौरवाचे व आदराचे स्थान आहे.

भारतीय संस्कृतीला चिरंजीवी ठेवण्याचे काम हे स्त्रीनेच केले आहे. आदिवासी काळाचा विचार जर केला तर मातृसत्ताक संस्कृती होती. काळ बदलत गेला आणि संस्कृतीही बदलत गेली. बदल म्हणजेच परिवर्तन होय. वेळोवेळी झालेल्या परकीय आक्रमणामुळे स्त्रीच्या दर्जात व भूमिकेत बदल होत गेले. एकंदरीत विविध कालखंडाचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की वैदिक कालखंडात स्त्रीयांची स्थिती परुषांच्या समान होती.स्त्रियांना पुरुष्याइतकाच दर्जा होता. त्यानंतरच्या काळात स्त्रीयांनी गृह्कार्य व पत्नीधर्म सांभाळावा एवढेच अपेक्षित होते. स्वातंत्र्पूर्व कालखंडात विविध समाजसुधारकांनी स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीशिक्षण जरी वाढीस लागले तरी २१ व्या शतकात सुदधा स्त्रियांचा दर्जा वाढीस लागला असे आपण म्हणू शकत नाही.

स्त्रीचे शिक्षणाचे प्रमाण जरी वाढले तरी समाजातील लोकांची मानसिकता स्त्रीकडे बघण्याची अजून समाधानकारक नाही.

**उद्देश**

- आजच्या काळात स्त्री – पुरुष असमानता याबबतची स्थिती अभ्यासणे.
- स्त्री–पुरुष असमानते मागील कारणांचा अभ्यास करणे.
- स्त्री–पुरुष असमानतेमुळे होणाऱ्या परिणामांची चर्चा करणे.
- स्त्री–पुरुष असमानतवर उपाययोजना सुचविणे

**स्त्री–पुरुष असमानते मागील क्षेत्रे**

1. कुटुंब

भारतातील सद्यःची पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था असल्याने वंश हा पुरुष्यांच्या नावाने चालतो. लग्न झाल्यानंतर स्त्रीला पुरुषांकडेच जावे लागते त्यामुळे पुरूषाला अवास्तव महत्व प्राप्त झाले आणि स्त्रीला कमी.

**2. विवाह**

विवाहाच्या संदर्भातही स्त्री–पुरुष असमानता मोठ्या प्रमाणावर दिसून येते.पारंपारिक भारतीय समाजात मुलीचा विवाह हा लवकरात लवकर केला जातो.

**3. आरोग्य**

आरोग्याच्या बाबतीतही स्त्री–पुरुष असमानता फार मोठ्या प्रमाणावर दिसून येते त्यामुळे बहुतेक कुटुंबातच मुलींपेक्षा मुलांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते.

**4. शिक्षण**

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाला परंतु आजही पुरुष साक्षरता ही स्त्रियांच्या तुलनेत ही अधिकच आहे.

**5. रोजगार**

आज अनेक स्त्रियांनी रोजगाराच्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. तथापि रोजगाराच्या क्षेत्रातही स्त्री–पुरुष असमानता दिसून येते.

**6. मालमत्ता**

पारंपारिक समाजात स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार नव्हता. स्त्रिया कमवू लागल्या तरीही त्यांच्या कमाईवर त्यांची मालकी असते असे नाही. अनेक स्त्रियांना त्यांची कमाई ही पतीच्या किंवा त्याच्या आई–वडिलांच्या हवाली करावे लागते.

**7.राजकारण**

पूर्वी भारतात राजेशाही होती,राजेशाहीत राजकीय सत्ता ही पुरुषांच्या हाती होती. राजकारणात व प्रशासनात स्त्रियांचा जवळपास सहभाग नव्हता.

**स्त्री–पुरुष असमानतेमागील कारणे**

**1. पितृसात्तक व्यवस्था**

भारतीय समाज व्यवस्था ही पितृसत्ताक स्वरुपाची आहे. ही व्यवस्था पुरुषांच्या वर्चस्वाचा पुरस्कार करते. पुत्र हा वंशाचा दिवा व त्यामुळे पुरुषांना संपत्तीचा वारसा मानला जातो. त्यामुळे पुरूषांना अनेक अधिकार व स्वातंत्र दिले असून स्त्रियांना ते अधिकार व स्वातंत्र नाकारलेले आहेत. त्यामुळे स्त्री पुरुष असमानता निर्माण झाली.

**2. धार्मिक कारण**

हिंदुच्या दृष्टीने मोक्ष हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असून पुत्र प्राप्तीशिवाय मोक्षप्राप्ती होत नाही असे हिंदू धर्म तत्वज्ञान सांगते. पित्याच्या चितेस पुत्राने अग्नी दिली तरच मोक्षप्राप्ती होते अशी हिंदूची श्रद्धा आहे. त्यामुळे पुत्र जन्मास महत्व दिले गेले व कन्या जन्म हा अवांछनीय ठरला. यातूनच स्त्री पुरुष असमानतेस चालना मिळाली.

**3.समाजिक सुरक्षा**

पूर्वी भारतात सामाजिक सुरक्षिततेची सुविधा उपलब्ध नव्हती. मुली विवाहा नंतर पतीगृही राहण्यास जात असल्याने त्यांना परक्याचे धन ठरविले. साहजिकच मुलींना कमी महत्व दिले गेले. याउलट मुले ही विवाहानंतरही आईवडिलांजवळ राहत असल्याने ती आईवडिलांचा आधार मानला गेली. परिणामी मुलास अधिक महत्व दिले गेले.

**४. शेती व्यवसाय**

प्राचीन काळापासून शेती हा भारतीयांचा मुख्य व्यवसाय आहे. या व्यवसायासाठी अधिक मनुष्य बळाची गरज असते. शेतीतील विविध क्रिया पार पाडण्यासाठी अद्धिक शारीकशक्तीची गरज असते.स्त्रियांना काही नैसर्गिक कारणास्तव (उदा. मासिकपाळी, गरोदरावस्था, बालसंगोपन इ.)शाररीककष्टाची कामे करणे अवघड जाते.त्यामुळेही कामे पुरुषच पार पाडू लागले. त्यामुळे पुरुषांना साहजिकच स्त्रियांच्या तुलनेत अधिक महत्व दिले गेले व समाजात स्त्री पुरुष असमानता निर्माण झाली.

**वर्तमान भारतातील स्त्रियांची स्थिती**

भारतीय समाजात स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित व्हावी याकरिता स्त्रीपुरुष समानतेचेतत्व मान्य करून अनेक क्रांतिकारक पाऊल शासनाने उचललेले आहे. त्यात स्त्रियांना कोणत्याही क्षेत्रात शिक्षण व नोकरी करण्याचे स्वातंत्र व संधी उपलब्ध करून दिलेली आहे. स्त्रियांनी आर्थिक, राजकीय व सामाजिक दृष्ट्या प्रभावीरित्या आपले मत प्रकट करून आपली योग्यता सिद्ध करता यावी याकरिता आपले सरकार प्रयत्नशील दिसून येते. या अनुषंगाने स्त्रियांनी विविध क्षेत्रात आपली प्रगती साधून घेतलेली आहे.

**1. शिक्षण क्षेत्रातील प्रग**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांची प्रगती झाली हे म्हणण्यापेक्षा त्यांनी स्वतःची उन्नती करून घेतली. प्राध्यापक,वकील, डॉक्टर ,न्यायधीश, जिल्हाधिकारी इ. मोठ्या विविध पदावर आज त्या विराजमान असून विविध क्षेत्रातील उच्च पदे विभूषित केली आहे.

**२. आर्थिक क्षेत्रातील प्रगती**

आजची स्त्री ही अर्थाजनातही पुरुषावलंबी राहिलेली नाही. शिक्षणामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती तर झालीच पण आर्थिक प्रगती देखील घडून आली. सोबतच वडिलांच्या पतीच्या संपत्तीत स्त्रियांचा वारसा हक्क असल्याने आर्थिक दृष्ट्या त्या सबळ झालेल्या आहेत. त्यामुळे पूर्वीसारखे स्त्रियांचे आर्थिक शोषण केले जात नाही.

**3. राजकीय क्षेत्रातील प्रगती**

भारतात स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वी स्त्रियांना मतदानाचा आणि राजकारणात प्रवेश घेण्याचा अधिकार नव्हता. पण आज ग्रामपंचायत पासून ते केंद्रसरकार पर्यंत निवडणूक लढविता येते.आज तिला सर्व प्रकारचे राजकीय हक्क देखील प्राप्त झालेले आहे.

**4. सामाजिक क्षेत्रातील विकास**

आजची स्त्री ही सामाजिक दृष्टीने अत्यंत जागरूक झालेली आहे. तिला तिच्या हक्काची पूर्ण जाणिव असून चूल–मुल या संकुचित विचारसरणीतून बाहेर निघालेली असून पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक क्षेत्रात आपली भूमिका बजावत आहे.

## स्त्री-पुरुष असमानतेमुळे होणारे दुष्परिणाम

### 1. स्त्रीव्यक्तीमत्व विकसनात अडचण

साधरणतः हिंदू संस्कृतीत स्त्रीला निम्न दर्जा दिला जातो. अजूनही निर्णय घेण्याचा अधिकार आजही कुठेकुठे दिला जात नाही. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्व विकसनात अडचण निर्माण होते. व कुठेतरी स्त्रीचे अस्तित्व व आत्मविश्वास हा कमी होत असतो.

### 2. स्त्रीयांच्या मानसिकतेवर परिणाम :

लहानपणापासून कुटुंबातच स्त्री – पुरुष म्हणजेच मुलगा–मुलगी त्याचे काम वा घरातील वागणूक यात भेद केला जातो. त्यामुळे स्त्रियांमध्ये न्युनगंड निर्माण होऊन त्यांच्या मानसिकतेवर परिणाम होत असतो.

### 3. स्त्रियांवरील वाढते अत्याचार व मानसिक विकृतीत वाढ

अजूनही जुन्या परंपरा व विचाराचे प्राबल्य इतके जास्त आहे की स्त्रियांना पायातील चप्पल म्हणुन वागणूक दिली जाते.त्यामुळे स्त्री ही उपभोगाची वस्तु आहे असच तिच्याकडे बघितल्या जाते. त्यामुळे आजतागयत स्त्रियांवर अत्याचाराचे प्रमाण हे वाढतच आहे. स्त्री ही परक्याच धन आहे, तिच्यावर होणारे अत्याचार व वाढता खर्च यामुळे गर्भातच तिची हत्या केली जात आहे, त्यामुळे स्त्रियांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे.

### 4. देशाच्या प्रगतीला बाधक

निसर्गतः मानवात दोनच घटक आहेत. एक स्त्री आणि दुसरा पुरुष म्हणूनच दोन घटक समान ठेवण्याकरिता दोघंनाही समान हक्क, समान स्वातंत्र्य,समान संधी देणे आवश्यक आहे तरच देशाची प्रगती होईल व वास्तव काही वेगळ आहे म्हणुन स्त्री–पुरुष असमानतेमुळे देशाच्या प्रगतीत अडचण निर्माण होत आहे.

## माहितीचे संकलन व विश्लेषण

**स्त्री पुरुष असमानता या विषयावर माहिती गोळा केली असता त्यांच्या मतांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे**

तक्ता क. 1

स्त्रीयांचा रोजगारांमध्ये भेदभाव

| अनु. क. | प्रश्न | प्रतिसाद | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री पुरुष तुलना | शारिरीकदृष्टया दुर्बल | कार्यक्षमतेत कमी | परंपरा | एकूण |
| 1. | स्त्रीयांना रोजगारांमध्ये समान वेतन दिले जाते का ? | 4<br>20% | 2<br>10% | 6<br>30% | 8<br>40% | 20<br>100% |

## निष्कर्ष

बहुतांश प्रमाणांत लोकांच्या मते परंपरेनुसार स्त्रियांना रोजगारामध्ये समान वेतन दिल्या जात नाही तर अल्पप्रमाणात शाररीकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे स्त्रियांना वेतन हे कमी दिले जाते.

तक्ता क. 2

स्त्रीयांचा समाजातील दर्जा

| अनु. क. | प्रश्न | प्रतिसाद | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | उच्च | कनिष्ठ | समान | |
| 2. | समाज वा समुदायात स्त्रीयांना कसा दर्जा दिल्या जातो. | 2<br>10% | 9<br>45% | 9<br>45% | 20<br>100% |

निष्कर्ष

बऱ्याच ठिकाणी स्त्रियांना समान अथवा कनिष्ठ दर्जा दिल्या जातो मात्र काहीच ठिकाणी स्त्रियांना उच्च दर्जा दिल्या जातो .

तक्ता क. 3

स्त्रीयांच्या आरोग्याची काळजी

| अनु. क. | प्रश्न | प्रतिसाद | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | खाणपिण्याची व्यवस्था | पोषण | शारिरीक कमजोरी | मासिक पाळीविषयी | |
| 3. | आरोग्याच्या दृष्टीने स्त्रीयांकडे कोणत्या गोष्टीत दुर्लक्ष केले जाते ? | 1<br>5% | 3<br>15% | 7<br>35% | 5<br>25% | 20<br>100% |

निष्कर्ष

बहुतांशी लोकांच्या मते स्त्रिया या शारीरक दृष्ट्या कमजोर असल्यामुळे त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाही, तर बरेचदा खाण्यापिण्याची व्यव्यस्था बरोबर नसल्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्या जाते.

तक्ता क. 4

जनसामान्याचे मत

| अनु. क. | प्रश्न | प्रतिसाद | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुर्णतः सहमत | अंशतः सहमत | पुर्णतः असहमत | अंशतः असहमत | |
| 4. | आपली संस्कृती ही पूरूष प्रधान आहे तिथे स्त्रीयांना दु्यम दर्जा दिल्या जातो असे आपणास वाटते, या विधानाशी तुम्ही कितपत सहमत आहात? | 9<br>45% | 8<br>40% | 3<br>15% | 0<br>00% | 20<br>100% |

निष्कर्ष

बहुतांश व्यक्ती असे मानतात की आपली संस्कृती ही पुरुषप्रधान आहे तर अत्यल्प व्यक्ती असे मानतात की आपली संस्कृती ही मातृसत्ताक आहे.

**तक्ता क. 5**
**संपत्ती वाट्यात भेदभाव**

| अनु. क. | प्रश्न | प्रतिसाद | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 5. | समान संपत्तीचा वाट महिलांना का दिल्या जात नाही ? | परक्याचे धन | वंशाचा दिवा | चुकीची मानसिकता | स्वतः नाकारतात | |
| | | 11<br>55% | 5<br>25% | 3<br>15% | 1<br>5% | 20<br>100% |

**निष्कर्ष**

बहुतांश लोकांच्या मते मुली या परक्याचे धन असल्यामुळे आणि मुलीचा हिस्सा जावयाला जाईल अशा विचारधारेमुळे समान संपत्तीचा वाटा दिल्या जात नाही तर अल्पप्रमाणात स्त्री या स्वतः हिस्सा घेत नाही.

**स्त्री पुरुष असमानता यामुळे होणारे परिणाम**

**1. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला अडचण**

कुटुंबाची दोन चाके असतात स्त्री आणि पुरुष .परंतु दोन्ही चाके सारखी असली तरच तो वेगात चालेल पण भारतीय हिंदू संस्कृतीत स्त्रीला निम्न दर्जा दिला आहे. कुठलाही निर्णय घेण्याचा अधिकार आजही कुठेकुठे तिला नाही. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्व विकासाला अडचण येते.

**2. कौटुंबिक व सामाजिक दृष्ट्या अयोग्यता**

कुटुंब म्हटल की पती – पत्नी आणि त्यांचे अपत्य असा संदर्भ घेतला जातो परंतु कालपरत्वे स्त्रीपुरुष असमानता यामुळे सामाजिक जीवनात विशेष महत्व नसल्याने स्त्रियांनी या क्षेत्रात पुढे येऊ नये, समान अधिकार मागू नये म्हणुन विविध निर्बन्द्ध लावण्यात आले.

**उपाययोजना**

1. स्त्री–पुरुष असमानता ही सामाजिक तत्वावर कमी करण्यापेक्षा कुटुंबातच लहानपणापासून आपल्या अपत्यावर मुलगी असो वा मुलगा समानतेची वागणूक व तसे संस्कार रुजविणे आवश्यक आहे.
2. स्त्री–पुरुष असमानतेमुळे देशाच्या प्रगतीमध्ये कसा अडसर निर्माण होतो.त्याची जाणीव लोकांना करून देणे.
3. स्त्री– पुरुष हा असमानता नैसर्गिक नसून मानवनिर्मित दृष्टीकोन आहे हे लोकांच्या निदर्शनास आणून देणे.

**संदर्भसूची**


- **घाटोळे, रा. ना.** ( 2002), *'भारतीय समाज व्यवस्था'*,नागपूर,श्री. मंगेश प्रकाशन.
- **नाडगोंडे, गुरूनाथ** ( 2002),' *ग्रामीण समाजशास्त्र'*,पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
- **मेश्राम, आर.बी.** ( 2013),' *भारतीय समाजप्रश्न आणि समस्या'*, नागपूर,विद्या प्रकाशन.

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERN!TIONIL RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

August-2018

SPECIAL ISSUE-LXII (A)

# SAMISHA



**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W. Nichit
Dr. Shubhangi Dange

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal* **ISSN : 2348-7143**
**Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)**
**Special Issue : Samisha**
**UGC Approved No. 40705**
**August 2018**

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | वजन वाढणे तंत्रज्ञान युगातील एक गंभीर समस्या | प्रा. डॉ. विजया कन्नाके. | 6 |
| 2 | महाराष्ट्रातील भक्तिगंगा | प्रा. डॉ. कविता होले | 12 |
| 3 | स्त्री सक्षमिकरणात पुरुषांचे योगदान एक अध्ययन | प्रा. डॉ. किरण रा. बेलुरकर | 15 |
| 4 | किशोरींचा आहार आणि आरोग्य | **प्रा. कु. सुषमा जयकुमार फरसोले** | 19 |
| 5 | समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस.डब्लु. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य शिक्षणाविषयी जाणीवजागृतीचा तुलनात्मक अभ्यास | प्रा. डॉ. तक्षशिला मोटघरे | 22 |
| 6 | महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक | **प्रोफेसर डॉ. के.के. पाटील /मनोरमा श्रीधर पवार** | 26 |
| 7 | मेळघाटातील गवळी समाजाच्या लोकसाहित्यातून अविष्कृत होणारी सामाजिकता | प्रा.नरेंद्र जनार्दन पाखरे | 29 |
| 8 | इतर मागासवर्गीयांचे ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर | संजय शेंडे | 31 |
| 9 | जागतिक व्यापारी संघटना आणि भारतीय बँकिंग क्षेत्र | **प्रा.डॉ.महादेव आसाराम रिठे** | 35 |
| 10 | कुपोषणाची कारणे, लक्षणे जाणून त्यावरील उपाययोजना | **कु. दयाश्री कोकाटे /डॉ. सुजाता सबाने** | 39 |
| 11 | श्री.शंकरराव कोल्हे यांचे सहकार चळवळीतील योगदान | प्रा.झरेकर आर.एस. | 44 |
| 12 | भगवान बुध्द आणि धम्म | प्रा. किशोर नामदेवराव वाघाणे | 49 |
| 13 | स्त्री सक्षमीकरणात महात्मा गांधीजींची भूमिका | **डॉ. ज्ञानेश्वर आर. यावले** | 51 |
| 14 | भीषण वास्तवाचे विदारक दर्शनः बिराड | **प्रा. डॉ. पंकज वानखडे** | 53 |
| 15 | "प्रभावी मागणी" जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकासाचा मार्ग | प्रा. रविंद्र बा.शेंडे. | 58 |
| 16 | रजोनिवृत्तीची कारणे व परिणाम | **विजया देविदासराव भोंड** | 62 |
| 17 | लोकमान्य टिळकांची विचारधारा | सौ.छाया सवडतकर | 65 |
| 18 | किशोरवयीन मूलामूलींच्या समस्या | **प्रा.सौ.सुषमा सु.जाजु** | 68 |
| 19 | अमरावती जिल्हयातील बालगृहातील बालकांच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक दर्जाचे अध्ययन | **प्रा. डॉ. सारिका एन. दांडगे (बोदडे) / प्राचार्य डॉ शारदा शरद गावंडे** | 72 |
| 20 | मुलांच्या लठ्ठपणाची कारणे आणि उपाय | प्रा.विभा ज. घोडखांदे | 77 |
| 21 | आदिवासी क्षेत्रातील बालकांच्या आरोग्य विशयक कुपोशणाच्या समस्या आणि उपाय | डॉ. सौ. कीर्ती आ. वर्मा | 81 |
| 22 | मराठी नाटकाचा संक्षिप्त इतिहास | रीता वाळके (डंभाळे) | 84 |
| 23 | महाविद्यालयीन विद्यार्थीनीं मध्ये एच.आय.व्ही./एड्स संबंधी जागरूकता व प्रतिबंधात्मक ज्ञानाचे अध्ययन | प्रा. स्वाती वैद्य | 86 |
| 24 | महाराष्ट्रीतील रस्ते विकासातील प्रादेशिक विषमता | सतिष तोडकर /डॉ. के.के. पाटील | 89 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013) August 2018
Special Issue : Samisha
UGC Approved No. 40705

# समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस.डब्लु. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य शिक्षणाविषयी जाणीवजागृतीचा तुलनात्मक अभ्यास

प्रा. डॉ. तक्षशिला मोटघरे
महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ

**प्रस्तावना:**

आरोग्य हा सुखी जीवनाचा पाया आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या विकासासाठी सुदृढ शरीराची व निकोप मनाची गरज असते. जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या आरोग्याचा अर्थ आजार नसून संपूर्ण स्वास्थ्याचा समावेश आहे. यात शारीरिक, मानसिक, भावनिक स्वास्थ्याचा समावेश आहे. आरोग्य संपादन करण्यासाठी व्यक्तीला व समाजाला जागरूक राहणे आवश्यक आहे. हाच प्रयत्न आरोग्य शिक्षणातून करून देत आहे. ज्या परिसरात व्यक्ती राहते त्या परिसरावर तिचे स्वास्थ अवलंबून असते,व्यक्तीच्या शारीरिक व भावनिक स्वास्थ्याचाही यात समावेश केलेला आहे. आरोग्य शिक्षणातील प्राथमिक ज्ञान समाजकार्यातील विद्यार्थ्यांना तर आहेच, पण त्यांना या ज्ञानाचे उपयोजन करण्यास शिकविणे,जीवन जगतांना या ज्ञानाचा प्रभावीपणे उपयोग करण्यास शिकविणे हे आरोग्य शिक्षणानेच साध्य होईल. If Wealth is Lost, Something is Lost, But Health is Lost, Everything is Lost.व्यक्तीला स्वस्थ जीवन जगण्यासाठी अन्य घटकासाठी जाणिवपूर्वक लक्ष देण्याची नितांत गरज आहे.यासाठी व्यक्तीच्या आरोग्याबरोबर सामाजिक आरोग्याचा विचार करून त्यावर विशेष भर देणे अत्यावश्यक ठरते, याची जाणीव आरोग्य शिक्षणातून करून देण्याचा हा प्रयत्नआहे. आरोग्याच्या व्यापक दृष्टीकोनातून आपणास शरीर, परिसर व मन या घटकांची विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**व्याख्या :**

**जॉन, एम. लास्टच्या** मते, ज्या प्रकियेद्वारे व्यक्ती व लोकांचा समूह अशाप्रकारे वागायला शिकतो, की ज्यातून त्यांच्या आरोग्याचे संवर्धन होते,आरोग्य हे कायम राहते, किमान पातळीपर्यंत येते त्या प्रकियेला आरोग्य शिक्षण असे म्हणतात.

**आरोग्य :**

आरोग्य म्हणजे केवळ रोगकिंवा अशक्तता यांचा अभाव नव्हे तर संपूर्ण शाररीक व मानसिक, सामाजिक सुस्थिती होय.

**महत्व :**

सुखी व कार्यक्षम जीवन जगण्यासाठी आरोग्यविषयक चांगल्या सवयी बालकासलावण्याविषयीचे ध्येय निश्चित करण्यात आले. आरोग्य शिक्षणाच्या आधारे बालकाच्या गरजा जोपासल्या जाते म्हणुन आरोग्य शिक्षण हे महत्त्वाचे ठरते.

**आरोग्य शिक्षणाविषयीची जाणीवजागृती :**

२१ व्या शतकाच्या वाटचालीत भारताने काही ध्येये नजरेसमोर ठेवली व स्वातंत्र्यप्राप्ती नंतर काही स्वप्ने , आशा — आकांक्षा बाळगल्या त्यात आदर्श समाजाची आखणी केली. आपल्या देश बांधवाना सामाजिक व आर्थिक दास्यातून मुक्त करायचे आहे. स्वावलंबी, स्वयंपूर्ण, निरोगी आरोग्यसंपन्न समाज निर्माण करावयाचा आहे. या सामाजिक गोष्टी साधत असतांना अनेक समस्यांपैकी अनारोग्य ही फार मोठी भीषण समस्या आहे. भारतातील लोकांना चांगले आरोग्य

लाभले पाहिजे. जमिनीची सुपीकता, हवेची शुद्धता पाण्याची व वैयक्तिक स्वच्छता राखली नाही तर मानवाचे जीवन कष्टमय होईल. या गोष्टी सतत जाणिव व त्यानुसार योग्य ती कृती करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याची आवश्यकता आहे. आरोग्य शिक्षण हा योग्य जाणीवजागृती निर्माण करण्याचा स्वत: शिक्षण आत्मसात करून आचरणात आणण्याचा विषय इतरांकडून तसे वर्तन घडवून आणण्याचा तो एक विचार आहे हि एक प्रवृत्ती तसेच
कृतीही आहे.

**संशोधन विषयाची आवश्यकता व महत्व :**

प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये सुदृढ आरोग्य, योग, ध्यान, धारणा,आध्यात्मिकता या बाबींना अतिशय महत्व होते. आधुनिक काळात मनुष्य सुखसोयीच्या मागेलागून स्वास्थ्याकडे दुर्लक्ष करीत आहे.विद्यार्थ्यांची स्थिती सुद्धा याचप्रमाणे दिसून येते. सतत सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत शाळा व कॉलेजचा अभ्यास, ट्युशन, स्वाध्याय, प्रोजेक्ट इ. मुळे त्यांचे स्वास्थ बिघडत आहे. प्राथमिक स्तरापासूनच विद्यार्थ्यांना शारीरिक स्वाथ्याबद्दलची माहिती असणे आवश्यक झाले आहे. आजच्या काळात आराम, सुखदायी जीवनामुळे अनेक आजाराच्या निर्मितीस चालना दिली जाते.त्यामुळे रक्तदाब, डोकेदुखी, पाठदुखी, इ. रोग होण्यास विलंब होत नाही. विद्यार्थी दशेतच आरोग्याचे महत्व समजले तर भविष्यात या व्याधी होत नाही. या

दृष्टीकोनातून आरोग्य शिक्षण हे महत्वाचे ठरते. म्हणुन प्रस्तुत संशोधनात या गोष्टीचा अभ्यास केलेला आहे. सुखीजीवन व कार्यक्षम जीवन जगण्यासाठी आरोग्य विषयक चांगल्या सवयी बालकास लावण्या विषयीचे ध्येय निश्चित करण्यात आले, आरोग्य शिक्षणाच्या आधारे बालकांच्या गरजा जोपासल्या जाते म्हणुन आरोग्य शिक्षण हे महत्वाचे ठरते.

**समस्या विधान :**

**समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस.डब्लु. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य शिक्षणाविषयी जाणीवजागृतीचा तुलनात्मक अभ्यास**

**उद्दिष्टे :**

१. समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस. डब्ल्यु. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
२. बी.एस. डब्ल्यु. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य शिक्षणाविषयीच्या जाणीवजागृतीचा अभ्यास करणे.
३. बी.एस. डब्ल्यु. द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य शिक्षणाविषयीच्या जाणीवजागृतीचा अभ्यास करणे.
४. बी.एस. डब्ल्यु. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य शिक्षणाविषयीच्या जाणीवजागृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतके :**

१. समाजकार्य महाविद्यालयात अभ्यासक्रमातील आरोग्य शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते.
२. आरोग्य शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक आरोग्याची जाणीवजागृती निर्माण होते.

**व्याप्ती :**

यवतमाळ शहरातील समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस. डब्लु. भाग १ व भाग २ च्या सर्व विद्यार्थ्यांचा समावेश यात केलेला आहे.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue : Samisha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
August 2018

**मर्यादा :**

यवतमाळ शहरातील दोन महाविद्यालयापैकी महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस. डब्लु. भाग १ व भाग २ च्या सर्व विद्यार्थ्यांचा समावेश यात केलेला आहे.

**कार्यात्मक व्याख्या :**

- **समाजकार्य महाविद्यालय :**
  इयत्ता१२ वी नंतर समाजकार्य पदवीचे शिक्षण ज्या महाविद्यालयात दिले जाते ते महाविद्यालय म्हणजे समाजकार्य महाविद्यालय होय.
- **बी.एस.डब्लू.भाग १:**
  समाजकार्य पदवी प्राप्त करण्याकरिता १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर प्रथम वर्षातील अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला विद्यार्थी म्हणजे बी.एस.डब्लू.भाग १ चा विद्यार्थी होय.
- **बी.एस.डब्लू.भाग २:**
  समाजकार्य पदवी प्राप्त करण्याकरिता प्रथम वर्षातील अभ्यासक्रमात उत्तीर्ण झालेला व पुढील वर्गात प्रवेश घेतलेला विद्यार्थी म्हणजे बी.एस.डब्लू.भाग २ चा विद्यार्थी होय.
- **आरोग्य शिक्षण :**
  सुदृढ आरोग्य टिकविण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात बी.एस. डब्लु.भाग १ व २ च्या अभ्यासक्रमात अभ्यास घटकासाठी असलेला विषय ज्यात आरोग्याबद्दलची माहिती प्रदान केली जाते तो विषय म्हणजे आरोग्य शिक्षण होय.
- **जाणिवजागृती :**
  एखादी गोष्ट करीत असतांना ती वाईट अथवा चांगली आहे याचे ज्ञान असणे व त्याचा समाजजीवनावर होणाऱ्या विपरीत परिणामाची माहिती असणे म्हणजे जाणिवजागृती होय.

**संशोधन नमुना निवड व साधने :**

प्रस्तुत संशोधनाकरिता संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सरल यादृच्छीक पद्धतीने बी. एस. डब्लु. भाग १ मधील २० व बी.एस. डब्लु. भाग २ चे २० असे एकूण ४०विद्यार्थ्यांची यात निवड केलेली आहे तसेच यात स्वनिर्मित प्रश्नावली या संशोधन साधनाचा वापर केलेला आहे.

**कार्यपद्धती :**

प्रस्तुत संशोधनात स्वनिर्मित प्रश्नावली अंतर्गत खालील घटकांचा समावेश करण्यात आला.

१. विद्यार्थ्यांची आरोग्य शिक्षणाविषयीची संकल्पना
२. विद्यार्थ्यांचा आरोग्य विषयक अभ्यास
३. आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण होणारी जनजागृती

**उद्दिष्ट क्र १ :**

**समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस. डब्ल्यु. प्रथम वर्षातील व बी.एस. डब्ल्यु. द्वितीय वर्षातील च्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.**

| अनु. क्र. | विवरण | विद्यार्थी |
|---|---|---|
| १. | बी.एस. डब्ल्यु. भाग –१ | २० |
| २. | बी.एस. डब्ल्यु. भाग २ | २० |
| | एकूण | ४० |

ISSN : 2348-7143
August 2018

उद्दिष्ट क्र.४ :

**बी.एस. डब्ल्यु. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य शिक्षणाविषयीच्या जाणीवजागृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.**

**विद्यार्थ्यांच्या जणिव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास**

| अनु. क्र. | प्रश्न | प्रथम वर्षातील विद्यार्थी | | | द्विवतीय वर्षातील वि[illegible] | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | एकुण | होय | नाही | [illegible] |
| १ | तुम्हाला आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातुन शारीरिक व मानसिक सुदृढतेबद्दल माहिती मिळते का ? | ०९<br>४५% | ११<br>५५% | २०<br>१००% | १३<br>६५% | ०७<br>३५% | [illegible] |
| २ | तुमच्या वर्तनात आरोग्य शिक्षणामुळे बदल पडला का? | ०८<br>४०% | १२<br>६०% | २०<br>१००% | १४<br>७०% | ०६<br>३०% | [illegible] |
| ३ | तुमच्या आरोग्य शिक्षण विषयामध्ये आरोग्य सेवा हा घटक महत्वाचा वाटतो काय? | १३<br>६५% | ०७<br>३५% | २०<br>१००% | १६<br>८०% | ०४<br>२०% | [illegible] |
| ४ | तुम्हाला आरोग्य शिक्षणाच्या ज्ञान प्राप्तीनंतर इतरांमध्ये जाणिवजागृती निर्माण करता आली काय? | ०७<br>३५% | १३<br>६५% | २०<br>१००% | १२<br>६०% | ०८<br>४०% | [illegible] |

**निष्कर्ष :**

१. बी.एस.डब्ल्यु. प्रथम व द्वितीय वर्षातील अभ्यासक्रमात आरोग्य शिक्षण विषयात स्वच्छता हा घटक महत्त्वाचा असून हा विषय शालेय स्तरावर देखील असावयास हवा.

२. प्रथम वर्षाच्या तुलनेत द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या मते आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून चांगल्या आरोग्यप्रतीची जाणीव व इतरांना प्रेरणा देण्याचे काम करता येऊ शकते.

३. प्रथम वर्षाच्या तुलनेत द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या मते आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा एक घटक या नात्याने सामुहीकतेची भावना दृढ होऊन सामाजिक कर्तव्य देखील लक्षात येतात, शिवाय या विषयाच्या माध्यमातून शाररीक व मानसिक सुदृढता कशी राखता येईल याबद्दलचे ज्ञान प्रगल्भ होण्यास मदतगार ठरते.

४. प्रथम वर्षाच्या तुलनेत द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या मते आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक व इतरांमध्ये आरोग्याविषयीची जागृती निर्माण करण्याचे सामर्थ्य व कौशल्य तयार होते.

५. प्रथम वर्षाच्या तुलनेत द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या मते आरोग्य शिक्षण या विषयाच्या माध्यमातून चांगल्या सवयी व स्वच्छताची सवय अधिक दृढ होते.

**संदर्भसूची :**

१. **करंदीकर व मंगरुळकर** (२००६), *'आरोग्यशिक्षण'*, कोल्हापूर: फडके प्रकाशन.
२. **गाडगीळ,स्वाती**(२००५) , *'आरोग्यशिक्षण'* पुणे : सुविचार प्रकाशन.
३. **शुक्ल, विद्याधर**(२००६) *'आरोग्यशिक्षण'*, मुंबई : निराली प्रकाशन .

(Special issue)
Vidyawarta®
Peer Reviewed International Research Journal
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Samiksha

Vol-01
March – 2018

Edit

Prof.Virag S.Gawande Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W.Nichit

Published By
Sant Gadge Maharaj Art's, Comm. & Sci. Collage Walgaon, Dist.Amravati
&
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

# Vidyawarta™
## International Multilingual Research Journal

Special Issue

# Samiksha

**VOL - 1**
**March – 2018**

## Editor
Prof.Virag S.Gawande
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W.Nichit

## Published By
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage Walgaon
Dist. Amravati &
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

## || Index ||

01) शासकिय योजनांच्या संदर्भात अनुसूचित जाती व जमातीच्या जाणीवा व सहभाग...
डॉ. किशोर बी. वासनिक, गोंदिया || 08

02) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील ग्रंथपाल व इतर ...
दिनकर भा. तायवाडे, जि. नागपूर || 13

03) स्वयंसहाय्यता समूह–बँक जोडणी कार्यक्रमाच्या माध्यमातून वंचितांचे सबलीकरण
महाजन संजय बाबुराव, नवी मुंबई || 17

04) बेरोजगारी नियंत्रण : काळाची गरज
प्रा. महादेव सदावर्ते, जि. गडचिरोली || 29

05) वस्तु आणि सेवा कर एक दृष्टिक्षेप
डॉ. जयमाला रामटेके, मोर्शी || 33

06) महिला आरक्षण व महिला सक्षमीकरण
प्रा. डॉ. मनोज पवार, नरखेड || 36

07) हैद्राबाद मुक्तिसंग्रामात मातृभूमी वृत्तपत्राची भूमिका
डॉ. धिरजकुमार नजान, जि. अकोला || 38

08) संयुक्त कुटुंबाद्वारे होणारे मूल्यसंवर्धन व विद्यार्थी समायोजनावर होणारा परिणाम
सहा.प्रा. तक्षशिला मोटघरे, यवतमाळ || 42

09) महिला सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटांची भूमिका
प्रेरणा कमलाकर कांबळे, पुणे || 45

10) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ ची – गरज आणि वैशिष्टे
प्रा.कु. मंगला अ. कडवे, नरखेड || 49

11) आदिवासी साहित्य और गोंड जनजाती के साहित्य का अभ्यास
प्रा.आशा बुधराम मडावी, उंब्रज. || 52

12) गांधारीचे डोळे - एक चिकित्सा
डॉ. आर. एम. केदार, जि अकोला || 58

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

हैद्राबाद संस्थानातील जनतेवरील अन्याय अत्याचाराच्या विरूध्द आवाज उठविला. हैद्राबाद संस्थानामध्ये चालणाऱ्या राजकीय घडामोडीच्या बातम्या प्रकाशित करून जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम वर्तमानपत्रानी केले. त्यामुळे जनतेमध्ये अन्यायी निजामी सरकारच्या विरोधात एकजूट निर्माण करण्याचे कार्य वऱ्हाड प्रांतातील वर्तमानपत्रानी केले त्यामुळे देशातील वेगवेगळ्या भागातील जनतेनी हैद्राबाद मुक्तिसंग्रामामध्ये मोठा उत्साहाने सहभाग नोंदविला. परिणामी निजाम सरकार अस्थिर करून सोडले. हैद्राबाद मुक्ति संग्रामामध्ये वऱ्हाड प्रांतातील वर्तमानपत्रानी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. असे म्हणावे लागेल. मुक्तिसंग्रामामाध्ये वर्तमानपत्रानी केलेले कार्य हे केन्द्रस्थानी होते.

**संदर्भ :-**


१) मातृभूमि, दि.११/११/१९३८, अकोला.
२) कित्ता.
३) उदय, दि. ५ मे १९४४, अमरावती.
४) मातृभूमि, दि.१७/११/१९३८, अकोला.
५) मातृभूमि, दि.०१/१२/१९३८, अकोला.
६) मातृभूमि, दि. १५/१२/१९३८, अकोला.
७) मातृभूमि, दि.१५/१२/१९३८, अकोला.
८) मातृभूमि, दि.७/४/१९४६, अकोला.
९) कित्ता.
१०) कित्ता.
११) मातृभूमि, दि.०१/०९/१९३८, अकोला.


❑❑❑

**08**

# संयुक्त कुटुंबाद्वारे होणारे मूल्यसंवर्धन व विद्यार्थी समायोजनावर होणारा परिणाम


सहा.प्रा. तक्षशिला मोटघरे
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ


***********

**प्रस्तावना :**

बालक जन्म घेतो ते कुटुंबातच त्याच्या पालन पोषणाचे, संगोपणाचे कार्य कुटुंबच करीत असते. माता आपल्या जन्म दिलेल्या बालकावर माया करते ते स्वावलंबी बनेपर्यंत त्याचे संगोपनही करते. मानवी प्राण्यांमध्ये परावलंबनाचा हा काळ फार मोठा असतो त्यामुळे त्याला कोणावर तरी अवलंबून रहावे लागते. संरक्षण व संगोपनाच्या गरजेतूनच कुटुंब निर्माण झाले असावे कारण कुटुंबाचा इतिहास इतकाच जूना आहे, याची निर्मिती केव्हा झाली हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी कुटुंबाच्या उपयुक्ततेमुळेच ती आजपर्यंत टिकून आहे.

**बॅग्ले म्हणतो** :बालविकास कार्यासाठी संयुक्त कुटुंबसंस्थेसारखी दुसरी संस्था नाही.

कुटुंब संस्थेच्या कार्यावरून कुटुंबसंस्थेचे अनन्य साधारण महत्व स्पष्ट होते. आज सर्वत्र भ्रष्टाचाराचे, बेजबाबदाराचे, दहशतवादाचे वातावरण पसरले असतांना जिव्हाळयाचे, प्रेमाचे, सुरक्षिततेचे स्थान एकच दिसते ते म्हणजे कुटुंब होय. मुलांवर संस्कार करण्यामध्ये कुटुंबातच जास्त वेळ राहत असल्याने त्याचा व्यक्तिमत्व विकासावर प्रभाव पडतो. यावरूनच संयुक्त कुटुंब संस्थेची उपयोगिता व तिचे महत्व स्पष्ट होते.

**संयुक्त कुटुंबाची सद्य:स्थिती :**

आजच्या परिस्थितीचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की पूर्वी परंपरेमुळे तसेच व्यवसायामुळे

एकत्र कुटुंब पद्धती जाऊन तिची जागा विभक्त कुटुंबाने घेतली आहे. याचा परिणाम संस्कृती व मूल्यांचा ऱ्हास होय.

**समायोजन :**

प्राप्त परिस्थितीशी यशस्वी समायोजन साधण्याचा प्रत्येक मनुष्य प्रयत्न करीत असतो. व्यक्तिचे समायोजन हे चार पायऱ्यांनी पुर्ण होते.

**पहिली पायरी :**

व्यक्तीला एखादी गोष्ट साधण्यात हेतू साध्य करण्यासाठी व्यक्तीला भिन्न भिन्न मार्ग सुचतात.

**दुसरी पायरी :**

हे मार्ग हाताळत असतांना त्यात अडथळा येतो.

**तिसरी पायरी :**

त्याच अडथळयांना दूर करून हेतू साध्य करण्यासाठी मार्ग शोधून काढला जातो.

**अंतिम पायरी :**

शेवटी हेतूपुर्ती केली जाते ही समायोजनाची अंतिम पायरी आहे.

समाजातील परिस्थिती व ढासळते मुल्य या सर्व गोष्टीचा परिणाम विद्यार्थ्यांना समायोजनात अडथळा निर्माण होतो व कठीण परिस्थितीत विद्यार्थी उग्र रूप ध ारण करतो किंवा त्या परिस्थितीला समोरे जाण्यात अक्षम ठरतो. या सर्व दृष्टीकोनातून प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

**मुल्यसंवर्धन** : ज्या कल्पनांनी, विचारांनी, अनुभवांनी एखादया पदार्थाचे किंवा घटनेचे महत्व समजते त्या कल्पनेला, विचाराला,अनुभवाला मूल्य असे म्हटले जाते. मूल्य जोपासना होत नाही, तेथे वर्तनाचा ऱ्हास होतो व या वर्तनाचा परिणाम संस्कृतीवर होतो. संस्कृती टिकविण्यासाठी मूल्यांचे संगोपन व संवर्धनाची गरज आहे. म्हणुनच समाज जीवनात होणारे बदल व मूल्य संवर्धन सहज शक्य होते. मूल्य संवध नि सहज शक्य होते. मूल्यांमुळे सामाजिक विश्वासाची भावना निर्माण होते. सहकार्य, प्रेम इ. मुळे सामाजिक संघर्ष कमी होतात. या सर्व गोष्टीचा विचार करता आजच्या काळात कुटुंबाद्वारे रूजविल्या जाणाऱ्या मूल्यांचे महत्व अनन्यसाधारण ठरते.

**संशोधनाची आवश्यकता व महत्व :**

प्रत्येक व्यक्तीने सदाचारी जीवन जगावे व जगावे व सत्य, शिवं, सुंदरम् ही जीवनाची अंतीम मूल्ये साध्य करावीत.मनुष्याचा उत्कर्ष हा मूल्यावरच अवलंबुन आहे. सामाजिक जीवनाकरिता ही मूल्य आवश्यक आहे. ही मूल्ये शिकविण्याकरिता कुटुंब संस्था उपयोगी ठरते. परंतु आजची कौटुंबिक स्थितीचा विचार करता संयुक्त कुटुंब जे संस्कार , संस्कृती व मूल्य देण्याचे व संवर्धन करण्याचे एकमात्र स्थान होते ते कुठेतरी हरवून बसले आहे. याला कारण सामाजिक परिस्थिती, स्पर्धा, स्वार्थीपणा इ. असू शकतो. परिणामी कुटुंब हे विभक्त असल्याने आई वडील हे आपल्या पाल्यांना पाहिजे तितक्या प्रमाणात वेळ देत नाही. त्यांचा संपूर्ण भर हा शैक्षणिक प्रगतीवरच असतो. म्हणुन संयुक्त कुटुंब हे मुल्यसंर्वधनाकरिता प्रभावी ठरत असल्याने प्रस्तुत विषय महत्वाचा ठरतो.

**समस्या विधान :**

**संयुक्त कुटुंबाद्वारे होणारे मूल्यसंवर्धन व विद्यार्थी समायोजनावर होणारा परिणाम**

**उद्दिष्टे :**

१. यवतमाळ शहरातील संयुक्त कुटुंबाचा शोध घेणे.

२. यवतमाळ शहरातील संयुक्त कुटुंबाद्वारे रूजविल्या जाणाऱ्या विविध मूल्यांचा अभ्यास करणे.

३. संयुक्त कुटुंबाद्वारे रूजविल्या जाणाऱ्या विविध मूल्यांचा विद्यार्थ्यांच्या समायोजनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**परिकल्पना :**

कुटुंबाद्वारे रूजविल्या जाणाऱ्या मूल्यांचा विद्यार्थ्यांच्या समायोजनावर सार्थक परिणाम होत नाही.

**व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधनात यवतमाळ शहरातील संयुक्त कुटुंबातील १२ ते १६ वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला. प्रस्तुत संशोधन हे संयुक्त कुटुंब, मुल्य व १२ ते १६ वयोगटापुरते मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती व साधने :**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला असून एस. के. मंगल निर्मित समायोजन चाचणीचा करण्यात आला.

**जनसंख्या व नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनात यवतमाळ शहरातील पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण क्षेत्रातून २५–२५ याप्रमाणे एकूण १०० संयुक्त कुटुंबातील मुलांचा न्यादर्श म्हणुन समावेश करण्यात आला.

**संख्याशास्त्रीय माहितीचे संकलन व विश्लेषण:**

**उद्दिष्ट क.१ : यवतमाळ शहरातील संयुक्त कुटुंबाचा शोध घेणे.**

| क्षेत्र | पूर्व | पश्चिम | उत्तर | दक्षिण | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| यवतमाळ शहरातील संयुक्त कुटुंब | २५ | २५ | २५ | २५ | १०० |

**उद्दिष्ट क. २ : संयुक्त कुटुंबाद्वारे रूजविल्या जाणाऱ्या विविध मूल्यांचा शोध घेणे.**

| मूल्य प्रकार | मूल्यांची नावे |
|---|---|
| वैयक्तिक मूल्य | १. अहंकार २. त्याग<br>३. अन्याय ४. आत्मपरिक्षण<br>५. आत्मनिर्भरता ६. कियाशिलता<br>७. कुतुहल ८. प्रोत्साहन वृत्ती<br>९. बुद्धीनिष्ठा १०. मार्गदर्शन वृत्ती<br>११. भयमुक्त व्यव्हारातून<br>१२. संयमशिलता १३. स्वार्थत्याग<br>१४. शुरता १५. श्रमप्रतिष्ठा<br>१६. आत्मविश्वास |
| सामाजिक मूल्य | १. अंधश्रद्धा निर्मुलन<br>२. कौटुंबिक जिव्हाळा<br>३. कृतीनिष्ठा<br>४. जनसहवास<br>५. लोकशिक्षण<br>६. विज्ञानदृष्टी<br>७. सर्वधर्मसमभाव |
| नैतिक मूल्य | न्यायनिष्ठा सत्संग |
| सांस्कृतिक मुल्य | १. आप्तप्रेम २.इतिहास प्रेम<br>३. खेळकर जीवनदृष्टी<br>४. दया निसर्गप्रेम ५. मातृप्रेम<br>६. देशप्रेम ७.विश्वबंधुत्व |
| आध्यात्मिक मूल्य | १.त्यागनिष्ठा २. निष्काम सेवा<br>३. परमेश्वर भक्त ५. मानवता<br>६. सत्यनिष्ठा |

**उद्दिष्ट क. ३ : कुटुंबाद्वारे रूजविल्या जाणाऱ्या मुल्यांचा विद्यार्थ्यांच्या समायोजनावर होणारा परिणाम अभ्यासणे.**

तक्ता क. १ : कौटुंबिक समायोजनाचा स्तर

| विभाग | श्रेणी | विवरण | इतर | संयुक्त कुटुंबातील विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| कौटुंबिक समायोजन | A+ | उत्तम | ०–१ | १० |
| | A | चांगला | २–३ | ४५ |
| | B | साधारण | ४–६ | २० |
| | C | असमाधानकारक | ७–८ | २९ |
| | -C | अतिशय असमाधानकारक | ८ च्या वर | ०० |
| | | | एकूण | १०० |

तक्ता क. २ : शैक्षणिक समायोजनाचा स्तर

| विभाग | श्रेणी | विवरण | इतर | संयुक्त कुटुंबातील विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| शैक्षणिक समायोजन | A+ | उत्तम | ०–१ | ०३ |
| | A | चांगला | २–३ | २७ |
| | B | साधारण | ४–७ | १५ |
| | C | असमाधानकारक | ८ –१२ | ४९ |
| | -C | अतिशय असमाधानकारक | १३ च्या वर | ०६ |
| | | | एकूण | १०० |

तक्ता क. ३ : भावनिक समायोजनाचा स्तर

| विभाग | श्रेणी | विवरण | इतर | संयुक्त कुटुंबातील विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| भावनिक समायोजन | A+ | उत्तम | ०–१ | ०१ |
| | A | चांगला | २–६ | १९ |
| | B | साधारण | ७–११ | ५५ |
| | C | असमाधानकारक | १२–१५ | १३ |
| | -C | अतिशय असमाधानकारक | १६ च्या वर | १२ |
| | | | एकूण | १०० |

तक्ता क. ४ : सामाजिक समायोजनाचा स्तर

| विभाग | श्रेणी | विवरण | इतर | संयुक्त कुटुंबातील विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| सामाजिक समायोजन | A+ | उत्तम | ०–२ | ०३ |
| | A | चांगला | ३–६ | ११ |
| | B | साधारण | ७–८ | ४५ |
| | C | असमाधानकारक | ९ –११ | ३७ |
| | -C | अतिशय असमाधानकारक | १२ च्या वर | ०४ |
| | | | एकूण | १०० |

तक्ता क. ५ : विद्यार्थ्यांचे समायोजनातील सर्व घटकांचे विवरण

| विभाग | श्रेणी | विवरण | इतर | संयुक्त कुटुंबातील विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| सर्व घटक | A+ | उत्तम समायोजन | ८ च्या वर | ०२ |
| | A | चांगला समायोजन | ०–२२ | २७ |
| | B | साधारण समायोजन | २३–३४ | ५५ |
| | C | असमाधानकारक समायोजन | ३५–४६ | १५ |
| | -C | अतिशय असमाधानकारक समायोजन | ४७ च्या वर | ०१ |
| | | | एकूण | १०० |

अनुमान

वरील कोष्टकावरून असे लक्षात येते की कौटुंबिक, भावनिक, शैक्षणिक, सामाजिक या चारही समायोजनाच्या घटकांमध्ये शैक्षणिक व कौटुंबिक

कार्य करू शकले नाही, विशेष करून त्यामुळे ग्रामीण महिलांचे दारिद्रय दूर झाले नाही याच वेळी बांग्लादेश, इंडोनेशिया, बोलेव्हिया आणि फिलीपाईन्स या देशांनी औपचारिक व अनौपचारिक कर्ज पुरवठयाच्या संयोगाने गरीबी कमी करण्यात यश मिळवायला सुरूवात केली. याचाच परिणाम म्हणून भारत सरकारने बचत गट स्थापनेला प्रोत्साहन दिले. भारतात महिलांची आर्थिक, सामाजिक व राजकीय स्थिती अत्यंत वाईट आहे. महिलांना दिली जाणारी निकृष्ट कामे, कामाचे स्वरूप, लैगिंक छळ, दुय्यम स्थान, शैक्षणिक मागासलेपणा, निकृष्ट आहार व आरोग्य स्थिती, बालविवाह, अधिकार व हक्कांच्या जाणिवेचा अभाव इत्यादी महिलांच्या या सर्व समस्यांचे मूळ आर्थिक समस्यावर आधारीत आहे. महिला जर आर्थिकदृष्टया भक्कम झाल्या तर त्यांच्या समोरील इतर अनेक समस्या आपोआप दूर होतील म्हणूनच 'स्वयंसहाय्यता बचत गट' हा सर्वावरील उपाय आहे.

**अभ्यास पध्दती —**

प्रस्तुत अभ्यास हा भारतातील स्वयंसहाय्यता बचत गटाची प्रगती आणि त्याद्वारे झालेले महिलांचे सक्षमीकरण यावर प्रकाश टाकणारा असून तथ्य संकलन पध्दतीतील दुय्यम स्त्रोताचा वापर करून अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तुत लेख खालील उदिद्ष्टांना संबोधून लिहिला आहे.

**उदि्दष्टये —**

१. महिला सबलीकरणातील महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका तपासणे.

२. भारतातील स्वयंसहाय्यता बचत गटांच्या प्रगतीचा आढावा घेणे.

३. महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता बचत गटांच्या प्रगतीचा अभ्यास करणे.

४. पुणे जिल्हयातील स्वयंसहाय्यता बचत गटांच्या प्रगतीचा अभ्यास करणे.

**स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांचे सबलीकरण—**

पूर्वीच्या काळी महिलांचे जीवन हे बंदिस्त स्वरूपाचे चार भिंतीच्या आतच महिलांचे अस्तित्व होते. परंतु आता ही चार भिंतीच्या आयुष्याची चौकट ओलांडून सार्वजनिक जीवनात उतरून महिलांनी आर्थिक विकासाची सुत्रेच बदलून टाकलेली आहेत. देशातील लाखो महिलांच्या आर्थिक क्षमतेसाठी बचत गटांच्या माध्यमातून महिला हया आर्थिक बाजूने स्वावलंबी तर झाल्याच परंतु त्याहून आधिक त्या देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण अशी भूमिका निभावत आहेत. महिला सबलीकरणातील एक प्रभावशाली उपकरण म्हणून महिला स्वयंसहाय्यता बचत गटांनी एक बहुआयामी अभियानाच्या स्वरूपात आपली भूमिका पार पाडली आहे जसे की—

- स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांच्या कार्यक्षमतेत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. अनेक महिला हया नगरपरिषदेत, पंचायत समितीत अधिक चांगल्या रितीने नेतृत्व करत आहेत. त्यामुळे त्यांचा राजकीय क्षेत्रामध्ये खूप मोठया प्रमाणात सहभाग वाढल्याचे दिसून येते.
- स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांना मोठया प्रमाणात रोजगार मिळाला. त्यांच्या ज्ञानात वाढ झाल्याचे दिसून येते. रोजगार मिळाल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येते.
- स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला. त्यामुळे त्यांना निर्णय घेता येऊ लागले आणि समाजातील त्यांची प्रतिष्ठा वाढल्याने त्यांच्यात आत्मसन्मानाची भावना रूजली.
- स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या राहणीमानात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते.
- स्वयंसहाय्यता बचत गटामुळे समाजातील वेगवेगळया महिला एकत्र येवून आपल्या पैशाची बचत करून एकमेकींची सुख—दुःखे वाटून घेतात त्यामुळे त्यांच्यात एकीची भावना रूजण्यास मदत होते.
- स्वयंसहाय्यता बचत गटामुळे समाजात असणाऱ्या रूढी, परंपरा यांच्या विरोधात जनजागृती झाल्याचे दिसून येते.
- स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांना येणाऱ्या समस्या व समाजातील लहानसहान गोष्टींची जाणीव होते त्यामुळे त्यांच्यात असणारी निर्णयक्षमता वाढते.
- स्वयंसहाय्यता बचत गटातील सक्रीय सहभागामुळे त्यांना आर्थिक व्यवहार करता येऊ लागले. त्यामुळे महिला बँकांचे व्यवहार, पोस्टाचे व्यवहार किंवा बचत गटांसबंधी असणारे व्यवहार स्वतः करू

समायोजनाच्या तुलनेत सामाजिक व भावनिक समायोजनात विद्यार्थ्यांचे प्रमाण हे कमी दिसून येते.

**प्रमुख निष्कर्ष**

१. कौटुंबिक मूल्य हा जीवनाचा पाया असल्याने विद्यार्थ्यांस समायोजनात मदत करीत असतात.

२. मूल्य ऱ्हासामुळे सामाजिक समायोजनात अडथळा निर्माण होतो.

३. कौटुंबिक, सामाजिक, भावनिक व शैक्षणिक या चारही समायोजनाच्या घटकामध्ये साधारण समायोजन करणारे विद्यार्थी अधिक प्रमाणात आहेत.

४. शैक्षणिक व कौटुंबिक समायोजनाच्या तुलनेत सामाजिक व भावनिक समायोजनात विद्यार्थ्यांचे समायोजन साधारण आहे.

❑❑❑

09

# महिला सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटांची भूमिका

**प्रेरणा कमलाकर कांबळे**
पीएच.डी. संशोधक, कॉमर्स विभाग,
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, पुणे

************

**प्रस्तावना**

अविकसित देशामध्ये ज्या सामाजिक आणि आर्थिक समस्या आहेत त्यापैकी दारिद्रय आणि कर्जबाजारीपणा या गंभीर समस्या आहेत. या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कर्जबाजारीपणा आणि लोकांचे दारिद्रय ही दोन्ही एकमेकांचे कारण व परिणाम आहेत. भारतातील दारिद्रयाचे वैशिष्टये म्हणजे ते महिलांमध्ये सर्वाधिक आहे. दारिद्रय निर्मूलनासाठी अनेक उपाययोजना भारत सरकारने राबविल्या. परंतु दारिद्रयात पाहिजे तेवढी घट झाली नाही भारत सरकारने दारिद्रय निर्मूलनासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू केला. परंतु या उपायानेही दारिद्रय फारसे कमी झाले नाही. देशातील दारिद्रय दूर करून नविन सामाजिक व आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य महिला बचत गट चळवळीत आहे.

१९८२—८३ मध्ये ग्रामीण भागातील महिला व बालविकासासाठी हा कार्यक्रम ५० जिल्हयासाठी सुरू केला. या कार्यक्रमामध्ये ग्रामीण महिलांनी आर्थिक कार्यक्रमात भाग घ्यावा बँकांबरोबर व्यवहार करावेत, संपत्ती खरेदी करावी आणि कर्ज घेऊन स्वयंरोजगार सुरू करावा यावर भर देण्यात आला. परंतु या कार्यक्रमालाही फारसे यश मिळाले नाही. या योजनेशिवाय 'स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण (ट्रायसम) ग्रामीण कारागीरांना सुधारीत औजाराचा संच वाटप (सीट्रा) या योजनेमध्ये कर्ज व अनुदाने दिली. मात्र दारिद्रय दुर झाले नाही. या सर्व योजनात काटकसर व बचत या घटकाकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले.

औपचारिक कर्ज पुरवठा धोरण कार्यक्षमपणे

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL
MULTIDISCItPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | सावित्रीबाई फुले यांची सामाजिक कविता<br>**प्रा. डॉ. अविनाश श. धोबे** | ५९-६३ |
| १५ | महाराष्ट्र : महिला सक्षमीकरण - एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. डॉ. विवेक अ. चौधरी** | ६४-६७ |
| १६ | दिनांची माऊली क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**प्रा. वर्षा अ. तिडके (शनिवारे)** | ६८-६९ |
| १७ | सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण<br>**प्रा. डॉ. सुषमा वा. बोंडे** | ७०-७२ |
| १८ | स्त्री शिक्षण व सावित्रीबाई<br>**सहा. प्रा. विकास एन. अड्याळकर** | ७३-७६ |
| १९ | सावित्री ही स्त्री जीवनाचा आरंभबिंदू<br>**प्रा. डॉ. सिध्दार्थ बुटले** | ७७-७९ |
| २० | आद्य कवयित्री सावित्रीबाई फुले<br>**प्रा. डॉ. मेघमाला अं. मेश्राम** | ८०-८३ |
| २१ | सावित्रीबाई फुले यांचे समाज परिवर्तनाचे कार्य<br>**प्रा. रिपोटे मोनाली विलास** | ८४-८८ |
| २२ | सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण<br>**प्रा. मुरलीधर एस. नाकाडे** | ८९-९१ |
| २३ | सावित्रीबाई फुले व समाज परिवर्तन<br>**प्रा. डॉ. रणधीर साठे** | ९२-९५ |
| २४ | रणरागीनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले- एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. संजय उत्तमराव उगेमुगे** | ९६-९९ |
| २५ | सावित्रीबाई फुले व स्त्रि-मुक्ती चळवळ<br>**सहा. प्रा. वसंता सिताराम वंजारी** | १००-१०३ |
| २६ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व स्त्रीवादी साहित्य : एक मीमांसा<br>**प्रा. डॉ. शोभा रोकडे** | १०४-१०९ |

# २५. सावित्रीबाई फुले व स्त्रि-मुक्ती चळवळ

**सहा. प्रा. वसंता सिताराम वंजारी**
महात्मा ज्योतीबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, राजरतन नगर, धामणगांव रोड, यवतमाळ.

सावित्रीबाई फुले हे नाव समोर आले की, स्त्रि-शिक्षण हे अगदी डोळ्यासमोर उभेराहते. महात्मा जोतीबा फुले यांच्या पत्नी म्हणून सावित्रीबाई फुले महाराष्ट्राला परिचीत आहेतच परंतु त्यांचा परिचय तेवढ्यापूरताच मर्यादीत नसून समाजसुधारणेचा क्षेत्रात सावित्रीबाईचे कार्य अगदी मोलाचे असुन त्यांनी स्वकर्तुत्वाने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

सावित्रीबाई या स्वतंत्र प्रज्ञेच्या विचारवंत होत्या. समाजजागृतीसाठी त्यांनी आपल्या लेखणातून व काव्यातून आपल्या आधुनिक, पुरोगामी व सुधारणावादी विचारांचा नेहमीच पुरस्कार केलेला आहे. त्यांनी लेखन व काव्य बरोबर जाहीर भाषनातूनही समाजाला नवे विचार दिले. समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. सावित्रीबाईंनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. आज उपलब्ध असलेल्या सावित्रीबाईंच्या भाषणातून त्यांची समाज उपयोगी पुरोगामी विचारसंपदा दिसून येत आहे. त्यांच्या भाषणाचे विषय उद्योग, विद्यादान, व्यसन व कर्ज असे सर्व सामान्य मानव निगडीत असून या सर्व भाषणातून सावित्रीबाईंनी सर्व सामान्य मानसाला सुखकर जिवनाचा मुलमंत्र दिलेला आहे. त्यांची सर्व भाषणे ही समाजाला दिशा दर्शक आहे. त्यांच्या या भाषणातील सर्व विषय मानवी जिवनात अती महत्वाचे असून त्या- त्या विषयाचे मानवी जिवनातील महत्व आणि त्यामध्येच आपल्या समाजाचे व देशाचे भवितव्य कसे अवलंबून आहे, हे सावित्रीबाईंनी आपल्या प्रखर बुध्दीवादाने, अनुभवाने व समाजातील सुक्ष्म निरिक्षणाने स्पष्ट केले आहे. त्यांची ही सर्व भाषणे विचारांना प्रेरणा व सर्व सामान्य मानसाची वैचारिक गुलामगिरीतून मुक्तता करणारी आहेत.

उद्देश

1. सावित्रीबाईंचे शिक्षणाविषयीचे योगदान अभ्यासणे.
2. सावित्रीबाईंचेसमाजसुधारणेतील योगदान अभ्यासणे.

महात्मा जोतीबा फुले यांनी 1848 मध्ये पुणे येथे महाराष्ट्रातील मुलींची पहीली शाळा सुरू करून स्त्रि-शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या या शाळेत अस्पृश्यांच्या मुलीही शिकत असत. त्यावेळी स्त्रिया व अस्पृश्य यांना शिक्षण देणे हा तत्कालीन समाजाच्या दृष्टीने अक्षम्य गुन्हा होता. त्यामुळे जोतीबांच्या या कार्याला चोहोबाजूंनी विरोध झाला.परंतु कितीही विरोध झाला, कितीही संकटे आली तरी आपल्या निश्चयापासून ढळायचे नाही, असा निर्धारच त्यांनी केला होता. त्यांच्या शाळेत ते स्वतः शिक्षक म्हणून कार्य करीत होते. पण शाळेत स्त्रिया व अस्पृश्य शिकत असल्यामुळे दुसरा कोणताही शिक्षक त्या शाळेत काम करण्यास तयार नव्हता. तेव्हा जोतीबांनी आपल्या पत्नीला म्हणजेच सावित्रीबाई यांना स्वतः घरीच लिहीण्या - वाचण्यास शिकवले व नंतर त्यांचीच शाळेत शिक्षिका म्हणून नेमणूक केली. म्हणूनच त्यांना पहिल्या भारतीय शिक्षिका म्हणतात.

महात्मा जोतीबा फुले यांनी स्त्रिया व अस्पृश्य यांनाशिक्षण देण्यासाठी शाळा सुरू करावी व आपल्या पत्नीस शिकवून शिक्षिकेचे काम करावयास लावावे हे पुण्यातील उच्चवर्णियांना व सनातन्यांना न पटण्यासारखे होते. याचा

त्यांना अतिशय संताप आला. त्यांनी सावित्रीबाईंना येनकेण प्रकारे त्रास देण्यास सुरूवात केली. सावित्रीबाई शाळेत जात - येत असतांना काही लोक रस्त्यात उभे राहून सावित्रीबाईंना उद्देशून अपमानास्पद वागणूक देत असत आणि त्यांची निंदा करीत असत. काही लोकांनी तर त्यांच्या अंगावर खडे मारण्यापर्यंत व चिखलशेण फेकण्यापर्यंत मजल मारली. एकदा शाळेत जात असतांना चौकातील गुंडांनी सावित्रीबाईंचा रस्ता अडवून, "मुलींना आणि महार - मांगांना शिकविणे तू बंद कर, नाहीतर तूझी अब्रू शाबूत राहणार नाही. अशी धमकी दिली. हे ऐकताच सावित्रीबाईंनी त्याला चपराक दिली. पण ईतकी अवहेलना व विटंबना होऊनदेखिल सावित्रीबाईंनी आपल्या अंगीकृत कार्यापासून माघार घेतली नाही. जोतीबांप्रमाणेच त्यांनी आपले कार्य निष्ठेने चालू ठेवले. आपण देत असलेल्या उपद्रवाला जोतीबा आणि सावित्रीबाई मुळीच दाद देत नाहीत, हे पाहून सनातनी लोकांनी जोतीबांचा घरच्या लोकांना म्हणजेच त्यांचे वडील गोविंदरावांना जोतीबा व सवित्रीबाईंचा कार्याबद्दल भडकावले व ते करीत असलेले कार्य कशाप्रकारे धर्मविरोधी आहे. याबद्दल त्यांच्या मनात भरविले. याचा परीणाम गोविंदरावांनी जोतीबा व सावित्रीबाई यांना घराबाहेर काढले. ही वेळ सावित्रीबाईंची सत्वपरीक्षा घेणारी होती. परंतू अशा आणीबाणीचा परिस्थितीत त्या मुळीच घाबरल्या नाहीत. आपल्या पतीचे कार्य हे एक प्रकारचे पुण्यकर्मच आहे, असा त्यांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी स्त्रि - शिक्षणाच्या कार्यात जोतीबांना मनापासुन साथ दिली. म्हणुनच आज स्त्रि - शिक्षणाचा बाबतीत जागृकता व अमुलाग्र परीवर्तन झालेले आहे.

स्त्रि - शिक्षणाप्रमाणेच जोतीबांचा अस्पृश्य उद्धाराच्या कार्यातही सावित्रीबाईंचा सहभाग होता. अस्पृश्यतेच्या प्रथेबाबत त्या म्हणत की, "सर्व मानव ही एक ईश्वराची लेकरे आहेत, हे जो पर्यंत आपणास कळत नाही तो पर्यंत सारे मानव भाऊ - भाऊ आहोत असे वाटणे हे ईश्वर ओळखण्याच्या मार्गातील महत्वाचे चिन्ह आहे. आणि ते सत्य आहे. पण त्याकडे दुर्लक्ष करून आम्ही श्रेष्ठ व महार - मांग निच म्हणून स्पृश्य - अस्पृश्यता मानणे मुर्ख पणाचे आहे. जे लोक असे मानतात व तिचे देव्हारे माजवितात त्यांना ईश्वराचे सत्य स्वरूप कधीच ओळखता येणार नाही. उच्च जाती, निच जाती ही ईश्वरकृत नाहीत. स्वार्थी मानवाने स्वतःचे स्वरूप व्यक्त करण्यासाठी आणि त्यायोगे आपले व आपल्या वंशजांचे हीत व्हावे म्हणून निर्माण केलेले हे पाखंडी तत्वज्ञान आहे. दुसऱ्या मानवास अस्पृश्य मानने हे मनुष्यत्वाचे लक्षण नाही. म्हणुन अस्पृश्यतेचा प्रत्येक व्यक्तीने धिक्कार करणे यातच प्रत्येक व्यक्तीचे, समाजाचे किंवा कोणत्याही मानवी संस्कृतीचे परम कल्याण आहे".

यावरून लक्षात येते कि, सावित्रीबाईंचे विचार किती उदात्त व मानवतावादी आहेत. सावित्रीबाईंनी अस्पृश्यांना शिक्षण देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती, त्या म्हणतात. "अज्ञान व भ्रामक समजुती यांच्या विळख्यात गुरफटलेल्या शुद्रातिशुद्रासशिक्षणानेच जाणिव होईल. म्हणून शिक्षण घेण्यास टाळाटाळी आपल्या हातून झाल्यास आपण भोगीत असलेली दुर्दशा पुढील पिढीस भोगणे क्रमप्राप्त होईल.

शिक्षणाच्या प्रचारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रातही काम करणे गरजेचे आहे. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविणे गरजेचे आहे. हे सावित्रीबाईंने ओळखले.काही कुर रूढींनाही त्यानी आळा घातला. बाला - जरठ विवाह प्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा - तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राम्हण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपण करून कुरूप बनविले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कोणातरी नराधमाचा शिकार बनत. गरोदर विधवा म्हणून समाज छळ करणार, जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही. अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भ्रृणहत्या

करत. जोतिबांनी या समस्येवर उपाय म्हणून बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थपणे चालविले. जोतीबांनी सुरू केलेल्या या बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलांची काळजी घेण्याचे काम सावित्रीबाई करीत. फसलेल्या वा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करित. फुले दाम्पत्याने जाहीर केले होते, 'कोणा विधवेचे अजानपणे वाकडे पाऊल पडले असेल, ती गरोदर असेल तर तिने गुपचूप यावे. बाळंत होऊन परत जावे. तुम्ही आपले मुल सोबत न्यावे किंवा ईथेच ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील'. या अनाथ मुलांवर त्या मातेच्या वात्सल्याने प्रेम करित व त्यांची सर्व प्रकारची सेवा करित. त्यांना स्वतःला अपत्य नव्हते. पण या बालहत्या–प्रतिबंधक गृहातील सर्व अनाथ बालकांना त्यांनी आपलीच मुले मानले होते. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राम्हण विधवेचे मुल त्यांनी दत्तक घेतले.

त्यावेळी विधवांच्या प्रश्न भयानक होता. त्या पोटासाठी लाचार असत. सावित्रीबाईंनी त्यांना छोटे व्यवसाय काढून दिले. पोटाची सोय झाली. काहीजणींची लाचारी संपली.केशवपण बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुनर्विवाहाचा कायदा घडवून आणणे. यासाठी प्रयत्न करणे. अशी अनेक समाजसुधारणेची कामे सावित्रीबाईंने कल्पकतेने पार पाडली.

महाराष्ट्र शेतीप्रधान आहे. शेतीला पाऊस लागतो. तो पडला तर शेती. नाहीतर दुष्काळ. मधूनमधून इथे दुष्काळ पडतो. पाण्याचा, अन्नधान्याचा, गवताचा, चाऱ्याचा. सावित्रीबाईंचा काळातही असे घडले. दोन वेळा दुष्काळ पडला. 1876 साली आाणि 1896 साली. पहील्या वेळी जोतीबा हयात होते. त्यांनी आणि सावित्रीबाईंनी दुष्काळाशी झुंज दिली. दुसऱ्या वेळी सावित्रीबाई एकट्याच होत्या, तरीही न डगमगता त्यांनी दुष्काळाशी झुंज दिली.

सावित्रीबाई कविताही करायच्या. त्यांनी दुष्काळासंबंधी एका कवितेत लिहिले –

झाडेझुडपे वाळून जाती।
उजाड झाला सर्व देश।।
गुरे मरती रानावनात ।
मानसे मरून पडती घरात ।।

जोतीबांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. त्याच्यातर्फे अनेक कामे करण्यात आले. ठिकठिकाणी पाणपोया उघडल्या, अन्नछत्रे सुरू केली, गोरगरीबांना तिथे जेवण मिळे, दोन हजार मुला - मुलींची जेवणाची सोय केली. यासर्वांची सावित्रीबाई स्वतः व्यवस्था पाहत होत्या.सामाजिक कांतीकार्यात व सार्वजनिक कामात स्वतःजवळचा सर्व पैसा जोतीरावांनी खर्ची घातल्याने त्यांना जिवनाच्या शेवटच्या दिवसात आर्थिक संकटाशी सामना करावा लागला. अस्पृश्यांच्या मुलामुलींसाठी शाळा, बालप्रतिबंधक गृह, दुष्काळग्रस्त मुलांच्या मदतीसाठी सुरू केलेला व्हिक्टोरिया बालाश्रम, दुष्काळग्रस्तांना मदत, पुर पिडीतांना मदत व अन्य सामाजिक कार्यासाठी मुलांच्या वस्तीगृहासाठी व बाळाजी कुसाची डुंबरे पाटील खटला यासर्व सामाजिक कार्यासाठी जोतीरावांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला. जोतीराव व सावित्रीबाई कर्मयोगी होते. जोतीरावांनी त्यांच्या जिवनात प्रामाणिकपणे कष्ट करून चांगल्या मार्गाने पैसा मिळविण्यासाठी अनेक व्यवसाय केले. ते उद्योग प्रिय व कष्ट करणारे असल्याने त्यांना सर्व व्यवसायात लाखो रूपये मिळाले. यासर्व व्यवसायात जोतीरावांना सावित्रीबाईंनी मनापासून साथ दिली. जोतीरावांच्या या व्यावसायिक यशामध्ये सावित्रीबाईंचा मोलाचा वाटा होता. त्या सर्व व्यवसायात सकियपणे कार्यरत होत्या. जोतीराव व सावित्रीबाई यांना पैशाची व संपत्तीची आसक्ती नव्हती. कष्टाने व प्रामानिकपणे त्यांनी मिळविलेला पैसा दिनदलीत दुबळ्या लोकांच्या कल्याणसाठी, अज्ञानी लोकांच्या सुधारणेसाठी, गोरगरिबांच्या मदतीसाठी व स्त्रीयांच्या उद्धारासाठी

MAH/MUL/ 03051/2012

ISSN :2319 9318

# विद्यावार्ता

Jan. To March 2018
Issue-23, Vol-01

**Date of Publication**
**31 March 2018**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Shodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell.07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

14) PETROLOGY AND GEOCHEMISTRY OF DECCAN BASALT-FLOWS .....
P. U. Terker, A. V. Tejankar || 69

15) INDUSTRIAL SICKNESS AND BACKWARDNESS IN BIHAR WITH .....
Rambabu Yadav || 73

16) Employee Retention – A Need For Present Era
Dr. Jayant Prabhakar Bobde || 79

17) Growth and Equity in Higher Education in India
Dr. Bhavesh N. Desai || 83

18) Demonetization in India: Myth and Reality
Dr. B. D. Karhad || 87

19) REVISING THE MYTHICAL FEMININE CHARACTERS ......
Dr. Ansa C Prasad || 92

20) Influence of Politics on Education System of India
Dr. Sudhir Kumar Rai || 99

21) FOOD SAFETY AND STANDARDS LEGISLATIONS: AN ANALYSIS
ROBIN KUMAR || 102

22) Gender Based Violations and Discrimination in India
Dr. Rupali Sharma || 107

23) अल्लाउद्दीन खिलजीची बाजार नियंत्रण व्यवस्था
डॉ. एच. आर. चौधरी || 111

24) महात्मा जोतिबा फुले याचे सामाजिक कार्य आणि विचार
प्रा. महेंद्र पाटील || 113

25) महिला सक्षमीकरण आणि मानवधिकार
सहा. प्रा. दिपक आर. आटे, यवतमाळ || 117

26) प्रादेशिक सहकार्य आणि सार्क संघटना
प्रा. संतोष महादेवराव मुगे || 120

27) 'नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बचतीचे स्वरूप :.....
जितेंद्र पांडूरंगराव काळे || 128

https://sites.google.com/site/vidyawartajournal — http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

**25**

# महिला सक्षमीकरण आणि मानवधिकार

**सहा. प्रा. दिपक आर. आडे,**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क यवतमाळ

***********

**गोषवारा (Abstract)**

महिलांच्या सबलीकरणेसंबंधी चर्चा करण्यापुर्वी सबलीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे आवश्यक ठरते. महिलांचे सबलीकरण किंवा सक्षमीरण याचा अर्थ महिलांना सर्वार्थाने सक्षम बनविणे होय पुर्वी भारतीय समाजात सर्व बाबतीत स्त्रीयांना दुययम स्थान होते हे पौराणिक व ऐतिहासिक दाखल्यावरून आपल्याला समजते. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीयांवर मोठया प्रमाणावर अन्याय झाला आहे, म्हणून भारतीय स्त्रिया देखिल अन्यायाच्या बळी ठरलेल्या आहेत असे पहावयास मिळते. लिंगभेदावर आधारीत जीवन समाजव्यवस्था नष्ट करून समाजनतेच्या तत्वार आधारीत व्यवस्था सबलीकरणात अपेक्षीत आहेत. महिलांना पुरूषांच्या बरोबरीने समाजीक आर्थिक व राजकीय हक्क मिळवून देणे म्हणजे सबलीकरण होय. समाजात स्त्रियांना अपेक्षित ठेवणा—या विकास प्रक्रियेपासून लांब ठेवू पाहणा—या शक्तीमध्ये मतपरिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया ही महिला सबलीकरण मानले जाते. महिलांच्या विचारांना नवीन दिशा देणे, दृष्टी देणे हे त्यात अपेक्षीत आहे. महिला सबलीकरण म्हणजे राष्ट्र विकासाचे प्रक्रिययेत पुरूषांच्या बरोबरीने सहभागी करून घेणे होय शारिरीक व मानसिक हिंसाचारापासून महिलांची सुटका करणे हे त्यात अपेक्षीत आहे.

स्त्रियांना विकासाबरोबर विविध संघर्षांना सामोरे जावे लागत आहे. स्त्रिया शिक्षित झाल्या पण शिक्षणासोबत बेरेजगारी सारख्या संघर्षांना तोंड देण्याची स्थितीहून निर्माण झाली. याही समस्येला सामोरे जाण्यासाठी ती आज उद्योगक्षेत्रात उतरण्याच्या मत स्थितीतत आलेली आहे. आज आपणासाठी अभिमानाची बाब आहे की, जगातील सर्वाधिक सशक्त व प्रतिभावान असणा—या शंभर महिलांची यादी जाहिर झाली. त्यात भारतात जन्मलेल्या पेप्सिकोलाच्यसा नियोजीत मुख्य कार्यकारी इंद्रायुई, आय सी आय सी. बँकेच्या ललीता गुप्ते व कल्पना मोरपिया या स्त्री उद्योजकांचा समावेश आहे. म्हणून आजच्या संगणकीय युगातील स्वयंरोजगारावर भक्षुन चालणार नाही तर इतरांबरोबर पुढे जाण्यासाठी स्वयंरोजगारातुनच उद्योजकतेकडे वळणे आवश्यक आहे.

स्त्रियांना सामाजिक, आर्थिक स्वावलंबनातुन आत्मविश्वास वाढवून स्वतःचे व्यक्तिमत्व संपन्न करण्याची संधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे स्त्रिला शिक्षित जागृत स्वतंत्र आर्थिक उन्नती स्वयंसिध्द होण्यासाठी स्वयंरोजगार व उद्योजकतेचा राजमार्ग उपलब्ध आहे. भारतामध्ये मात्र आजची स्त्री संघटित झालेली दिसून येते. यातूनच स्त्रियांचा गट व बचत गटांची निर्मिती झाली व स्त्रि व्यावसायाभिमुख झाली. या विविध व्यवसायाचे प्रशिक्षण घेतल्यास ही स्त्री व्यवंसाय कुशलतने करून शकते. परंतू व्यवसाय व इतर क्षेत्रात काम नकरणा—या स्त्रियांच्या मानी हक्कांचे ब—याचदा उल्लंघन होत असल्याने आढळून येते. म्हणून प्रस्तुत प्रकरणात महिला सक्षमीकरणासोबत त्यांच्या मानवी हक्कांची सुरक्षा करणे यावर विस्तृत चर्चा केलेली आहे.

**महिलांचे मक्षमीकरण:—**

प्रत्येक राष्ट्रातील प्रत्येक स्त्री किंवा पुरूष, बालक, वृध्द, अपंग, सदृढ यांचा सर्वांगिन विकास झालेला असेल तर त्या देशाचा बहुमुखी विकास होतो. परंतु जागतहक पातळीवर विविध स्तरावर महिलांचा विकास झालेला नाहि. त्याकरिता शासन सामाजिक संस्था यांनी त्याचा सर्वांगीण विकास करण्याकरिता अनेक योजना राबविण्यात आहेत. भारतात स्वातंत्र्पुर्व काळात महिलांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केला गेला. स्वातंत्र्यानंतर सक्षमीकरणाबाबत शासनाने अनेक धोरणे राबविली आहे. तसेच महिलांचे सबली करणाकरिता २००१ हे वर्ष जाहिर केले होते. सक्षमीकरण प्रकिया सतत चालणारी असली तरी प्रत्येक अप्प्यावर सक्षमीकरणाचे संदर्भ बदलत असतात. म्हणुन सक्षमीकरणाची समर्पक अशी व्याख्या करता येत



Scanned by CamScanner

नसली तरी काही अभ्यासकांनी सक्षमीकरणाच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

१. महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रीने स्वत:च्या क्षमतांची ओळख करून क्षमतांचा विकास करावयाच्या प्रगती व सामाजिक निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे.

२. स्वत:च्या क्षमतांचा विकास करणे, स्वत:च्या समस्यांचे निराकरण करून आत्मनिर्भरतेने व आत्मविश्वासाने काम करणे, यासाठी मदतीची माहिती मिळविणेत्यास महिला सक्षमीकरण म्हणतात.

३. जागतिक बॅंकेने केलेली व्याख्या:– "व्यक्तिंना किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि फलाप्राप्तमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय.

४. स्त्री सक्षमीकरण म्हणजे आत्मविश्वासा मध्ये वाढ, क्षमता, वृध्दी, सामाजिक जाणीव जागृती, कार्यात्मक साक्षरता, लिंगसभाव संचेतन, आरोग्यविषयक जाणीव, स्वत:आत्मसन्मानाने जगणे, आत्मनिर्भर व वित्तीय संस्थाबरोबर जोडणी घेणे त्यास महिला सबलीकरण म्हणतात.

अशा प्रकारे महिलांच्या सक्षमीकरणाबाबत विविध स्तरावर वेगवेगळया संकल्पना मांडलेल्या आहेत.

**सक्षमीकरणाची आवश्यकता–गरज:**

१. देशातील सर्वांगीण साधन संपत्तीच्या विकासाठी सक्षमीकरण गरजेचे आहे.

२. महिला सक्षमीकरणामुळे स्त्री–पुरूष सर्वच स्तरावर समानता प्रस्थापित होईल त्यामूळे समतोल विकास संकल्पना अस्तित्वात येईल.

३. स्त्री घटकांना मानसिक, सामाजिक, आर्थिक विकासाकरिता सक्षमीकरण आवश्यक आहे.

४. महिलांचे आरोग्य, मानसन्मान वाढविणे, जीवनमान उंचवणे, समाजात निर्भयतेने जगणे.

५. राजकीय क्षेत्रातील दुर्गुणाचा नाशकरण्याबरिता व निकोप राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्याकरिता सक्षमीकरण गरजेचे आहे.

६. महिलांना आर्थिक समता, हक्क अधिकार, निर्णय कर्तव्य, स्वअस्तित्व याची जाणीव व्हावी?

७. महिला सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने अनेक जबाबदा–या पेलु शकतील.

८. संपुर्ण समाज सुख समाधान, आनंदाने व समाजात जबाबदार म्हणून कार्य करण्याकरिता सक्षमीकरण आवश्यक आहे.

९. समाजामध्ये मुलगी, पत्नी, माता या भुमिका सांभाळण्याकरिता आवश्यक आहेत.

१०. महिलांचे संघटन मजबुत होण्याकरिता आणि महिलांवरिल अन्याय, अत्याचार, गुन्हेगारी दुर होण्याकरिता महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे.

**सक्षमीकरणाचे घटक**

**१. आर्थिक सक्षमीकरण:–** स्त्री कामाचा दर्जा, परिस्थिती, हीन दर्जाची मानलेली असतात. स्त्रियांच्या कामाला केंद्रीभुत मानुन त्यांच्या कामाचा, त्यागाचा विचार केल्यास सबलीकरणास सुरवात होईल. स्वतंत्र उद्योग उभा करणे जोखमीचे वाटते. परंतु स्वयं–साहाययता बचत गटामार्फत धाडसाने उद्योग सुरू करतात. कारणा उद्योग प्रशिक्षण, भांडवल, उभारणी, विक्री व्यवस्था, यंत्रसामुग्री, कच्चा माल, कर्लफेड इ. गोष्टीचे सल्ला मार्गदर्शन गटामार्फत मिळते.०२

**२. सामाजिक सक्षमीकरण:** समाजातील चाजीरीती, रूढी, परंपरा या बंधनामुळे स्त्रीचे सामाजिक खच्चकरण मोठया प्रमाणात होत आहे. स्त्री ही सामाजीक बंधनामुळे खच्चीकरण होवुन अबला बनलेली आहे. स्वातंत्रपुर्व व स्वातंत्रानंतर शिक्षणाच्या माध्यमातून अनेक स्वयं–सहाययता बचत गट होय. गटामुळे महिला एकत्र येउ लागल्या गटामूळे स्त्रीपुरूष समानता प्रस्थापित होउ लागली. आपल्या गटामार्फत चळवळी उभ्या करू लागल्या आहेत.

**३. राजकीय दृष्टया सक्षमीकरण:** स्वयं–सहाययता गटाच्या माध्यमातून महिला राजकारणात सहभागी होत आहेत. गटामध्ये, निर्णय, डावपेच याचे कौशल्य आत्मसात होउ लागले. त्यामुळे पंचायत राज्य संस्थाचा कारभार सुरळीतपणे पार पाडत आहे. शिवाय नेतृत्व व कर्तव्या पार पाडण्याची संधी प्राप्त झाली आहे. स्वयंसुरळीतपणे पार पाडत आहे. शिवाय नेतृत्व व कर्तव्य पार पाडण्याची संधी प्राप्त झाली आहे. स्वयं–सहाययता बचत गटामुळे राजकीय दबाव गट निर्माण होत आहे. राजकीय व्यासपीठावर सन्मानाने वागवीले जात आहे.

**सक्षमीकरणात येणा–या अडचणी**

**१. समाजचा विरोध:** महिलांचे परिवर्तन स्वीकारण्यास समाजतील पुरूष, पुढारी लोक सहसा अनुकुलता दर्शवित नाहीत. कदाचित महिलांना संघटित करतांना समाजाचा विरोध होईल, प्रसंगी संघर्ष होउ शकतो.



Scanned by CamScanner

**२. चरित्रावर ठपका:** घराबाहेरिल जबाबदा—या, कर्तव्य महिला करू लागतात अनेक मंडळींशी कामा निमित्त संपर्क, भेटीगाठी होतात त्यूनच महिलांच्या चारित्रियावर आरोप केले जातात. महिला यशाची पायरी चढताना अनैतिक संबंधाच्या अफवा फैलविल्या जातात, जेणेकरून महिलांनी घराबाहेर पडू नये.

**३. महिलांची स्वत:ची मानसिकता:** महिलांच सक्षमीकरण करण्यासाठी समाजात पोषक वाताराणाची आवश्यकता असते. परंतु समाजात असे वातावरण अशक्य असते. त्यामूळे माहिला थोडयाफार अपयशांची खचू शकतात.

**४. सार्वत्रिक दारिद्रय:** भारतामध्ये सबलीकरण महत्वाचा अडसर सार्वत्रिक दाद्रिय होय. महिलांमध्ये सर्व बाबतीत दारिद्रयाचे प्रमाण मोळे असल्यामुळे सक्षमीकरणात अडचणी येतात.

**५. समाज पुर्वग्रह दुषित व पुरूषसत्ताक पध्दती:** समाज पुर्वग्रह दुषित आहे की, महिलांना घराबाहेर पडुन काम करू नये. समाजात कामाच्या ठिकाणी वर्तणुक चांगली मिळत नाही. तसेच पुरूषसत्ताक पध्दतीने माहिलांना निकृष्ट पध्दतीची कामे दिली जातात. त्यांच्या मताला कमी किंमत दिली जाते. त्यामुळे सबलीकरण होण्यात अडचणी निर्माण होतात.

**६. ग्रामीण, धार्मिक, रूढी परंपरा यांचा पगडा:** महिला या सामजिक रूढी, परंपरा, धार्मिक यात बांधल्यागेल्यामूळे जगण्याची उमेद कमी होते. या परंपरामुळे त्या घरातचा अडकेन राहतात. जगाचे ज्ञान प्राप्त होत नाही. त्यामूळे सबलीकरण होत नाही.

**स्त्रियांचे मानवी हक्क व त्याची सुरक्षा:**

मानवी हक्क हे स्वातंत्राचे प्रतिक आहे. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी स्वत:ची प्रगती साधाण्यासाठी हक्कांची गरज असते. मानवी हक्काची मल्पना हुळुहळु विकसीत हो आली आहे. मानवी सन्मान आणि मानवी जीवन यांची इतिहासात सतत अव्हेहलना झाली असून ती आज पण होत आहे. मानव म्हणून जन्माला आल्यानंतर मानवी सन्मान आणि जीवनाच्या रक्षणासाठी त्याच्या नैसर्गिक हक्क यांचे संरक्षण करणे म्हणजेच मानवी हक्कांचे सरंक्षण होय. या हक्कांचे संरक्षण योग्यप्रकारे होत नसल्यामूळेच मानवी हक्कांची सुरक्षा व्हावी या दृष्टीकोणामुळेच मानवी हक्क आयोगाची स्थापना करावी असा एक विचार प्रवाह जगभर पुढे आला. याचेच उदा. म्हणजे भारतात राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना केली.

**भारतातील स्त्रियांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन:**

लिंगभेदामुळे स्त्रियांवर घोर अत्याचार झालेले होते आणि आजही वास्तवात होत आहेत. कारण परंपरेचा कायदा आजी प्रभावी आहे, पण आज स्त्री—मुक्ती संघटना हया अत्याचाराविरूध्द लढत आहेत. विशेशत: ही बाजु कणखरपणे सांभाळल्यामुळे काही प्रमाणात का होईना चित्र बरेच पालटलेले दिसते. स्त्री मुक्ती बरोबरच स्त्री—वादाचा आग्रह स्त्री संघटनांनी धरलेला दिसतो. त्यामूळे स्त्रीयांच्या मानवी हक्कांची भुमिका अर्थातच आग्रही ठरते.

भारतातील परिस्थती लक्षात घेतली तर असे आढळुन येईल की, शिक्षणाचा अधिकारच जेथे नाकारलेला होता, तेथे शिक्षणाची काय प्रगती झाली, तिचा आलेख दहा—दहा वर्षांचा हे स्पष्ट करतो की, स्त्रियांची शिक्षणातील प्रगती दिवसेंदिवस वाढती दिसत आहे. विशेषत परंपरावादी दृष्टीकाने ज्यांना केवळ चुल, मुल व घरे सांभाळणे यापर्यंतच मर्यादित ठेवत होते किंवा आहेत त्याच्या पुढे एकुन शैक्षणिक क्षेत्रात स्त्रिया गुणवत्तेच्या बाबतीत पुरूषाना मागे टाकत असल्याचे चित्र आज दिसत आहे. आता तर स्त्री संघटना हाही दावा करू लागल्या आहेत की, विकासाची समान संधी मिळताच स्त्रिया कोणत्याही आघाडयरी वर काम करू शकतात परंपरागत

कायद्यानी जखडलेली स्त्री डॉ बाबासाहेबांच्या संविधानात समतेच्या आधारावर विकासाची समान संधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे तर अर्थार्जन, सेवा योजनातील संधीमुळे तसेच नोकरीमुळे मिळलेल्या स्वावलंबनामूळे सक्षम होउन सशक्तीकरणाची वाट चालु लागल्याची दिसुन येते. आज भारतात सर्वच क्षेत्रात आय. ए.एस.वकिल, न्यायाधिश, इंजिनियर्स, डॉक्टर, बीझीनेस मॅनिजमेंट मधील अधिकारी, इंजीन ड्रायव्हर्स, पायलट्स पासून ते ऑटोरिक्षा ड्रायव्हर्स पुरूष कर्तृत्वांच्या जागांवर आपलच कर्तृत्व स्त्रियांनी सिध्द केलेले आहे. फार तर, शिक्षिका, नर्सेस किंवा प्राध्यापिकापर्यंत मजल मारली आहे.

**महवत्वाचे महिलाभिमुख कायदे:**

स्वातंत्रोत्तर काळात भारत सरकारने महिलांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अनेक कायदे संमत केले आहेत.

१. अनैतिक व्यापार कायदा १९५६

२. मातृत्व लाभ कायदा १९६१

३. हुंडाबंदी कायदस १९६१, १९८४ च्या



Scanned by CamScanner

दुरूस्तीसह

४. स्त्रियांचे असभ्य प्रदर्शन कायदा १९८६

५. सतीप्रथा प्रतिबंध कायदा १९८७

६. राष्ट्रिय महिला आयोग कायद्या १९९०

७. कौटुंबिक हिंसेपासुन स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५

८. बालविवाह बंदी कायदा २००६

याशिवाय हिंदु विवाह कायदा हिंदु, बारसा हक्क कायदा, कुटुंब न्यायालय कायदा असे विशेष तरतुदी असणारे कायदे भारतात स्त्रि करीत आहेत.

**निष्कर्ष:**

आजच्या स्त्रिने समाजात आणि कुटुंबामध्ये आपले वेगळे आस्तित्व निर्माण केले आहे. त्यामूळे तिच्या बुध्दीच्या आणि व्यक्तिमत्वाचा विकास झाला दिसून येतो. ती आपला स्वाभिमान टिकविण्यासाठी घरातून बाहेर जावून अर्थाजन करीत आहे. ती आपल्या कुटुंबाचा जिवन स्तर उंचावण्यासाठी आणि आर्थिकदृष्टया सबल सक्षम बनू शकतात. व आत्मनिर्भर होवू शकतात. समाजात मागसलेल्या घटकांना स्त्रियांना देशाच्या मुख्यप्रवाहात आणाण्यसाठी स्वातंत्रानंतर देशाच्या संविधानात त्यांच्यासाठी खास तरतुदी करण्यात आल्या. भारतीय घटनाकार डॉ. आंबेडकरांनी सामाजिक, राजकीय परिस्थितीनुसार रूंदावत राहील्या. मानवी हक्कांची सुरक्षा करण्यसाठी राष्ट्रीय हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. हे सर्व असले तरी ख—या अर्थाने समाजा मध्ये स्त्रियांच्या मानवी हक्कांबदद्ल जाणीव निर्माण झालेली नाही. स्त्रिला जर स्वातंत्रनंतरही माणसुकीची वागणुक दिल्या जात नसेल तर समाजाची प्रगती होउ शकणार नाही.

**संदर्भ:**


महिलांचे सबलीकरण— दाद्रिय निर्मूलन व स्वयंसाहययता गट, श्रीमती दासगुप्ता कविता, श्री देसाई रविद्र

महिला सबलीकरण स्वरूप व समस्या डॉ. कांकारिया राजेंद्र, डॉ. गोटे

आमचे व्यासपीठ, स्वयंसामाहययत समुह डॉ. घोरपडे आश्विनी शिवताई सुरेश र

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, प्रकाशन

मानवी हक्क, के सागर पब्लीकेशन, प्रा. व्ही. —पाटील

लोकसत्ता दैनिकातील कात्रण


26

# प्रादेशिक सहकार्य आणि सार्क संघटना


**प्रा. संतोष महादेवराव घुगे**

इतिहास विभाग फर्ग्युसन महाविद्यालय पुणे


***********

जागतिक पातळीवर शांतता आणि समन्वय ठेवण्यासाठी, विकासाला चालना देण्यासाठीआणि एकमेकांना परस्परपूरक मदत करण्यासाठी, कोणत्याही दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये संवाद होणे आवश्यक आहे. हा संवाद संघटनात्मक पातळीवर असेल तर तो अधिक प्रभावी ठरतो. विसाव्या शतकात पहिले व दुसरे महायुद्ध, शीतयुद्ध, शस्त्रास्त्र स्पर्धा याबरोबरच साम्राज्यशाहीने सर्व जग ढवळून काढले होते. विचाराचे अभिसरण आणि गतिमानता ही या शतकाची वैशिष्टेे आहेत. या शतकाला जसे संघर्षाचे शतक म्हणतात, त्याचप्रमाणे सहकार्याचे शतकदेखील म्हणता येईल. कारण या शतकात अनेक आंतरखंडीय आणि एकखंडीय संघटना स्थापन झाल्या. पहिल्या महायुद्धात मोठ्य प्रमाणात मानवहानी व अर्थहानी झाली. अशी हानी परत होऊ नये म्हणून १९२० मध्ये राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. परंतु साम्राज्यवादाचे समर्थन करणाऱ्या राष्ट्रांनी, राष्ट्रसंघ अपयशी ठरेल अशी कृत्ये केली आणि राष्ट्रसंघ अपयशी ठरला. विड्रो विल्सन या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या मताप्रमाणे, अवघ्या २० वर्षात जग दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले गेले आणि जगाने परत एकदा मोठ्य प्रमाणात मानवहानी व अर्थहानी अनुभवली. यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली व ती संघटना जागतिक पातळीवर शांतता, सहकार्य, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य या क्षेत्रात आजपर्यंत भरीव स्वरूपाचे काम करत आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणाचे



Scanned by CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

**April To June 2018**
**Issue-27, Vol-01**

**Date of Publication**
**30 April 2018**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

13) A STUDY OF CORRELATES DEPRESSION AMONG COLLEGE GOING STUDENTS
**Prof. Dr. Punam Kumari & Vikas kumar verma, patna** ||74

14) The Contai Massin the Swadeshi Movement (1905—1911)
**Dr. Sankar Kumar Das, Bankura University** ||78

15) "Buddha Dharmma, in the view of Dr. Babasaheb Ambekar"
**Dr. T. G. Gedam, Dist.- Nagpur** ||87

16) IMPACT OF DEMONETIZATION ON BANKING SECTOR
**Prof. Suresh N. Gawai, Buldana** ||91

17) Reimagining Sexuality and Desire in Angela Carter's Re-written Fairy ...
**Anjum Tahir, Jammu and Kashmir** ||95

18) Mathematical Modeling of Game Theory, Nash Equilibrium and some asp...
**Dr. Nirbhay Kumar Sinha, New Delhi** ||100

19) AWARENESS ABOUT GST AMONG FUTURE TEACHER
**Prof. Santosh Arora & Anit Kumar Srivastava, Bareilly (U.P.)** ||105

20) नक्षलवादी चळवळ आणि भारतीय लोकशाही
**सहा. प्रा. दिपक आर. आटे, यवतमाळ** ||110

21) स्त्रियांच्या विकासात समाज सुधारकांची भुमिका
**प्रा. डॉ. देशमुख पी. एस., जि. लातूर** ||113

22) महाराष्ट्रातील उर्दू माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षणाविषयीचा अभ्यास
**सय्यद समियोद्दीन & डॉ. सय्यद शफिवोद्दीन, बीड** ||116

23) मानव संसाधन विकास : सैद्धांतिक विवेचन
**फुलारी ज्योती, औरंगाबाद** ||118

24) मानवी विकास निर्देशांक
**प्रा. शोभा विष्णुपंत खंदारे, टेंभुर्णी** ||121

25) वनीकरण एक अभ्यास- नांदेड जिल्हा
**प्रा. स्वाती विकासराव कुरमे, जि. नांदेड** ||123

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03



Scanned by CamScanner

20

# नक्षलवादी चळवळ आणि भारतीय लोकशाही

सहा. प्रा. दिपक आर. आटे
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क
यवतमाळ

**********

**प्रस्तावना:—**

जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा एकमेव देश म्हणून आज संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे लागले असले तरी भारतातील विषमता आधारीत जाती व्यवस्था आणि अर्थव्यवस्था भारताच्या विकासात अडथळे निर्माण करित आहेत. एकविसाव्या शतकात हिच कारणे भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोर अनेक कारणांना जन्म देत आहे. स्वतंत्रानंतर भारताने नेहमी आपल्या बाहय सुरक्षेवरच विचार केला तसेच अमाप पैसा आणि मानवी शक्तीचा वापरही केला. मात्र अंतर्गत सुरक्षेचा म्हनावा तेवढा विचार केला नाही. म्हणुनच आज अनेक समस्यांनी भारत अंतर्गतरित्या पोखरत जात आहे. एकीकडे दहशतवादी हल्ले, राज्यविरोधी बंडखोरी, फुटीरतावादी चळवळी भारतीय अर्थव्यवस्थेत पुढील विविध प्रश्न उदा. वाढती बेरोजगारी, सामाजिक तणाव, नैसर्गिक साधन संपत्तीचे असमान वाटप, आर्थिक विषमता, स्त्री—पुरुष भेद, गरिबी विरोधी श्रीमंत, वाढत्या नागरिकरणामुळे निर्माण झालेले असंख्य प्रश्न, नैतिकतेचे पतन, शेतीसुधारणा कार्यक्रमात आलेले अपयश अश्या विविध प्रश्नांनी राष्ट्रिय सुरक्षितता घेरली आहे. त्यातच झारखंड, पश्चीम बंगाल, आंध्रप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, बिहार आणि उडीसा या राज्यात वाढत्या नक्षलवादी चळवळीने उग्ररुप धारण केलेले दिसुन येते. नक्षलवादी हल्लाचा परिणाम हा भारतभर पसरलेला आहे. त्यामुळे देशाअंतर्गत सुरक्षीताला धोका निर्माण झाला, यामुळे नक्षलवादी चळवळकडे मोठयाप्रमाणात लक्ष देणे महत्वाचे ठरले आहे. याचाच अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून करण्यात आला आहे.

**नक्षलवादाचा अर्थ—**

नक्षलवाद म्हणजे शस्त्राच्या बळावर हिंसक मार्गाचा अवलंब करून समाजात भितीचे वातावरण निर्माण करून आपले ध्येय साध्य करणारी संघटना होय. सत्ता ही बंदूकीच्या धाकावर निर्माण करता येते या तत्वावर त्यांचा विश्वास आहे. नक्षलवादी खुन करून क्रांती आणू इच्छीतात. नक्षलवादी संघटनांचा भारतीय संविधानावर विश्वास नाहीं. नक्षलवादी निवडणूक प्रकियेवर बहिष्कार टाकतात. हिंसेच्या मार्गाने हुकूमशाही निर्माण करणे हे त्यांचे ध्येय आहे.

**जॉन केटम** च्यामते, राजकिय उदिष्टये प्राप्त करण्यासाठी अवैधानिक मार्ग अवलंबनारी आणि हिंसात्मक कार्य करणारी संघटना म्हणजे नक्षलवाद होय.

**नक्षलवादी चळवळीचा उदय:—**

प्रत्येक चळवळीला कोणत्या नकोणत्या तत्वाला जोड असते, तत्वाशिवाय चळवळिंना आपल्या उददेशापर्यंत जाता येत नाही म्हणून तत्व प्रणालीचे चळवळीत अत्यंत महत्वाचे स्थान असते. नक्षलवाद्याच्या मते, भारतात संसद शोषिताचे शेतक—यांचे शेतमजुरांचे व गरिबांचे हित पहात नाही तर ती जमीनदार, सावकार, भांडवलदारं यांच्या हातचे बाहुले बनत आहे, नोकरदार वर्ग त्यांचा दलाल बनत आहे म्हणून अश्या वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सक्षत्र क्रांतीचा उपयोग केला पाहिजे त्यांच्या व्दारे शासन व्यवस्था बदलू शकते.''

भारतामध्ये नक्षलवादी चळवळ १९६७ पं. बंगालमधील दार्जिलिंग जिल्हांतील नक्षलबाडी या ठिकाणी चळवळीचा अध्वर्यु चारु मुजूमदार यांच्या गावाला जन्माला आली. या गावामध्ये जमीनदार गुंडाना बोलावून आदिवासी तरुणाला मारहाण केली व त्याची ठिंगनी नक्षलबाडी च्या आजुबाजुनधील गावात पडली आणि नक्षलवादी चळवळ उदयाला आली. तेव्हा नक्षलवाद्यानी अन्याय, अत्याचार, जुलूम शोषणा विरुध्द सशक्त लढा सुरु केला. नक्षलवाडी या गावाच्या जवळील बडा मणीराम ज्योत नावाचे एक गाव आहे. या गावातील काही तरुणांनी तांदुळ लुटून शेजारच्या नेपाळ देशात नेउन विकला. ही घटना नक्षलीबंडाची सुरूवात होती. परंतु जमीनदारा विरूध्द हा लढा असल्याने यामध्ये पहिली आहूती नागरॉय चौधरीची पडली या गदारोळात नागरॉय चौधरीची हत्या नक्षलबाडीत झाली



Scanned by CamScanner

अशी वार्ता पसरली त्यामुळे बंडाळी करण्या—या या पक्षाच्या लोकांनाच, नक्षलवादी या नावाने ओळखल्या जाउ लागले आणि ही उपाधी कायमची चिटकली. तसेच त्यांच्या हिंसाचाराचा वादाला तात्वीक अर्थ त्यांनीच लावला अश्या प्रकारे चळवळीची व्याप्ती भारतभर वाढली.

**नक्षलवादाची कारणे—**

भारतीय समाजात नक्षलवाद फोफावण्याची असंख्य कारणे आहेत. काही महत्वपुर्ण कारणे खालीलप्रमाणे.

१. नक्षलवाद ही समस्या आर्थिक अधिकारांशी निगडीत असल्यामुळे आर्थिक कारण हे नक्षलवादाचे मुख्य कारण आहे.

२. आदिवासींमध्ये असलेली कमालीचे दारिद्रय व बेकारी हे नक्षलवादाचे मुख्य कारण आहे.

३. आदिवासींमधील अज्ञान हे सुध्दा नक्षलवादाचे प्रमुख कारण आहे.

४. शासनाने कामचलाउ व तकलादू धोरणे हे नक्षलवाद फोफावण्याचे मुख्य कारण आहे.

५. राज्यकर्ते व शासकीय कर्मचारी यांच्यात आंदिवासी प्रती असलेली उदासिनतेची भावना नक्षलवादाचे मुख्य कारण आहे.

६. समाजव्यवस्थेत बोकाळलेला भ्रष्टाचार व भांडवलदार, जंगल ठेकेदार यांच्याकडून आदिवासींचे होत असलेले शोषण नक्षलवादास कारणीभुत ठरलेले आहे.

**आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी संविधानात्मक महत्वपूर्ण तरतुदी:—**

भारताला स्वातंत्र मिळाल्यांनंतर भारताचे स्वतंत्र संविधान तयार करण्यात आले. भारतीय संविधानात समता आणि न्यायाचे तत्व मान्य करून जातीव्यवस्थेच्या आधारावर निर्माण झालेली विषमता दूरन करणे तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचा विकास करण्याच्या दृष्टिने अनेक महत्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्यात.

भारतिय संविधानाच्या १६ व्या कलमानुसार राज्याधीन नोक—या किंवा पदावर नियुक्ता बाबत नागरिकांना समान संधी देण्यात आली आहे.

कलम ३८ नुसार राज्य अशा समाजव्यवस्थेची निर्मीती आणि संरक्षन करण्याचा प्रयत्न करील की, जी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाव्दारे लोककल्याण साधेल.

कलम ४६ नुसार राज्याकडून आदिवासींना आर्थिक आणि शिक्षणसंबंधी विशेष सोयी देण्याची व्यवस्था केली आहे जेणे करून ते आपली उन्नती करून घेवू शकेल.

कलम १६४ नुसार आदिवासी कल्याणाकरिता आणि त्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी राज्यात सल्लागार परिषदा आणि स्वतंत्र विभागाची व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे या केंद्र सरकारात एक विशेष अधिका—यांच्या नियुक्तीची व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे या कलमानुसार आसाम, मध्यप्रदेश, विहार आणि ओरिसा याय सारख्या राज्यात आदिवासींची संख्या जास्त असल्यामुळे आदिवासी कल्याण मंत्रालय निर्माण करण्याची तरतुद केली आहे.

कलम ३३० आणि ३३२ नुसार आदिवासींना लोकसभा आणि विधानसभेत पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून त्यांना आरक्षण देण्यात आले.

कलम ३३५ नुसार प्रशासनाची कार्यक्षमता सुरक्षित राखून आदिचससींना केंद्रीय आणि राज्या सरकारच्या नोक—यामध्ये एकुन जागेपैकी ७.५: जागा आदिवासीसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. सरकारी, मर्यादित कंपन्या आणि स्वायत्त संस्थांना देखिल हा नियम लागू आहे.

कलम ३३८ नुसार अनुसूचित जमातीकरिता एका अधिका—यांची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतिला देण्यात आला आहे. अनुसूचित जमाती कल्याणासाठी संविधानाने दिलेल्या संरक्षणात्मक तरतूदीचे पालन होते कि नाही हे पाहण्यासाठी विशेष अधिका—यांची नियुक्ती करण्यात येते.

अशाप्रकारे आदिवासी लोकांना इतर समाजाबरोबर आणण्यासाठी विशेष सोयी आणि सवलतीची तरतूद भारतीय संविधानात केली आहे. त्यांना सर्व प्रकारचे हक्क प्रदान करून त्यांच्या हिताचे संरक्षण करण्यात आले आहे. आदिवासांच्या विविध समस्यांचे निवारण करण्याच्या दृष्टिने संविधानात्मक तरतुदी विशेष महत्वाच्या आहेत.

**सामाजिक व्यवस्थेच्या लोकशाहीकरणाच्या अपयशांची कारणे :—**

भारतातील केंद्र आणि राज्य शासनाने आदिवासी समाजाचा विकास करण्याच्या संदर्भात अनेक कार्यक्रम राबविले आहेत. परंतु या शासकीय कार्यक्रमाचा किंवा



Scanned by CamScanner

योजनांचा लाभ आदिवासींना मिळलाच नाही. शासणाने या विकास कार्यक्रमासाठी कोटयावधी रूपये खर्च केले तरी या योजनांना अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. सांविधानात्मक तरतुदी नुसार जो लाभ आदिवासी समुदायाला मिळाला पाहिजे तो त्यांना मिळलाच नाही. आदिवासी विकास योजना फक्त कागदोपत्री राहील्यात. आदिवासी विकास कार्यक्रमाच्या मर्यादा कोणत्या आहेत? या विकास कार्यक्रमाचा त्यांना लाभ का झाला नाही? आजही विकसीत समाजाच्या तुलनेत आदिवासी समाज मागास का आहे? भारतीय लोकशाहीने प्रत्येक नागरीकाला विशेष अधिकार दिले असले तरी येथील आदिवासी समाजाला हातामध्ये शस्त्र घेवुन नक्षल्वाद का स्विकारला आहे? या संदर्भात मुल्यमापन होणे गरजेचे आहे.

**राजकिय व्यवस्थेचे अपयश:–**

भारतात नक्षलवादी चळवळीचा प्रभाव वाढण्याचे महत्वाचे कारण म्हणजे स्वातंत्र्यानंतर ६०–६५ वर्षाच्या कालावधीतही देशातील दुर्बल घटकांना व उपेक्षित वर्गांना न्याय मिळवून देण्यास राजकीय व्यवस्थेला यश आले नाही. नक्षल्वादी संघटना असा आरोप करतात की, या देशातील सर्वच राजकीय पक्ष हे भांडवलदार, जमिनदार व इतर वरिष्ठ वर्ग हे शोषक वर्गाचे पाठीराखे आहेत. लोकशाहीच्या नावाखाली काही मूठभर लोकांनी राजकीय सत्तेत आणली मक्तेदारी निर्माण केली आणि त्याच्याच जोरावर त्यांनी सर्व प्रकारचे लाभ आपल्या पदरात पाडून घेतले म्हणूनच लोकशाहीच्या मार्गाने या देशातील कष्टकरी व श्रमजीवी वर्गाच्या शोषणाचा अंत करणे कधीही शक्य नाही. भारतीय समाजातील जो वर्ग विकासापासुन वंचित राहिला आहे त्यांना नक्षलवादी संघटनेचे तत्वज्ञान मनापासून पटते आणि वंचित, शोषित वर्गातिल लोक नक्षवाद्यांना साथ देण्यासाठी स्वेच्छेने पुढे येतात. म्हणूनच सरंजामशाही व्यवस्थेचा प्रभाव असलेल्या ग्रामिण भागात आणि आदिवासी भागात नक्षलवादी चळवळ वेगाने फोफावत चालली आहे.

**शासकिय प्रयत्नांना अपयश:–**

नक्षलवादी चळवळीचा प्रभाव वाढण्यासाठी सरकारने आत्तापर्यंत विविध उपाययोजना केल्या आहेत. परंतु त्यांच्या या प्रयत्नांना म्हणावे तसे यश आल्याचे दिसत नाही. सरकारचे प्रयत्न कमी पडण्याचे महत्वाचे कारण म्हणजे राज्यसरकारांनी नक्षल्वादाच्या वाढत्या प्रभावाकडे कायदा व सुव्यवस्थेची समस्या या दृष्टीने पाहणे होय. त्यामुळे या चळवळीच्या ख–या स्वरूपाकडे दुर्लक्ष झाले. देशातील उपेक्षित घटकांच्या चालत आलेल्या अव्याहत शोषणातून नक्षलवादी चळवळीला बळ मिळाले आहे. राजकारणी आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे आदिवासींना व भूमीहिन शेतमजूरांना मूलभूत सोयीसुविधांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे नक्षल्वाद्यांना जनतेचा पाठिंबा मिळत आहे नक्षलग्रस्त भागात आजही परिस्थिती जैसे–थे आहे आणि त्यामुळे नक्षलवाद्यादाचा बिनोड करण्यात सरकारला यश मिळतांना दिसत नाही. नक्षलवाद हा कायद्या आणि सुरक्षेचा प्रश्न नसून तो एक सामाजिक प्रश्न आहे. त्यामुळे नक्षल्वादग्रस्त भागामध्ये शासनाने जणतेच्या सेवा सुविधा कडे लक्ष दिले पाहिजे. सिमावर्ती भागात आदिवासींच्या समस्या दिवसेनदिवस वाढतच आहे. आदिवासिंच्या तरूण मुलींना संशयाच्या आधारे पोलीस यंत्रणा उचलून नेवून एनकांउनटर, अत्याचार, बलात्कार यासारख्या घटना नक्षलग्रस्त भागात घडतांना दिसत आहे. आदिवासींच्या बायकांना आपल्या मालकीच्या समजून काहि सरकारी अधिकारी आणि ठेकेदार तसेच आदिवासिंना कोठडीत ठेवून मारनारे शैतानी वृत्तीचे पोलिस यांच्या हिसंक कामामुळे आदिवासी तरूण मुलेच या आदिवासी चळवळीत सहभागी असल्याचे दिसून येते.

नक्षली प्रभावाखाली असलेल्या ८० टक्के भुभागावर जंगल पसरलेले आहे. या प्रदेशामध्ये आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. दुर्गम भागात आजही मुलभुत सेवा–सुविधा पोहचलेल्या नाही. रस्ते, आरोग्य, शिक्षण, नवे तंत्रज्ञान या मुलभूत सुविधा जनतेपर्यंत पोहचल्याच नाहीत. शाळामध्ये विज नाही तरीही सरकार कडून ई–विद्या प्रकल्पावर कोटयावधी रूपये खर्च केले जात आहेत. रोजगार हमीचा मोबदला देता यावा यासाठी बायोमेट्रीक प्रणालीने किती लोकांना मजुरी मिळाली आहे? दुर्गम भागातले शेकडो रस्ते रखडले आहेत. कर्मचारी व डॉक्टरअभावी आरोग्य केंद्र ओस पडली आहेत. नक्षवाद्यांच्या नावाखाली काम नकरणा–या कर्मचारी संख्या हजारोंच्या घरात आहे. प्राथमिक शिक्षणाची सोय नाही तेथे संगणकावरून धडे दिले जात आहे. वन हक्काचे दावे मंजुर झाले पण प्रलंबित दाव्यांची संख्या लाखावर पोहोचली आहे. रेशनचे धान्य मिळावे म्हणून लाखो रूपये खर्च करून एस.एम.एस. यंत्रणा बसविण्यात आली पण दुर्गम भागात नेटवर्कच नाही यासर्वांचा विसर प्रशासनाला पडला आहे.



Scanned by CamScanner

निष्कर्ष :—

हिंसेमुळे आजपर्यंत देशात किंवा जगात कोणताच प्रश्न सुटला नाही. हिंसेमुळे फक्त रक्तपात झाला आहे. त्यामुळे कोणत्याही समस्येचे विधायक परिणाम आजपर्यंत तरी दिसली नाही. हिंसाचाराने राज्यव्यवस्था बदलता येत नाही. नक्षलवादी चळवळीचा ज्या कारणामुळे प्रारंभ झाला त्या बाबी देशात आजही अस्तित्वात आहेत. देशाचे दारिद्र्य, बेकारीचे प्रमाण हे धक्कादायक. आदिवासींना योग्य वागणूक मिळत नाही. दुर्गम भागातील प्रशासन ही अपेक्षेप्रमाणे कार्य करत नाही. सरकारणे या समस्येचा सामना करण्यासाठी विविध कार्यक्रमाची आखणी केले आहे. परंतु कार्यक्रमाची आखणी करून चालनार नाही तर प्रत्यक्ष अमलबजावनी करणे अधिक गरजेचे आहे. नक्षलग्रस्त भागातील जणतेला संरक्षन पुरवून नक्षवाद्याचा बिमोड करण्यास प्रवृत्त करूण सरकारला मदत करण्या—या नागरिकांचे स्वरक्षण करण्याची जबाबदारी शासनाने उचलने गरजेचे आहे. गडचिरोली, चंद्पुर, गोंदिया या जिल्हामध्ये आजही मोठ्याप्रमाणात नक्षलवादाचे प्राबल्य दिसुन येते. केंद्र सरकार नक्षलवादी हिंसेला रोखण्यासाठी ठोस प्रयत्न करतांना दिसत नाही. त्यामुळे नक्षलकारवांयां मध्ये सतत वाढ होत चाललेली आहे. नक्षलवाद समुळ नष्ट करावयाचा असेल तर त्याकरिता गरज आहे ती दृढ ईच्छाशक्तिची मात्र नेमके याच बाबीचा शासनाकडे अभाव दिसुन येतो. कारण सरकारकडे नक्षलवादाला दहशतवादाच्या श्रेणित बसविते तर कधी नक्षलवाद्याशी वाटाघाटींनी समस्या सोडविण्याचा प्रयत्न करते. सरकारचीही डोलायमान स्थिती विचार करण्यास भाग पाडणारी आहे.

**संदर्भग्रंथ सुची:—**

१.डॉ. प्रदिप आगलावे— आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपुर—२०१०

२.भारत सरकार विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय— भारतीय संविधान, पाचवी आवृत्ती,२००२

३.देवेंद्र गावंडे—नक्षलवाद चळवळीचे आवाहान, सुगावा प्रकाशन, पुणे १९९३

४.मनोज श्रीवास्तव —नक्षलवाद कारण, समस्या एव समाधान, विश्वभारतीय पब्लीकेशन,नई दिल्ली —२०११

५.स्मरणिका— २७ वे राज्यस्तरीय राज्यशास्त्र व लोककल्याण प्रशासन अधिवेशन

६.स्मरणिका— नक्षलवाद—आव्हान आणि आवाहन, राज्यस्तरिय चर्चासत्र, वाशिम, २०१३

७.मासिक चाणक्य मंडल— नोव्हेंबर २०१०

**21**

## स्त्रियांच्या विकासात समाज सुधारकांची मूमिका

**प्रा. डॉ. देशमुख पी. एस.**
भाई किसनराव देशमुख महाविद्यालय,
ता. चाकूर जि. लातुर

**प्रस्तावना :-**

आधुनिक काळात भारतीय स्त्रिया व्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेत असलेल्या दिसून येतात. त्या उच्च शिक्षण घेवून नोकरी, व्यावसाय, उद्योग, सामाजिक कार्य, राजकारण इत्यादी क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहेत. त्या स्वतःच्या कर्तत्वाने समाजात आपला स्वतंत्र ठस्सा निर्माण करीत आहेत. नोकरी, व्यावसाय, उद्योग, करणाऱ्या स्त्रिया, आर्थिक दृष्टीने स्वावलंबी असलेल्या दिसुन येतात. त्या कुटूंबात मुला-मुलींचे शिक्षण, विवाह, आर्थिक नियोजन, भौतिक वस्तुची खरेदी, स्थावर मालमत्तेची खरेदी, विक्री या संबंधी स्वतः निर्णय घेत असलेल्या दिसून येतात. त्याच बरोबर त्या सामाजिक राजकीय कार्यामध्ये सहभाग घेत आहेत. यावरून त्यांचा कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक दर्जा उंचावलेला दिसुन येतो.

आधुनिक काळात स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्य मिळून त्यांचा कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय दर्जा उंचावलेला दिसुन येत असला तरी स्त्रियांचे जीवन आणि दर्जा संबंधी ऐतिहासिक आढावा घेतला असता, उत्तर वैदिक कालखंडापासुन स्वातंत्र्य पुर्व काळा पर्यंत स्त्रियांचे जीवन पुरुषांच्या अधिन असलेले दिसुन येते. पुरुषांनी स्त्रियांवर वैवाहिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय बंधने घलेली होती. त्यामुळे स्त्रियांचे जीवन बंदिस्त होवुन त्या परावलंबी जीवन जगत होत्या. त्यांचा कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक दर्जा अस्पृश्य व गुलामांच्या बरोबरीचा बनला होता. अशा परावलंबी आणि दुःखमय जीवन जगणाऱ्या स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्य देवून त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्या मध्ये भारतीय समाज सुधारकांची भूमिका व कार्य महत्वाचे



Scanned by CamScanner

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

December 2018, Issue-49, Vol-01

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

14) Computer Technology in India
Ridhu Saini, Hoshiarpur ||65

15) EDUCATION AND SKILL DEVELOPMENT: ITS CHANGING DYNAMICS
DR. MURALI KRISHNA SARMA & PROF. UDAY PRATAP SINGH, RAMGARH ||69

16) GENERAL POSITION OF KULLU WOMEN AND BHUTTICO WOMEN
Kumari Deepa Thakur ||75

17) THE IMPACT OF EMOTIONAL INTELLIGENCE ON TEACHERS OF HIGHER EDU...
Ms. Swati P. Doye, Ms. Priyanka R. Thakur & Ms. Priti S. Mankar, Nagpur ||81

18) महाभारतकालीन स्त्रियांची स्थिती
प्रा. डॉ. सुदर्शन सदाशिव क्षेत्री, जि. नांदेड ||86

19) सांस्कृतिक समन्वयाचे केंद्रस्थान : मढी
प्रा. केरकळ अर्जुन शंकर, जि. अहमदनगर ||88

20) ग्रामीण भागातील बेरोजगारी एक समस्या
सहा. प्रा. दिपक आर. आटे, यवतमाळ ||90

21) ''भवरलाल जैन यांचे विविध क्षेत्रातील योगदान''
डॉ. कल्पना भजनी & डॉ. कांचनमाला क्षीरसागर, नागपूर ||94

22) नोटाबंदीचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणरे परिणाम
श्री. गिरीधर केशव कुनघाडकर, चंद्रपूर ||97

23) नांदेड जिल्हयातील मत्स्यव्यवसाय - एक अभ्यास
प्रा. स्वाती विकासराव कुरमे, जि. नांदेड ||99

24) महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाकरिता संविधानातील तरतुदी आणि राष्ट्रीय धोरण
कु. शुभांगी मुनघाटे ||102

25) पाणलोट क्षेत्र विकासाचा सामाजिक व आर्थिक विकासावर झालेला परिणामांचा भौगोलिक अभ्यास
प्रा. पठाण कलंदर मुस्तफा, जि. बीड ||105

26) मिल्लीया महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विषयाचा अभ्यास
सय्यद समियोद्दीन & डॉ. सय्यद शफियोद्दीन, बीड ||107

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03



Scanned by CamScanner

असल्यामुळे त्यांच्या भाषेतही संमिश्रपणा निर्माण झालेला आहे. पारंपरिक व्यवसाय व चालीरीती यांचे जतनही या समाजाने केलेले आहे.

**समारोप :** सूफी धर्माचार आणि भक्ती धर्माचार यांच्यात बरेच साम्य आढळते. प्राचीन काळी आर्य इराणमधूनच आलेले असल्यामुळे हिंदू—मुस्लिमांचा प्राचीन धर्म एकच होता. पुढे इराणमध्ये शियापंथी इस्लाम व भारतात वैदिक, बौध्द वैगरे धर्म पसरले. इराणची मूळची उदार व सहिष्णु वृत्ती जशी शियापंथीय व सूफी संप्रदायात प्रकट झाली, तशी भारतीय आर्यांची बौध्द धर्म व भक्ती पंथ यात प्रदर्शित झाली. भक्ती पंथ व सूफी पंथातील महात्म्यांनी हिंदू—मुस्लिम ऐक्य घडविण्याचा प्रयत्न केल्यामुळे भारतात हे दोन्ही परस्परविरोधी धर्म गुण्यागोविंदाने राहण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. [७] राष्ट्रीय ऐक्याच्या दश्ष्टिने हे कार्य महत्वपूर्ण आहे. 'विविधतेतून एकता' या भारताच्या वैशिष्ट्याचा प्रत्यय आपणास मढी या ठिकाणी येतो.

**निष्कर्ष:**

१. मढी हे हिंदू, मुस्लिम व भटके विमुक्त या सर्व जाती जमातींचे श्रध्दास्थान आहे.

२. मढी हे ऐतिहासिक वारसा लाभलेले एक महत्वपूर्ण धार्मिक स्थळ आहे.

**संदर्भ:**

१. Gazetteer of the Bombay Presidency, (1884). Ahmednagar District, Volume XVII, Mumbai, P. 726-27

२. चिटणीस,के.एन.(१९८७).मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग—२, पुणे, पृ. ५९—६०

३. जोशी, सुरेश (१९६३). मिरीचे ऐतिहासिक दर्शन, अहमदनगर, पृ. १०

४. Gazetteer of the Bombay Presidency, Ibid, Page- 726-27

५. नेवासकर अशोक. 'पाथर्डी तालुक्याची ऐतिहासिक पाहणी' इतिहास संशोधन प्रदीप, पृ. २१ ते २८

६. मरकड,संजय. (२०१२). नवनाथ दर्शन, पृ. ८०

७. देशमुख मा. म. (२००३). मध्ययुगीन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, पृ. २२४

20

# ग्रामीण भागातील बेरोजगारी एक समस्या

**सहा. प्रा. दिपक आर. आटे**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क
यवतमाळ

***********

**प्रस्तावना:**

बेरोजगारी भारतातील एक गंभीर समस्या आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील बरोजगारी कमी करण्यासाठी व्यापक प्रयत्न केले गेले, परंतु बेरोजगारी सातत्याने वाढतच आहे. बेरोजगारीचे दृष्परिणाम संपुर्ण समाजाला भोगावे लागतात. ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीकोणतुन ग्रामीण बेरोजगारीचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

व्याख्या ''त्या देशात बेकारी आहे, जिथे सुदृढ आरोग्य असणा—या व्यक्तींना काम करण्याची इच्छा असुन त्यांना काम मिळत नाही'' जी. आर.मदन

"Unemployment is said to exist in a country where the healthy persons of working age who are willing to work, are not able to find work at the current wage level." (Madan.G.R. Social change and social problems in Indian society p-226)

थोडक्यात, प्रचलित वेतन दरात काम करण्याची इच्छा व कुवत असून देखील ज्यांना काम मिळत नाही त्यास बेकारी असे म्हटले जाते.

**उद्देश**

प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील जीवन जगणा—या घटकांच्या आर्थिक व सामाजीक स्थितीत सुधारणा व्हावी व त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावला जावा. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील जीवन जगणा—या लोकांना त्यांच्या पायावर अभे राहता यावे. ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देउन त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यास सक्षम करणे हे या संशोधन



Scanned by CamScanner

लेखनाचे उदिदृष्ट आहे.

**बरोजगारीचा दर:—**

भारतामध्ये मोठया प्रमाणावर बेरोजगारी आढळुन येते. परंतु योग्य आकडेवारीच्या अभावी निश्चित अशी संख्या प्राप्त होत नाही. ग्रामीण भागातील बेरोजगारीची तर निष्चितपणे आकडेवरीच मिळत नाही. ही आकडेवारी रोजगार कार्यालयाकडून प्राप्त होत असते शहरामधील व्यक्ती सेवायोजन कार्यालयात आपली नोंद करतात, परंतु ग्रामीण भागामध्ये या जागृतीचा अभाव आढळुंन येतो. ब—याच वेळी नोकरीत असुन देखील त्यांच्या नावाची नोंद रोजगार कार्यालयात असते. त्यामुळे आकडेवारी निश्चीत रूपात मिळणे कठीण होते. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीपासुन बेरोजगारीमध्ये सतत वाढ होत आहे. मागील पाच वर्शात तर उचांक गाठल्याचे दिसुन येते.

**ग्रामीण बेरोजगारी दर**

State-wise details of unemployment rates amongst youth in both rural and urban areas :

| SL No. | State/Union Territory | Rural | Urban |
|---|---|---|---|
| 1. | Andhra Pradesh | 1.8 | 8.5 |
| 2. | Arunachal Pradesh | 2.5 | 4.8 |
| 3. | Assam | 6.8 | 19.9 |
| 4. | Bihar | 4.3 | 17.4 |
| 5. | Chhattisgarh | 1.3 | 7.6 |
| 6. | Delhi | 5.1 | 10.8 |
| 7. | Goa | 26.0 | 18.5 |
| 8. | Gujarat | 1.4 | 4.9 |
| 9. | Haryana | 5.5 | 9.3 |
| 10. | Himachal Pradesh | 4.2 | 9.7 |
| 11. | Jammu & Kashmir | 4.1 | 13.6 |
| 12. | Jharkhand | 3.7 | 18.6 |
| 13. | Karnataka | 1.5 | 6.4 |
| 14. | Kerala | 26.8 | 32.5 |
| 15. | Madhye Pradesh | 1.0 | 7.3 |
| 16. | Maharashtra | 2.7 | 8.4 |
| 17. | Manipur | 2.6 | 17.4 |
| 18. | Meghalaya | 0.7 | 10.7 |
| 19. | Mizoram | 0.8 | 4.8 |
| 20. | Nagaland | 5.5 | 18.9 |
| 21. | Orissa | 10.2 | 31.7 |
| 22. | Punjab | 9.7 | 10.5 |
| 23. | Rajasthan | 1.8 | 6.2 |
| 24. | Sikkim | 6.4 | 7.9 |
| 25. | Tamil Nadu | 3.5 | 8.2 |
| 26. | Tripura | 32.1 | 60.1 |
| 27. | Uttarakhand | 3.3 | 12.2 |
| 28. | Uttar Pradesh | 1.5 | 7.4 |
| 29. | West Bengal | 6.0 | 13.2 |
| 30. | A&N Islands | 13.2 | 21.5 |
| 31. | Chandigarh | 6.2 | 13.9 |
| 32. | Dadra & Nagar Haveli | 6.9 | 7.9 |
| 33. | Daman & Diu | 0.6 | 4.9 |
| 34. | Lakshadweep | 16.7 | 45.5 |
| 35. | Puducherry | 18.3 | 25.5 |
| | All India | 4.0 | 10.1 |

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीला भारतात ३३ लाख लोक बेरोजगार होते. या योजनेच्या शेवटपर्यंत बेरोजगार लोकांची संख्या ५३ लाख इतकी झाली. दुस—या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी ही संख्या ७१ लाख इतकी झाली. तिस—या योजनेच्या शेवटी ९६ लाख लोक बेरोजगार होते. तीने वार्षीक योजनां मध्ये बेरोजगारीचे प्रमाण अतिशय वाढते या दरम्यान २२२ लाख लोक बेरोजगार होते, तर चौथ्या योजनेच्या शेवटी १४० लाख लोक बेरोजगार होते, तर पाचव्या योजनेच्या शेवटी २८० लाख लोक बेरोजगार होते. सहाव्या योजनेच्या शेवटी १२० लोक बेरोजगार होते. सातव्या योजनेच्या शेवटी देशात ७.० मिलियन व्यक्ती बेरोजगार मागील दशकात हीच संख्या ४० मिलीयन इतकी बेकार झाली.

**बेरोजगारीची कारणे(Causes of unemployment) :**

एजीयट आणि मेरील यांनी बेरोजगारीच्या कारणांना दोन भागता विभागले आहे. वैयक्तिक कारण आणि अवैयक्तिक कारण बेरोजगारीच्या कारणांचा आपणास खालीलप्रमाणे विचार करता येईल.

**शारीरिक अयोग्यता:**

सततचे आजारपण, अपंगत्व, शारीरिक दुर्बलता, व्यसनाधिनता या कारणांमुळे ब—याच वेळा व्यक्ती काम करू शकता नाही आणि त्यामुळे अशा व्यक्तींना बेकारीला तोंड द्यावे लागते.

**शैक्षणिक अयोग्यता:**

ब—याच वेळा कामासाठी जी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे, ती पात्रता व्यक्तीजवळ नसल्यामुळे काम असुनही तो त्या ठिकाणी अपात्र समजला जातो. परिणामी बेकारी वाढत जाते.

**वैयक्तिक अयोग्यता:**

ब—याच वेळा व्यक्तीजवळ आवश्यक असणारा शैक्षणिक पात्रता असते. काम करायची त्याची तयारी असते, परंतु तरीदेखील योग्य त्या ज्ञानाअभावी तो त्या ठिकाणी काम करण्यास सक्षम समजल्या जात नाही.

**लोकसंख्या वाढ:**

लोकसंख्येत होणारी सततची वाढ हे भारतातील बेरोजगारीचे महत्वाचे कारण मानले जाते. भारतामध्ये



Scanned by CamScanner

दरवर्षी १.७० कोटी जनसंख्या वाढते. भारतामध्ये त्या प्रमाणात उद्योग, व्यवसाय, शासकीय–निमशासकीय कार्यालयात जागा निघत नसल्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण दिवसेन दिवस वाढत आहे.

**मर्यादित जीवमन:**

लोकसंख्या वाढत आहे, यामुळे कुटुंबातील संख्या वाढत जाते आणि त्याबरोबर तमिनीचे छोटया –छोटया तुकडयात विभाजन होते. या छोटया–छोटया शेतीच्या तुकडयावर संपुर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत नाही परिणामी बेकारीत वाढ होते.

**नैसर्गिक आपत्ती:**

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबुन आहे. अतिवृष्टी, कोरडा दृष्काळ, भुकंप, चक्रीवादळ, वणवा या सर्व गोष्टीमुळे शेतीवर आघात होतात व ही नैसर्गिक आपत्ती बेकारी वाढविण्यास कारणीभुत ठरते.

**शेतीची मागास अवस्था:**

आजही भारतामध्ये पारंपारिक पध्दतीने शेती केली जाते. त्यामुळे उत्पादन खर्च जास्त व उत्पन्न कमी अशी शेतीची स्थिती दिसुन येते. आधुनिक तंत्रज्ञानापासुन आजही भारतीय शेतकरी दुर आहे. याचा परिणाम प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे बेकारीवर होत असतो. जेव्हा शेतामध्ये काही काम नसते त्या कालावधी मध्ये मजुर वर्ग खाली राहतो व त्यामुळे हंगामी बेकारी निर्माण होते.

**औद्योगिकीकारण:**

बेकारी निर्माण करण्यास औद्योगिकीकरण हा घटक देखील कारणीभुत ठरतो. वस्तुचे उत्पादन मानवाऐवजी यंत्राने होउ लागले. यंत्रामुळे कमी श्रमात जास्त काम होउ लागले. एक संगणक अनेक व्यक्तींचे काम करतो, यामुळे बेकारी वाढते.

**हंगामी बेकारी:**

ब–याच व्यवसाय हे विशिष्ट हंगामातच चालु असतात. त्यामुळे या क्षेत्रात काम करणा–या व्यक्तींना इतर कालावधीमध्ये हंगामी बेकारीला तोंड द्यावे लागते. त्यामुळे बेरोजगारीच्या संख्येत देखील वाढ होते.

**प्रतिष्ठा:**

सध्याच्या काळामध्ये नवयुकांना शेती हा प्रतीष्ठेचा व्यवसाय वाटत नाही. त्यांच्याजपळ आवश्यक तेवढी पात्रता देखील नसते त्यामुळे इतर ठीकानी ग्रामीण युवक नोकरी करू शकत नाही, तसेच घरच्या शेतात काम असुनही काम करण्याची इच्छा नसते त्यामुळे बेकारीच्या संख्येत वाढ होते.

योजना आयोगाने बेरोजगारीची कारणे पुढिल प्रमाणे सांगीतली आहेत.

लोकसंख्येची वाढ

ग्रामीण कुटीरोद्योगाचा –ऱ्हास

शरणार्थीची समस्या.

शेतीव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात रोजगाराचा अनुपयुक्त विकास

परंपरागत पध्दतीने शेती करण्याची पध्दत.

अशा प्रकारे सध्याच्या काळामध्ये बेरोजगारी ही ज्वलंत समस्या आहे आणि त्यासाठी वैयक्तिक, शारीरिक, आर्थिक, औद्योगिक, सामाजिक अशी अनंक कारणे कारणीभुत आहेत.

**बेरोजगारीचे दुष्परिणाम**

कुटुंबातील एक व्यक्ती जरी बेरोजगार असला तरी संपुर्ण कुटुंबावर व समाजावर त्याचा प्रभाव पडतो. बरोजगारीचे दुष्परिणाम पुढीप्रामाणे सांगता येतील.

**वैयक्तिक विघटन**

पात्रता व इच्छा असुनही जर नोकरी मीळाली नाहि तर व्यक्तीच्या वर्तनुकीवर त्याचा परिणाम होतो. चिंताग्रस्तता, तनाव, चीडचीडेपणा, एकलकोंडेपणा, न्यूनगंड, नैराश्य वाढत जाते. यामुळे त्याच्या कुटुंबातील व्यक्तीशी असलेल्या संबधात व सामाजिक संबंधा मध्ये बिघड निर्माण होतो. ब–याच वेळा समजात बेरोजगारीला कंटाळुन आत्महत्या केल्याच्या घटनाही घडत असतात.

**शारीरिक परिणाम**

बेरोजगारीमुळे शरीरावर परिणामी आरोग्यावर अतीशय विपरीत परिणाम होतो. बेकार व्यक्ती स्वतःच्या शरीराची हेळसांड करतो. तो पोटभर जेवत नाही. योग्य आहार घेत नाही. चिंता व तनावामूळे त्याला व्यवस्थीत जेवन जात नाही. परिणामी त्याचे शरिर अनेक आजारांचे घर बनु शकते. योग्य उपचारा अभावी अशा वेळेस मृत्यु सुध्दा येउ शकतो.

**कौटुंबीक विघटन**



Scanned by CamScanner

बेरोजगारीच कौटुंबिक संबधावर फार मोठा प्रभाव पडतो. दृश्य बेकारीमुळे व्यक्ती कुटुंबाच्या आवश्यक गरजा देखिल पूर्ण करू शकत नाही. कुटुंब सदस्याचे भरन पोषण, कुटुंबातील वृध्दांची आजा–यांची काळजी, मुलांचे शिक्षण अशी कर्तव्य तो करू शकत नाही. अशावेळेस संपुर्ण कुटुंबच कोलमडते. कुटूंबामध्ये तनाव व संघर्ष निर्माण होतो. कौटुंबिक वादाच्या प्रकरणामध्ये वाढ होण्याचे बेरोजगारी ही देखील एक कारण आहे.

**सामाजिक विघटण**

बेरोजगारी हे अनेक सामाजिक समस्यांचे मूळ आहे. रीकामेडोकेहे शैतानचे घर असते, असे म्हटले जाते बेरोजगारीतुन जुगार, वेसनाधीनता, भिक्षावृत्ती, गुन्हेगारी, भ्रष्टाचार वेश्या व्यवसाय अशा अनेक समस्या निर्माण होतात. यामुळे समाजाचे सामाजिक आरोग्यच धोक्यात येते. अशा व्यक्तींच्या संघटणा होणे हे संपुर्ण समाजाच्या दृष्टीने घातक असते.

**आर्थिक विघटन**

बेरोजगारीमुळे जिवनाचा स्थर हालावतो व्यक्तीचा कर्जबाजारीपणा वाढतो, बेरोजगारीमूळे कार्यक्षमता कमी होते, परिणामी राष्ट्रीय उत्पन्नात घट होते व संपुर्ण समाजावर त्याचा विपरित परिणाम होतो.

**राजकीय परिणाम**

देशव्यापी बेरोजगारी राजकीय विद्रोहाला जन्म देते. ब–याच वेळा यातुन दंगल घडवुन आणली जाते. देशात अराजकता माजवली जाते. सत्तेवर येण्यासाठी अथवा आपली खुर्चि टिकवुन ठेवण्यासाठी राजकारणी व्यक्ती समाजामध्ये अराजकता पसरवितात व त्याचे परिणाम संपुर्ण समाजाला भोगावे लागतात.

**सांस्कृतीक परिणाम:**

देशव्यापी बेरोजगारी राजकीय विद्रोहाला जन्म देते. ब–याच वेळा यातुन दंगल घडवुन आणली जाते. देशात अराजकता गाजवली जाते. सत्तेवर येण्यासाठी अथवा आपली खुर्चि टिकवुन ठेवण्यासाठी राजकारणी व्यक्ती समाजमध्ये अराजकता गाजवली जाते. सत्तेवर येण्यासाठी अथवा आपली खुर्चि टिकवुन ठवेण्यासाठी राजकारणी व्यक्ती समाजामध्ये अराजकता पसरवितात व त्याचे परिणाम संपुर्ण समाजाला भोगावे लागतात.

**सांस्कृतीक परिणाम**

आर्थिक स्थिती व सांस्कृतिक विकास याचा जवळचा संबंध आहे व्यक्तीला काम नसेल तर त्याच्या जवळ पैसा नसणार. त्यामुळे त्याचे कशातही लक्ष लागत नाही. संस्कृतीचे जतन करायचे तिचा विकास करायचा तर तो उपाशी पोटी होत नाही. परिणामी सांस्कृतीक विकसावरदेखील याचा परिणाम होतो.

**नैतिक पतन**

बेरोजगारीमुळे चरित्रयाचा –हास होतो. बेरोजगारीमुळे वाईट गोष्टीची सवय लागते. चोरी करणे, खोटे बोलणे, नशा करणे, व्यभिचार करणे मोठया व्यक्तींविषयी आदराची भावना न ठेवणे अशा अनेक गोष्टी व्यक्तींमध्ये आढळुन येतात. आधी खुप चांगले वागणा–या व्यक्तीमध्येदेखील बेरोजगारीमुळे अशा प्रकारचे बदल झाल्याचे आढळुन आले आहे.

अशा रीतीने बेरोजगारीमुळे वैयक्तिक, शारीरिक, मानसीक, सामाजिक, आर्थिक, नैतिक, सांस्कृतिक, राजकीय, कौटुबीक परिणाम होतात.

**बेरोजगारी दुर करण्यासाठी शासनाकडुन केले गेलेले प्रयत्न**

पंचवार्षिक योजना

बेकारी भत्ता

अनुसुचित जाती–जमाती व अपंग यांसाठी विशेष भरती मोहीम

स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना

पंतप्रधानमंत्री रोजगार योजना

ग्रामीण रोजगार सृजन कार्यक्रम

संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना

जयप्रकाश नारायण रोजगार गॅरंटी योजना

प्रधानमंत्री ग्रामद्योग योजना

शेतमजुर विमा योजना.

**बेरोजगारी दुर करण्यासाठी सुचना शिफारशी**

भारतासमोर बेरोजगारी ही ज्वलंत समस्या आहे व तिचे संपुर्ण समाजावर वाईट परिणाम होत आहेत. बेरोजगारीची सोडविण्यासाठी पुढील बाबींचा अवलंब केल्यास बेरोजगारीची समस्या संपुष्टात येउ षकते.

वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण

शिक्षण प्रणालीत सुधारणा



Scanned by CamScanner

मुलोद्योगी शिक्षणावर भर

ग्रामीण भागात कुटीरद्योगास प्रोत्साहन

स्वयंसाहयता गटास प्रोत्साहन

ग्रामीण युवकांना व्यवसाय प्रशिक्षण व जागृती

शेतक—यांना कमी व्याजदारावर कर्ज उपलब्ध

शेतक—यांना जोड व्यवसाय करण्यास प्रोत्साहनन

वरिल उपाय केल्यास बेरोजगारी सोडविण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सुचि:**


डॉ. स.श्री.मु.देसाई, डॉ. सौ निर्मल भालेराव निराली प्रकाशन

आगलावे प्रदीप, सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपुर

खलवार सुगन चन्द्र, वाणी तेजराम, 'निर्धनता उन्मुलन एवं ग्रामीण विकास'

डॉ नंदा पांगुळ—बाराहाते, भारतीय ग्रामीण समुदाय

Ahuja Ram, 'social problem in India', Rawat Publications

Desai, A.R, 'Rural Sociology in India'

Dandekar, V.M & Rath Nilkanth, 'Poverty in India'

Mishra G.P, 'Rural Unemployment and Land Celing Policy.'

Visaria Pravian, 'Poverty and Unemploy ment.'


❑❑❑

**21**

# "भवरलाल जैन यांचे विविध क्षेत्रातील योगदान"


**डॉ. कल्पना भजनी**

कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर

**डॉ. कांचनमाला क्षीरसागर**

नवप्रतिभा महाविद्यालय, नागपूर



**सारांश (Abstrsct) :—**

आधुनिक काळातील यशस्वी शेतकरी, उद्योजक व शेतकऱ्यांचे मार्गदर्शक असणारे भवरलालजी जैन हे बहुआयामी व्यक्तीमत्वाचे धनी होते. त्यांनी हजारो शेतकरी कुटुंबांना रोजगार मिळवून दिला. म्हणून त्यांना शेतकरी कुटुंबाचे आधारवड संबोधिल्या जात असे. शेतकऱ्यांच्या उन्नती व प्रगतीसाठी काय करता येईल याचा नेहमी ते दूरदृष्टीने विचार करीत. या आधुनिक स्पर्धेच्या काळात मानवाला घडायचे असेल किंवा सक्षम व्हायचे असेल तर परिश्रम, प्रबळ इच्छा व स्वत: कृषीतील असण्याची गरज आहे हे त्यांनी आपल्या जीवनातून शेतकऱ्यांना पटवून दिले. त्यांच्या त्या जिद्दीमूळे त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले व शेतकऱ्यांच्या समोर एक आदर्श उभा केला होता. आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी शेती व्यवसायाची प्रेरणा शेतकऱ्यांमध्ये जागविली.



**बिजशब्द (Keywords) :—** भवरलाल जैन, शेती, शेतकरी.


**उद्दिष्टये :—**

१) भवरलालजी जैन यांच्या शेतीविषयक कार्याचा आढावा घेणे.

२) भवरलालजी जैन यांच्या शेतीविषयक कार्यासोबतच इतर क्षेत्रीय कार्याचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :—**



Scanned by CamScanner

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV Marathi Part - II October - December - 2018

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतातील दहशतवाद, नक्षलवादाचे एक ऐतिहासिक अध्ययन<br>**प्रा. डॉ. गौतम ए. शंभरकर** | १-५ |
| २ | योगशास्त्राची वाढती लोकप्रियता आणि उपयुक्तता<br>**डॉ. बी. एम. सावरकर** | ६-८ |
| ३ | तेलंगणा प्रादेशिकवादाचा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर होणारा परिणाम<br>**घन आनंद लक्ष्मीकांत**<br>**डॉ. विजय यशवंतराव जाधव** | ९-१४ |
| ४ | तलाक कायदा - अपुरे संरक्षण<br>**डॉ. भालेराव जी. पी** | १५-१६ |
| ५ | नक्षलवादाचा आदिवासीच्या आर्थिक जीवनावरील प्रभाव<br>**डॉ. साळुंके जयसिंग ज्ञानदेव** | १७-१९ |
| ६ | महिला पोलिस आणि लिंगभाव<br>**प्रा. काळे आर. बी.**<br>**प्रा. मोकासरे जी. टी.** | २०-२३ |
| ७ | शेतकरी आत्महत्या देशासमोरील एक गंभीर आव्हान<br>**प्रा. डॉ. दिलीप जानकीराम घोंगडे** | २४-२८ |
| ८ | साधना बालकुमार दिवाळी अंक २०१८ मधील कथांमधून आशयातून संस्कारित होणाऱ्या गाभाघटकांचा व मूल्यांचा अभ्यास<br>**डॉ. छाया दिलीप महाले** | २९-३४ |
| ९ | शेतकरी आत्महत्या : कारणे, उपाय व समाजकार्य मध्यस्थी<br>**सहा. प्रा. विकास एन. अड्याळकर** | ३५-३९ |
| १० | स्वयं सहायता बचत गट महिला सक्षमीकरणाचे माध्यम<br>**डॉ. गणेश आर. गाडेकर** | ४०-४३ |
| ११ | स्त्रियांच्या सक्षमिकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रा. देविदास नागोराव रिठे** | ४४-४६ |
| १२ | सुखा एक पर्यावरणीय प्रकोप<br>**प्रा. कांबळे डी. एस.** | ४७-५० |

# ९. शेतकरी आत्महत्या : कारणे, उपाय व समाजकार्य मध्यस्थी

**सहा. प्रा. विकास एन. अड्याळकर**
महात्मा ज्योतीबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ.

भारत हा कृषीप्रधान अर्थव्यवस्था असणारा देश आहे. शेतकरी हा या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे साहजिकच शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या संदर्भात कृषीव्यवस्थेचा अत्यंत जवळचा संबंध आहे. कृषी विकासाचा वेग जितका जास्त राहील त्या प्रमाणात शेतकऱ्यांचा विकास घडून येणार आहे. कृषी व्यवस्था ही या देशातील ग्रामिण भागातील व्यापक व्यवस्था आहे. या भागातील शेतकरी म्हणजे देशाला अभिमान वाटावा असा घटक आहे. त्यासाठी तो व त्याचे कुटुंब अत्यंत काबाडकष्ठ करतात. परंतु आजही तो व त्याचे कुटुंब उपेक्षित जीवन जगत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या 70 वर्षात देशात ज्या विविध क्षेत्रांची प्रगती होत आहेत, त्यामानाने कृषीक्षेत्र बरेच मागासलेले आहे. भारतात जागतिकिकरणा नंतर शेतीच्या क्षेत्रात विविध बदल होत गेले.

70 टक्के भारतीय जनता शेतीवर आधारीत आहे. हरितक्रांतीनंतर शेतकऱ्यांनी देशाला अन्नधान्य या बाबतीत स्वयंपुर्ण केले. तरीही शेकडो लोक उपासमारीने मरतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहे. ह्या कृत्रिम नर हत्याच होय. येथिल व्यापारी, उद्योगपती, अरबो कोटींची लूट करतात, देशाला फसवितात, तेव्हा ओरड होत नाही. भाववाढ होण्याची, शेअरमार्केट कमी होण्याची अथवा सरकारी तिजारीवर बोझा होण्याची भाषा सरकार करित नाही. पण शेती धोरणारणाचा विचार करतांना सरकारी तिजोरी वर भार येत आहे असे सांगितले जाते. माहगाई वाढणार हे सांगितले जाते. याचाच अर्थ शेतकरी कधीही सरकारसाठी महत्वाचा नव्हता. जे शेतकरी जीवंत आहे कारण मरता येत नाही म्हणून. जीवंत आहेत याचा अर्थ चांगले आहेत असे नव्हे. ज्यांनी आत्महत्या केल्यात त्यांच्या कुटुंबाची काय स्थिती आहे. हे घरात जाऊन सरकारने व उद्योजकांनी बघावे त्यानंतरच ते माणसे प्राण्यांचे की किड्यांचे जीवन जगतात हे ठरवावे. आज समृध्दी महामार्ग तयार होत आहेत. पण शेतकऱ्यांच्या समृध्दीचा विचार मात्र होतच नाही. हे लोक व शासनाच्या लक्षांत यावे हीच संवेदनशिलता या लेखाच्या माध्यमातून निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे.

शेती आणि शेतकरी यांचे अतूट बंधन आहे. काळ्या आईशी तो इमान–इतबारे वागतो परंतु इथल्या व्यवस्थेशी तो बेईमानी करित नाही उद्विग्न मनाने तो आपल्या मुलाला म्हणतो "शेती करण्याचे शिक, नाही तर मागशिल भिक" त्यांची मुल ना शिकतात, ना व्यवसायाची व्यवस्था झालेली आहे. शेतीत ना पिक, ना अवकृपा व लहरीपणा, अपुरे उत्पादन या सर्व कारणांपायी त्याच्यावर कर्जाचे डोंगर वाढत आहे. परिणामी ग्रामिण विकासाला खिळ बसत असून इथला माय–बाप शेतकरी आत्महत्या करित आहे. या ज्वलंत समस्येवर अभ्यास होणे गरजेचे आहे म्हणून प्रस्तुत विषय संशोधकाने निवडलेला आहे.

**उद्देश**

1. भारतीय शेतकऱ्यांचा अभ्यास करणे.
2. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कारणांचा अभ्यास करणे.

3. शेतकरी आत्महत्येवर उपाय–योजना सुचविणे.

4. समाजकार्यकर्त्यांची मध्यस्थी अभ्यासणे.

आजच्या आधुनिकतेच्या काळात सुध्दा भारताचा आर्थिक विकास शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे सन 2004 मध्ये भारतात शेती क्षेत्रात गुंतलेली लोकसंख्या 58 टक्के तर एकूण देशांतर्गत उत्पन्नातील शेती क्षेत्राचा हिस्सा 21 टक्के इतका होता. 2005–2006 मध्ये भारताच्या स्थुलमानाने विचार करता उत्पादनात शेती व संलग्न क्षेत्राचा वाटा आज 10.8 टक्के इतका आहे. तसेच देशातील 125 कोटी लोकांना अन्नपुरवठा करण्याचे काम शेतीक्षेत्र करते. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्र महत्वाचे आहे. देशाच्या नियोजनाचे यशापयश बऱ्याच प्रमाणात शेतीच्या यशापयशावर अवलंबून आहे. मात्र शेती क्षेत्राचा विकास मर्यादीत आहे. भारतातील शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असले तरी या स्थितीत फारशी सुधारणा झाली नाही. सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांना सोडविण्यासाठी देशात सरकारी चळवळ सुरु करण्यात आली. सहकारी संस्थांकडून शेतकऱ्यांच्या कर्जाची उपलब्धता होऊनही सावकाराकडून शेतकऱ्यांचे कर्ज घेणे थांबले नाही. आजही शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी झाला नाही.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या** :– भारतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, आणि छत्तीसगड ह्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. ह्या राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. ह्या राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा संबंध, शेतीक्षेत्राची असमाधानकारक कामगीरी आणि शेतमालाच्या किंमतीत घट, निकृष्ठ बियाणे, अशा घटकांशी संबंधित आहे. नॅशनल काइम रेकार्ड्स ब्युरोमार्फत मिळालेल्या माहितीनुसार 1996 ते 2005 या कालावधीत पुरूष शेतकऱ्यांच्या बाबतीत मृत्यूदराचा वार्षीक वृध्दीदर 4.8 होता. सन 1997 ते 2001 या कालावधीत शेतकऱ्यांच्या आत्महत्याची वार्षिक सरासरी 15384 होती. सन 2001 ते 2005 या कालावधीत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वार्षीक सरासरी 17384 होती. सन 2005 मध्ये देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येपैकी 64 आत्महत्या महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, या राज्यातील आहेत. महाराष्ट्रातील एकुण शेतकऱ्यांच्या आत्महत्येपैकी 2007 पर्यंत एकट्या विदर्भात 1823 शेतकऱ्यांच्या आत्महत्या केल्या आहेत हे येथे उल्लेखनिय आहे.

भारतीय वंशपरंपरेने कर्जबाजारी असतो व त्यांचे हे स्वरूप सातत्याने सुरू असते. भारतातील परंपरा, सामाजिक रूढी, बाजारातील दोष, नैसर्गिक संकटे, अशा अनेक कारणांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होते. त्यामुळे घेतलेले कर्ज तो देऊ शकत नाही परिणामी तो आत्महत्या करतो. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण करणाऱ्या रॉयल कमिशन ने 'भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो व कर्जात मरतो' असे विधान केले आहे.

कृषीप्रधान देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहिल्यास 1995 ते 2010 या कालावधीत 2 लाख 56 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, 2003 ते 2010 या कालावधीत दर अर्ध्या तासाला एक शेतकरी आत्महत्या करतो हा 'एनसीआरबी' या (नॅशनल काईम रेकॉर्ड ब्युरो) रिपोर्ट आहे आणि यातही महाराष्ट्र नंबर एक वर आहे, शिवाय यात इतर आत्महत्यांचे प्रमाण 10.6 टक्के (दर एक लाख लोकांमागे) अशी ही कृषीप्रधान देशातील शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणाची आकडेवारी आहे.

संपूर्ण भारतातील 2010 पासून 2015 पर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी पाहिली तर शेतकऱ्यांच्या भयान स्थितीचे स्वरूप लक्षात येते.

| अ.क. | वर्षे | शेतकऱ्यांच्या आत्महत्या |
|---|---|---|
| 1. | 2010 | 15,964 |
| 2. | 2011 | 14,027 |
| 3. | 2012 | 13,754 |
| 4. | 2013 | 11,772 |
| 5. | 2014 | 12,306 |
| 6. | 2015 | 12,602 |

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारण**

**1. कर्जबाजारीपणा**

शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा हा शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभुत असलेल्या अनेक घटकांपैकी एक प्रमुख घटक आहे. भारतीय शेतीची उत्पादकता कमी असल्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न कमी आहे. शिवाय शेती हा व्यवसाय निर्सगावर अवलंबून असल्यामुळे उत्पादन शाश्वत नाही. पिकासाठी घेतलेले कर्ज वेळेवर परत करणे शक्य झाले नाही. तर नव्याने कर्ज घेवून पुर्वीचे कर्ज परत केले जाते. शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे तो कर्जाची परतफेड करण्यासाठी खाजगी कर्ज घेतात. जर शेतमालाचे उत्पादन पुरेसे झाले नाही तर त्याच्या डोक्रूावरिल कर्जाचा बोजा वाढत जातो आणि तो कर्जाच्या दृष्टचकात अडकतो शेवटी कर्ज बाजारीपणाला कंटाळून आत्महत्येचा मार्ग स्विकारतो.

**2. नव्या आर्थिक धोरणाचा स्विकार**

ज्यावेळी भारत सरकारने 1991 नंतर खुल्या व्यापार धोरणाचा स्विकार केला त्यावेळी या धोरणाचा स्विकार करण्याच्या स्थितीत भारतीय अर्थव्यवस्था नव्हती. कृषीसाठी पाणी, विज, खते, औषधे, बियाणे, मालाची आयात निर्यात, कर्जात सवलत यासाठी सरकार जे अनुदान व सवलती देत असे त्या कमाकमाने 8 ते 10 वर्षात बंद कराव्या असे सरकारला सांगण्यात आले व त्याचा परिणाम असा झाला की, शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला दुसऱ्या बाजुला मालाची किंमती स्थिर राहिल्या व गरिबाला माल कमी किंमतीला मिळावा म्हणुन सरकारने मालाच्या किंमती वाढु दिल्या नाहीत. त्याचा परिणाम असा झाला की, उत्पन्नापेक्षा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला व शेतकरी मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झाला.

**3. जलसिंचन सुविधा अपुऱ्या**

भारत देशामध्ये 60 टक्के शेती कोरडवाहु या प्रकारात मोडते. तर महाराष्ट्र 84 शेती कोरडवाहु शेती आहे. पुरेसा व नियमित पावसा अभावी कोरडवाहु शेतीची उत्पादकता फारच अल्प आहे. अशा कोरडवाहु शेतजमिनीवर शेतकरी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करू शकत नाही. वर्षानुवर्षे ही परिस्थिती बदलत नसल्याने शेतकरी दुखी होतो आणि त्याच्या मनात आत्महत्येचा विचार येतो.

**4. उत्पादन खर्च अधिक**

सरकार ज्या आधारभुत किंमती जाहीर करतो. त्यापेक्षा उत्पादन खर्च जास्त असल्याने सरकारचे उत्पन्न कमी होते म्हणजेच त्याचे निव्वळ उत्पन्न सातत्याने घटत आहे.

5. योजना काळात शेती खर्चात घट

पहिल्या पंचवार्षीक योजना काळात शेतीसाठी 15.9 टक्के रक्कमेची तरतुद केली होती. 11 व्या योजनेत ही तरतुद 3.7 टक्के पर्यंत कमी झाला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस शेतकरी अडचणीत येवून कर्जाचा डोंगर त्याच्या समोर उभा राहतो त्यामुळे त्याला आत्महत्येशिवाय पर्याय राहत नाही.

1. कृषीक्षेत्रातील विकासाचा अभाव
2. शेती संबंधित नविन तंत्रज्ञानाचा अभाव
3. कुठीर लघु उद्योग नाही.
4. आधुनिक शेती कामगाराचा अभाव
5. कमी उत्पन्न
6. दारिद्रय
7. शेतीचे लहान तुकडे
8. पावसाची अनियमितता
9. सरकारी धोरण
10. दुय्यम व्यवसाय नाही.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी उपाय**

1. सेंद्रीय शेतीचा स्विकार करायला पाहिजे.
2. दर्जेदार बी–बियाणाचा वापर
3. नव्या तंत्रज्ञानाचा वापर
4. गरजाभिमुख पिकाचे उत्पन्न
5. नद्याजोड प्रकल्पाचे नियोजन
6. जुन्या तलाव व धरणांची पुर्नरचना
7. शेततळ्यांचे निर्माण
8. पाणी अडवा पाणी जिरवा पाणलोट योजना प्रभावी करणे
9. जलयुक्त शिवार योजना यशस्वी राबविणे

**व्यावसायिक समाजकार्याची मध्यस्थी**

सामाजिक नियमानुसार, विचारानुसार व्यक्तीच्या सर्वकाही गरजांची पुर्तता ही कोणत्याही स्वरूपात अडचणी वा समस्या न येता पुर्ण झाल्यास व्यक्ती समाधानाने, सुखाने जिवन जगतो व त्यास जीवनाविषयक आपुलकी, जिव्हाळा, प्रेम, जिज्ञासा प्राप्त होते. त्यास आत्महत्या सारख्या कल्पना अथवा विचार सुचत नाहीत. तो आपल्या वाटेला आलेल्या भूमिका सुयोग्य पणे पार पाडतो. असे व्यक्तीसह कार्याच्या जननी मेरी रिचमंड म्हणतात.

- आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवांचे मनोबल उंचावून तिला आर्थिक, सामाजिक पातळीवर समाजकार्यकर्ता सक्षमक करण्यास सहकार्य करू शकतो.

- समस्याग्रस्त व्यक्तीला स्वतःच्या समस्या सोडविण्यासाठी व्यक्तीसहकार्याच्या पध्दतीचा उपयोग करून क्षेत्रकार्यामध्ये शेतकऱ्यास आपल्या स्वतःमध्ये असणाऱ्या क्षमतेची जाणीव ही वैयक्तीक समुपदेशनाच्या माध्यमातून केली जावू शकते. परिणामतः याचा उपयोग नकारात्मक भावना रोखण्यासाठी होतो किंबहुना आत्महत्या रोखन्यासाठी मदत होईल.
- शेतकरी विधवांचा एक गट बनवून त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपकम राबविण्यात समाजकार्यकर्ता होवू शकते.
- शेतकरी विधवांच्या सासरीकडील नातेवाईकांसोबत सुसंवाद साधण्यासाठी समाजकार्य मध्यस्थी करता येवू शकते परिणामतः विधवा स्त्रीला दोन्ही कडील कुटुंबाचा आधार मिळवून देण्यासाठी समाजकार्यकर्ता प्रयत्न करू शकतो.
- शेतकऱ्यांच्या पुन्हा आत्महत्या होवू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपायांद्वारा मध्यस्थी होवू शकते यासाठी विविध योजनांची माहीती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे, हवामान अंदाज, बाजारभाव यांची माहीती शेतकऱ्यांना होईल याची व्यवस्था करणे. आधुनिक बी–बियाणे, खते, किटकनाशके, तंत्रज्ञान, अवजारे यांची माहीती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यामध्ये समाजकार्य मध्यस्थती करता येईल.
- अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या कल्याणसाठी समाज कल्याण प्रशासन या व्यावसायिक समाजकार्यातील वैज्ञानिक पध्दतीचा प्रशासन विषयक आदर्श नमुन्यातून शेतकऱ्यांना विकासाच्या प्रवाहातून आनले जाते.
- महाविद्यालयीन स्तरावर आप–आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या समस्या, आत्महत्या यावर लघुशोध प्रबंध, गटशोध प्रबंध करतात याचा वापर करून नविन धोरणाची आखणी करता येवू शकते.

एकंदरित संपूर्ण कुटुंबाच्या सक्षमिकरण करण्यासाठी समाजकार्यकर्ता मध्यस्ती करू शकतो.

**संदर्भ ग्रंथसुची**

1. जाधव नरेंद्र, 2008 महाराष्ट्र शासनः शेतकरी आत्महत्या आणि कृषी क्षेत्रापुढील आव्हाणेः कर्जमाफी आणि समग्र महाराष्ट्र कृषीविकास कृती.
2. शेतकरी आत्महत्येच्या संदर्भातला यशदा संस्थेचा अहवाल.
3. पांगुळ वाराहाते नंदा, 2009 आत्महत्या वैदर्भीय बळीराजाच्या, आर.बी. प्रकाशन, नागपूर.
4. पाटील जे. एम, भारतीय शेती, प्रबोधन प्रकाशन, कोल्हापूर.
5. कऱ्हाडे बी. एम, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपूर.
6. बोकरे दिवाकर 2008, शेतकऱ्यांच्या आत्महत्या डायमंड प्रकाशन, पुणे.

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
Journal No. 40776

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

Volume - VII, Issue - IV, October - December - 2018
ISSN 2277 - 5730

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

# AJANTA

Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Is Hereby Awarding This Certificate To

सहा. प्रा. विकास एन. अढ्याळकर

As a Recognition of the Publication of the Paper Entitled

शेतकरी आत्महत्या : कारणे, उपाय व समाजकार्य मध्यस्थी

Ajanta Prakashan
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL
MULTIDISCItPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV Marathi Part - I October - December - 2018

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | सावित्रीबाई फुले यांची सामाजिक कविता<br>**प्रा. डॉ. अविनाश श. घोबे** | ५९-६३ |
| १५ | महाराष्ट्र : महिला सक्षमीकरण - एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. डॉ. विवेक अ. चौधरी** | ६४-६७ |
| १६ | दिनांची माऊली क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**प्रा. वर्षा अ. तिडके (शनिवारे)** | ६८-६९ |
| १७ | सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण<br>**प्रा. डॉ. सुषमा वा. वोंडे** | ७०-७२ |
| १८ | स्त्री शिक्षण व सावित्रीबाई<br>**सहा. प्रा. विकास एन. अड्याळकर** | ७३-७६ |
| १९ | सावित्री ही स्त्री जीवनाचा आरंभबिंदू<br>**प्रा. डॉ. सिद्धार्थ बुटले** | ७७-७९ |
| २० | आद्य कवयित्री सावित्रीबाई फुले<br>**प्रा. डॉ. मेघमाला अं. मेश्राम** | ८०-८३ |
| २१ | सावित्रीबाई फुले यांचे समाज परिवर्तनाचे कार्य<br>**प्रा. रिपोटे मोनाली विलास** | ८४-८८ |
| २२ | सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण<br>**प्रा. मुरलीधर एस. नाकाडे** | ८९-९१ |
| २३ | सावित्रीबाई फुले व समाज परिवर्तन<br>**प्रा. डॉ. रणधीर साठे** | ९२-९५ |
| २४ | रणरागीनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले- एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. संजय उत्तमराव उगेमुगे** | ९६-९९ |
| २५ | सावित्रीबाई फुले व स्त्रि-मुक्ती चळवळ<br>**सहा. प्रा. वसंता सिताराम वंजारी** | १००-१०३ |
| २६ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व स्त्रीवादी साहित्य : एक मीमांसा<br>**प्रा. डॉ. शोभा रोकडे** | १०४-१०९ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १८. स्त्री शिक्षण व सावित्रीबाई

**सहा. प्रा. विकास एन. अड्याळकर**
महात्मा जोतीबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ.

'वादळाने झोडपले नि राजाने मारले' हे सांगायचे कोणाला\ ही फिर्याद कोण घेणार\ अशी केविलवाणी परिस्थिती 19 व्या शतकाच्या प्रारंभी शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रियांची झालेली होती. सर्वत्र अज्ञानाचा, अत्याचाराचा व शोषणत्वाचा अंधकार माजलेला होता. दुष्ट रूढी, अन्यायी परंपरा, जातीभेद, लिंगभेद, कृत्रिम धर्मकल्पना या मानवनिर्मित भेदांमुळे शुद्र, अतिशुद्र, शेतकरी, कष्टकरी व स्त्रिया या बहुजनवर्गाला 'माणूस' म्हणून जीवन जगणे कठीण झालेले होते. माणसाला माणसासारखे वागविण्याचा साधा माणुसकिचा विचार त्याकाळी लयाला गेला होता.

स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा 3 जानेवारी 1831 रोजी सातारा जिल्हयातील नायगाव य़ेथे सावित्रीबाई फुले यांचा जन्म झाला. वयाच्या नवव्या वर्षी ज्योतीराव फुले यांच्याशी त्यांचा विवाह झाला. ज्योतीबा फुल्यांच्या समवेत शेती करता करता सावित्रीबाई साक्षर बनल्या. सावित्रीबाईंनी ज्या काळी शिक्षण घेतले तो काळच महिलांसाठी वागणूक आणि त्यांची होणारी पिळवणूक यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नसल्याने पुण्यात बुधवार पेठेतील भिडे वाड्यात महात्मा फुले यांच्या बरोबर सावित्रीबाई मुलींची पहिली शाळा सुरू केली. एकोणविसाव्या शतकात ज्या वेळी भारतासारख्या रूढीवादी परंपरा असणाऱ्या देशात स्त्रीला समाजात 'चूल आणि मुल' एवढेच स्थान होते, स्त्रीला समाजात कोणताही दर्जा नव्हता अशा वेळी तिला शिक्षणाच्या माध्यमातून एक नवी दिशा, नव संजीवनी देण्याचे काम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. ज्या काळात महिलांनी शिक्षण घेणे हे पाप मानले जात होते त्याचा काळात त्यांनी स्वतः शिक्षण घेवून महिलांना शिक्षणाची दारे उघडी करून दिली. या शाळेला व महिला शिक्षणाला तत्कालीन समाज व्यवस्थेकडून होणारा त्रास सहन करून त्यांनी स्त्री शिक्षणाचे पवित्र कार्य चालू असतांना पण त्या आपल्या कार्यापासून डगमगल्या नाही. त्यांच्या मुलींच्या शाळेत मुलींची संख्या हळूहळू वाढू लागली. पुण्यात त्या काळात हा चर्चेचा विषय झाला. या कार्यामुळे समाजात सावित्रीबाईचा दरारा निर्माण झाला होता. सुरवातीच्या काळात सहा मुलींवर सुरू केलेल्या शाळेबरोबरच पुणे आणि परिसरात 18 शाळा काढून स्त्री शिक्षणाची गंगोत्री सुरू केली.

ज्ञानाई सावित्रीचे कर्तव्याचेद शिक्षणक्षेत्रात पहिले पाऊल पडले होते. ज्योतीरावांच्या प्रेरणेने हे पाऊल यशस्वी झालेले होते. ज्योतीराव हे सावित्रीबाईंचा आदर्श गुरू, आदर्श मार्गदर्शक होते. ज्योतिराव हे सावित्रीच्या सामाजिक कार्याची शक्ती होती, ऊर्जा होती तर सावित्रीबाई ही ज्योतीरावांच्या सामाजिक परिवर्तनाचे स्त्रीउद्धराचे शिक्षणाच्या माध्यमातून पहिलं पाऊल टाकतांना सावित्रीबाईने हालअपेष्टा, निंदानालस्ती, शिव्याशाप, अपमान व अवहेलना यांचे हालाहल सहजपणे पचविले.

## उद्देश

1. सावित्रीबाईच्या शिक्षणाची पार्श्वभुमी जाणून घेणे.

2. स्त्री शिक्षणाच्या बाबतीत सावित्रीबाईचे योगदान.

3. सावित्रीबाईच्या शिक्षण कार्यात येणाऱ्या अडचणीचे अध्ययन करणे.

'गुरूणां माता गरीयसी' या वचनाप्रमाणे भारतीय संस्कृतीत मातेची व स्त्रीची महती गायली आहे. भारतीय स्त्री मात्र अज्ञानाच्या गुलामगिरीत पिढयान्‌पिढया जखडली होती. हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे तिला शिक्षणाचा अधिकार नव्हता. या अन्यायी व जुलमी धर्मकल्पनेस छेद देऊन ज्योतीरावांनी आपल्या पत्नी सावित्रीप्रमाणे हिंदू स्त्रियांना ज्ञानी करण्याचा निर्धार केला. तिला शिकविण्याचे ठरविले. अज्ञान म्हणजे जीवनातील अंधार, ज्ञान म्हणजे जीवनातील प्रकाश, शिक्षणाने मनुष्याला मनुष्यत्व येते. त्याला सत्य–असत्याचा विचार करण्याची जाणीव निर्माण होते. शिक्षणाने माणूस आत्मनिर्भर व विचारी बनतो. शिक्षण हेच सुधारण्याचे मूळ आहे. शिक्षणाशिवाय अशा प्रकारची जाणीव ज्योतीरावास झाली होती. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' या सत्याचा प्रत्यय विचारांती ज्योतिरावास झाला.

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली । गतिविना वित गेले ।
वित्ताविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

ज्योतीरावांच्या या अखंडाप्रमाणे त्या मार्तडांना विद्येचे मानवी जीवनातील महत्व उमगलेले नव्हते. ज्योतीरावांचे शैक्षणिक तत्वज्ञान शाश्वत व अलौकिक असल्याने सनातन्यांच्या कोल्हेकुईला न जुमानता ज्योतिरावांनी मुलींची शाळा सुरू करण्याची पुर्ण तयारी केली. अखेर या शाळेचा पहिला दिवस उगविला. 1 जानेवारी 1948 नवयुगाची सुरूवात झाली. आणि त्याशाळेच्या पहिल्या शिक्षिका म्हणुन सावित्रीबाईंना तो मान मिळाला. सावित्रीबाईंना शाळेत जाण्याचे मनावर दडपण होते, परंतु त्याचबरोबर मुलींना शिकविण्याचे क्रांतिकारी व पवित्र कार्य आपण आज सुरु करणार याचा आनंदही तिच्या मनात ओसंडत होता. ज्योतिरावांचे घर गंजपेठ ते बुधवार पेठ यातील अंतर जवळ–जवळ एक कोसाचे. मोठ्या लगबगीने सावित्रीबाई शाळेत जाण्यास तयार झाल्या. मोठ्या भक्तीभावाने आपले सासरे गोविंदराव यांच्या पाया पडली. त्यांच्या या पवित्र कार्यास आशिर्वाद घेतला. नंतर त्या ज्योतीरांच्या पाया पडल्या. लौंकिकार्थाने जसा ज्योतीराव त्यांचा पती होते तसे त्यांचा गुरू सुध्दा होते. स्त्रीयांच्या उद्धारासाठी त्यांच्या त्यांच्या मुक्तीसाठी घराचा उंबरठा सावित्रीबाई ओलांडणार होत्या. स्त्री स्वातंत्र्यासाठी त्या घराबाहेर पडणार होत्या.

सनातनी उच्चवर्णीयांना सावित्रीबाई शाळा सुरू करण्यास जाणार असल्याचे समजले होते. एका कनिष्ठ जातीतल्या हिंदू बाईने शिक्षिकेचे काम करण्याचा निर्णय घेवून समाजद्रोह व धर्मद्रोह केला असे समजण्यात आले. एका माळी बाईने समाजाची सर्व प्रकारची बंधने तोडून शिक्षिकेचे काम करावे ही गोष्ट अभूतपूर्व व अपवित्र वाटली. त्यामुळे त्यांच्यात खोट्या अहंकाराची व संतापाची लाट उसळली. सावित्रीबाईंना प्रतिकार करण्याठी व या पवित्र कार्यापासून परावृत्त करण्यासाठी हे सर्व सनातनी शाळेच्या रस्त्यावर घराबाहेर मोठ्या अहमहमिकेने थांबले होते. नवयुगाच्या पवित्र कार्याची सुरवात करण्यासाठी घराबाहेर जात असतांना व एक एक पाऊल धिम्या गतीने टाकित असता वाटेत घराबाहेर आलेल्या सर्व सनातन्यांनी सावित्रीबाईला अचकट–विचकट शिव्या दिल्या. तिची मानहानी केली. तिच्या अंगावर घाण व खरकटे पाणी टाकले. त्यांनी तिच्या अंगावर चिखल व घरातील कुजके अन्न

टाकण्यासही मागेपुढे पाहिले नाही. खरकट्या पाण्याने सावित्रीबाई पुर्ण भिजल्या, साडी भरली. परंतु त्यांचे अंतर्मन तसेच शुध्द, स्वच्छ व पवित्रच राहिले.

सनातनी लोकांनी सावित्रीबाईची मोठी अवहेलना केली. तिला क्रूरपणे दगड मारण्यासही कमी केले नाही. सभ्यता व संस्कृतीचा टेंभा मिरवणाऱ्या तथाकथीत समाजसुधारणांनी माणुसकिला काळीमा आणणारे कृत्य करून एका स्त्रीची–अबलेची मानहानी केली होती. तिला त्रास दिला होता. घाण, चिखल टाकूनही सावित्रीबाई आपल्या पवित्र कार्यापासून परावृत्त होत नाही, हे पाहून सनातन्यांचा राग अनावर झाला व त्यांनी सावित्रीबाईला दगड मारण्यास सुरूवात केली. दगडांचा मारा खात सावित्रीबाई मोठ्या निर्धाराने आपल्या ध्येयाकडे जात होती. एक–एक दगड सावित्रीबाईंच्या कपाळावर लागला, कपाळातून भळाभळा रक्त वाहू लागले. रक्ताने पुर्ण साडी भरली. कपाळात वेदना सुरू झाल्या. परंतु, नव्या युगाने समाजपरिवर्तनाची महान ध्येय उरी बागळणाऱ्या त्या तळपत्या ज्योतीने जराही पर्वा केली नाही. सावित्रीबाई आपले उदात्त ध्येय व ध्येयासाठी लागणारा निर्धार यांपासून जराही विचलीत झाली नाही. सावित्रीबाई आपल्या ध्येयवादी मनात म्हणत होती, 'कुणी मला अतोनात त्रास देवू शकतील पण माझे ध्येय विचलित करणार नाही. कुणी माझे प्राणही हिरावून घेऊ शकेल पण माझ्या ध्येयावरिल श्रध्दा नाही'. सनातन्यांचा शेण, कचरा, खरखटे, दगड यांचा मारा सहन करितच सावित्रीबाई आपल्या शाळेकडे, आपल्या ध्येयाकडे मानवजातीच्या उध्दारासाठी वाटचाल करत होती.

स्त्रीयांच्या शिक्षणाची क्रांती करणारी व ज्ञानाची पहिली ज्योत आपल्या असिम त्यागाने लावणारी सावित्रीबाई दृढनिश्चयी सावित्रीबाई अपमान, कुर थट्टा, हालअपेष्टा, अवहेलना, मानसिक व शारीरिक छळ व दगडी मारा निमूटपणे सहन करीत जखमी झालेली सावित्रीबाई एकदा रस्त्यावर थांबून आपल्या निंदकांना व छळ करणाऱ्यांना मोठ्या विनयाने म्हणाली, "मी मानवतेचे कर्तव्य करण्यास जात आहे. तुम्हासारख्या लोकांच्या टीकेच्या झंझावाताने व छळाने माझ्या हातातील कर्तव्याच्या ध्येयाचा दिवा कधीही विझणार नाही या झंझावातात ज्ञानाची ज्योत कधीही मालवणार नाही. या ज्योतीने मी ज्ञानाचा प्रकाश लावणार आहे. माझ्या मानवतेच्या कर्तव्याचा, ज्ञानाच्या नवयुगाचा व परिवर्तनाचा प्रवास काट्याकुटयांतून चालणारा असून कितीही संकटे आली तरी तो प्रवास अखंउपणे चालू राहणार आहे. देव तुमचे भले करो. तुमच्या मनाचे परिवर्तन करो."

"तुझ्यातला अहं जागवला
न स्त्री स्वातंत्र्यम अर्हति ।
म्हणणाऱ्या मनूने
आणि तूही स्वतःभोवती कुंपन घातलंस
व्यवस्थेच्या साक्षीने
सवित्री या कोकिळेने मात्र
ही रूपेरी बेडी आता तोडलीस
करपलेल्या आम्रवृक्षावर
ती आता कंठ फुटेपर्यंत गातेय
आणि भर शिशिरातही तिच्या स्वप्नांना

आता एकटीच

सामोरी जातेय.''

या काव्यपंक्तीप्रमाणे या देशात पहिल्या प्रथम ज्योतीराव–सावित्रीबाईने भारतीय स्त्रीच्या मनुवादी व्यवस्थेला छेद दिला. भारतीय स्त्रीच्या पायातील गुलामीच्या बेड्या तोडण्याचा प्रयत्न केला. या उदात्त कार्यासाठी त्यांना गृहत्याग करावा लागला. स्त्री शुद्रांस शिक्षणाची संधी मिळविण्यासाठी ज्योतीराव–सावित्रीबाईने त्यांच्या शाळा सुरू केल्या. त्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत त्यांनी युगप्रवर्तक काम केले. त्या अलौकिक समाजपरिवर्तनाची व क्रातीकार्याची दखल त्या काळच्या परकिय सरकारलाही घ्यावी लागली. ज्योतीराव–सावित्रीबाईं यांनी जेव्हा या अलौकिक कार्यास सुरवात केली तेव्हा न्यायमुर्ती म.गो. रानडे हे दहा वर्षाचे होते, तर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर नि महात्मा गांधी यांचा जन्मही झालेला नव्हता. उभ्या भारतात स्त्री–शुद्रांच्या उध्दारकार्याचा शुभारंभ ज्योतीरावांनी प्रथम केला व त्यास सावित्रीबाईने आपल्या कृतीने साथ दिली. समाजसुधारणेचा असा हा गजर प्रथम महाराष्ट्रात ज्योतीराव–सावित्रीबाईच्या प्रयत्नाने झाला. त्यांच्या या कार्यारंभानेच महाराष्ट्रात पहिल्या समाजक्रांतीची व नवपरिवर्तनाची सुप्रभात झाली व त्यातूनच भारतीय समाजक्रांतीला आरंभ झाला म्हणून ज्योतीराव–सावित्रीबाई हे दांपत्य भारतीय समाजक्रांतीचे आद्य जनक बनले. समाजसुधारणांची गंगोत्री उगमस्थान झाले.

सवित्रीबाईने मोठ्या कष्टाने, त्यागाने व ध्येयाने प्रेरित होऊन शोषित समाजाचा उध्दार करण्याच्या केलेल्या क्रांतिकारक कार्याचा गौरव त्यांच्या हयातीतच अनेकांनी केला. त्यांची थोरवी अनेकांनी गायली. सावित्रीबाईंचा खरा गौरव त्यांचे पती जोतीरावांनी सर्वप्रथम 16 डिसेंबर 1852 रोजी पुणे येथिल पेशव्यांच्या ऐतिहासिक अशा विश्रामबाग वाड्यात केला. जोतिराव सावित्रीबाईंच्या शैक्षणिक कार्याबद्दल इंग्रज सरकारी शिक्षा मंडळाने त्यांचा जाहीर सत्कार विश्रामबाग वाड्यात केला. या सत्कारला नम्रपणे उत्तर देतांना व आपली पत्नी सावित्रीबाई हिच्या कार्याचा गौरव करातांना ज्योतिराव म्हणाले 'मानवतेच्या या महान कार्यात माझी पत्नी सावित्रीबाई हिचे खास मी आभार मानले पाहिजेत. कारण की मी निरनिराळ्या शाळा स्थापण्यास कारण मात्र आहे, पण त्या शाळा सावित्रीने अनेक संकटांशी झुंज देऊन व अनेक प्रकारची दुःखे सोसून नावारूपास आणल्या. याचा अभिमान वाटतो. म्हणून या पवित्र कार्यात ती अभिनंदनास पात्र आहे. गौरवास पात्र आहे.' सावित्रीबाईंचा यापेक्षा मोठा गुणगौरव कधीही झालेला नाही जोतीरावांसारखा एका महात्म्याने आपली पत्नी सावित्रीबाई हिच्या कार्याचा खऱ्या अर्थाने सार्थ गौरवच मोठ्या अभिमानाने केलेला आहे.

## संदर्भग्रंथ सुची

1. कांडगे, राम. *क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले.* पुणे : राजश्री प्रकाशन.
2. महाराष्ट्रातील समाजसुधारक : साहीत्यीक, भारतीय विचारधारा
3. www.krantisuryaprattshttan.com

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN


## An International Multidisciplinary Quarterly Research Journal

Volume - VII, Issue - IV, October - December - 2018
ISSN 2277 - 5730


Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

# AJANTA

Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

सहा. प्रा. विकास एन. अड्याळकर

As a Recognition of the Publication of the Paper Entitled

स्त्री शिक्षण व सावित्रीबाई


**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com


**Editor : Vinay S. Hatole**

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

UGC Approved
Jr.No.62759

Jan. To March 2018
Issue-21, Vol-04

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431123 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

# Index

1) Emotional Maturity and Social Maturity of B.Ed. Teacher Trainees
Gyanprakash Arya & Dr. (Mrs.) Indira S. Shukla, Mumbai || 10

2) DROUGHT EFFECT AND THEIR MEASURES IN INDIA
Mr.Choutmal Sambhaji Kishanrao & Dr. N.H.Awade , Mukhed || 15

3) Availability and utilization of Data Mining
S.GNANAMURTHY , Vellore(D.T) Tamil nadu || 17

4) "Effect of Detergent Surf on Heart Beat rate of the crab Barytelphusa....
Dr. Mujewar Mahinaj & Dr. Gochade R.M. , Nanded || 24

5) An Analysis of Institutional Financing to Agricultural in India
B.Krishnamurthy & Dr.G.Venkata Naidu || 27

6) Five *Bhāvas* with special reference to *PāriGāmikaBhāvas* as the base for ..
Rajal Borundia Jain.V || 33

7) "Role of Internal Quality Assurance Cell (IQAC)in Maintaining Quality ....
Dr.Mohan Lal , Nakur Saharanpur, (UP) || 39

8) IMAPACT OF DIGITALIZATION ON PUBLIC LIBRARIES IN TELANGANA
R. JAGAN MYTHRI, Telangana State. India. || 45

9) Terrorism Counters Human Rights
Miss.Rekha Pahuja , Jalgaon(M.S.) || 50

10) Strategic Analysis of Goa Tourism
Mr. Anand Naik Panvelkar , Bambolim Goa || 54

11) Role of Higher education in the empowerment of wo..
Dr.prema pallavi C.B. ,Karnataka. || 59

12) DISSEMINATION OF HANAFI SECT IN PALAKKAD: A STUDY ON TRADE ORIENTED ...
Sainudeen. C.P, Palakkad (DT), Kerala || 61

13) Relationship between Test Anxiety and Academic Achievement of ..
Dr. Abha Sharma, Lucknow || 65

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

14) DEVELOPMENT WITH WOMEN EMPOWERMENT IN INDIA
MEHZABEEN SULTANA , Gauhati University || 72

15) "A COMPARATIVE STUDY OF FINANCIAL ANALYSIS OF THE PIJ ....
Jaydev M. Vithlani, Anand || 77

16) चंद्रपूर जिल्हयातील मोठया व मध्यम उद्योगातील स्थान निर्देशांकाचे ...
डॉ. राजेंद्रकुमार डांगे & प्रा. प्रकाश रामभाऊ रामटेके जिल्हा. चंद्रपूर || 82

17) "आश्रमशाळेत शिकणा-या इयत्ता ८वी तील आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा शैक्षणिक ...
डॉ. आशा म. धारस्कर-भावसार , अकोला || 85

18) लोकसंख्या : जग आणि भारत
प्रा.डॉ. प्रान्जु रा. हिरेखण, यवतमाळ || 91

19) स्त्रियांच्या नव्वदोत्तरी कथेतील सामाजिक पर्यावरण
डॉ. प्रल्हाद होंडे जि. जालना || 95

20) लोकसाहित्यातील इहवाद
प्रा.डॉ.विजय पाटील, जाफ्राबाद || 99

21) संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार
प्रा. डॉ.ममता इंगोले (महल्ले), जि.अकोला || 101

22) सर्वांसाठी घरे आणि घरात छोटीशी ग्रंथालये रू एक अभिनव...
प्रा.दिलीप गोविंदा पाटील, जिल्हा— रायगड (महाराष्ट्र) || 107

23) तुकाराम महाराजांच्या अभंगातून व्यक्त होणारे आध्यात्मिक विचार रत्न
डॉ यशोद श्रीमंतराव पाटील , औरंगाबाद || 110

24) 'हिंदी के उपन्यासों में आदिवासी विमर्श'
प्रा.डॉ.डी.एम.टिळेकर, जि.पुणे (महाराष्ट्र) || 112

25) मध्यकालीन संगीत और कला तथा राज्य आश्रय
Sachin Agnihotri ,Shahbad Bhoor,BAREILLY (UP) || 117

26) वर्तमान में सांस्कृतिक मूल्यों के पुनर्स्थापन में विवेकानन्द के व्यवहृत ...
डा० निशा अग्रवाल, मथुरा। || 123

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | UGC Approved JANO 62759 | Vidyawarta® | Jan. To March 2018 Issue-21, Vol-04 | 031

# लोकसंख्या : जग आणि भारत

प्रा. डॉ. प्राजु र. हिरेखण
महात्मा ज्योतीबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ

मानव सामाजिक प्राणी आहे आणि यातूनच त्यांच्या जीवनातील उत्क्रांतीच्या मार्गाला सुरूवात झाली पुर्वी आपले वंशज आग पेटवायला शिकले कंद–मुळ गोळा करून उपजिविका पूर्ण करू लागले कालांतराणे गट समूहाने राहुन समस्या सोडवू लागले पृथ्वीवर मानावाचा विकास वर्तमानापासून सुमार १० लाख वर्षापूर्वी पुरापाषाण काळात (Paleolithic age) झालेला होता त्यावेळी जगातील मनुष्याची संख्या संभवत: १००० पेक्षा ही कमी असावी इ.स. १३०० पासून जगाची लोकसंख्या कशी वाढत आलेली आहे तसेच भारताच्या लोकसंख्येतही कशी वाढ झाली हे खालील कोष्टकावरून लक्षात येईल.

**लोकसंख्या**

| वर्ष | लोकसंख्या (जग) | वर्ष | लोकसंख्या (भारत) |
|---|---|---|---|
| १३०० | ४० कोटी | १८७२ | २०.३ कोटी |
| १६५० | ५० कोटी | १८९१ | २३.६ कोटी |
| १८०४ | १ अब्ज | १९०१ | २३.८३ कोटी |
| १९२७ | २ अब्ज | १९११ | २५.२० कोटी |
| १९६० | ३ अब्ज | १९२१ | २५.१३ कोटी |
| १९७४ | ४ अब्ज | १९३१ | २७.८९ कोटी |
| ११ जुलै १९८७ | ५ अब्ज | १९४१ | ३१.८६ कोटी |
| १२ आक्टो १९९९ | ६ अब्ज | १९५१ | ३६.१० कोटी |
| २४ फेब्रु २००६ | ६.५ अब्ज | १९६१ | ४३.९२ कोटी |
| ३१ ऑक्टो. २०११ | ७ अब्ज | १९७१ | ५४.८१ कोटी |
| ८ फेब्रु २०१३ | ७.६४ अब्ज | १९८१ | ६८.३३ कोटी |
| डिसे २०१४ | ७.२ अब्ज | १९९१ | ८४.६३ कोटी |
| ०९ डिसे २०१७ | ७.४२८ अब्ज | २००१ | १०२.७० कोटी |
| २०५५ | १०अब्ज (अंदाज) | २०११ | १२१.०२ कोटी |
| संदर्भ : संयुक्त राज्य अमेरिका जनगणना ब्युरोच्या | | २०१३ | १२७.९४ कोटी |
| | | २०१६ | १३२.६८ कोटी |
| | | संदर्भ — भारतीय जनगणना | |

११ जुलै १९८७ रोजी जगात ५ अब्जाव अपत्य जन्माला आले तेव्हा पासून हा दिवस 'विश्व लोकसंख्या दिवस' म्हणून जगभर पाळला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने १९९९ – ६ अब्ज एक मोठा मैलाचा दगड म्हणून मानला. ३१ ऑक्टोबर २०११ रोजी आपली लोकसंख्या ७ अब्ज झाली. आशिया, युरोप, आफ्रिका, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया ह्या पाच खंडामधील देशात सर्वात कमी लोकसंख्या आहे जगाच्या एकुण लोकसंख्येत ६० टक्के आशियामध्ये आहे.

६४ वर्षात भारताची लोकसंख्या तिप्पटीहून अधिक झाली आहे. भारताच्या लोकसंख्येत वाढ १५ दिवसात चंदीगढ (६,४०, ७२५ लोकसंख्या) आणि प्रत्येक महिण्यात एक आस्ट्रेलिया (१.८५ करोड) ची लोकसंख्येत वाढ होते. भारतात प्रत्येक १२ महिण्याच्या लोकसंख्येत वाढ लगभग १५५ मिलियन आहे. जी फ्रांस (५८.८ मिलीयन) ब्रिटेन (५८.८ मिलीयन) आणि इटली (५७.३६ मिलीयन) च्या मिश्रित लोकसंख्येच्या थोडी कमी आहे.

**उद्देश :—**

१) जग व भारत लोकसंख्या वाढीचा अभ्यास करणे.

२) लोकसंख्येशी संबधी सिध्दांचा अभ्यास करणे

संयुक्त राष्ट्र संघाची सहस्त्रक विकास ध्येय प्राप्त करण्यासाठी UNDP च्या सहाय्याला UNFPA (United Nations Population Fund/ United Nations Fund for Population Activies) ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेची स्थापना १९६७ मध्ये न्यूयॉर्क येथे करण्यात आली. न्छथ्च। चे उद्दिष्ट म्हणजे 'प्रत्येक पुरूष, स्त्री आणि मूल यांना आरोग्य व समान अधिकार मिळवून देणे' यासाठी ही संस्था जगभरातील लोकसंख्येचे आकडे गोळा करून त्या आकड्यांचे विश्लेषण करून दरवर्षी State of world Population नावाचा अहवाल प्रकाशित करत असते. २०१३ च्या अहवालाचा विषय डवजीमत ेिवक पद बीपसकीववक तर २०१४ च्या अहवालाचा विषय The popular of 1.8 Billion हा

जगाच्या विकासाबरोबर समस्याही वाढत आहेत . वाढणाऱ्या समस्येपैकी आज जगापुढे लोकसंख्या वाढ ही सर्वात मोठी समस्या आहे. लोकसंख्येची समस्या ही दोन प्रकारची असते.

१) न्यूनतम लोकसंख्येची समस्या

२) अतिरिक्त लोकसंख्येची समस्या

जेव्हा एखाद्या देशाची लोकसंख्या ही तेथील नैसर्गिक साधन संपत्तीपेक्षा कमी असते तेव्हा त्या देशास निम्न लोकसंख्येची समस्या भेडसावत असते उदा. आस्ट्रेलिया, स्विडन, न्युझीलन्ड.

एखाद्या देशाची लोकसंख्या हे तेथील नैसर्गिक साधन संपत्ती पेक्षा अधिक असेल तर त्या देशास अतिरिक्त लोकसंख्येची समस्या भेडसावत असते. उदा. चीन, भारत, बांगलादेश.

अतिरिक्त लोकसंख्येच्या समस्येसच लोकसंख्या वाढीची समस्या असेही म्हणतात.

**लोकसंख्या बदलाच्या अवस्था :—**

एखाद्या अर्थव्यवस्थेचा जसजसा विकास होत जातो त्यातील लोकसंख्येतील रचनेतही बदल होत जातो लोकसंख्या वाढीचा अभ्यास करण्याऱ्या ब्लॅकर, थॉम्पसन, नॉटन्स्टाईन या तंज्ञानी हा बदल अभ्यासला

यामध्ये फ्रॅंक नॉटन्स्टाईन या तज्ञाने Theory of Demographic Transition मांडली होती. यातून लोकसंख्या बदलाच्या अवस्था त्यांनी मांडल्या.

१) उच्च स्थिर अवस्था:या अवस्थेत जन्मदर व मृत्यूदर दोन्ही जास्त असतात.

२) प्रारंभीची प्रसरणशील अवस्था : या अवस्थेत जन्मदर जास्त व मृत्यूदर कमी असते.

३) उशिराची प्रसरणशील अवस्था : या अवस्थेत जन्मदर व मृत्यूदर दोन्हीही कमी होत जातात.

कार्ल मार्क्स च्या म्हणण्यानुसार, ''कोणत्याही समाजाचे अस्तित्व आणि निरंतर यासाठी दोन प्रकारचे उत्पादन महत्वाचे ठरतात, जिवंत राहण्यासाठी आवश्यक वस्तुचे उत्पादन आणि दूसरे म्हणजे मुलांचे उत्पादन होय''.

माणुस सर्वात आधी जिवंत राहिला आणि त्यानंतरच इतिहासाची निर्मिती करु शकला. जिवंत राहण्यासाठी अन्न, वस्त्र, आणि निवारा इ. मूलभूत घटक उत्पादीत होणे आवश्यक आहे. सोबतच या जगात आलेली प्रत्येक वस्तु नशवर म्हणजेच समाप्त होणारी आहे. यात मानव अपवाद नाही. एकंदरीत तोही मरणशील, नष्ट होणारा आहे. मरणाऱ्या व्यक्तीच्या जागी नव्या व्यक्तीचा (मुलांचा) जन्म झालेला असतो . म्हणजेच समाजातील निरंतरता टिकून राहते परंतु मुलांना जन्म देणाच्या प्रक्रियेत मोठया प्रमाणात वाढ झाली. एकंदरित लोकसंख्येचा विस्फोट होईल आणि मुले कुटुंब, समाजाचे आपुलकी, स्नेही न राहता बोझ बनून राहतील, कारण या अवस्थेत जीवन जगण्यासाठी साधनाचे उत्पादन आणि मुलांच्या उत्पादनात कल्पना करण्यात आली आणि 'हम दो हमारे दो' चा नारा लावण्यात येतो, तरीही लोकसंख्येत तीव्र गतीने वाढ होत आहे.

**लोकसंख्येशी संबंधीत सिध्दांत :—**

लोकसंख्या संबधीत अनेक विव्दानांनी स्वत:चे वेगवेगळया रूपाने मत मांडले आहेत ते खालील प्रमाणे —

**१) थॉमस माल्यस :—**

या तज्ञाने १७९८ मध्ये 'लोकसंख्यचे तत्व' यावर एक प्रबंध Essay in Principles of Population सादर केला. या प्रबंधातून त्यांनी लोकसंख्या वाढीचा एक सिध्दांत मांडला. यानुसार सतत लोकसंख्या वाढत असते. मृत्यूच्या ऱ्हासाच्या कारणांनी (गर्भपात, बालहत्या, युध्द इ.) लोकसंख्या वाढीचा वेग मंदावतो . परंतु ही कारणे दूर लोटली तर लोकसंख्या वाढीचा वेग वाढेल. पण वाढत्या लोकसंख्येला पुरेसे अन्न उत्पादित होऊ न शकल्यामुळे लोकसंख्या वाढीचा वेग पुन्हा मंदावेल. विकसित तंत्रज्ञान व विज्ञानामुळे पुर्वीपेक्षा लोकसंख्या वाढीचा दर वाढतच राहिल व अन्नधान्य उत्पादनाचाही वेग वाढत राहिल. एकंदरीत लोकसंख्या वाढत राहिल.

या विचारामधून 'माल्थसचा सापळा' Malthusian Trap ही संकल्पना वापरली जाऊ लागली तात्पर्य असे की, अर्थव्यवस्थेचे दरडोई उत्पन्न स्थिर असते परंतु नवनवे संशोधन आविष्कारामुळे दरडोई उत्पन्नात वाढ होते. परंतु त्यामुळे राहणीमानात सुधारणा होण्या ऐवजी लोकसंख्येत वाढ होते परिणामी

दरडोई उत्पन्न तेवढेच राहते. एकुण उत्पन्न वाढूनही दरडोई उत्पन्न न वाढल्यामुळे विकास होत नाही. अर्थव्यवस्था सापळ्यात अडकते.

इंग्लड मधील कृषी क्रांती आणि युरोप मधील औद्योगिक क्रांती यांनी माल्थसचा सापळा मोडून काढला तर आशियाई व आफ्रिकन देश मात्र माल्थसच्या सापळ्यात अडकून राहिले. विकासाची गती मंदावली तर लोकसंख्येची वृध्दी होत गेली.

२) हार्वे लायबेन्स्टाईन :—

यांनी १९६३ मध्ये लोकसंख्येचा सिध्दांत मांडला. लोकसंख्या वाढली तर दरडोई उत्पन्न कमी होते, हे सर्वत्र आहे. परंतु हार्वेनी या उलटही संबंध असतो हे दाखवून दिले. त्याच्या सिध्दांतानुसार, दरडोई उत्पन्न कमी झाले तर लोकसंख्या वाढते. उदा. दरडोई उत्पनाच्या कमतरतेमुळे कमी शिक्षण, खुळया समजुती (जास्त मुले जन्माला घातली तर उत्पन्न अधिक) अशा चुकीच्या भावना. हार्वेनी हे चक्र मोडण्यासाठी त्रिसूत्री सांगितली. ती म्हणजे राहणीमानाचा दर्जा उंचावणे, जन्मदर कमी करणे आणि सर्वात महत्वाचे दरडोई उत्पन्न वाढविणे. दरडोई उत्पन्न वाढले तर लोकसंख्या कमी होईल. यासाठी लायबेन्स्टाईनने अर्थव्यवस्थेत 'विशिष्ट गुंतवणूक' करण्याचा सल्ला दिला. त्याच्या या विशिष्ट गुंतवणूकीच्या संकल्पनेला Critical Minimum Effort असे म्हणतात.

**लोकसंख्या संक्रमण सिध्दांत :—**

हा सिध्दांत माल्थसव्दारे त्यांची पुस्तक on the principles of the population मध्ये मांडण्यात आले यात त्यांनी अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकास आणि लोकसंख्या यांच्या संबधाविषयी मत मांडले आहे त्यांच्या मते, ''अर्थ व्यवस्था अविकसित रहत तेव्हा लोकसंख्या सामान्य दराने वाढते आणि अर्थव्यवस्थेचा विकास अधिक होतो. तेव्हा मृत्यूदर कमी व जन्मदर अधिक होते म्हणजे या अवस्थेत लोकसंख्येचा विस्फोट होतो जेव्हा अर्थव्यवस्था विकसित होते तेव्हा जन्मदर आणि मृत्यूदर दोन्ही कमी असतात त्यामुळे लोकसंख्येत कमी प्रमाणात वाढ होते''.

**भारताची लोकसंख्या :—**

वरील दाखविलेल्या कोष्टकानुसार भारताची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या भारत जगातील लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचा देश असून ती वेळ दूर नाही की, पहिल्या क्रमांकाने ओळखला जाईल. भारतात दर १० वर्षानी जनगणना होत असते. भारताच्या लोकसंख्येचे अनुमान १७७१ पासून उपलब्ध होतात. पहिली अधिकृत जनगणना १८७२ मध्ये करण्यात आली. ज्यानुसार भारताची लोकसंख्या २०.३ कोटी होती मात्र पहिली नियमित शृंखलेची जनगणना १८८१ मध्ये घेण्यात आली. तेव्हां पासून दर दहा वर्षानी नियमित जनगणना घेतली जाते. २०११ ची जनगणना १८७२ पासून मोजल्यास १५ वी तर स्वातंत्र्या नंतरची सातवी जनगणना आहे.

लॉर्ड मेयोने १८७२ मध्ये जनगणनेचे प्रयत्न केले असले तरी ही जनगणना पूर्ण होऊ शकली नाही. १८८१ मध्ये लॉर्ड रिपनने केलेली जनगणना ही पूर्ण आकडेवारीसह होती.

स्वातंत्र्यानंतर 'भोर' समितीच्या शिफारशी नुसार जनगणनेची संपूर्ण जबाबदारी केंद्राने घेतली. यासाठी 'जनगणना कायदा १९४८' संमत करण्यात आला. त्यानुसार गृहमंत्रालयाच्या अधिन महापंजीयक किंवा जनगणना आयुक्त यांच्या निर्देश अनुसार होते.

भारताच्या लोकसंख्येचा विषय संघसूचीत येतो भारतीय संविधान कलम २४६ नुसार लोकसंख्येचे कार्य संघ सरकार व्दारे करण्यात येते. भारतातील पहिले जनगणना आयुक्त हेनरी प्लाउडेन होते.

२००१ ची जनगणना भारताची पहिली पूर्ण कम्प्युटरीकृत जनगणना होती.

भारताची लोकसंख्या अमेरीका, इंडोनेशिया, ब्राजील, पाकिस्तान, बांग्लादेश, आणि जापान यांच्या एकत्रीत लोकसंख्ये बरोबर आहे.

२०११ च्या जनगणनेला 'आपली जनगणना आपले भविष्य' असे नाव देण्यात आले डॉ. सी. चंद्रमौली हे जनगणना आयुक्त होते. देशाच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील यांच्या नोंदणीपासून जनगणनेचा प्रारंभ झाला. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण १९७६, २००० करण्यात आले. भारतात कुटुंब नियोजन कार्यक्रम १९५२ मध्ये करण्यात आला

**भारतातील लोकसंख्येची वैशिष्टे, कारणे, परिणाम उपाययोजना :**

**वैशिष्टये :-**

१) उच्च जन्मदर व कमी मृत्यूदर

२) लोकसंख्येची जास्त घनता

३) वाढते सरासरी वयोमान
४) बदलता बालमृत्यूदर
५) वयोगटातील बदल
६) प्रतिकूल स्त्री—पुरूष प्रमाण

कारणे :—

१) कुटुंब नियोजनाविषयीच्या जागृतीचा अभाव
२) वैद्यकीय व आरोग्य सुविधांत झालेली सुधारणा
३) नैसर्गिक आपत्तीवर नियंत्रण
४) शिक्षणाचा प्रसार

परिणाम :—

१)वाढती बेरोजगारी, दारिद्रय
२) अन्नधान्याची समस्या
३) आर्थिक विकासास अडथळा
४) पर्यावरणाची हानी
५)जमिन शेती वरील दबाव

उपाययोजना :—

१) कुटुंब नियोजन कार्यक्रम
२) स्त्री शिक्षणाचा प्रसार
३) जाणिवजागृती कार्यक्रम
४) सामाजिक सुरक्षा
५) लोकसंख्या शिक्षण

उपरोक्त विवेचनावरून असे स्पष्ट होते की, जग आणि भारत यांची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आज जग आणि भारता समोर लोकसंख्या वाढ ही अनुबॉमपेक्षाही विस्फोटीत समस्या झालेली आहे. ज्यामुळे दरडोई उत्पन्नापासून तर व्यक्तीच्या विकासा पर्यंत सर्वच घटकाला किड लागून पोखरून निघते.

एल .पी . जी . च्या युगात अनेक आविष्कारासोबत समस्याचाही आविष्कार होत चालला आहे.

माल्थसच्या मते, ''मानव जीवन मुख्यत: खाद्य सामग्रीच्या पुर्तीवर आधारित आहे. त्याशिवाय मनुष्याचे जीवन असह्य असते. यौन संबधी मूल प्रवृत्ती स्त्री—पुरूष दोन्हीत सार्वभौम असते. त्यामुळे जनन दर मोठ्या प्रमाणात वाढतो परंतु साधने अथवा खाद्य सामग्री त्या अनुपाताने वाढत नाही'' त्यांच्या नुसार लोकसंख्या भौतिक वृध्दिने म्हणजे १,२,४,८,१६,३२ यानुसार तर खाद्य सामग्री अंकगणितीय वृध्दि म्हणजे १,२,३,४,५ यानुसार वाढत असते. तसेच लोकसंख्येच्या घनत्वा मध्ये वृध्दि आणि संपत्तीत पारस्पारिक संबंधाचा उल्लेख करते वेळी श्री. सैंडलर ने म्हटले की, ''अधिक संपत्तीचा प्रभाव व्यक्तिच्या अपत्य उत्पत्तीवर मोठ्या प्रमाणावर जाणवतो''.

पाचव्या पंचवार्षीक योजना काळात तत्कालीन आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री श्री. करनसिंग यांनी १६ एप्रील १९७६ ला पहिल्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाची घोषणा केली. (आणिबाणीच्या काळात जाहिर) तर दुसरे राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० मध्ये करण्यात आले.

लोकसंख्या वाढीवर प्रतिबंध घालण्यासाठी पंचवार्षीक योजनेत विविध कार्य केले. पहिली पंचवार्षीक योजना (१९५१—५६) मध्ये १९५१ साली सुविहितपणे औपचारिकरित्या कुटुंब नियोजन कार्यक्रम राबविणारा भारत हा पहिला देश होता. पाचवी पंचवार्षीक योजना (१९७४—७९) मध्ये मोठ्या प्रमाणात पुरूष नसबंदी दृष्टिकोनावर भर (राष्ट्रीय आणिबाणी काळात) दिला या काळात 'कुटुंब नियोजन' या कार्यक्रमाचे पुनर्नामकरण करून 'कुटुंब कल्याण योजना' ठेवण्यात आले.

सातवी पंचवार्षीक योजना (१९८५—९०) मध्ये कुटुंब नियोजनासोबतच माता व बाल आरोग्य सेवांचे बळकटीकरण कार्यक्रम सार्वजनिक लसिकरण कार्यक्रमाचे सम्मिलीकरण झाल.

आठवी पंचवार्षीक योजना (१९९२—९७) मध्ये १९९२ साली कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे पुनर्नामकरण करण्यात येऊन कार्यक्रम असे ठेवण्यात आले.

नववी पंचवार्षिक योजना १९९७—९८ मध्ये सि.एस.एस.एम. चे रूपांतर करून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम ची सुरवात झाली.

दहावी पंचवार्षिक योजना (२००० —२००७) २००५ साली प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम २ (RCH-II) ची सुरवात झाली.

संदर्भ सुची :—

आगलावे, प्रदिप (२००८). भारती समाज संरचना आणि समस्या, नागपूर : साईनाथ प्रकाशन.
देसले, किरण (२०१५). अर्थशास्त्र, जळगाव : दिपस्तंभ
कोळंबे, रंजन (२०१४—१५). भारतीय अर्थव्यवस्था. पुणे :भगीरथ प्रकाशन.

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY QUARTERLY
RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - II / English Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV October - December - 2018

Marathi Part - II / English Part - II

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | युगानायिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**प्रा. डॉ. गौतम ए. शंभरकर** | १-५ |
| २ | सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण<br>**प्रा. डॉ. भालेराव युलिसिस एकनाथ** | ६-९ |
| ३ | स्त्री शिक्षण<br>**गणेश वासुदेव पानझाडे**<br>**प्रा. अर्चना ज्ञानोब अडसुळे** | १०-१३ |
| ४ | सावित्रीबाई फुले आणि समाज परिवर्तन<br>**पल्लवी शेंडे** | १४-१६ |
| ५ | महिला सक्षमिकरणात राजा राजमोहन रॉय व महात्मा फुले या समाज सुधारकांचे योगदान<br>**प्रा. डॉ. आर. बी. शेटे** | १७-२० |
| ६ | स्त्री सक्षमीकरण<br>**डॉ. राजेश जानराव काळे** | २१-२५ |
| ७ | सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे अध्ययन<br>**प्रा. डॉ. आर. डी. इंगोले** | २६-२८ |
| ८ | आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले<br>**डॉ. राजेश शंकरराव पत्तीवार** | २९-३० |
| ९ | क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले - स्त्री स्वातंत्र्य हक्क<br>**डॉ. अशोक सोनकांबळे** | ३१-३३ |
| १० | स्त्री - जीवनाला नवी दिशा देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे** | ३४-३६ |
| ११ | सावित्री फुले आणि समाज परिवर्तन<br>**प्रा. डॉ. राणी जगन्नाथराव जाधव** | ३७-४२ |
| १२ | स्त्रियांचे प्रेरणास्थान : सावित्रीबाई फुले<br>**डॉ. वर्षा चिखले** | ४३-४६ |
| १३ | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले<br>**प्रा. डॉ. सौ. यू. आर. पाटील** | ४७-५१ |

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | महिला सक्षमीकरणामध्ये सावित्रीबाई फुले यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. विलास घोडे** | ५२-५७ |
| १५ | सावित्रीबाई फुले आणि समाज परिवर्तन<br>**श्री विलास आत्माराम देऊलकर** | ५८-६१ |
| १६ | स्त्रि मुक्तीच्या प्रणेत्या - सावित्रीबाई फुले<br>**डॉ. उषा एम. खंडाळे** | ६२-६७ |
| १७ | पुनर्विवाह : काल आणि आज<br>**शितल संग्राम सालवाडगी** | ६८-७३ |
| १८ | सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य<br>**डॉ. शरद देवराव उमाटे** | ७४-७९ |
| १९ | सावित्रीबाई : एक युगप्रवर्तक क्रांतीसूर्या<br>**प्रा. रुपेष कुचेवार** | ८०-८२ |
| २० | स्त्रि स्वातंत्र्याच्या संदर्भात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या विचारांचे योगदान - एक दृष्टीकोप<br>**प्रा. डॉ. सुधा मु. खडके (कडू)** | ८३-८७ |
| २१ | सावित्रीबाई फुले व सामाजिक परिवर्तन<br>**प्रा. यादवराव रा. गहाणे** | ८८-९० |
| २२ | स्त्री स्वातंत्र्य<br>**प्रा. सुभाष आर. गोंडाणे** | ९१-९३ |
| २३ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंचे सामाजिक चळवळीतील कार्य<br>**प्रा. शिवचरण नामदेव धांडे** | ९४-९६ |
| २४ | सावित्रीबाई फुले : स्त्री समाज मुक्तीदात्या<br>**प्रा. सतीश ज. पिसे** | ९७-९८ |
| २५ | महाराष्ट्रातील तेजस्वी स्त्रीरत्न क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले<br>**डॉ. रोहिणी दि. मेश्राम** | ९९-१०० |
| २६ | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि समकालीन स्त्री जीवन<br>**प्रा. डॉ. साईनाथ शेटोडे** | १०१-१०३ |

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | सावित्रीबाई फुलेंचे सामाजिक चळवळीतील योगदान<br>**प्रा. डॉ. सिद्धार्थ शिवाजी वाठोरे** | १०४-१०७ |
| २८ | स्त्री मुक्ती चळवळीची अग्रणी सावित्रीबाई फुले<br>**डॉ. अनिल एन. ठाकरे** | १०८-११० |
| २९ | सावित्रीबाई फुले व समाज परिवर्तन<br>**सहा. प्रा. सुहास उत्तमराम वाघमारे** | १११-११४ |
| ३० | नारी और क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**Dr. Ratnapal M. Dohane** | ११५-११७ |


# CONTENTS OF ENGLISH PART - II


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Savitribai Phule and Women Education<br>**A. Malyadri** | 1-6 |
| 2 | Status of Girl Child Dropout and Women Education in South 24 Parganas District: Relevance to the thought of Savitribai Phule<br>**Dr. Ashis Biswas** | 7-12 |
| 3 | Savitribai Phule and Present Indian Education System<br>**Prof. Gautam C. Satdive** | 13-16 |
| 4 | Savitribai Phule: A Crusader for Women Empowerment<br>**Narinder Kaur** | 17-21 |
| 5 | Revolutionary Savitribai Phule and Women Empowerment<br>**Mahendrakumar M. Meshram** | 22-26 |

...UME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
...NTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २९. सावित्रीबाई फुले व समाज परिवर्तन

**सहा. प्रा. सुहास उत्तमराम वाघमारे**
महात्मा जोतीबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ.

फुले दांम्पत्याच्या जिवनाकडे पाहण्याचा प्रयत्न केला जातो त्यावेळी निश्चितच काही गोष्टींची जाणीव होते ...जगाच्या मानवी इतिहासात या दांम्पत्या इतके मानवतेचे, मानव धर्माचे, परिवर्तनाचे महान कार्य सेवाभावी वृत्तीने, ...गाने, मोठ्या हालअपेष्टा व अपमान सहन करून मोठ्या कष्टाने अन्य कोणत्याही दांम्पत्याने केल्याचे उदाहरण ...पडत नाही.

कांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जिवनकार्याचा उलघडा करणे म्हणजे स्त्री स्वातंत्रांचा अस्तीत्वाची जाणीव करणे होय, खरं तर आजच्या वैज्ञानिक युगात हा समाज इतका शिक्षित झाला, की, त्याचे पाय जमीनीवर कधी येतच नाही. स्त्रीयांच्या शिक्षणाचा विचार केल्यास शैक्षणिक, राजकिय, किडा अश्या अनेक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतल्याचे दिसते, मात्र आज जी स्त्री या समाजात स्वतंत्र पणे वावरत आहे, आज प्रत्येक क्षेत्रात आपली भुमिका बजावत आहे. या सर्वाचे श्रेय फुले दांम्पत्यांला जाते, मात्र खंत या गोष्टिची वाटते ख–या विद्योची देवता असलेल्या कांतीज्योती सावित्रीबाई फुलेंकडे या समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन नाहीच.

ज्या व्यवस्थेत बहुजन समाजाला शिक्षणाचा अधिकार नव्हता, ज्या व्यवस्थेत स्त्रीयांना काही कठोर कायद्याच्या बंधनात अडकविलेले होते, स्त्री म्हणजे केवळ भोग वस्तु, स्त्रीयांना चुल आणि मुल या पलीकडे कुठलाच अधिकार स्वीकारता येणार नाही, स्वतंत्रेचा अधिकार, विधवा महिलेवर अत्याचार, बालविवाह अशा अनेक बंधनात अडकलेला हा स्त्री समाज, अश्या अवस्थेत एकोणीसच्या शतकात असा एक ध्रुवतारा जन्माला आला कि, समस्त बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी आपलं अस्तित्व पणाला लावून समाजातील अज्ञान, दारिद्र, जातीभेद पाहुन ते अतिशय अस्वस्थ होत असत. ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चिय केला ही दारिद्री, ही गुलामी केवळ अशिक्षित पणामुळे असल्याचे त्यांना जाणीव झाली. यातूनच शिक्षणाची कास धरणे हाच खरा उपाय आहे आणि हाच गुलामीवरिल प्रहार आहे. फुले दांम्पत्यानी मानवी जिवनात शिक्षणाला खुप मोठ स्थान दिले आहे. त्यातच स्त्री शिक्षणासाठी आपलं अस्तित्व देखील खर्ची घातले 1848 साली पुण्यातील भिडे वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरूवात करून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. सावित्रीबाईंनी पतीकडून अक्षर ओळख करून घेवून स्वतः मुलींना शिकवण्यास सज्ज झाली. स्त्रीयांना केवळ शिक्षणच नाही तर प्रत्येक क्षेत्रात समानता मिळण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

## उद्देश

1. सामाजिक परिवर्तनात सावित्रीबाईचे शैक्षणिक, बालहत्या प्रतिबंधक गृह बाबत योगदान अभ्यासणे.
2. सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात येणा–या अडचणीचे अध्ययन करणे.

या देशात पहिल्या प्रथम जोतीबा–सावित्रीबाई यांनी भारतीय स्त्रीच्या मनुवादी व्यवस्थेत छेद दिला भारतीय स्त्रीच्या पायातील गुलामीच्या बेड्या तोडण्याचा प्रयत्न केला. या उदात्त कार्यासाठी त्यांना गृहत्याग करावा लागला. त्यांच्या गृहत्यागासंबंधी एका विद्याप्रेमी व सत्यप्रेमी मानसाने,"बॉम्बे गार्डीयन" या इंग्रजी वर्तमान पत्रात आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले आहे कि, स्त्रीया, महार, मांग, यांच्या मुला–मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय दाम्पत्य जोतीबा–सावित्रीबाई यांच्या उदात्त हेतूवर व शिक्षणाच्या पवित्र कार्यावर पाच–सहा महिन्यानंतर दुर्देवाने वक्रदृष्टी फिरली. अक्षर शुन्य अज्ञानी लोकांच्या अनिष्ठ रूढी, परंपरेच्या विचाराला व जातीबांधवाच्या दबावाला बळी पडून गोंविदराव फुले यांनी आपल्या मुलाला व सुनेला घराबाहेर काढले व मानवतेच्या चांगल्या कार्याला खिळ पाडली. यामुळे सर्वच अव्यवस्था झाली आणि शाळा बंद पडली. घराबाहेर पडल्यानंतर आपले कुटुंब स्थिरस्थावर होईपर्यंत व कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे साधन पाहण्यापर्यंत महार, मांग, यांच्या मुला–मुलींकरिता काढलेली शाळा काही काळ बंद पडली. आपली परिस्थिती सुधारल्या नंतर व कुटुंब स्थिरस्थावर झाल्यानंतर जोतीबा–सावित्रीबाई यांनी ही शाळा सदाशिव राव काकडे यांनी दिलेल्या जागेत पुन्हा जोमाने सुरू केली. तीन–चार वर्षाच्या अल्प काळात आपले जीवन शिक्षणाच्या कार्यात संपूर्ण पणे झोकून देवून मोठ्या ध्येयाने प्रेरित होवून अत्यंत कष्ठाने जोतीबा–सावित्रीबाई यांनी निरनिराळ्या ठिकाणी अठरा शाळा काढल्या व त्या यशस्वी रित्या चालविल्या

सावित्रीबाई या स्वतंत्र प्रज्ञेच्या विचारवंत होत्या. समाज परिवर्तनासाठी त्यांनी विविध घटकांवर कार्य केले. त्याकाळात बालविवाहाची प्रथा रूढ होती. औषधोउपचार व चांगली वैद्यकिय सुविधा यांचा विशेष विकास झालेला नव्हता. योग्य त्या उपचाराच्या अभावी अंधश्रध्देवर विश्वास ठेवल्याने बाल मृत्यूचे प्रमाण जास्त होते. या परिस्थितीमुळे बाल विधवांचे प्रमाण समाजात वाढलेले होते. बालविधवांची करून, दारूण अवस्था दारोदार पाहावयास मिळे साध्या माणूसकिच्या भावनेने शब्दांनी त्यांना धिर देण्याची वृत्ती ही समाजात नव्हती. कटू शब्दांनी तिची अवहेलना केली जाई.

त्या काळी ब्राम्हण समाजात विधवांचे पुनर्विवाह करण्याची परवाणगी नव्हती. धर्माने त्यांचा पुनर्विवाह निषिध्द ठरविला होता. पुनर्विवाहाची मुभा धर्माने फक्त पुरूष वर्गाला दिलेली होती. स्त्रीयांना मात्र त्यापासून वंचित ठेवण्याचा हेका पुरूष प्रधान संस्कृतीने सोडला नव्हता. बाल वयात वैधव्य प्राप्त झालेल्या अनेक मुलींवर तरूण वयात पुरूषा कडून अत्याचार होत असत. पुरूष आपली पाशवी वासना शमविण्यासाठी तिचा उपभोग घेत व तिच्यावर बलात्कारही करत असत. अत्याचाराने लादलेले व संयम सुटल्याने नको असलेले मातृत्व त्या विधवांच्या नशिबी येत असे त्या मातृत्वामुळे समाज तिचा तिरस्कार करी कुटुंबात तिची निर्भत्सना होई. हजारो विधवा तरूण स्त्रीया व हजारो नवजात शिशू यांना वाचवून त्यांना नवजिवन देण्याचा संकल्प जोतीरावांनी आपल्या विचाराने व सावित्रीबाईनी प्रत्यश आपल्या कृतीने सोडला. नवजात शिशूंचे प्राण वाचविण्यासाठी, त्यांचे चांगले संगोपण होण्यासाठी व तरूण विधवा गरोधर मातांची आत्महत्या टाळण्यासाठी जोतीरावांनी सावित्रीबाईच्या साहाय्याने पुणे इथे सन 1863 मध्ये "बालहत्या प्रतिबंधक गृह" याची स्थापना आपल्या स्वतःच्या राहत्या घरात केली.

स्त्रीच्या मातृत्वाचा गौरव आपल्या भारतीय संस्कृतीत नेहमी केला जातो खरा, पण हे मातृत्व विवाह संस्थेच्या चौकटीत बसणारे नसेल तर ते स्त्रीच्या छळास कारणीभुत होते. आपल्या समाजात मुलांसाठी जिवाच्या आकांताने तळमळणारी स्त्री जशी आपल्याला दिसते त्याच प्रमाणे कोवळ्या जिवाचा गळा घोटून भ्रूहत्या करणारी स्त्री देखील

आपल्या समाजात आढळते. स्त्रीची ही परस्पर विरोधी चित्रे एका समाजात दिसतात याचे उत्तर सामाजिक निती संकेतात असल्याचे सावित्रीबाईच्या निदर्शनास हे बालहत्या प्रतिबंध गृहाचे प्रत्यक्ष काम करित असतांना आले.

जोतीराव सवड असेल तेव्हा पाय मोकडे करण्यासाठी पुण्यातील मुळामुठा नदीच्या संगमापर्यंत मोकळ्या हवेत सायंकाळच्या वेळेस फिरावायास जात अशाच एका सायंकाळच्या वेळी गरोधर स्त्री मुळामुठा नदीत जिव देण्यास आली होती. जोतीरावांनी मोठ्या आवाजात खडसावून विचारले कोण तु इथे काय करित आहेस तिची ती कर्म कहानी ऐकून कळवाळू जोतीरावांचे मन हेलरवून गेले. त्यांनी तिला धिर दिला तिची समजुत घातली व तिला जिव देण्यापासून परावृत्त केले. तिला पोटच्या मुलीची माया देण्याचे व तिचा सांभाळ मुलीच्या ममतेने करण्याचे अभिवचन देवून तिला त्या कातर सायंकाळी आपल्या घरी आणले. त्या गरोदर स्त्रीचे नाव होते "काशी". घरी आल्यावर काशीची सर्व कर्मकहाणी जोतीरावांनी आपली पत्नी सावित्रीबाईस सांगितली ति कहानी ऐकून सावित्रीबाईसही अत्यंत वाईट वाटले. काशी विषयी सावित्रीबाईच्या मनात करूणा निर्माण झाली. सावित्रीबाईनी तिला मातेची माया दिली गरोदर पणातल्या अवस्थेत असणा–या काशीस सावित्रीबाईने तळहाताच्या फोडाप्रमाणे सांभाळले काशीपुढे बाळंत होवून तिला गुटगुटीत मुलगा झाला. या मुलाचे नाव सावित्रीबाईच्या आवडीप्रमाणे "यशवंत" ठेवण्यात आले. यशवंत म्हणजे जिवनाच्या सर्व क्षेत्रात यश मिळविणारा जोतीराव व सावित्रीबाई यांना मुल–बाळ नसल्याने सावित्रीबाईंच्या आग्रहाखातर जोतीरावांनी यशवंतास दत्तक घेतले व कायदेशिर रित्या जोतीरावांनी त्यास आपले मिळकतीचे व स्वतःचे वारस बनविले. यशवंत याला दत्तक घेते वेळी जाती बांधवांनी व नातेवाईकांनी या दत्तक विधानास फार मोठी विरोध केला. कुणाच्या पोटचा याचा थांग पत्ता नसणारा, पापाच्या करणीतून जन्माला आलेला अशा कुत्सित शब्दांनी यशवंत या अनाथ, अजाण व निष्पाप बालकावर त्यांनी टिकेची राळ उठविली त्या टिकेला कोणतीही भिक न घालता मोठ्या निर्धाराने व ध्येय वादाने सावित्रीबाईच्या सांगण्यावरून यशवंत याला दत्तक घेतले व मोठ्या धुमधडाक्याने दत्तक विधान समारंभ पार पडला. या घटनेला व या समारंभाला भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात तोड नाही.

केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कामे सावित्रीबाईनी कल्पकतेने पार पाडले. सत्य शोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईचा मोठा सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईनी सत्य शोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहीली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केला, "काव्यफुले" व "बावनकशी सुबोध रत्नाकर" हे काव्य संग्रह त्यांनी लिहीले. पुढील काळात त्यांची भाषणेही प्रकाशित करण्यात आली. इ.स. 1896 सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईनी समाजाला सत्काराचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरिर विक्रय करणा–या बाया–बापड्यांना दुष्टाच्या तावडीतून सोडून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास पाठविले.

इ.स. 1896–97 साला दरम्यान पुणे परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. हा जिव घेणा आजार अनेकांचे जिव घेवू लागला हा रोग संसर्गजन्य आहे हे कळल्यावर ब्रिटीश शासनाने जबरदस्तीने संभाव्य रूग्नांना वेगळे काढून स्थानांतरीत करण्याचा खबरदारीचा उपाय योजला. यातून उभ्दवणारी परिस्थिती ओळखून सावित्रीबाईनी प्लेग पिडीत रूग्नांनसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाने यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना त्यांच्या

कुटुंबियांना आधार देवू लागल्या. प्लेग च्या रोग्याची सेवा करातांना सावित्रीबाईंना ही प्लेग झाला त्यातून इ.स. 10 मार्च 1897 रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाईंनी जोतीबांच्या सर्व कार्यात हिरहिरीने भाग घेतला. स्त्रीयांनी शिकावे हे त्यांचे ब्रिद वाक्य होते अनाथांना आश्रय मिळावा हेही त्यांचे कार्यक्षेत्र होते. सामाजिक कार्यात त्यांचा पुढाकार असे. त्यामुळेच 1876–77 च्या दुष्काळात त्यांनी खुप कष्ठ केले.

**संदर्भ ग्रंथसुची**

1. कांडगे, राम. *कातीज्योती सावित्रीबाई फुले.* पुणे : राजश्री प्रकाशन.
2. कांबळे, झुंबरलाल. *सावित्रीबाई फुले.* पुणे : सुगावा प्रकाशन.
3. www. krantisuryapratishthan.com

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

# An International Multidisciplinary Quarterly Research Journal

Volume - VII, Issue - IV, October - December - 2018
ISSN 2277 - 5730

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

# AJANTA

Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

सहा. प्रा. सुहास उत्तमराम वाघमारे

As a Recognition of the Publication of the Paper Entitled

सावित्रीबाई फुले व समाज परिवर्तन

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**Editor : Vinay S. Hatole**

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERN!TION!L RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

August-2018

SPECIAL ISSUE-LXII (B)

# SAMISHA



**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W. Nichit
Dr. Shubhangi Dange

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar.
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.261

ISSN - 2348-7143

# INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

August -2018

SPECIAL ISSUE- LXII(B)

**Guest Editor**
Dr. Dinesh W. Nichit
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Shubhangi Dange

**Chief Editor**
Dr.Dhanraj T.Dhangar

**Executive Editor**
Prof.Virag S.Gawande

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**August -2018**
**SPECIAL ISSUE- LXII (B)**
**Volume-2**

# Samisha
# समिक्षा

**Executive Editor:**
**Prof.Virag S.Gawande**
**Guest Editor :**
**Dr.Sanjay j. Kothari**
**Dr. Dinesh W. Nichit**
**Dr. Shubhangi Dange**
**Chief Editor :**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 225/-



Scanned with OKEN Scanner

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | 'दीनबंधू' : दलित पत्रकारितेचा उद्गाता | डॉ. शिवाजी जाधव | 6 |
| 2 | विविध गुंतवणूकी आणि गुंतवणुकीवरील कर प्रणाली – एक चिकित्सक अभ्यास | प्रा. रिता रामजी राऊत | 10 |
| 3 | संघटनेत गीता 'ज्ञाना'ची भूमिका | डॉ. के. एल.देशपांडे | 14 |
| 4 | भारतीय अर्थव्यवस्थेला तारक, जी. एस. टी. (करप्रणाली) | प्रा. डॉ. कांतेश्वर जी. ढोबळे | 17 |
| 5 | महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता | प्रा.डॉ. मनिषकुमार कायरकर | 20 |
| 6 | भंडारा जिल्ह्यातील वसाहत प्रारूपांचे भौगोलिक अध्ययन | प्रा. डॉ. गणेश एम. धोटे प्रा. डॉ. किशोर वाय. ठाकरे | 26 |
| 7 | वारकरी संप्रदाय उगम, विकास व सद्यस्थिती : एक आढावा | डॉ. ओमप्रकाश सा.बोबडे | 32 |
| 8 | मेळघाटातील कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून सूचविलेल्या काही सूचना व शिफारशी | कु. दयाश्री वि. कोकाटे डॉ. सुजाता ब. सबाने | 38 |
| 9 | महात्मा गांधी आणि पंचायत राज व्यवस्था | प्रा.सुहास शिवणकर/ नागापूरे | 44 |
| 10 | राष्ट्रसंताचे शिक्षणविषयक विचार | प्रा. डॉ. प्रमोद ना. घ्यार | 49 |
| 11 | भारतातील दारिद्रय : घटकराज्यानुसार विश्लेषण | प्रा.काशिदे यादव मधुकर | 53 |
| 12 | ग्रामीण महिलांचा आरोग्यविषयक अभ्यास | प्रा. डॉ. कल्याण मोरे कोळी शितल अरुण | 60 |
| 13 | आदिवासी समूदायाच्या विकासातील स्वयं सेवी संस्थांची भूमिकाः एक अभ्यास | प्रा. अरूण वि.शेटे | 64 |
| 14 | ग्रामीण साहित्यात संस्कृतीक चळवळीचे योगदान | प्रा. एम. डी. झलके | 69 |
| 15 | ग्रामीण कादंबरी ''भाषा'' हे संवाद माध्यम | श्री प्रवीण मारोतराव देवघरे | 72 |
| 16 | आंबेडकरवादी दलित व भटक्यांच्या स्वकथनांची पार्श्वभूमी | मनोज वि. नेवले | 74 |
| 17 | भारतीय शिक्षणातील लिंगभेद : स्त्रियांच्या शिक्षणातील अडसर | प्रा. डॉ. महेन्द्र भाऊराव वासेकर | 77 |
| 18 | दलित साहित्य - प्रेरणा आणि प्रयोजन | प्रा. डॉ. राजेंद्र वाटाणे | 80 |
| 19 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे गटनिरपेक्षता धोरणातील योगदान | प्रा. डॉ. माधुरी एन. देवतळे | 86 |
| 20 | आधुनिक भारतीय विचारक – डॉ. बी. आर. अम्बेडकर | डॉ. यशवंत डी. मेश्राम | 89 |
| 21 | विदर्भातील साक्षरतेचे भौगोलिक अध्ययन | डॉ. एम. बी. गाथे | 93 |
| 22 | खनिजतेल किंमत वाढीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम | प्रा. एम. पी. चोपडे | 97 |





Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue : Samisha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
August 2018

# आदिवासी समूदायाच्या विकासातील स्वयं सेवी संस्थांची भूमिकाः एक अभ्यास"

प्रा. अरूण विठ्ठलराव शेटे
महात्मा जोतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ.

भारतीय समाज हा ग्रामीण, नागरी आणि आदिवासी समूदायात विभागला असून त्यापैकी आदिवासी समूदाय हा अधिक मागासलेला, विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दुर, अविकसीत असून अनेक समस्यांनी ग्रस्त असलेला आढळून येतो. दुर्गम भागात, जंगल दऱ्याखोऱ्यातील वास्तव्य करीत असल्यामूळे सभ्य समाजापासून दूर किंवा अलिप्त राहतो. आदिवासींना आदिजन, वनवासी, गिरीजन तर राज्यघटनेच्या ३४१ व्या कलमानूसार 'अनुसूचित जमाती' (Sheduled Tribe) असे संबोधले आहे. तसेच दुर्गम भागात वास्तव्य करणारा, समान बोलीभाषा बोलणारा, रूढी, प्रथा, परंपरांचा अंगिकार करणारा, धार्मिक व अंध्दश्रध्देचा प्रभाव असणारा आणि विशिष्ट प्रकारचे सांस्कृतिक जीवन जगणारा, समूहाने राहणारा समूदाय म्हणजे आदिवासी समूदाय होय.

आदिवासी समुदायाचे जीवनप्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांचे सर्वांगीण कल्याण साधण्यासाठी स्वयंप्रेरणेने कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्था कार्यरत असल्याचे आढळते. ज्यामुळे आदिवासींच्या जीवन विकासाला, परिवर्तनाला चालना मिळत आहे.

स्वतंत्र भारतात अनुसूचित जमातीच्या कल्याणाची, उन्नतीची घटनात्मक तरतूद करून आदिवासींच्या विकासावर आजतागायत सातत्याने भर देण्यात आला आहे, शासन, स्वयंसेवी संस्था........ याद्वारे आदिवासींचा विकास साधून त्यांना समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतू अद्याप आदिवासी समूदाय अपेक्षित प्रमाणात विकासाच्या प्रक्रियेत किंवा परिघात समाविष्ट का नाही? शासनाद्वारे दरवर्षी मोठी आर्थिक तरतूद करूनही आदिवासींची उन्नती का दिसून येत नाही? त्यांच्यात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण का टिकून आहे? धार्मिकता अंधश्रध्देचा पगडा व आरोग्याचे प्रश्न का स्थिर आहेत? आदिवासींच्या जीवन विकासात स्वयंसेवी संस्थांची भूमिका कशी आहे? स्वयंसेवी संस्थाद्वारे 'आदिवासी कल्याण' याबाबतची वास्तवता कशी आहे? आदिवासींचे कल्याण साधतांना शासन, स्वयंसेवी संस्था योग्य समन्वयन साधले जाते का? अशा विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी प्रस्तूत विषयाचे अध्ययन करण्यात आले आहे.

**अध्ययनातील संकल्पनाः**

**आदिवासी जमाती** :- इ. स. १९६२ साली शिलॉंग येथे आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची समर्पक व्याख्या केली त्यानूसार 'एकासमान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पुर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भुप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टिने मागास असलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या, रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजाचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी म्हणतात"

**स्वयंसेवी संस्था** :- 'त्या अशा संस्थात्मक अस्तित्वाच्या असतात की जे व्यक्तीसमूहाने निर्माण केलेले असते त्यामध्ये संघटीत होणारे आत्मप्रेरणेने सामील होतात, अथवा एखाद्या बाहय प्रेरनेने संघटित होतात, त्यामागे विशिष्ट परिसरातील लोकांना मदत करण्याचा हेतू असतो. लोकांच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने या संस्था स्वतंत्रपणे मदत कार्य करतात, हे कार्य अशा रितीने करतात की, ग्रामीण भागाच्या सर्व स्तरातील लोकांचा समतोल आणि प्रभावी विकास साधन्यातील प्रयत्नात शासकिय प्रतिनिधी संस्था आणि लाभार्थी ग्रामीण लोक परस्परांच्या निकट संपर्कात यावेत' - डी. आर. चौधरी.

"अशासकीय ऐच्छिक संघटना अशा प्रबळ इच्छेने संघटित झालेल्या असतात, की त्या जादुमय बदल घडवून आणतात. काही सामाजिक अपप्रवृत्ती आणि दर्गुणांचे निर्मूलन करू शकतात."- एम. मुतालिब.

**आदिवासींचे कल्याण** :-"आदिवासी समूदायाला सर्वांगीण दृष्टया विकासाच्या (प्रगतीच्या) दिशेने विकास मार्गावर मार्गक्रमित करणे म्हणजे आदिवासींचा विकास/कल्याण होय."



Scanned with OKEN Scanner

**आदिवासी समूदाय व स्वयंसेवी संस्थांचे स्वरूपः-**

२०११ च्या जनगणनेनूसार भारतातील एकुण लोकसंख्या (१२१.०५) कोटीपैकी १०.४२ कोटी (८.६ टक्के) लोकसंख्या आदिवासींची आहे. त्यापैकी महाराष्ट्राच्या ११.२३ कोटी लोकसंख्येपैकी १.०५ कोटी (६.४ टक्के) आदिवासी असून नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहूल जिल्हा आहे, महाराष्ट्रात एकुण ४७ आदिवासी जमाती असून त्यापैकी कोलाम, कातकरी, बडा माडिया हया तीन अतिमागास (Primitive Tribes) जमाती आहेत.

भारतात विविध राज्यात आदिवासींच्या कल्याणासाठी वा विकासासाठी स्वयंसेवी संस्था प्रभावीपणे कार्यरत आहेत. त्यांना भारत शासन व विदेशातून देखील फंड वा अनुदान प्राप्त होत असते. महाराष्ट्रात देखील आदिवासी कल्याणार्थ साधारणतः १६ स्वयंसेवी असून त्या स्थानिक पातळीपासून (Grass Root) बदलाचे, समस्या निरसनाचे कार्य करीत आहेत. उदाः- विदर्भातील सर्च-गडचिरोली, आनंदवन-वरोरा, आम्ही आमच्या आरोग्यासाठी-कुरखेडा......वगैरे. यांच्यामुळे स्थानिक, दुर्गम भागातील लोकांचे, आदिवासींचे जनजीवन संरक्षित बनत आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. उदाः- डॉ. बंग दाम्पत्यांच्या **'सर्च'** संस्थेच्या आरोग्य विषयक सेवार्थ भूमिकेमुळे तेथील आदिवासींचे आरोग्य प्रश्न नियंत्रणात असून बाल-माता, मृत्यचे प्रमाण कमी झाले आहेत असे निदर्शनास येते.

**भारतातील आदिवासी कल्याणाकरीता राज्यनिहाय काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची संख्यात्मक माहिती**

| राज्य | स्वयंसेवी संस्थांची संख्या | राज्य | स्वयंसेवी संस्थांची संख्या | राज्य | स्वयंसेवी संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १२ | जम्मू आणि कश्मीर | ०५ | दिल्ली | ०२ |
| अरूणाचल प्रदेश | १० | कर्नाटक | १४ | ओरीसा | २७ |
| अंदमान व निकोबार | ०१ | केरळ | ०७ | राजस्थान | ०४ |
| आसाम | १० | मध्यप्रदेश | १५ | सिक्कीम | ०२ |
| चंदीगढ | ०३ | महाराष्ट्र | १६ | तामिळनाडू | ०३ |
| गुजरात | ०८ | मणिपूर | १२ | त्रिपुरा | ०४ |
| हिमाचल प्रदेश | ०५ | मेघालय | ०३ | उत्तरप्रदेश | ०२ |
| झारखंड | ०६ | मिझोराम | ०२ | उत्तराखंड | ०७ |
| | | नागालॅण्ड | ०२ | पश्चिम बंगाल | २३ |

संदर्भः GOI, Annual Report of the Ministry of Tribal affairs 2011-2012, New Delhi.

आदिवासी विकासाकरीता भारतात २०८ स्वयंसेवी संस्था (छळ्) आदिवासी विकास मंत्रालयाकडून अनुदान घेवून कार्यरत आहेत.

**अध्ययनाचे उद्देशः-**

१) आदिवासींच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.
२) आदिवासींचे प्रश्न, समस्यांचे अवलोकन करणे.
३) आदिवासींच्या कल्याणातील (विकासातील) स्वयंसेवी संस्थांची भूमिका अभ्यासणे.
४) स्वयंसेवी संस्था व आदिवासींचे कल्याण (विकास) स्थितीचे मूल्यमापन करणे.
५) निष्कर्ष व उपाययोजना सूचविणे.

**अध्ययनाचे गृहितके :-**

१) आदिवासी समुदाय विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असला तरी विकासाची गती मात्र मंद दिसून येते.
२) शासन, स्वयंसेवी संस्था सर्वस्तरातून आदिवासी विकासार्थ प्रयत्न होत असले तरी अनेक कारणास्तव आदिवासी समुदायाला विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.
३) आदिवासींच्या कल्याणार्थ स्वयंसेवी संस्था विविधांगी भूमिका पार पाडीत आहेत.



Scanned with OKEN Scanner

४) आदिवासींच्या कल्याणार्थ स्वयंसेवी संस्थाच्या योगदानामुळे सकारात्मक बदल दिसत असून त्यामध्ये काही उणिवा ही आढळून येत आहेत.

**तथ्यांचे निर्वचन/अन्वयार्थ/स्पष्टीकरण :-**

**१) आदिवासींच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.**

भारतीय समाजातील आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरणानूसार सर्वत्र आदिवासींचे वास्तव्य आढळते. केवळ चंदीगड-पंजाब राज्यात आदिवासींची संख्या आढळत नाही. परंतू मध्यप्रदेशात आधिकाधिक आदिवासींची संख्या असून इतरही राज्यामध्ये कमी अधिक आदिवासी जमाती आढळतात. भारताच्या पुर्वेकडील राज्यात आदिवासींचे अधिक वास्तव्य आहे. आसाम, ओरीसा, झारखंड...... यापैकी नागालॅण्ड राज्यात जवळपास ६४ टक्के पेक्षा अधिक लोक आदिवासी आहेत. तर महाराष्ट्रात वारली, भिल्ल, गोंड, कोलाम, कोरकू, कातकरी, पावरा, ठाकर, महादेव कोळी या जमाती प्रामुख्याने आढळतात.

भारतीय लोकसंख्येच्या दृष्टीने अल्पसंख्याक असलेला आदिवासी समुदाय 'दुर्बल घटक' म्हणून गणला जात असून त्यांच्यात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण दिसून येत आहे. तरी देखील शासनाच्या व स्वयंसेवी संस्थांच्या विविधांगी प्रयत्नांतून आदिवासी जनजीवन काही प्रमाणात सुधारत आहे. अलिकडील काळात आदिवासी विकसनार्थ आदिवासी भागात पायाभूत सोयी सुविधांची उपलब्धी झालेली दिसून येते. पक्के रस्ते, वस्तीतील सिमेंट रस्ते, बालवाडी, मिनी-अंगणवाडी, प्राथमिक आश्रमशाळा, पिण्याच्या पाण्याची सोय, दिवाबत्ती, घरकुल.. ईत्यादी. परंतू आदिवासी समूदायामध्ये फारश्या प्रभावी आरोग्य सेवा आढळत नाही. तसेच वनहक्क किंवा रोजगराची निश्चित उदरनिर्वाहाच्या साधनांची उपलब्धी मात्र आढळत नाही. (ज्यामुळे यवतमाळ जिल्हयातील कोलामांना रोजगाराच्या अभावी बेकार राहावे लागते.) तसेच त्यांची व्यावसायिक उन्नती दिसून येत नाही. यामुळे आदिवासींची आर्थिक-आरोग्य विषयक स्थिती फारशी समाधानकारक आढळत नाही. सोबतच आदिवासी समूदायाची शैक्षणिक वाटचाल देखील साधारणच आहे. पुर्वी अक्षर ओळख नसलेला म्हणून ओळखला जाणारा समूदाय सद्यस्थितीत अक्षर ओळख होत आहे. परंतू शिक्षणाचा जीवन विकासात उपयोग करून घेवू न शकलेला समूदाय म्हणण्याची स्थिती निर्माण झालेली आहे. अलिकडील परिक्षा रहीत शिक्षण पध्दतीमुळे मूल सहज पुढील वर्गात हस्तांतरीत केलं जात आहे, परंतू त्या तुलनेत त्यामध्ये गुणवत्ता विकसीत होईलच याची शाश्वती नाही. याचा प्रत्यय बहूतांश वेळा येतो. तसेच उच्चशिक्षणात किंवा नोकरी व्यवसायात प्रभावी वाटचाल दिसून येत नाही.

तेव्हा आदिवासी समुदायाच्या विकासात्मक स्थितीला चालना मिळाली असली तरी त्यांची विकासात्मक स्थिती मात्र समाधानकारक आढळून येत नाही.

**२) आदिवासींचे प्रश्न किंवा समस्यांचे अवलोकन:-**

सद्यस्थितीत आदिवासी समुदायाचे मागासलेपण, अज्ञानता, संस्कृती प्रियता, परिवर्तनाची अस्विकृतता, शासन-एनजीओ च्या भूमिकेच्या अंमलबजावणीतील उणिवा, दुर्गम भागातील वास्तव्य, शोषण यामुळे त्यांच्या विकासामध्ये अनेक अडथळे येवून त्यांच्या प्रश्नांची किंवा समस्यांची तिव्रता अधिक पाय रोवून आहे. आदिवासी समुदाय आणि आर्थिक मागासलेपण, कर्जबाजारीपणा, बेकारी, आर्थिक, शोषण, बचतीचा अभाव, पारंपारीक व स्थलांतरीत शेती अशा विविध बाबी त्यांच्या आर्थिक समस्यांना चालना देतात. तर आदिवासी स्त्री, बालके आणि आरोग्याचे बिकट प्रश्न यांचा जवळचा संबंध दिसून येतो. बालकुपोषण, रक्ताल्पता, संसर्गजन्य आजार, कमालीची अस्वच्छता, तत्पर वैद्यकीय सेवा, सोयी-सुविधांचा अभाव यामुळे पावसाळयात होणाऱ्या संसर्गजन्य आजार (उदा:-मेळघाटातील आदिवासींचा कुपोषणाचा प्रश्न), तसेच धार्मिकतेचा, अंध्दश्रध्देचा अत्याधिक प्रभाव, शैक्षणिक मागासलेपण, सांस्कृतिकतेचा प्रश्न, सामाजिक मागासलेपण, स्त्रियांचे शोषणाचे प्रश्न याबाबी अधिकाधिक प्रकर्षाने जाणवतात. (उदा:- कुमारीमाता प्रश्न.....)

वरील प्रमाणे आदिवासी समुदायाच्या जीवनात विविधांगी समस्यांचे अस्तित्व टिकून असल्याचे प्रकर्षाने आढळते.

**३) भारतात आदिवासींच्या कल्याणकरीता काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व त्यांची भूमिका**

आदिवासींच्या विकासाकरीता भारतातील अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. आदिवासींच्या आर्थिक, शैक्षणिक, उन्नतीसाठी , जनजागृती, राजकीय जागृती महिला सक्षमीकरण, बाल कुपोषण, अशा वेगवेगळया क्षेत्रात स्वयंसेवी



Scanned with OKEN Scanner

संस्था काम करतात. शासन आणि आदिवासी विकास यामधील मधला दुवा म्हणजे स्वयंसेवी संस्था होय. आदिवासींच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रभावी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाची गरज आहे. भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून नियोजनात स्वयंसेवी संस्थांसाठी त्यांना आदिवासी क्षेत्रात कार्यकरण्यासाठी वित्तीय तरतुद करण्यात आलेली आहे.

आदिवासींचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वच्छेने स्थापित झालेल्या स्वयंसेवी संस्था आदिवासी कल्याणार्थ प्रभावीपणे कार्यरत असून त्यांच्या योगदानामुळे आदिवासींच्या जीवनमानात सुधारणा होवून त्यांचे जीवन विषयक प्रश्नांची उकल होत आहे. याअनुषंगाने देशातील कांही स्वयंसेवी संस्थांची माहिती पुढील प्रमाणे

**१) सहजः-** (पुर्व गुजरात-दोहाड जिल्हा,१९६४) ही आदिवासी महिलांच्या आर्थिक विकासासाठी कार्यरत असून महिलांना गृह आधारीत उपजिवीकेच्या संधी (पारंपारीक हस्तकला-वस्तू तयार करणे) उपलब्ध करून देतात. **२) समताः-** १९९०, आंध्रप्रदेशातील आदिवासी जमाती मधील विकासाचे प्रश्न आणि जनवकालत यावर भर देते. ज्यांअंतर्गत जमीनीची अलिप्तता, विस्थापन आणि राजकीय असक्षमिकरण या प्रश्नांना वाचा फोडून आदिवासींच्या हक्कांचे प्राधान्याने संरक्षण देते. **३) आरबिकेएसः-** (१९८१ पासून राजस्थान कार्यरत) सुरूवातीस आदिवासींच्या मुलींच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले होते. सध्या ४३० गावात विविधांगी प्रश्न हाताळत आहे. त्यामध्ये प्रामूख्याने शिक्षण, बालविकास, महिला सक्षमीकरण, आरोग्य, स्वच्छता आणि नैसर्गीक संसाधनांचे व्यवस्थापन ईत्यादी क्षेत्रात कार्यरत आहे. **४) संभव :-** उ. प्र. ६ जिल्हयातील २५०० गावात कार्यरत-महिला, बालक, शिक्षण, आरोग्य आणि वैधानिक अधिकार असे विविधांगी प्रभावी कार्य करीत आहे. **५) सीवायएसडीः-** ओडीसा-१९८२:- ओरीसातील ग्रामीण, नागरी व आदिवासींचे जीवनमान सुधारण्यासाठी कार्यरत. विशेषत्वाने तळपातळीपासून ग्रामीण उपजिवीका, शिक्षण, सहभाग प्राधान्य, शासन व्यवहार, अर्थसंकल्पिय उत्तरदायित्व आपत्ती शमन, आरोग्य, लिंगभाव समानता, जलस्वच्छता, बाल हक्क, संरक्षण या क्षेत्रात कार्यरत आहे. तर महाराष्ट्रात १) ग्राममंगल-१९८२ अनुताई वाघ यांनी 'ऐने आदिवासी गावात' (ठाणे) ही संस्था स्थापित केली, बालशिक्षण, ग्रामविकासाचे प्रकल्प राबविले जातात. २) सत्यनिकेतन ट्रस्ट (अकोले तालुका)- याअंतर्गत बालक संगोपन केंद्रे, परित्यक्ता, विधवा, निराधार महिलांसाठी ६ महिने ते ३ वर्षापर्यंत अल्प मुदत निवासस्थान, वस्तीगृहे, शिक्षणावर भर, सर्वोदय, परिसर विकास व आर्थिक उत्थानासाठी विविध प्रकल्प राबविले. ३) **आदिवासी विकास पुढाकार** महाराष्ट्र व म. प्र. आदिवासींच्या कल्याणार्थ कार्यरत. ४) **सर्च-** (Society for Edu. Action & Research in community Health ) १९८६ साली डॉ. अभय व डॉ. राणी बंग यांनी गडचिरोली येथे स्थापना केली. लोकांना आरोग्य सुविधा पुरविणे, व आरोग्य प्रशिक्षण व शिक्षण, व आरोग्य धोरणांना आकार देण्यासाठी सहाय ही तीन प्रमुख हेतू, तसेच क्षेत्र संशोधन, क्षेत्र सुनावनी, गृह आधारित नवजात संगोपन (HBNC) दृष्टीकोनामुळे या परिसरातील नवजात आणि अर्भकाचे मृत्यूचे प्रमाण ५० टक्याने कमी झाले आहे.

अशा प्रकारे आदिवासीच्या विकासासाठी, उत्थानासाठी विविध उद्देश साध्य करण्यासाठी देशात आणि राज्यात नामांकित स्वयंसेवी संस्था कार्य करतांना आढळतात. ज्यामुळे आदिवासींच्या जीवनमानात सुधारणा होवून बदल दिसून येत आहे.

**४) स्वयंसेवी संस्था व आदिवासींचे कल्याण (विकास) स्थितीचे मूल्यमापन करणे.**

वरील विश्लेषणावरून आदिवासींच्या कल्याणात स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे दिसून येत आहे. ज्यामुळे त्यांच्या विकासास चालना मिळून सकारात्मक बदलही दिसून येत आहेत. परंतू आदिवासींचे कल्याण व स्वयंसेवी संस्था यांचे अवलोकन केल्यास कांही मर्यादाही दिसून येतात. जसे स्वयंसेवी संस्थाच्या संख्येत वाढ, संस्थांना अनुदान मिळण्याचा प्रश्न, पारदर्शकतेचा अभाव, शासन, शासकीय अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवी संस्था समन्वयाचा अभाव अशा विविध बाबींच्या मर्यादा किंवा उणिवा आढळून येत आहेत.

**निष्कर्षः-** १) आदिवासींची स्थिती काही प्रमाणात बदलत असून त्यांची वाटचाल सकारात्मक दिशेने दिसून येते, परंतू त्याची गती मात्र मंद आहे. २) आदिवसी समुदाय दुर्बल घटक म्हणून गणला जात असून त्यांच्यात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणही दिसून येते, तसेच त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. बेकारी, दारिद्रय, आरोग्याचे प्रश्न,



Scanned with OKEN Scanner

अज्ञानता ईत्यादी. ३) महिलांचे आरोग्य, शिक्षण, आर्थिक सक्षमीकरणाचे प्रश्न अधिक जाणवतात. ४) आदिवासींच्या कल्याणासाठी देशातील काही नामांकित स्वयंसेवी संस्था 'तळपातळीपासून' कार्य करीत आहेत, ज्यामुळे आदिवासींचे जीवनमान उंचावत आहे. ५) स्वयंसेवी संस्थांच्या भूमिकांमध्ये काही त्रुटी वा उणिवा आढळून येत आहेत. ६) आदिवासी समुदाय विकास व शासन यातील दुवा म्हणजे स्वयंसेवी संस्था होय.

**उपाययोजना :-** १) स्वयंसेवी संस्थांनी प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने व 'नाहीरे' वर्गाविषयीच्या तळमळतेने कार्य करावे, ज्यामुळे परिणाम स्वरूप कार्य दिसून येईल. २) आदिवासी समुदायाभिमुख, संस्कृती, राहणीमान, कला कौशल्य यास अनुसरून त्यांच्या बदलाची प्रक्रिया व रोजगार व्यवसाय उभा करावा. ३) आदिवासींच्या जनजागृतीवर, योजनात्मक लाभ यावर भर देण्यात यावा. ४) शासन स्तरावरून स्वयंसेवी संस्था आदिवासींच्या आरोग्य, आर्थिक व शैक्षणिक विकासात्मक कार्य करतांना योग्य ते मार्गदर्शन, प्रशिक्षण अनुदान-अर्थसहाय वेळत द्यावे, व साहित्य पुरवठा करण्यात यावा. ५) शासनाने आदिवासी विकास धोरणाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यावर भर द्यावा. ६) शासन व स्वयंसेवी संस्था यांच्यात योग्य समन्वयन असावे, व स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचे पारदर्शकतेने मुल्यमापन करावे, आदिवासींचे हक्कांचे जतन करावे.

**संदर्भग्रंथ सूची :-**

१) गारे गोंविद, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' २०००, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.
२) गारे गोंविद, 'आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ', २०००, सुगावा प्रकाशन, पुणे.
३) देवगांवकर एस. जी., 'आदिवासी विकास प्रकाशन' २०११, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
४) जाधव तु. व शिरापूरकर म., 'मानवी हक्क', २०१५, युनिक ॲकाडमी. पुणे.
५) उंबरकर दि., 'कोरकू आदिवासी सामाजिक विकास आणि शासकीय कल्याणकारी योजना', अद्वैत प्रकाशन अकोला.
६) ताटके निलम, 'संशोधन करतांना', २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
७) देवगांवकर शैलजा, 'वैदर्भीय आदिवासी जीवन आणि संस्कृती', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.द
८) पी. साईनाथ, 'दुष्काळ आवडे सर्वांना', २००३, अक्षर प्रकाशन, मुंबई
९) www.shodhganga.com



Scanned with OKEN Scanner

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV Marathi Part - III October - December - 2018

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | जागतिकीकरण: उच्च शिक्षण गुंतवणूक व गुणवत्ता<br>**डॉ. त्र्यंबकराव का. कदम** | ६७-६९ |
| १६ | आदिवासी जमातींचा शैक्षणिक विकास व शासकीय प्रयत्न: एक समाजशास्त्रीय अभ्यास<br>**प्रा. प्रदीप दाजीबा पाटील** | ७०-७३ |
| १७ | शेतकऱ्यांची आत्महत्या ; कारणे आणि उपाय<br>**डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे** | ७४-७७ |
| १८ | जातीवादाचे सामाजिक परिणाम आणि उपाय<br>**डॉ. होमराज राठोड** | ७८-८२ |
| १९ | विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे वास्तव<br>**प्रा. जगदिश आर. वाटमोडे** | ८३-८५ |
| २० | शिक्षक व बिगर शिक्षकांच्या मुलांमधील शैक्षणिक आवड : एक तुलनात्मक अभ्यास<br>**दिनेश आरोंडे** | ८६-८९ |
| २१ | जागतिकीकरणाच्या काळात आदिवासींचा विकास : देशापुढील एक आव्हान<br>**सुनिल कि. कोडापे** | ९०-९६ |
| २२ | भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान<br>**श्री गिरीधर केशव कुनघाडकर** | ९७-१०० |
| २३ | मानव संसाधन विकासातील व्यावसायीक व तंत्र शिक्षणाची भूमिका<br>**डॉ. शिंदे ज्ञानेश्वर साहेबराव** | १०१-१०५ |
| २४ | नक्षलवाद : कारणे व उपाययोजना<br>**प्रा. सोनकांबळे गंगाधर सोपान** | १०६-१०९ |
| २५ | यशस्वी जीवनाचे साधन म्हणजे आरोग्य<br>**डॉ. सुभाष वाघ** | ११०-११२ |
| २६ | महिला सक्षमीकरण व आरक्षण<br>**प्रा. डॉ. राजेंद्र एम. झाडे** | ११३-११५ |
| २७ | ग्रामीण विकास योजनांच्या संदर्भात ग्रामस्थांची जागरूकता : विशेष संदर्भ - नांदूर बाजार तालुका<br>**डॉ. प्रतिभा अशोक धोरजार** | ११६-११९ |
| २८ | राजकीय क्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण आणि भारतासमोरील आव्हाने<br>**प्रा. डॉ. माधुरी ना. कोकोडे** | १२०-१२३ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १८. जातीवादाचे सामाजिक परिणाम आणि उपाय

प्रा. भीमराव पाटील
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, औरंगाबाद.

**प्रस्तावना**

जगाच्या पाठीवर सर्वच समाजात सामाजिक स्तरीकरण प्रामुख्याने आढळते. जसे जन्मावर, वंशावर, शारीरिक क्षमतेवर, बुद्धिमत्तेवर, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक या विविध आधारावर सामाजिक स्तरीकरण अस्तित्वात आहे. परंतु भारतातील सामाजिक स्तरीकरण हे प्रामुख्याने जातीव्यवस्थेवर आधारित आहे. म्हणून जातीवादाची गंभीर समस्या भारतात निर्माण झाली आहे. भारतीय समाजव्यवस्थेत जातीव्यवस्थेला विशेष महत्त्व आहे. कारण भारतीय जातीव्यवस्था ही बंद स्तरीकरण स्वरूपाची आहे. डॉ. जी. एस. घुर्ये यांनी आपल्या **Caste, Class and Occupation, 1961** या ग्रंथात म्हटले आहे की, आर्य जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांच्यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे वर्ण निर्माण झाले होते. आर्यांनी अनार्यांवर स्वामीत्व मिळविले. अशा येथील मूळच्या स्थानिक रहिवाशांचा समावेश शूद्रांमध्ये करण्यात आला. थोडक्यात हिंदू जातीव्यवस्था ही आर्यांनी निर्माण केली आणि पुढे जातीचे प्रश्न वाढून जातीवाद निर्माण झाला.

भारतीय समाजव्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीचे सामाजिकरण हे त्याच्या जातीनुसार होत असते तसेच उच्च जातीचे लोक स्वतःला श्रेष्ठ समजतात व कनिष्ठ जातीच्या लोकांना तुच्छ मानतात. व्यक्तीच्या निष्ठा या त्याच्या जातीपुरत्याच मर्यादित असतात. व्यक्ती आपल्या जातीच्या हिताचाच विचार करते यातूनच जातीवाद निर्माण होतो. आज भारतातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रात जातीवाद फोफावला आहे. त्यामुळेच जातीवादाची एक ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे.

**उद्देश**

1. जातीवादाला प्रोत्साहन देणाऱ्या बाबी अभ्यासणे.
2. जातीवादाच्या दुष्परिणामाचा आढावा घेणे.
3. जातीवादाला आळा घालण्यासाठी उपाय सुचविणे.

**जातीवादाचा अर्थ**

साधारणतः जातीप्रती निष्ठा म्हणजे जातीवाद होय. जातीवाद ही जातीप्रती वाढलेली देन आहे. ही आपल्या जातीप्रती अंधळी आस्था किंवा भावना आहे जी आपल्या जातीच्या उद्देशाखेरीज अन्य जातीच्या हिताची अवहेलना करण्यास प्रेरीत करते. जातीवर आधारीत धर्मशाळा, धार्मिक मंदिर, दवाखाना, शिक्षण संस्था इत्यादींचा जन्म याच भावनेअंतर्गत झाला म्हणून आपल्या जातीला श्रेष्ठ मानने, इतर जातीच्या व्यक्तींचा भेदभाव करणे, आपल्या जातीच्या व्यक्तींनाच वाढविणे, पुढे येण्याची संधी निर्माण करून देणे. थोडक्यात आपल्या जातीच्या हितासाठी अन्य जातीच्या हिताची अवहेलना करणे म्हणजे जातीवाद होय.

जातीवादाच्या वाढीसाठी प्रोत्साहन देणाऱ्या बाबी

विवाहासंबंधी बंधने

प्रत्येक समाजात जातीअंतर्गत विवाहाचे बंधन असल्यामुळे प्रत्येकाने जातीतच विवाह करावा असे प्रतिबंध लावल्या जाते. जातीत, बिरादरीत आपली प्रतिष्ठा कमी होण्याच्या भितीने प्रत्येक व्यक्ती आपल्याच जातीत विवाह करतो त्यामुळे जोडीदार निवडण्याचे क्षेत्र मर्यादित होते. त्यामुळे विवाहा संबंधीच्या निषेधाने जातीवादाला प्रोत्साहन मिळते.

आपल्या जातीप्रती अंधविश्वास निर्माण होतो

प्रत्येक जातीतील व्यक्ती आपल्या जातीतील व्यक्तीवर जास्त प्रमाणात विश्वास करतो. सुख दुःखाच्या प्रसंगीही अधिकत्तर प्रमाणात आपल्याच जातीच्या व्यक्तीला हातभार लावल्या जातो. दुसऱ्या जातीच्या सदस्यासोबत राहणे व खानपानावर काही प्रमाणात प्रतिबंध लावल्या जातो. आपल्या जातीतील सदस्याचे सण, समारंभ, उत्सव, प्रथा, परंपरा, चालिरिती समान असल्यामुळे आपल्याच जातीप्रती अंधविश्वास निर्माण होतो जे नंतर जातीवादाचे रुप धारण करते.

सामान्य रितीरिवाज व समान व्यवसाय

आपण एकाच पूर्वजाचे वंशज आहोत ज्यामुळे आपले रितीरिवाज, धार्मिक विचार समान आहेत तसेच जातीचा सामान्यतः एकच व्यवसाय असल्यामुळे व्यक्तीत आपल्या जातीप्रती निष्ठा निर्माण होते व त्यामुळे जातीवाद वाढायला मदत मिळते.

जातीअंतर्गत सम्मेलने / मेळावे

नागरीकरण व दळणवळणाच्या विकसित साधनांमुळे शहरात वेगवेगळया क्षेत्रात येणारे एकाच जातीच्या लोकांमध्ये जास्त मेलजोल राहतो. नगरातील आपल्या जातीच्या सर्व सदस्यांना एकत्रित करण्यासाठी सहभोज सम्मेलने व मेळावे करतात. त्यामुळे जातीप्रती व जातीच्या सदस्याप्रती आपुलकी निर्माण होते यामुळे सुध्दा जातीवाद प्रवृत्ती वाढीला लागते.

जातीप्रती निष्ठा वाढविण्यास संचार साधनाचा वापर

आपल्या जातीप्रती निष्ठा वाढविण्यासाठी जातीतील सदस्य मोठया प्रमाणात विकसित संचार साधनाचा वापर करुन प्रचार करतात. आपल्या जातीतील आदर्शाचा सतत प्रचार करण्यासाठी सम्मेलने आयोजित करणे, जीवन साथीच्या निवडीत मदत करणे, जाती वर्तमानपत्र चालविणे, साप्ताहिक, मासिक पत्रिका काढणे, जातीच्या सदस्याकडून चंदा गोळा करुन आपल्या जातीतील व्यक्तीची कुठे निवड झाल्यास, जातीतील सदस्यांनी यश संपादन केल्यास त्यांचा सत्कार करणे या सर्व बाबीमुळे जातीप्रती इमानदारी व भक्तीला प्रोत्साहन मिळून जातीवाद वाढायला कारणीभूत ठरते.

जातीवादाचे दुष्परिणाम

भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात जातीवादाने फारच वाईट प्रकारे प्रभावित केले आहे. जातीवादामुळे व्यक्तीमध्ये देशभक्तीची भावना विकसित न होता राष्ट्रीय विकासाला बाधा निर्माण होते. जातीवादाचे दुष्परिणाम पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

**राष्ट्रीय एकात्मतेस बाधक**

जातीप्रती निष्ठा ही राष्ट्रीय एकात्मतेतील प्रमख अडचण आहे. व्यक्ती राष्ट्र हिताच्या तुलनेत जातीहिताला प्राधान्य देतो तेव्हा शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात चुकीच्या व्यक्तीची निवड होउन देशाचे मोठे नुकसान होते त्यामुळे राष्ट्रविकास थांबतो.

**लोकशाहीला घातक**

लोकशाही ही समानतेवर आधारीत बाबीवर जोर देते तर जातीवाद हा जातीनिष्ठतेवर जोर देते. आजही निवडणूकीच्या रणांगणात जातीय सरंचनेवर आधारीत उमेदवाराची निवड केली जाते. त्यामुळे जातीच्या आधारावर मते प्राप्त होईल त्यामुळे नालायक व्यक्तीची निवड होऊन राजकीय क्षेत्रात जातीवाद लोकशाहीला गंभीर धोका निर्माण करेल.

**भ्रष्टाचाराला प्रोत्साहन नैतीक पतन**

जागतिकीकरणामुळे व्यक्ती आपल्या जातीच्या सदस्याची मदत खालच्या थराला जाऊन करतो. त्यासाठी तो उचित–अनुचित साधनांचा उपयोग करतो. यामुळे त्याचे नैतिक पतन होते व भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळते.

**औद्योगिक क्षेत्राला बाधक**

जातीवादामुळे औद्योगिक क्षेत्र सुध्दा प्रभावित होते. जातीवादामुळे अयोग्य व कमी प्रशिक्षित व्यक्ती सरकारी व खाजगी नोकरी मिळविण्यात महत्वपूर्ण पदावर पोहचण्यात सफलता मिळवितो असे नालायक लोक आपले काम योग्यप्रकारे करु शकत नाही. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राला व विकासाला बाधा निर्माण होते.

**मानवी मूल्याचा अभाव**

व्यक्तीच्या व देशाच्या प्रगतीसाठी व्यक्तीला विकास करण्यासाठी स्वातंत्र्य, समानसंधी, न्याय या मानवी मूल्यांची गरज असते. जेव्हा समाजात मानवी मूल्य असते तेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तीला विकास करण्याची संधी मिळते परंतु जातीवादामुळे मानवी मूल्याचा ऱ्हास होणे हा जातीवादाचा सर्वात मोठा दुष्परिणाम आहे.

**समान सामाजिक आणि धार्मिक हक्काचा अभाव**

जातीवादामुळे खालच्या जातीच्या लोकांना धर्म एकच असताना देखील धार्मिक विधीपासून वंचित ठेवण्यात आले तसेच सामाजिक व धार्मिक अपात्रता लादण्यात आल्या. शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक सर्वच बाबतीत अडवणूक केल्यामुळे जगाच्या तुलनेत आपण शेकडो वर्ष विकासात मागे पडतो.

**जातीवादाला आळा घालंण्यासाठी उपाययोजना**

**आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन**

आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देऊन जातीवादाला समाप्त केल्या जाऊ शकते. शासकीय स्तरावर यासाठी प्रोत्साहन दिल्या जाते तरीही आंतरजातीय विवाह केवळ शहरात व शिक्षित लोकांमध्येच मर्यादित आहे. आंतरजातीय विवाहामुळे दोन भिन्न जातीमध्ये स्नेहसंबंध वाढून जातीवादाची संकुचित भावना कमी होण्यास मदत होईल.

**जाती शब्दाचा वापर कमीत कमी करणे**

जातीच्या नावाचा कमीत कमी वापर करावा. कोणत्याही संस्थेचे नाव जातीच्या आधारावर नसावे. जातीच्या नावावर असणाऱ्या संस्थेचे अनुदान बंद करावे अशाप्रकारे जाती या शब्दाचा वापर कमीत कमी केल्यास जातीवादाला आळा बसू शकतो.

**निम्न जातीच्या आर्थिक स्थितीत सुधारणा**

हजारो वर्षापासून आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या जातीमध्ये ज्याचा समावेश होतो अशा निम्न जातीच्या आर्थिक स्थिती उंचावण्याकरिता शासकीय स्तरावर अजुनही व्यापक प्रयत्नाची गरज आहे. कारण आर्थिक विषमता ही द्वेषाला जन्म देते.

**योग्य शैक्षणिक प्रणाली**

बालवाडीपासून उच्च शिक्षणापर्यंत जातीय विचार निर्माण होईल असे शिक्षण असू नये. जाती या राष्ट्राच्या विकासाला कशा बाधक आहे हा विचार शिक्षणाच्या माध्यमातून प्रभाविपणे मांडला जावा.

**औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देणे**

औद्योगिकरणामुळे जातीवाद नष्ट होतो. कारण कारखान्यात व्यक्ती इतर जातीच्या व्यक्तीसोबतही राहून काम करतो. इतर जातीच्या लोकासोबत राहून त्याची दृष्टी अधिक व्यापक बनते. त्यामुळे जातीवादाला कोणतेही स्थान राहत नाही. म्हणून औद्योगिक विकास जातीमधील अंतर कमी करण्यास मदत करते.

**लोकांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणणे**

खऱ्या अर्थाने जातीवादाचा उगम हा मनात होतो. मनातील भावनांचे प्रतिबिंब आचरणातून उमटते म्हणून मानवी मन जातीवादाच्या आहारी जाणार नाही. यासाठी योग्य शिक्षण प्रणाली, योग्य संस्कार व समानतेचे तत्व मनावर प्रतिबिंबीत करणारे कार्यक्रम घ्यावे.

**निष्कर्ष**

जातीवादामुळे भारतीय समाज एकसंघ निर्माण होऊ शकला नाही त्याच बाबीचा गैरफायदा घेउन परकीयांनी आमच्यावर हजारो वर्ष अधिराज्य केले. मुघल हे बाहेरुन येऊन येथे हजारो वर्ष सत्ता उपभोगली. इंग्रजांनी शेकडो वर्ष आमच्यावर राज्य केले. आपल्यामध्ये असणाऱ्या दुहीचा फायदा घेऊनच व आपल्याला आपसात लढवूनच त्यांनी हे साध्य केले म्हणून जुने दिवस आले नाही पाहिजे असे वाटत असल्यास समाजातून जातीवाद हद्पार करणे आवश्यक आहे. जातीवाद ही जातीप्रथेमुळे निर्माण झालेली समस्या आहे. जातीवादामुळे द्वेष, स्पर्धा, संघर्ष या भावना निर्माण होतात. जातीवादात प्रामुख्याने दोन अंगे पहावयास मिळतात. एक मानसिक व दुसरी व्यावहारिक. मानसिक दृष्टिकोनातून जातीवादाने पछाडलेले व्यक्ती आपल्या जातीच्या प्रेमाने इतकी आंधळी झालेली असते की ती आपल्या जाती गटा व्यतिरिक्त दुसऱ्या गटाचा विचार करण्यासही तयार नसतो. जातीवाद्यांची दृष्टी इतकी संकुचित झालेली असते की ते आपल्या जातीसाठी इतर समाजाचा किंवा राष्ट्राचा बळी देण्यासही मागेपुढे पाहत नाही अशा या जातीवादामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे. म्हणून आपल्या संविधानाने दिलेल्या मानवी मूल्य स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्याचा कृतीतून प्रचार–प्रसार मनामनातून केल्याशिवाय राष्ट्रप्रेम निर्माण होणार नाही आणि जातीवाद नष्ट होणार नाही.

**संदर्भग्रंथ सूची**

- घाटोळे, रा. ना. (2002). *भारतीय समाज व्यवस्था.* नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.
- मेश्राम, आर. बी. (2013). *भारतीय समाज प्रश्न आणि समस्या.* नागपूर : विद्या प्रकाशन.
- आंबेडकर, बी. आर. (2018). *जातीप्रथेचे निर्मूलन.* प्रबुध्द भारत पुस्तकालय.

28th DEC. 2018

ISSN: 978-81-939849-0-1

# Maharashtra Journal of Social Work

## (A Half Yearly Journal)



Published By
Maharastra Association of
Social Work Educators (MASWE)

८७. स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी समाजकार्यकर्त्याची आवश्यकता........................३५५
डॉ. नंदा पांगुळ-बारहाते
८८. राष्ट्रीय एकात्मतेची आवश्यकता........................................................................३६१
डॉ. नरेश एस. कोलते
८९. मुलभूत हक्क व पारधी जमातीची स्थिती............................................................३६५
डॉ. प्रल्हाद एस. धोटे
९०. बाल विकास आणि शासनाचे उपक्रम..................................................................३६९
डॉ. प्रान्जू रा. हिरेखण
९१. आदिवासी जमातीच्या विकासाकरिता संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका व भारतीय संविधानातील तरतूदी – एक दृष्टिक्षेप............३७७
डॉ. शाम दामू सोनवणे
९२. बाल लैंगिक शोषण......................................................................................३८३
डॉ. सुनिता डी. भोईकर
९३. स्त्री भ्रुण हत्येचे दाहक वास्तव........................................................................३८६
डॉ तुळशिराम एस. राठोड
९४. बालकामगार: अधिकार, संवैधानिक तरतुदी व अधिनियम.........................................३८९
डॉ. विलास घोडे
९५. बालकांचा शिक्षण हक्क कायदा आणि वर्तमान स्थिती.............................................३९५
डॉ. गणेश आर. गाडेकर
९६. क्षेत्रकार्यात ग्रंथालय सेवांचे योगदान.................................................................३९९
डॉ. प्रतिभा लक्ष्मण वराडे
९७. महिलांचा राजकिय सहभाग आणि त्यांची भूमिका...................................................४०२
प्रा.नरेश वासुदेव पाटील
९८. दहशतवादाचे जागतिकीकरण आणि भारत.............................................................४०७
प्रा. सतीश धवड
९९. बालकाचा विकास व बालकाचे हक्क...................................................................४११
प्रा. निलेश प्र. हरणे
१००. बाल संरक्षणाकरिता बालहक्क संहिताची अंमलबजावणी.........................................४१४
प्रा. संजय फुलकर
१०१. आदिवासी विकास योजना व त्याचा परिणाम.......................................................४१८
प्रा. उमेश उईके
१०२. अंगणवाडी केंद्र : ग्रामीण महिलांचा विकास व महिला सक्षमीकरण समाजकार्य दृष्टीने–एक अभ्यास ............ ४२४
प्रा. राजू के. माटे
१०३. आदिवासी विकासातील अडथळे आणि समाजकार्याची मध्यस्थी.....................................४२८
रविंद्र.एस.मडावी

# १५. बालकांचा शिक्षण हक्क कायदा आणि वर्तमान स्थिती

डॉ. गणेश आर. गाडेकर

महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ

शिक्षण समाज व राष्ट्राला समृध्द बनविणारे महत्वपूर्ण साधन मानले जाते. समाज व राष्ट्राचा विकास शिक्षणावर अवलंबून असल्यामुळे शिक्षणाला मूलभूत अधिकार म्हणून जगातील बहुतांश देशांनी मान्यता प्रदान केली आहे. शिक्षण व्यक्तीच्या विचार करण्याच्या पध्दतीला साचेबध्द करु शकते. मानवाला निसर्गाने जीवन दिले असले तरी जीवन जगण्याची पध्दती रुजविण्याचे अमूल्य कार्य शिक्षणच करु शकते. याच दृष्टिकोनातून भारतीय शासनाने शिक्षणाचा अधिकार अधिनियम आर. टी. ई. अॅक्ट मंजुर करुन १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशात लागू केला. प्रस्तुत कायद्याच्या माध्यमातून ६ ते १४ वर्षाखालील सर्व बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. बालकांना मजबुत, सुशिक्षित आणि अधिकारसंपन्न बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अर्थात बालकांना गुणवत्तापूर्ण व सक्तीने शिक्षण प्राप्त करणे बालकांचा मूलभूत मानवी हक्क असल्याचे प्रस्तुत कायद्यावरुन निर्दर्शनास येते. ज्ञान, कौशल्य व मूल्याद्वारे बालकांना संपन्न बनवून भारताचा सुजान आणि प्रबुध्द नागरिक बनविणे हेच या कायद्याचे अंतिम ध्येय आहे.

**शिक्षण अधिकार कायदा २००९ मधील तरतुदी :**

१. ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण बालकांचा मूलभूत अधिकार.

२. प्रत्येक बालकास शाळेत आणणे, टिकविणे, त्यास गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देणे.

३. शाळेत कधीच न आलेल्या व शाळेतून गळती झालेल्या बालकांना शाळेत आणणे व त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे.

४. वयानुरुप योग्य इयत्तेत प्रवेश देऊन विशेष शिक्षणाद्वारे त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे ही शिक्षक व शाळांची जबाबदारी.

५. केणत्याही बालकास इयत्ता ८ वी पर्यंत नापास करता येणार नाही.

६. बालकाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.

७. समाधानकारक प्रगती नसलेल्या विषयांचे विशेष शिक्षण देऊन बालकाला अपेक्षित पातळीपर्यंत आणणे.

८. अपंग बालकाला वयाची १८ वर्षे पूर्ण करेपर्यंत मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे.

९. बालकास शाळेत दाखल करणे हे प्रत्येक माता-पित्याचे / पालकाचे कर्तव्य.

१०. प्रवेशासाठी बालक / पालकांची मुलाखत / परीक्षेस प्रतिबंध / प्रवेशासाठी देणगी / शुल्कास प्रतिबंध.

११. प्रवेशासाठी लॉटरी पध्दतीचा अवलंब.

१२. शाळांनी बालकांना इयत्ता ८ वी पर्यंत नापास करून त्याच वर्गात ठेवल्यास, प्रवेश नाकारल्यास शाळांवर कठोर कारवाई.

१३. अनाधिकृत शाळांवर दंडात्मक कठोर कारवाई.

अशा प्रकारच्या तरतुदी कायद्यामध्ये करण्यात आलेल्या आहेत. सदर कायद्याचा अभ्यास करताना काही प्रश्न मनात निर्माण होतात की, दाखल झालेली सर्व बालके शाळेत नियमितपणे उपस्थित राहतील? इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण सर्व बालक पूर्ण करतील? व प्राथमिक शिक्षणाच्या कोणत्याही स्तरावर त्यांची गळती होणार नाही? इयत्ता ८ वी पर्यंतच्या शिक्षणात संधीची समानात व अपेक्षित गुणवत्ता टिकविल्या जातील? ८ वी पर्यंतचे अखंडीत शिक्षण व ८ वी च्या नंतरच्या शिक्षणाची प्रेरणा हा कायदा देऊ शकेल? शिक्षण खंडीत झाले तरी संपादित केलेल्या कौशल्यांच्या आधारावर असा बालक स्वयंरोजगाराची संधी शोधू शकेल? या सर्व प्रश्नांच्या निराकरणानंतर २००९ चा प्रस्तुत कायदा बालकांना शिक्षणाचा मूलभूत हक्क बहाल करण्यास समर्थ आहे अथवा नाही हे अवलंबून आहे.

आज कधी नव्हती एवढी चर्चा होणारे एकमेव क्षेत्र आहे ते म्हणजे शिक्षणक्षेत्र. शिक्षणाची दारे सर्वांना खुली करण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातलेल्या समाजसुधारकांच्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या मोठ्या उत्साहात साजऱ्या करीत असताना त्यांच्या विचारांना मात्र आज आपलेच राज्यकर्ते शिक्षण क्षेत्रात नवनव्या सुधारणा करुन हरताळ फासत आहेत.

बऱ्याच कालावधीनंतर शिक्षण अधिकार कायदा अंमलात आणल्यानंतर आशा वाटू लागली की, याबाबतीत विचार मांडणारे सुखावले. गोरगरीबांच्या शिक्षणासाठी झटणाऱ्यांना आनंद झाला. शिक्षणाचे पूर्णकार्य म्हणून महाराष्ट्रातील खेडयापाडयातून काही व्यक्ती मात्र प्रामाणिकपणे कार्य करीत असल्याचे दिसून येते. याचा लाभ आजवर शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना होता आहे. शाळा-शिक्षण हेच त्यांच्या सुखी, समृध्द जगण्याचे कारण झाले आहे. शिक्षण नसते तर त्यांचे किंवा त्यांच्या पिढीचे काय झाले असते असा प्रश्न पडतो. मात्र आता शिक्षणाचे बाजारीकरण झाले असल्याने हे क्षेत्र मुठभर सत्ताधारी, पुढारी आणि त्यांच्या निटकच्या धनदांडग्यांनी काबीज केले आहे.

२०१२ पासून शिक्षकांच्या भरतीवर घातलेल्या बंदीमुळे विश्वासार्ह असे मनुष्यबळच शिक्षण क्षेत्रात दिसून येत नाही. जे आहे ते उदासीन आहे. मात्र, खाजगी स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये असे मनुष्यबळ आढळते. म्हणून किमान तसे दाखवले तरी जाते. खरे तर या शाळांमध्ये शिकवणारे शिक्षक खरोखरच डी. एड. बी. एड., पीएच. डी. धारक आहेत काय हा एक संशोधनाचा विषय ठरावा. बिगरसरकारी व्यवस्थेत काम करणारा कोणताही घटक कोणत्याही गोष्टीला जबाबदार असत नाही. कारण सरकारचे आणि त्यांचे काही देणेघेणेच नाही. ही व्यवस्था म्हणजे एकप्रकारे समांतर सरकारच असते. त्यांचे एकमेव धोरण म्हणजे निरनिराळ्या सर्वेक्षणांचा हवाला देत सरकारी शिक्षण किती कुचकामी आहे हे सतत माध्यमांना हाताशी धरून लोकांच्या माथी मारत राहणे आणि त्याचीच री ओढत सरकार आपल्याला या संबंधात काहीतरी करायचे आहे असे दाखवत निर्णय घेताना दिसते. आपण 'शाळा आहे, पण शिक्षण नाही' म्हणत 'विद्यार्थी आहे पण शाळा नाही' येथपर्यंत येऊन पोहोचलो आहोत.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सरकारने वाडया-वस्त्यांवर शाळा सुरु केल्या. त्यावेळी पटाचा कोणताही निकष सरकारच्या विचाराधीन नव्हता. त्यामुळे प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या समाजातील अनेक विद्यार्थ्यांना शाळेत व शिक्षणाच्या प्रवाहात आणणे शक्य झाले. मात्र सरकारच्या नव्या आदेशानुसार कमी पटसंख्या व कमी गुणवत्ता ही कारणे दाखवून शेकडो शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे शाळांच्या इमारती, स्वच्छतागृहे व अन्य सुविधांसाठी केलेला खर्च वाया गेला आहे. मुख्य म्हणजे या शाळाबंदीमुळे आता एक किलोमीटरपेक्षाही अधिक अंतरावर असलेल्या दुसऱ्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना जावे लागणार आहे. परिणामी अनुपस्थिती, विद्यार्थी गळती अशा समस्या उदभवल्यास नवल नाही. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे यामुळे मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण लक्षणीयदृष्टया कमी होण्याचा धोका आहे. बंद करण्यात आलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता,

शिक्षकांचे अध्यापन व एकूण शालेय वातावरण याबाबतीत पालक समाधानी असूनही सरकारने मात्र आपल्या निर्णयावर ठाम राहण्याचे ठरविले आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून १ कि. मी. च्या आत मोफत शाळेची सोय उपलब्ध करून देणे सरकारला अनिवार्य असून त्यापेक्षा अधिकच्या अंतरासाठी वाहतुक सुविधाही सरकारने करावयाची आहे. परंतु शाळाबंदीच्या कठोर निर्णयाच्या अंमलबजावणीनंतर या मुलांच्या शिक्षणाच्या भवितव्याबाबतचा ठोस आराखडा मात्र अद्याप सरकारकडून आलेला नाही. शाळा बंद झालेल्या ग्रामीण भागातील मुले ओढे-नाले पार करीत दुरच्या शाळेत येतील काय? शाळाबंदीचा निर्णय पालकांशी चर्चा करुन घेतला असता तर अशा अनेक गोष्टी सरकारच्या निदर्शनास आल्या असत्या.

राष्ट्रीय पातळीवरच्या शैक्षणिक संस्था शिक्षकांच्या संघटना आणि शिक्षण तज्ञ या सर्वांचा सहभाग असलेला आरटीई फोरम या कायद्याच्या प्रभावी अंमलबाजवणीसाठी देशभरात प्रयत्न करीत आहे. १० हजार स्वयंसेवी संस्थांचे पाठबळ त्यांना आहे. कायद्याला ८ वर्षे झाल्यानंतर त्यांनी एक आढावा घेतला. या कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी अनेक आघाडयांवर संथ आहे. देशातील सर्व मुलांना समान दर्जाचे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे उद्दिष्ट साकार झालेले दिसत नसून केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने त्या योजनांना प्राध्यान्यक्रम दिला पाहिजे असे मत आयोगाने व्यक्त केले आहे. आजिमितीला देशातील सुमारे ८० लाख मुले शाळेच्या बाहेर आहे. शाळा सोडलेली ही मुले बाल मजुर स्थलांतरीत, अपंग तसेच दुर्लक्षित आणि वादग्रस्त परिसरातील आहेत. मूलभूत सुविधा आणि शिक्षकांची उपलब्धता या बाबतीत फक्त १० टक्के शाळा आरटीई कायद्याच्या निकषात बसतात अशी वस्तुस्थिती या पाहणीतून पुढे आली आहे.

सात वर्षे तज्ञांनी अभ्यास केल्यानंतर या कायद्याची निर्मिती करण्यात आली. त्या प्रक्रियेत कायद्याच्या मसुद्यामध्ये बदल होत गेले. वंचित घटकातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये असा विचार कायद्यामागे होता. शिक्षण हक्क कायदा नेमका काय आहे, त्याचे स्वरुप काय आहे याबाबत अजुनही शाळांमध्ये आणि पालकांमध्ये पुरेशी जनजागृती झालेली नाही. पालकांना असा काही कायदा आहे याची कल्पनाच नाही. प्रवेशासाठी पालक येतच नसतील तर राखीव कोटा भरायचा कसा असा प्रश्न संस्थाचालकांना पडतोय. श्रीमंतांच्या शाळेत तसे प्रवेश मिळाले तरी या घटकांना शाळेतील पुढील शिक्षणाचा खर्च परवडत नाही. त्या भीतीपोटी पालक काही शाळांमध्ये प्रवेश घेत नाही. शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर अशा प्रवेशाबाबतची कोणतीही जाहीरात सरकारी यंत्रणा करीत नाही. त्यामुळे अनेकांना असे काही प्रवेश असतात याची कल्पनाच नसते. इंग्रजी शाळांबद्दल पालकांची असलेली भीती आणि गैर समजुतीमुळे अनेक पालक त्या शाळांकडे वळतच नाहीत. काही विशिष्ट शाळांसाठी पालकांचा आग्रह असल्याने अन्य शाळांमधील राखीव कोटयातील प्रवेश पूर्णच होत नाहीत अशी स्थिती आज दिसते आहे.

देशाच्या मानवविकास निर्देशांकात प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची पटनोंदणी, उपस्थिती व गुणवत्तापूर्ण शिक्षण याचाही विचार केला जातो. परंतु या निर्णयामुळे विद्यार्थीच शाळेत जाऊ शकणार नसतील आणि विशेषत: मुली शाळेपासून वंचित राहणार असतील तर देशाचा मानवविकास कसा साधणार? तसेच आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना अनुतीर्ण न करण्याच्या शासकीय धोरणामुळे शाळेत अनुपस्थित राहणारे, इयत्तानुरुप अध्ययनक्षमता प्राप्त न करणारे विद्यार्थीही आठवीपर्यंत उर्तीण होतात. साहजिकपणेच अशा विद्यार्थ्यांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण झालेले नसते. दुसरा मुद्दा - शाळाबाहय विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करुन घेऊन त्यांच्या वयानुरुप इयत्तेत अध्ययन करण्याची सुविधा सरकार पुरविते परंतु शाळाबंदीच्या निर्णयामुळे मोठया प्रमाणावर शाळाबाहय विद्यार्थ्यांचे भवितव्य अंध:कारमय झाले आहे.

मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता आदिवासी शाळा (पटसंख्या २० पेक्षा कमी) बंद करण्याचा निर्णय सरकार घेत असल्याचे कळते. तशा सूचना एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांनी संबंधित शाळांना दिल्या आहेत. या विद्यार्थ्यांच्या व

त्यातील शिक्षकांच्या समायोजनाविषयी सरकार आश्वासन देत असले तरी या शाळा बंद झाल्यानंतर वरील विद्यार्थ्यांप्रमाणेच याही विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. परिणामी शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या आधीच्या संख्येत ही आणखी नवी भर पडणार आहे. त्यासाठी शासकीय यंत्रणा राबेल, कागदावर आकडेही येतील, हे हळूहळू कमी होत जातील. ते त्या विद्यार्थ्यांना माहितही असणार नाहीत. कागदावर सगळे काही स्वच्छ व सुंदर असेल परंतु शिक्षणाला वंचित झालेली ही मुलं मात्र सर्वार्थाने उपेक्षितच राहतील. त्यांचे जग कधी सुंदर होईल काय? सरकारी शाळेतून मुलं का कमी झाली याची कारणे आपल्या शिक्षण धोरणात आहे की धोरणाच्या अंमलबजावणीत याचा विचारच आपण करीत नाही. व्यवस्थेतल्या अनेक घटकांचा हा जर परिपाक असेल तर त्याची शिक्षा महाराष्ट्रातील खेडयापाडयातील (जिथे रस्ते, वीज, पाणी उपलब्ध नाही) मुलांना का? व्यवस्थेत काम करणाऱ्या कोणालाच हा विचार का करावासा वाटला नाही? आपणा सर्वांना कागदावरच व्यवस्थेला फाइलिंग करून ठेवण्यासाठीचं शिक्षण हवं आहे. अनेक शाळांमधून शिक्षक या कामातच व्यस्त असतात. दिवसाचा त्याच्या अध्यापनातला किती वेळ अशा गोष्टींमध्ये खर्ची पडतो आणि ज्यासाठी त्याची नेमणूक झालेली आहे त्यासाठी त्यांच्याकडे किती वेळ मग उरतो याचाही विचार होण्याची गरज आहे.

शिक्षण क्षेत्राबद्दलची ही कमालीची अनास्था कोणत्याच समाजाला परवडणारी नाही. या क्षेत्रातल्या कोणत्याही एका घटकाची उदासिनता हे राष्ट्रावर येणारे संकटच होय. व्हिक्टर हयूगो या विचारवंताचे एक वाक्य समाजाने आणि सरकार चालविणाऱ्यांनी लक्षात ठेवावे असे की, 'जो शाळागृहाचे दरवाजे उघडतो तो कारागृहाचे दरवाजे बंद करतो' आपण यातलं नेमकं काय करणार आहोत, याचा विचार आताच केला नाही तर भविष्यात त्याचे दुरगामी परिणाम भोगावे लागतील.

### संदर्भ ग्रंथ सूची


काळे, संदीप (२०१६). मानवी हक्क आणि माहितीचा अधिकार.

शास्त्री एस. एन. मानवी अधिकार आणि कर्तव्ये यांचा परिचय. पुण : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

त्रिपाठी, मधुसुधन (२०१०). भारत मे मानवाधिकार. नई दिल्ली : ओमेगा प्रकाशन.

राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, फरीदकोट हाउस कॉपरनिकस मार्ग, नई दिल्ली.

दैनिक महाराष्ट्र टाईम्स दिनांक १६ जुलै २०१४

दैनिक लोकसत्ता दिनांक १० जुलै २०१३

चव्हाण, यशवंतराव (१९७५). महिला व बालविकास धोरण आणि निर्णय. मुंबई : विकास प्रकाशन.

लोकराज्य, मार्च २०१०

लोकराज्य, जुलै २०१२

Peer Reviewed Referred and UGC
Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL



# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | 'स्त्री पुरुषतुलना' ग्रंथाची वैशिष्ट्ये आणि संहिता<br>**संजय जनार्दन आगलावे** | १-३ |
| २ | दलित चळवळीत महात्मा फुले राजर्षी शाहूंचे ऐतिहासिक योगदान<br>**डॉ. नरेश कवाडे** | ४-१० |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक चळवळीत योगदान<br>**डॉ. गणेश आर. घाडेकर** | ११-१५ |
| ४ | अण्णाभाऊ साठे : क्रांतिविचाराचं योगदान<br>**डॉ. विजय एम. जाधव** | १६-२० |
| ५ | वातावरणातील बदलामुळे शहरी व ग्रामीण भागातील शेतीपुरक व्यवसायावर झालेला परिणाम<br>**अर्चना दिनकर नेमाडे** | २१-२६ |
| ६ | आर्थिक विकासात अमर्त्य सेन यांचे योगदान<br>**डॉ. शंकर आर. चव्हान** | २७-२९ |
| ७ | सामाजीक परिवर्तनाचे संगीताचे योगदान<br>**प्रा. दिपक महादेव जामनिक** | ३०-३२ |
| ८ | शाहू फुले व आंबेडकर यांचे सामाजिक चळवळीतील योगदान<br>**प्रा. डॉ. भारती कृष्णराव देशमुख** | ३३-३६ |
| ९ | भारतीय राज्यघटना निर्मितीत डॉ. आंबेडकरांची भूमिका<br>**डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे** | ३७-४२ |
| १० | खेळ स्पर्धामुळे होणारा सामाजिक विकास<br>**डॉ. प्रकाश कांबळे** | ४३-४५ |
| ११ | हवामान बदलाचा भारतीय शेतीवर होणारा परिणाम<br>**प्रा. डॉ. केंद्रे देविदास सदाशिव** | ४६-५० |
| १२ | ग्रामीण व शहरी आर्थिक विकास आणि हवामानातील बदल<br>**प्रा. डॉ. सुनिल एन. ढेरे** | ५१-५३ |
| १३ | भारतीय समाज सुधारक : डॉ. पंजाबराव देशमुख<br>**प्रा. कु. दिपाली गोपाळराव वाघमारे** | ५४-५७ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक चळवळीत योगदान

**डॉ. गणेश आर. गाडेकर**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९१९ मध्ये साऊथ ब्युरो कमिशनपुढे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची कैफियत मांडून आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. १९२० मध्ये अस्पृश्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी त्यांनी मूकनायक नावाचे पत्र सुरु केले. ह्याच वर्षी नागपूर येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदेत छत्रपती शाहू महाराजांनी 'अस्पृश्यांना त्यांचा नेता लाभला आहे' अशा शब्दात बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव केला होता. ह्यावेळी टिळक युगाचा अस्त होऊन गांधीयुगाचा उदय होत होता.

१९२३ मध्ये बाबासाहेब आंबेडकरांनी आपले परदेशातील शिक्षण पूर्ण केले व ते मायदेशी परत आले. १९२४ मध्ये त्यांनी 'अखिल बहिष्कृत हितकारणी सभे' ची स्थापना केली. अस्पृश्यांना सवर्णांच्या पाणवठ्यावर पाणी पिण्यास बंदी होती म्हणून १९२७ मध्ये बाबासाहेबांनी महाड येथील चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी सत्याग्रह केला. हा सत्याग्रह केवळ पिण्याच्या पाण्यासाठी नव्हता तर आम्हीही सवर्णांबरोबर समानतेने पाणी पिऊ शकतो हा हक्क बजावण्यासाठी केलेला होता. महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहानंतर सवर्णांनी तळ्यात गोमूत्र टाकून तळ्याची शुध्दी केली होती. बाबासाहेब आंबेडकरांनी पुन्हा एकदा महाड येथे सत्याग्रह करुन 'मनुस्मृती' ची जाहीर होळी केली होती. ह्याच काळात बाबासाहेब आंबेडकरांनी 'सायमन कमिशन' पुढे निवेदन देऊन अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी केली होती. १९३० मध्ये नाशिक येथल्या काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह केला. हा सत्याग्रह केवळ मंदिरप्रवेशासाठी होता असे नव्हे, तर 'आम्ही हिंदू आहोत. आम्हाला इतर हिंदूप्रमाणे हिंदूंच्या मंदिरात जाण्याचा अधिकार आहे' अशी ही भूमिका होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी काळाराम मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाला पाठिंबा दिला होता. ब्राह्मणेत्तर चळवळीचे दिनकरराव जवळकर हे आजारी असतानाही मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहात सहभागी झाले होते. सवर्णांनी अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाला विरोध केला. काळाराम मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह हा अनेक वर्षे चालला, पण दलितांना मंदिरात प्रवेश देण्यात आला नाही. ह्याच काळात ब्रिटीश सरकारने गोलमेज परिषदेचे आयोजन केले. बाबासाहेब आंबेडकरांनी ह्या परिषदांमधून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. १९२३ मध्ये जातीय निवाडा जाहीर झाला आणि शिख, मुस्लिम, अँग्लो इंडियन, संस्थानिक ह्यांच्याबरोबरच अस्पृश्यांनाही स्वतंत्र मतदारसंघ जाहीर झाला. ह्याला महात्मा गांधीजींनी तीव्र विरोध दर्शविला. 'स्वतंत्र मतदारसंघामुळे अस्पृश्य हिंदूपासून कायमचे तुटतील' अशी गांधीजींची धारणा होती. महात्मा गांधीजींनी अस्पृश्यांना मिळालेल्या स्वतंत्र मतदार संघाविरुध्द पुण्याच्या येरवडा जेलमध्ये २० सप्टेंबर १९३२ रोजी प्राणांतिक उपोषण सुरु केले. बाबासाहेब आंबेडकरांनी पुणे करारावर २६ सप्टेंबर १९३२ रोजी स्वाक्षरी केली आणि स्वतंत्र मतदार संघ सोडून दिला. महात्मा गांधीजींनी दलितांच्या राखीव जागांची मागणी मान्य केली.

हिंदूंकडून दलितांचा होणारा छळ कमी होत नव्हता. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदूमध्ये परिवर्तन घडवून आणण्यापेक्षा हिंदू धर्मच सोडून दिला पाहिजे ह्या विचाराने १९३५ मध्ये धर्मांतराची घोषणा केली. 'मी हिंदू म्हणून जन्मलो त्याला माझा नाईलाज होता पण मी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा त्यांनी केली आणि सर्वत्र खळबळ माजली. केवळ बहिष्कृत समाजाचे राजकारण करण्यापेक्षा संपूर्ण शोषित वर्गांचे राजकारण करावे म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ मध्ये 'मजूर पक्ष' ची स्थापना केली. त्यातही त्यांना म्हणावे तसे यश आले नाही. दुसऱ्या महायुध्दामुळे संपूर्ण देशातील राजकीय वातावरण बदलले होते. स्वातंत्र्याची चळवळ शिगेला पोहचली होती. महात्मा गांधीजींनी १९४२ मध्ये इंग्रजांविरुध्द 'चलेजाव' ची घोषणा केली होती. संपूर्ण देश चळवळमय बनला होता. देशाला स्वातंत्र्य मिळालू तर ते हिंदूच्या हाती जाईल आणि हिंदूच्या आणि हिंदूंच्या हाती सत्ता गेली तर त्यांच्याकडून अस्पृश्यांच्या हिताचे रक्षण होणार नाही. म्हणून देशातील सर्व दलित नेते एकत्र आले आणि त्यांनी १९४२ मध्ये 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' ची स्थापना केली.

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. बाबासाहेब आंबेडकरांना महाराष्ट्रामध्ये काँग्रेसच्या उमेदवाराकडून निवडणूकीत पराभव पत्करावा लागला. तेव्हा त्यांना मुस्लिम लिगच्या पाठिंब्यावर पश्चिम बंगालमधून निवडूणक जिंकावी लागली. बाबासाहेबांची संविधान समितीवर निवड झाली. त्यांनी स्वतंत्र भारताची घटना बनवताना प्रचंड परिश्रम केले. त्यामुळे त्यांचा 'घटनेचे शिल्पकार' म्हणून गौरव झाला. बाबासाहेब आंबेडकरांना स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात त्यांच्या योग्यतेप्रमाणे खाते मिळाले नाही. त्यांनी सादर केलेले हिंदू कोड बिलही मंजूर होऊ शकले नाही. दलितांवरील अन्याय-अत्याचारही थांबले नाहीत. प्रतिगामी सत्तेत राहून परिवर्तनाची लढाई करणे शक्य नाही असे बाबासाहेबांना वाटले आणि त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसमवेत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी 'बौध्द धम्मा' ची दीक्षा घेतली. त्यानंतर लगेच ६ डिसेंबर १९५६ मध्ये त्यांचे निधन झाले.

बाबासाहेब आंबेडकर म्हणजे दलितांच्या इतिहासातील युगपुरुष आहेत. त्यांनी मुर्दाड समाजात स्वाभिमानाचे वादळ उठवले. मुके-कंगाल माणसांना क्रांतिकारक बनवले. सभा, संमेलने, परिषदा, सत्याग्रह आणि मेळाव्यातून दलितांच्या अस्तित्वाचे आणि अस्मितेचे लढे गतिमान केले. पत्रकारिता, पक्ष, संघटना व समाजसेवेच्या माध्यमातून सतत संघर्ष उभा केला. त्यांची वाणी आणि लेखणी, त्यांचे जीवन आणि कार्य, त्यांचा धम्म आणि कायदेनीती, त्यांच्या चळवळी आणि मागण्या ह्यातून स्वातंत्र्योत्तर काळात दलित चळवळ आणि दलित साहित्य ह्यांचा जन्म झाला.

**दलित युवकांच्या चळवळी**

स्वातंत्र्योत्तर काळातील दलित युवकांनी अनेक संघटना स्थापन केल्या. अनेक चळवळीत भाग घेतला. ह्यामध्ये दलित युवकांच्या दोन चळवळी बहुचर्चित ठरल्या. पहिली 'दलित साहित्य चळवळ' आणि दुसरी 'दलित पँथर' ही चळवळ. ह्या दोन चळवळी स्वातंत्र्योत्तर काळातील दलित तरुणांच्या मानसिक आंदोलनाची प्रतीके आहेत.

**दलित साहित्य चळवळ**

'मूकनायक' ते 'महानिर्वाण' हा १९२० ते १९५६ पर्यंतचा काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणी, वाणी आणि कार्याने भारावला होता. बाबासाहेबांनी अस्पृश्यांची कैफियत गावकुसापासून ते गोलमेज परिषदेपर्यंत मांडली. अस्पृश्यांच्या समान हक्कांसाठी पाण्यापासून ते परमेश्वरापर्यंत संघर्ष केला. बाबासाहेबांच्या कार्यामुळे संपूर्ण दलित लेखकांनी बाबासाहेबांच्या विचार-कार्याचा गौरव सुरु केला. याचे मुर्तिमंत उदाहरण म्हणून दलित शाहिरांचा उल्लेख करता येईल. शाहिरांनी आपल्या जलशांच्या माध्यमातून समाजात चळवळीचे चैतन्य निर्माण केले. ह्या काळात जे लेखन झाले ते प्रबोधनाचा प्रचार करणारे आहे. बाबासाहेबांच्या कार्यकालाला दलित चळवळीच्या इतिहासातील 'प्रबोधनपर्व' म्हणता येईल. ह्या प्रबोधनापर्वातील प्रमुख लेखक म्हणून बंधू माधव, शंकरराव खरात, ना. रा. शेंडे आणि अण्णाभाऊ साठे ह्यांचा उल्लेख करता येईल.

बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजातील मुलांच्या उच्च शिक्षणासाठी १९४६ साली मुंबईत सिध्दार्थ महाविद्यालय आणि १९४९ साली औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरु केले. ह्या महाविद्यालयांमधून शिक्षण घेणारी दलितांची पहिली पिढी बाबासाहेबांच्या विचाराने भारावलेली होती. ह्या पिढीतला दलित तरुण आपल्या भावना शब्दात मांडण्याचा प्रयत्न करीत होता. ह्याचे प्रत्यंतर ह्या काळात प्रकाशित झालेल्या मिलिंद महाविद्यालयातील दलित विद्यार्थ्यांच्या वार्षिकांकातील लेखनात दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळातील दलित तरुण शिक्षित झाले. त्यांना संघटना आणि संघर्षाचे महत्त्व पटले. भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानामुळे आपले प्रश्न सुटतील ही त्यांची आशा फोल ठरली. एकीकडे ज्ञान, विज्ञान आणि कायदा ह्यामुळे दलित समाजात प्रचंड जागृती होऊ लागली तर दुसरीकडे दारिद्र्य आणि जातिव्यवस्थेने दलितांना जर्जर केले. शिक्षणाचा प्रसार, चळवळीचा रेटा आणि प्राप्त परिस्थितीविरुध्द संघर्ष ह्यामुळे दलित तरुणांनी प्रस्थापित विषम समारचनेविरुध्द असलेली आपल्या मनातील 'चीड' आणि 'संताप' आपल्या लेखनातून व्यक्त केला. ह्या लेखनालाच 'दलित साहित्य' असे संबोधण्यात आले.

**दलित पँथर**

बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दलित चळवळ काही काळ थांबल्यासारखी झाली होती. दलित समाज भांबावला होता. परंतु 'दलित पँथर'च्या उदयामुळे दलित चळवळ पुन्हा गतिमान झाली.

दलित पँथरची स्थापना ९ जुलै १९७२ रोजीची आहे. म्हणजे स्वातंत्र्य मिळून पाव शतक लोटले असताना आणि बाबासाहेबांच्या निधनानंतर दीड शतक उलटले असताना 'दलित पँथर'ची स्थापना झाली आहे. या सबंध काळात एकीकडे दलितांवर अन्याय-अत्याचार होत होते तर दुसरीकडे ह्या जुलमाला वाचा फोडणारी प्रभावी अशी संघटना दलितांकडे नव्हती. शिक्षण, विज्ञान, कायदा, आंबेडकरी विचारधन आणि चळवळ ह्यामुळे दलित तरुणांच्या मनात आत्मसन्मानाची भावना प्रबळपणे वर्धमान होत होती. दलितांना भेडसावणारे प्रश्न सुटत नव्हते. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा सांगणारा रिपब्लिकन पक्ष सत्ता, स्वार्थ, तडजोडी आणि गटबाजीने पोखरला होता. अस्पृश्यतेच्या प्रश्नावर संघर्ष करण्यासाठी स्वतंत्र संघटना नव्हती. जाती अंताच्या प्रश्नांवर प्रखरपणे लढणारी संघटना असणे ही काळाची गरज होती.

**दलित स्त्रियांच्या व्यथाचे स्वरुपं**

दलित स्त्रिला शिक्षणाबाबत सामाजिक विरोध असा कधीच नव्हता. दलित स्त्री समाजाची व्यथा फार वेगळी होती. दलित समाजाने जुन्या वाईट चालीरिती व सामाजिक अनिष्ट रुढींचा त्याग करुन सामाजिक सुधारणा प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा निर्धार केला. त्यांनी माणुसकीचे स्वतंत्र जीवन उपभोगण्यासाठी धडपड सुरु केली. माणुसकीचे हक्क मिळविण्यासाठी दलितांची ही चळवळ साधी व सोपी कधीच नव्हती. त्यांना ही चळवळ चालवतांना पावलो पावली संघर्ष करावा लागला, सवर्ण हिंदूंनी दलितांच्या मुक्ती-चळवळीचे मुळातच पाय छाटण्याचे प्रत्यही अत्यंत कठोर व अघोर कृत्य केले. दलितांचा अनेक छळ त्यांनी केला. दलित वर्गावर सवर्णांनी गाव बहिष्कार, सामाजिक बहिष्कार टाकून त्यांचा नोकरी धंदा, बाजार हाट, सार्वजनिक रस्ते, पाणवठे बंद करुन अत्यंत निर्घृणपणे प्रत्यही कोंडी केली. ह्या सर्वच प्रकारच्या अन्याय-अत्याचाराची झळ दलित स्त्रिला सुध्दा लागली. दलित स्त्रिला शहरात मिलमध्ये नोकरीनिमित्त जावे लागत असे. तसेच संत्रामंडी, भाजीमंडी, धान्यगंज आदि अनेक व्यापारधंद्याच्या ठिकाणी दलित स्त्रिला धंदा अथवा मोलमजुरीकरिता जाणे भागच असे. अशावेळी त्यांच्या आर्थिक दुबळेपणाचा फायदा घेऊन त्यांना फूस लावणे, बाटवणे त्यांची जबरदस्तीने छेडखानी व बेअब्रु करणे स्त्रि पळवून नेऊन त्यांना वाम मार्गाला लावणे, हे प्रकार शहरातून दलित स्त्रिच्या बाबतीत सर्रास होऊ लागले होते. कारण दलितां सवर्ण हिंदू समाजाने अव्हेरलेले, त्यांचा वाली, रक्षणकर्ता कोणीही नाही. सरकार मायबाप हेही सवर्णीयांच्याच हातातील. दलितांना आता कळून चुकले की, आपणच आपले संरक्षण केले पाहिजे. ह्या जाणीवेने महार तरुण जागला. महार तरुण संघाच्या संघटनेत तरुण एकत्रित आले. त्यांनी कोणत्याही प्रकारच्या अन्याय-अत्याचारांना प्रतिकार करण्याची शक्ती निर्माण केली. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली अखिल दलित समाज नवचैतन्याने व स्वाभिमानाच्या जिद्दीने पेटून सामाजिक क्रांतीच्या संघर्षाने रणशिंग फुंकण्यापूर्वी, विदर्भातील दलित स्त्रिला संरक्षण, आत्मबल देण्याचा प्रयत्न महार तरुण संघाने केला यात शंकाच नाही. स्वतःच्या संरक्षणाची फळी मजबुत करुन आपल्यावर अन्याय, जुलूम करणाऱ्या विरुध्द दलित युवकांनी संघर्ष केला. काही शहीद झाले. परंतु निकराने शेवटपर्यंत लढा दिला. दलित स्त्रियांनी सुध्दा या संघर्षात आपले साहय पणाला लावले आणि या संघर्षामुळेच दलित स्त्रिची व्यथा निवारण होऊ शकली. आता तर एका दलित स्त्रिच्या संरक्षणाकरिता सर्व समाज खडबडून पुढे येतो. सर्व समाज संघटनेची शक्तीच तिच्या पाठिशी उभी राहते.

डॉ. आंबेडकरांनी १९२७ मध्ये दलित समाजाचा सार्वजनिक पाणवठ्याचा अधिकार प्रस्थापित करण्याकरिता महाडच्या चवदार तळ्याचा लढा उभा केला होता आणि ह्याच लढ्याने अखिल दलितांच्या जीवनात स्वाभिमानाने व माणुसकीने जगण्याची जाणीव जागृत केली. विदर्भातील सर्व दलित समाज डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवून नेहमीच त्यांच्या पाठिशी उभा राहिला आहे. त्यामुळे दलित स्त्री-पुरुषांच्या जीवनावर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा फारच मोठा प्रभाव पडला आणि त्यांनी प्रेरित केलेल्या सामाजिक क्रांतीच्या विचाराने दलित स्त्री सुध्दा सामाजिक क्रांतीला सामोरी गेली.

१९२० साली नागपूरला भारतीय बहिष्कृत परिषद कोल्हापूरचे कै. छत्रपती शाहू महाराज यांचे अध्यक्षतेखाली झाली होती. ह्या परिषदेला दलित वर्गातील स्त्रियासुध्दा उपस्थित होत्या. शिवाय परिषदेत मंजुर करण्यात आलेल्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या ठरावावर सौ. बनसोडे व कु. रुक्मिणीबाई यांनी घरगुती भाषेत पण निर्भीडपणे मुलीस सक्तीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे असे सांगितले होते.

**महाराष्ट्रात दलित महिलांची वाटचाल**

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या परिवर्तनाला सुरुवात झाली ती शिक्षणाने याबाबत इंग्रजांचे आगमन निश्चितच फलदायी ठरले. पण महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाईंनी शिक्षणाच्या संदर्भात जे कार्य करुन ठेवले ते अतुलनीय आहे. त्याचबरोबर महर्षी कर्वे, न्या. रानडे, पंडिता रमाबाई, आगरकर यासारख्या अनेक समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणासाठी नेटाने प्रयत्न केले.

परंतु याच पुरोगामी महाराष्ट्रात स्त्री परिवर्तनासंदर्भाला सामुहिक विचार नोंदवितांना इथल्या दलित स्त्रीचा उध्दाराचा विचार मात्र वेगळ्या अंगानेच करावा लागतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानव मुक्ती लढ्यातच दलित स्त्री मुक्तीच्या साऱ्या वाटांचा प्रारंभ आहे हे सर्वप्रथम नमुद करणे अतिशय महत्वाचे आणि गरजेचे आहे. या देशात स्त्री म्हणून जन्मास येणे आणि त्यातही ती स्त्री दलित म्हणून जन्माला आल्यावर तिच्यासमोर काय भोगवाटा वाढुन ठेवलेला असतो हे फक्त तीच सांगू शकते. अस्पृश्यतेची भयानता व घरातल्या अठरा विश्व दारिद्र्याने तिला पार गांजुन टाकले होते. अर्थात संपूर्ण समाजच यात भरडला गेला होता. दलित स्त्रीची खऱ्या अर्थाने स्वत:च्या अस्तित्वाचीही लढाई सुरु झाली. ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरापूर्वीच्या महत्वाच्या टप्प्यांमध्ये दलित स्त्री खुप मोठ्या संख्येने उतरली होती. उदा. महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेशासाठी संघर्ष इत्यादी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणासाठी ती मोठ्या संख्येने उपस्थित राहत असे. डॉ. आंबेडकरांनी दलित स्त्रीला उद्देशून केलेल्या भाषणात तर समग्र दलित स्त्रीत एक वेगळीच उर्जा निर्माण झाली. एकीकडे ग्रामीण दलित स्त्री अशिक्षित व प्रचंड गरिबीत जगत होती पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या समाजाला या सगळ्या अस्पृश्यतेतून मुक्त करणार आहेत व त्यांनी सांगितलेला मार्ग स्वीकारणे हा विचार घेवून दलित स्त्री अशा क्रांतीकारक प्रवर्तनात उभी राहिली. आजही दलित स्त्रियांसाठी डॉ. आंबेडकरांचे विचार चिरकाल प्रेरणादायीच आहे हे कोणीही नाकारु शकत नाही.

**संदर्भग्रंथ सूची**


- आंबेडकर, बी. आर. (२००४). *दलितांचे शिक्षण.* नागपूर : सरिता प्रदिप गायकवाड.
- कोंडेकर, ए. वाय. (२०००). *भारतीय समाज.* कोल्हापूर : फडके प्रकाशन
- कोसारे, एच. एल. (२०१२). *विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास (स्वातंत्र्यपूर्व).* नागपूर : नेहा प्रकाशन.
- कीर, धनंजय ( १९८९). *डॉ. बाबासाहेब आंबेडकर.* मुंबई : पॉप्यूलर प्रकाशन.
- कुळकर्णी, पी. के. (२०१२). *दलितांचे आणि आदिवासींचे समाजशास्त्र.* पुणे : डायमंड पब्लिकेशन.
- गोखले, द. न. (२००६). *डॉ. आंबेडकरांचे अंतरंग.* मुंबई : मौज प्रकाशन गृह
- गेडाम, तु. वि. (२०१२). *अस्पृश्यता व तिचे मूळ.* नागपूर : प्रकाशन कल्याण शिक्षण संस्था.
- गाठाळ, एस. एस. (२०११). *आधुनिक भारतातील सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळी.* औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स.
- मोरे, शेषराव (१९९८). *डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास.* पुणे : राजहंस प्रकाशन.

# 2019-20

Peer Reviewed
Referred and UGC
Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL



# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कार्यकुशल समाजउध्दारक : महात्मा ज्योतीराव फुले<br>**प्रा. विलास सोमाजी पवार** | १-६ |
| २ | महात्मा फुले यांच्या विचारातील कृषि अर्थशास्त्र<br>**डॉ. निलम एम. छंगाणी** | ७-११ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चलन विषयक विचार आणि समकालीन प्रासंगिकता<br>**डॉ. डि. के. राठोड** | १२-१५ |
| ४ | समाजशास्त्रीय व सांस्कृतीक दृष्टीकोणातून मानसशास्त्रज्ञांचे योगदान<br>**प्रा. संतोष उमाकांत पस्तापूरे** | १६-२० |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : मार्क्सवाद, उदारमतवाद आणि बौध्दवाद<br>**डॉ. एस. एस. पवार** | २१-२३ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक लोकशाही विचार<br>**डॉ. फोले संभाजी कोंडबाजी** | २४-२६ |
| ७ | सामाजिक प्रबोधनासाठी गर्दे वाचनालयाची भूमिका<br>**प्रा. प्रदिप बारड** | २७-२९ |
| ८ | भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये भारतीय विचारवंताची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. स्वाती विकासराव कुरमे** | ३०-३३ |
| ९ | वीर वामनराव जोशी यांचे सामाजिक चळवळीतील योगदान<br>**प्रा. संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी** | ३४-३७ |
| १० | भारतीय राजकीय विचारवंतांचे सद्यस्थितीत योगदान : विशेष संदर्भ पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. राजेश सुभाष चालीकवार** | ३८-४१ |
| ११ | राजर्षी शाहू महाराजांचे कृषि विषयक विचार<br>**प्रा. मोहोकार हरिहर शिवदास** | ४२-४३ |
| १२ | भारतातील सामाजिक चळवळीत विचारवंताचे ऐतिहासिक योगदान<br>**प्रा. होमराज टी. राठोड** | ४४-४८ |
| १३ | सामाजिक चळवळीतील विचारवंतांचे ऐतिहासिक योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. मीता दिनकरराव कांबळे** | ४९-५२ |

VOLUME - VIII, ISSUE – I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १२. भारतातील सामाजिक चळवळीत विचारवंताचे ऐतिहासिक योगदान

**प्रा. होमराज टी. राठोड**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ.

**प्रस्तावना**

भारतीय समाज व्यवस्थेत हजारो वर्षापासून अनेक समस्या विद्यमान होत्या व आजही बहुतांश समस्या आहेत या समस्या सोडविण्यासाठी वेळोवेळी काही आंदोलने झाली, काही चळवळी अजुनही सुरु आहेत पण भारतीय समाजामधील समस्या काही नष्ट झाल्या नाही. भारतीय समाज व्यवस्थेत सामाजिक सुधार घडवून आणून परिवर्तन घडवणे हे प्रामुख्याने सामाजिक चळवळीचे महत्वपूर्ण कार्य असते. या चळवळीचा मुख्य उद्देश समाजामध्ये असणाऱ्या जुन्या सामाजिक, धार्मिक, अंधविश्वास, अस्पृश्यता, बालविवाह, विधवाविवाह, जातीप्रथा, सतीप्रथा इत्यादी कुप्रथांना विरोध करुन समाजाला आदर्श व सुदृढ बनविणे हा असतो. भारतातील सामाजिक चळवळीचा इतिहास हा फार प्राचीन आहे. जैन, बौध्द आणि शिख धर्म या धर्मांचा उदय समाजातील वाईट परंपरा, जातीभेद तत्कालीन धार्मिक परिस्थिती यामुळेच झाला आहे. अनेक संतांनी जसे तुलसीदास, कबीर, नामदेव, तुकाराम, गुरुनानक, संत सेवालाल इ. नी समाजातील कुप्रथेवर टीका करुन समाजाला एक नवी दिशा देण्याचे कार्य केले. इंग्रजाच्या काळात राजाराममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधी, विनोबा भावे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयप्रकाश नारायण इत्यादी समाजसुधारकांनी प्रयत्न केले. या समाज सुधारकांनी काही संस्था स्थापन करुन भारतात सामाजिक सुधार चळवळीच्या माध्यमातून सुधारणा घडवून आणण्यास हातभार लावला.

**उद्दिष्टे**

१. भारतातील सामाजिक चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२. भारतीय सामाजिक चळवळीत विचारवंतांच्या योगदानाचा आढावा घेणे.

**सामाजिक चळवळीचा अर्थ**

समाजामध्ये असणाऱ्या कुप्रथा अनिष्ट प्रथांना आळा घालण्यासाठी बहुसंख्य लोकांनी केलेले संघटीत कार्य तसेच निरंतर सामुहिक कृतीद्वारे समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी कुप्रथेच्या विरोधात विरोध करुन विचाराधिष्ठित संघटीत बाबीला सामाजिक चळवळ असे म्हणतात.

**भारतात सामाजिक चळवळीत विचारवंताचे योगदान**

**१) राजाराममोहन रॉय**

बंगालमध्ये राजाराममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजाची स्थापना केली. तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये अस्पृश्यता, बालविवाह, हुंडा पध्दती, जातीभेद, विधवा विवाह निषेध, सतीप्रथा इत्यादी वाईट प्रथा होत्या. या अनिष्ट चालिरिती मोडून टाकण्यासाठी १८८९ मध्ये सतीबंदीचा कायदा करुन सती जाणे बंद केले. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा करुन समाजात

विधवेला जीवन जगण्याचा हक्क मिळवून दिला. पुढे हीच चळवळ ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून रविंद्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन, ईश्वरचंद्र विद्यासागर इत्यादी समाजसुधारकांनी चालविली.

**२) स्वामी दयानंद सरस्वती**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी १८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना मुंबईत केली. आर्य समाजाला पंजाब, उत्तरप्रदेश, राजस्थान, गुजरात इत्यादी राज्यात चांगला प्रतिसाद मिळाला. आर्य समाजाच्या माध्यमातून समाजातून धार्मिक अंधश्रध्दा कमी करण्यावर जोर दिला होता. सोबतच समाजात असणाऱ्या कुप्रथा जसे बालविवाह, विधवा पुनर्विवाह निषेध, मुर्तीपूजा, धार्मिक अंधविश्वास इत्यादी गोष्टी आर्य समाजाला मान्य नव्हत्या. आर्य समाजाने अनाथालय, विधवाश्रम आणि आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली होती.

**३) स्वामी विवेकानंद**

स्वामी विवेकानंदानी आपले गुरु रामकृष्ण परसहंसाची प्रेरणा घेऊन १८८७ मध्ये रामकृष्ण मिशनची स्थापना केली. रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून समाजात जागृती करुन एक चळवळ उभी केली त्यात प्रामुख्याने दुष्काळ, महारोगी, अनाथ, रोगपिडीत व ग्रस्त लोकासाठी कार्य केले. तसेच जातीभेद, अस्पृश्यता, अंधविश्वास इत्यादी बार्बीवर प्रकाश टाकून समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**४) शिखबाबा रामसिंग**

पंजाबमध्ये शिख बाबा रामसिंग यांनी नामधारी चळवळीच्या माध्यमातून समाजात जागृती करण्याचे कार्य केले. बालविवाह, कन्यावधु, परदाप्रथा, व्यसनाधिनता, जातीभेद, विवाह प्रसंगी भोजन व हुंडा पध्दतीला विरोध केला.

**५) सर सैय्यद अहमद खॉ**

सर सैय्यद अहमद खॉ यांनी मुस्लीम समाजामध्ये असणाऱ्या रुढी, परंपरा, अंधविश्वास या वाईट प्रथेला नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी बहुपत्नीत्व प्रथेला विरोध केला. त्यांनी उर्दुपत्रिका काढून मुसलमानांना विज्ञान व औद्योगिकरणासाठी समाजात जागृती निर्माण केली. मुसलमानांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अलिगड आंदोलन करुन त्यांच्या प्रयत्नामुळे १८७५ मध्ये अलिगडमध्ये मुस्लीम विश्वविद्यालयाची स्थापना झाली.

**६) महात्मा ज्योतिबा फुले**

सत्यशोधक चळवळ ही महात्मा फुले यांनी महाराष्ट्रात ब्राम्हणाच्या विरोधात चालवली. ब्राम्हण गरीब जनतेची कशी पिळवणूक करतात त्यांना भय दाखवून अधंश्रध्दांच्या आहारी जायला भाग पाडतात याचे वर्णन त्यांनी सार्वजनिक सत्यधर्म, गुलामगिरी, ब्राम्हणाचे कसब इत्यादी साहित्याची निर्मिती करुन व स्त्री शिक्षणाचा प्रसार करुन समाजात नवचैतन्य निर्माण करण्याचे महान असे कार्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले.

**७) महात्मा गांधी**

महात्मा गांधींनी भारतीय समाजातील अनिष्ट चालिरिती, रुढी, परंपरा, जातीभेद, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी हरिजन सेवक संघ स्थापन करुन जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तसेच बालविवाह, वेश्यावृत्ती, मद्यपान, हुंडा पध्दत, देवदासी प्रथा इत्यादी कुप्रथेविरुध्द समाजात जागृती करण्यासाठी सुधार चळवळ उभारली.

**८) बिरसा जनजातीय सुधार चळवळ**

भारतीय समाजातील जनजातीची दशा सुधारण्यासाठी अनेक सामाजिक सुधार चळवळी व आंदोलने झाली त्यात प्रामुख्याने बिरसा, आंदोलन बोरसिंह आंदोलन, मोतीलाल तेजावत यांनी भिल्लातील सामाजिक वाईट प्रयेला नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

**९) सेवाभाया यांची भटके सुधार चळवळ**

संत सेवालाल महाराज हे पहिले बंजारा समाजातील समाज सुधारक परंतु लोकांनी त्यांना देव बनवून टाकले. भटक्या समाजातील कुप्रथेवर त्यांनी प्रबोधन केले. बालविवाह, मद्यपान, अंधश्रध्दा, बहुपत्नी विवाह, हुंडापध्दती या विरोधात त्यांनी समाजात जागृती केली.

**१०) विनोबा भावे**

विनोबा भावे यांनी भुदान चळवळीच्या माध्यमातून समाजात असणारी विशेषतः आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जमिनदारांना भावनिक आवाहन करुन मला तुमचा मुलगा माना तुम्हाला जर दोन मुल असतील तर मला तिसरा मुलगा मानून मला भूमी / जमीन द्या अशा पध्दतीने जमिनी मिळवून भुमिहीनांना भूमी देऊन समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**११) जयप्रकाश नारायण व विनोबा भावे**

गरीब व श्रीमंतामध्ये समानता आली पाहिजे या विचारावर सर्वोदय चळवळीचा जोर होता. स्त्रियांना सर्व क्षेत्रात पुरुषाबरोबर समान दर्जा मिळाला पाहिजे तसेच समाजातील वाईट प्रथा, परंपरा, नष्ट करुन सर्वांचा सर्वांगिण विकास म्हणजे सर्वोदय या आधारावर ही चळवळ चालविली होती.

**१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

जन्मजात लाभलेले दलितपण व त्यावर लादलेली अस्पृश्यता ही अन्यायकारक आहे ही भावना समाज सुधारकाच्या मनात होती. अनेक संतांनी आपले संतपण पणाला लावले पण रुढींचा पगडा एवढा जबरदस्त होता की हे सगळे प्रयत्न अपुरे ठरले. डॉ. आंबेडकराचा जन्म दलिताच्या पोटी झाल्यामुळे त्यांच्या वाट्याला दलित पिडीत व शोषीताची सगळी दुःखे आली म्हणून डॉ. आंबेडकराची चळवळ ही अधिक वास्तव होती. प्रस्थापित समाज व्यवस्थेत गुदमरुन गेलेल्या दलितांना बंडखोरी करण्याचा मंत्र देऊन खऱ्याखुऱ्या मुक्ती संग्रामाची सुरुवात त्यांनी केली. स्वाभीमान, स्वावलंबन व आत्मोध्दार हा त्यांच्या चळवळीचा गाभा होता. दलिताच्या मुक्तीचा मार्ग जर कोणता असेल तर ते शिक्षण आहे म्हणून शिक्षणाची कास धरा, शिका संघटीत व्हा व संघर्ष करा हा त्यांचा मूलमंत्र होता. कारण अज्ञान, अंधश्रध्दा व अनिष्ट रुढी परंपरा दुर करण्याचे सामर्थ्य केवळ शिक्षणाने लाभते हा त्यांचा पक्का विश्वास होता. शिक्षणाने स्वतः तेजस्वी व्हावे व इतरांनाही करावे ही बाबासाहेबाची शिकवण होती. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित चळवळीत चैतन्य निर्माण केले.

**१३) नारायण मेघाजी लोखंडे**

औद्योगिक क्रांतीमुळे एकीकडे समृध्दता आली पण कामगाराच्या वाट्याला केवळ निराशा व वैफल्य आले. अमर्यादित नफा कमविणाऱ्या मालक वर्गाने कामगाराला माणूस म्हणून कधी ओळखलेच नाही. त्यामुळे कामगार वर्गाची मोठ्या प्रमाणात

पिळवणूक झाली. त्यामुळे कामगार अधिकच दुबळा झाला. या व्यवस्थेविरुध्द एकटा व्यक्ती टिकू शकणार नाही या भावनेतून कामगार संघटना व चळवळीला सुरुवात झाली.

भारतातील कामगार संघटनेची स्थापना मुंबईत नारायण मेघाजी लोखंडे या कामगारानी १८८४ मध्ये केली व कामगारांनी लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांची चळवळ उभी करुन आपल्या रास्त मागण्या कारखाना आयोगापुढे मांडल्या व बऱ्याच मागण्या मान्य करण्यात आल्या त्यामुळे कामगारांचे मनोबल वाढून १८९० मध्ये लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई गिरणी कामगार संघ' स्थापन करण्यात आला. सर्वसाधारणपणे कामगार चळवळीचे उद्देश हे कामगार वर्गाच्या जिवनमानात सुधारणा घडवून आणने हे होते. या ध्येयावर आधारीत या कामगार चळवळीची वाटचाल सुरु आहे. आज अनेक कामगार संघटना उदयास आल्या आहेत.

**१४) बालकांच्या विकासासाठी बाल समर्थन चळवळ**

आजचा बालक हा उद्याचा खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माता आहे. या उक्तीप्रमाणे बालकाच्या सर्वांगिण विकासासाठी बाल समर्थन चळवळ चालविणे हे बालकाच्या हिताचे आहे. भारताच्या संविधानाच्या आधारे भारतात बालकल्याण धोरण अस्तित्वात आले. बालकाच्या कल्याणासाठी शासकीय, निमशासकीय, ऐच्छिक संस्था विविध स्तरावर कार्य करीत असतात. पंचवार्षिक योजना बालकांची काळजी घेतात. या धोरणानुसार १४ वर्षाखालील बालकाला धोक्याच्या ठिकाणी काम दिल्या जाणार नाही. त्यांच्या वयाला व शक्तीला न पेलणारे कोणतेही काम देता येणार नाही. निरोगी वाढीसाठी सर्व सोयी व सेवा बालकांना देण्यात येतील. अशा सर्व सोयी सुविधा बालकांना देऊन बालकाचे संपूर्ण कल्याण साधणे सर्व प्रकारच्या शैक्षणिक, तांत्रिक सेवा उपलब्ध करुन देणे, साधने प्रदान करणे. कारखाना अधिनियम १९४८ चिल्ड्रेन ॲक्ट नुसार बालकांना संरक्षण देण्यात आले आहे. अशा प्रकारच्या बालकाच्या कल्याण होण्याच्या दृष्टीने अनेक प्रकारच्या चळवळी करण्यात आल्या.

**१५) शेतकरी चळवळ**

१८५७ ते १९२१ हा कालखंड शेतकरी चळवळीचा शुभारंभ होता. जमिनदारांचा जुलुम व शासनाचा शेतसारा यामुळे शेतकरी त्रस्त झाला होता. त्यामुळे शेतकऱ्यानी त्या विरोधात आवाज उठविला. १८५५ मध्ये संथालानी सावकाराविरोधी केलेली चळवळ, १८७५ मध्ये दक्षिणेत झालेली सावकार विरोधी दंगल याच काळात बंगालमधील कुळांनी जमिनदाराविरुध्द फुंकलेले शिंग व पंजाबमधील शेतकऱ्यांनी सावकाराविरुध्द थोपटलेले दंड इत्यादी. उदाहरण स्पष्टपणे दर्शवितात की भारतातील शेतकऱ्यामध्ये असंतोष हा १९ व्या शतकापासूनच खदखदत होता.

स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांचे भाग्य बदलेल असे वाटत होते. शेतकऱ्याचे प्रश्न सुटतील अशी आशा वाटत होती पण शेतकऱ्याच्या वाट्याला घोर निराशाच आली. आता आता आर्थिक विकासाच्या योजना कार्यान्वीत होत असताना व हरीत क्रांतीची चिन्हे दिसत असताना शेतकरी आंदोलने वेग घेऊ लागली आहेत. कोणत्या ना कोणत्या कारणाने किंमतीची पातळी वाढणे व त्यातून शेतकऱ्याच्या असंतोषाला वाचा फुटणे असे प्रकार देशात वारंवार घडत आहेत. समाजातील इतर वर्गाची स्थिती सुधारत आहे पण शेतकरी वर्ग अजुनही दुरच आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. शेतकऱ्याची दुःखे सहनशक्तीच्या पलिकडे जात आहेत हे वेळीच लक्षात घेतले पाहिजे. कारण आतापर्यंतचा इतिहास ही बाब स्पष्ट करते की, वारंवार पडणारे दुष्काळ, शेतमालाची खालावलेली किंमतीची पातळी, जमिनीचा जबरदस्तीने लिलाव, कुळाची हकालपट्टी इत्यादी कारणाने

शेतकरी ग्रस्त आहे पण योग्य नेतृत्व, योग्य संघटना, व्यापक व्यासपीठ आदीच्या अभावाने ह्या चळवळी प्रभावी होऊ शकल्या नाही. पण हे वेळीच लक्षात घेतले नाही तर त्याचे घटके सर्व समाजालाच पोळून काढतील यात शंका नाही. या दृष्टीने शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे शासनाने सकारात्मक व राष्ट्रीय दृष्टीने पाहिले पाहिजे अन्यथा शेतकरी आंदोलनाच्या चळवळीचे रुपांतर वनव्यात व्हायला वेळ लागणार नाही.

## समारोप

भारत हा विविध जाती, धर्मांचा, पंथाचा देश असल्यामुळे भारतीय समाजात हजारो वर्षापासून अनेक बाबतीत विषमता व असमानता पाहायला मिळते त्यासाठी वेळोवेळी साधुसंताने, समाज सुधारकांनी, विचारवंतांनी चळवळी केल्या आहेत, आंदोलन उभी केली आहेत. अशा प्रकारच्या सामाजिक चळवळीचा समाज जीवनावर फार मोठा प्रभाव पडतो. सामाजिक चळवळीकरिता जनजागृती करावी लागते. लोकांचा पाठिंबा मिळवावा लागतो. एखाद्या समस्येविषयी लोकांचे लक्ष आकर्षित करुन त्या समस्येची भिषणता लोकांच्या लक्षात आणून द्यावी लागते. तेव्हा हळूहळू लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण होऊन लोक आपल्या विचारात व व्यवहारात बदल घडवून आणतात. अशाप्रकारे सामाजिक बदलातून सामाजिक चळवळी जन्म घेतात. त्यामुळे आधुनिक काळात सामाजिक चळवळींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. रशिया, चिन या देशामध्ये आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेत बदल घडवून आणण्याच्या संदर्भात सामाजिक चळवळीची विशेष भूमिका होती.

भारतातील केशवपन, सतीप्रथा, अस्पृश्यता, बालविवाह, जातीभेद इ. अनिष्ट प्रथा बंद होऊन आधुनिक समाज व्यवस्थेची निर्मिती करण्यात सामाजिक चळवळीचे फार मोठे योगदान आहे. दलित चळवळ, आदिवासी चळवळ, स्त्री चळवळ, शेतकऱ्यांची चळवळ इत्यादी काही महत्वाच्या चळवळी मागील प्रमुख भूमिका म्हणजे सामाजिक बदल घडवून आणणे होय. अशाप्रकारे सामाजिक चळवळ व सांस्कृतिक बदल परस्पर संबंधीत आहे. म्हणून सामाजिक चळवळी शिवाय सामाजिक बदल होऊ शकत नाही.

## संदर्भ सूची

मोठ्या शहरांमध्ये भूमिभरणासाठी जागेची कमतरता असल्यामुळे योग्य माध्यमाद्वारे जैवविघटनशील कच-याचे विघटन केले जाते. त्यातून मातीसाठी चांगल्या दर्जाचे पोषण मिळते. तसेच समृध्द आणि पर्यावरणीय अनुकूल खत तयार केले जाते. त्यामुळे मातीची गुणवत्ता आणि उत्पादनक्षमता वाढते.

भारतात तयार होणा-या महापालिकेतील घन कच-यामध्ये ३५-४० टक्के सेंद्रिय घटक आहेत. या कच-याचे विल्हेवाटीच्या सर्वात जुन्या पध्दतीपैकी एक सेंद्रिय पध्दतीने पूनर्जीवीकरण केले जाऊ शकते. सेंद्रिय कचज्याच्या विघटनाची नैसर्गिक प्रक्रिया म्हणजे खत किंवा कंपोस्ट याचे उत्पादन यामध्ये पोषक द्रव्ये अतिशय समृध्द असतात.

घन कच-याच्या अयोग्य व्यवस्थापनाचे परिणाम :

१. नैसर्गिक सौंदर्य कमी होणे : पसरलेल्या घन कच-यामुळे नैसर्गिक सौंदर्य कमी होते.

२.कच-याची दुर्गंधी : साठविलेल्या कच-यापासून दुर्गंधी निर्माण होते.

३. रोगांचा प्रसार : घनकचरा विल्हेवाटीची ठिकाणे अनेक रोगांना आमंत्रित करतात.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक ३० डिसेंबर २०१७ (अवलंबित)

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१७ च्या अनुषंगाने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, शहरामधील नागरिकांना सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशाप्रकारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून सेवा देत असताना नागरिकांकडूनही त्यास सहकार्य मिळणे अपेक्षित आहे. परंतु जे नागरिक सहकार्य करीत नाहीत त्यांना घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार दंड करणे आवश्यक आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या तरतूदीचे अनुपालन न करणा-या व्यक्ती, संस्था यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार नगरपरिषदा, नगरपंचायती यांना देण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती यांना आहे.

घनकच-याचे प्रकार :

अ) कुजणारे पदार्थ ब) न कुजणारे पदार्थ

अ) कुजणारे पदार्थ :

यामध्ये पालापाचोळा, भाजीपाल्याचा, उरलेले अन्न, स्वयंपाकातील टाकलेले पदार्थ, जनावरांची विष्ठा, मेलेले प्राणी, कागद, लाकूड इत्यादींचा समावेश होतो.

ब) न कुजणारे पदार्थ :

पुनर्वापरातील / प्रक्रियाशील :

यात प्लास्टीक, काच, कपडा, लोखंड, रबर, धातू इत्यादी वस्तू येतात.

अप्रक्रियाशील :

यात धर्माकोल, टेट्रापॅक, पाण्याच्या बॉटल इत्यादी

घनकच-याचा उगम :

१) घरातून निघणारा कचरा :

भाजीपाला, फळे, इत्यादींचे तुकडे, कपडे, प्लास्टीक, घरगुती वापरतील इतर वस्तू.

२) शेतातून निघणारा कचरा :

पिकांचे अवशेष, सडलेली फळे, पाला, झाडांची खोडं इत्यादी.

३) इतर कचरा :

कंपन्यांमधील टाकाऊ वस्तू, मेलेले प्राणी, काचा, टाकाऊ फर्निचर, कारखान्यातील राख इत्यादी.

घनकचरा वर्गीकरणाचे प्रकार :

१. ओला कचरा / कुजणारा कचरा

२. सुका कचरा / न कुजणारा कचरा

३. पुन्हा वापरता येण्यासारखा कचरा

घनकचरा व्यवस्थापनेचा हेतू :

घनकचरा म्हणजे रोजच्या वापरातून उरलेला निरुपयोगी पदार्थ. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातून निघणारा घनकचरा व त्याची विल्हेवाट ही जगापुढील एक मोठी समस्या आहे. पूर्वीच्या काळी घनकचरा विल्हेवाट लावण्याची समस्या नव्हती कारण लोकसंख्या कमी होती आणि घनकचरा टाकण्यासाठी जमीन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होती. परंतु आता लोकसंख्या वाढल्यामुळे घनकचरा मोठ्या प्रमाणात तयार होतो. घनकचरा मोठ्या प्रमाणात तयार होण्याची कारणे म्हणजे शहरीकरण, औद्योगिकरण, प्लास्टीक वस्तू, उंचावलेले राहणीमान आणि त्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू, वाढलेल्या लोकसंख्येची अन्नाची गरज ते भागविण्यासाठी शेतातील वाढलेले उत्पादन व त्यापासुन निघणारा घनकचरा या सर्व घनकच-याचे व्यवस्थापन दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे.

संदर्भ साहित्य आढावा / परिक्षण :

घनकचरा व्यवस्थापना संदर्भात (https://mnshuleprient.org) या संकेत स्थळावर असे नमुद केले की, मानवाने जसजशी प्रगती केली तसतशी त्याच्या वस्तू वापरण्याच्या प्रमाणातही वाढ झाली. पूर्वी घरुन सामान आणण्याकरिता निघत असताना कापडी पिशवी सोबत नेली जात होती परंतु आता मानवाच्या प्लास्टीक पिशव्यांचा अतिवापरामुळे कच-याच्या ढिगा-यात दिवसेंदिवस अती वाढ झाली आहे आणि हाच कचरा साठवून राहिल्याने त्याचा पर्यावरणावर व नागरिकांवर दुष्परिणाम होत आहे. घरे, कार्यालये, दुकाने, भाजीमंडया, रुग्णालये, शेती या सर्व ठिकाणाहून अनेक वेगवेगळ्या प्रकारचा कचरा रोज निघतो. आपल्या घरातल्या टाकाऊ वस्तू, कचरा सरळ घराबाहेर फेकून दिला जातो.

घनकचरा व्यवस्थापना संदर्भात ५ मे २०१७ च्या लोकमत वृत्तपत्रात असे लिखित आहे की, महाराष्ट्रातील मुंबईतील अंधेरीच्या विजयनगर कॉलनीमध्ये घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प यशस्वीरित्या राबविला जात आहे. या प्रकल्पामुळे कॉलनीतला वर्षभरातला तब्बल १०० टन कचरा महानगरपालिकडे जात नाही.

या पर्यावरणात कचरा नसतो तो आपणच निर्माण करतो. निर्माण झालेल्या कच-याची विल्हेवाट आपणच लावायला हवी. महाराष्ट्रातला प्रत्येक माणूस दिवसाला ०.१४ ते ०.६३ किलो कचरा करतो. तसे महाराष्ट्रात अंदाजे एक वर्षात ९३ लाख टन घनकचरा हा नगरपालिका क्षेत्रात निर्माण होतो.

महिला, पुरुष, मुलं, शाळकरी मुलं, कामगार या सर्वांना घनकचरा व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून कचज्याची विल्हेवाट आणि स्वच्छता कशी करावयाची आहे ती अंगी शिस्त लावली पाहिजे. सर्व गाव, आंगण, रस्ते, मंदिर, शाळा, पर्यटनस्थळे, बगीचे इत्यादी ठिकाणच्या कचरा व्यवस्थापनातून प्रत्येकाने जबाबदारीने वाटा उचलला तर नक्कीच स्वच्छता राहून आरोग्य चांगलं राहिल. (https://mr.vikaspedia.in)

मानव व त्यांच्या सभोवताली असणारे पर्यावरण यांचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. पृथ्वीवरील सजीव सृष्टी निकोप राहण्यासाठी स्वच्छ व सुंदर पर्यावरणाची आवश्यकता असते. पर्यावरण शुध्द ठेवण्यासाठी मानव व पर्यावरण यांचे संतूलन कायम ठेवणे आवश्यक आहे. मानवाच्या बहुतांश गरजा पर्यावरणातूनच भागविल्या जातात. मागील शतकांपासून प्रचंड प्रमाणात वाढलेली लोकसंख्या व औद्योगिकरणामुळे मानव व पर्यावरण यांच्यातील समतोल केव्हा व कसा ढासळला हे मानवाच्या लक्षातही आले नाही. अतिलोभापायी मानवाने मोठ्या प्रमाणात पर्यावरण अशुध्द केले. वाढत्या लोकसंख्येचे पालनपोषण करण्यासाठी मानवाने अविचाराने नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करुन निसर्गाचा पर्यायाने पर्यावरणाचा नाश केला. पर्यावरणाचे संतुलन बिघडले. पर्यावरणाच्या अनुषंगाने ज्या परिसंस्था निर्माण झाल्यात, विकसित झाल्यात त्यांचेही संतुलन बिघडले. अनेक प्रकारे पर्यावरण दुषितकांद्वारा जेव्हा पर्यावरण दुषित होऊन जेव्हा मानव व पर्यावरणाचा तोल ढासळतो तेव्हा त्या क्रियेला प्रदुषण असे म्हणतात. जगामध्ये औद्योगिक क्रांती झाल्यानंतर मानवाने मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करुन पर्यावरण दुषित केलेले आहे. ह्या वाढत्या प्रदुषणामुळे पृथ्वीवरील संपूर्ण सजीवसृष्टी विनाशाच्या मार्गावर येऊन आहे. उदा. मागील शंभर वर्षात पृथ्वीच्या सरासरी तापमानात वाढ झाली आहे. वातावरणातील ओझोन वायूचा थर वाढत्या प्रदुषणामुळे हळूहळू नष्ट होत असून या थराद्वारा जे अतिप्रखर अतिनिल सूर्यकिरणे शोषले जातात. त्यांच्या शोषणाचे प्रमाण कमी होत आहे. अतिनिल सूर्यकिरण जर पृष्ठभागापर्यंत पूर्ण तिव्रतेने पोहचली तर सजीवसृष्टी फार काळ जिवंत राहू शकणार नाही. म्हणून मानवाचे पहिले आद्य कर्तव्य म्हणजे पर्यावरण प्रदुषण नियंत्रित करुन ते जास्तीत जास्त शुध्द ठेवणे. आजचे वेगाने होणारे प्रदुषण याच गतीने सुरु राहिले तर पृथ्वी इतर निर्जिव ग्रहांच्या मालिकेत जाऊन बसण्यास फारसा वेळ लागणार नाही. (विठ्ठल घारपुरे, पृ. १८५)

**अध्ययनाचे उद्देश :**

१. घनकचरा व्यवस्थापन करणा-या महिलांमध्ये पर्यावरण संरक्षण दृष्टिकोन विकसित होण्यामागील कारणांचा अभ्यास करणे.

२. पर्यावरण संरक्षण जागरुकतेचा गावपातळीवर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

**क्षेत्र :**

सदर अध्ययनासाठी क्षेत्र म्हणून यवतमाळ तालुक्यातील शिवणी, शेळी व खोरद या गावांची निवड केली आहे.

**तथ्य संकलनाचे स्त्रोत :**

प्रस्तुत अध्ययन करण्यासाठी तथ्य संकलन करताना उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून अध्ययनासंबंधित तथ्य गोळा करण्यात आली तसेच दुय्यम स्त्रोतामध्ये लिखित व अलिखित साहित्यांचा समावेश करण्यात आला. तसेच त्यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, इंटरनेट, पुस्तके, दैनंदिन वृत्तपत्रे इत्यादींपासून जमा करण्यात येणा-या तथ्यांचा समावेश करण्यात आला.

**दृष्टिकोन विकसित होण्यास कारक घटक :**

गावपातळीवर घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी व त्या संदर्भात जनजागृती करण्यासाठी तसेच त्याचा पर्यावरण संरक्षण दृष्टिकोन विकसित होण्यामागील कोणते घटक कारणीभूत ठरते हे जाणून घेणे आवश्यक ठरते. म्हणून सदर अध्ययनात या सारणीची निर्मिती करण्यात आली.

सारणी क्र. १

**दृष्टिकोन विकसित होण्यास कारक घटक दर्शक सारणी**

| अ.क्र. | विवरण | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत अभियान | ५५ (९१.६७) | ०५ (०८.३३) | ६० (१००%) |
| २ | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान | २३ (३८.३३) | ३७ (६१.६७) | ६० (१००%) |
| ३ | वाढते जीव घेणारे आजार | १२ (२०.००) | ४८ (८०.००) | ६० (१००%) |
| ४ | शाश्वत विकास व्हावा | १४ (२३.३३) | ४६ (७६.६७) | ६० (१००%) |

**स्पष्टीकरण :**

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण ६० (१००%) उत्तरदात्यापैकी घनकचरा व्यवस्थापन राबविण्यासाठी पर्यावरण संरक्षण दृष्टिकोन विकसित होण्यास कारक घटक स्वच्छ भारत अभियान आहे असे होय उत्तर देणारे उत्तरदाते ५५ (९१.६७%) आहे तर नाही असे उत्तर देणारे उत्तरदाते ०५ (०८.३३%) आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान हे कारक घटक आहे असे होय उत्तर देणारे उत्तरदाते २३ (३८.३३%) आहे तर नाही असे उत्तर देणारे उत्तरदाते ३७ (६१.६७%) आहे. वाढते जीव घेणारे आजार हा कारक घटक आहे असे होय उत्तर देणारे उत्तरदाते १२ (२०.००%) आहे तर नाही असे उत्तर देणारे उत्तरदाते ४८ (८०.००%) आहे. शाश्वत विकास व्हावा हा कारक घटक आहे असे होय उत्तर देणारे उत्तरदाते १४ (२३.३३%) आहे तर नाही असे उत्तर देणारे उत्तरदाते ४६ (७६.६७%) आहे.

**निष्कर्ष :**

उपरोक्त स्पष्टीकरणावरुन असा निष्कर्ष निघतो की, शासनाद्वारा स्वच्छता राखण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून शासनाने स्वच्छता अभियान राबविले होते त्याचा प्रभाव सदर ग्रामस्थावर अधिक प्रमाणात पडला व त्यामुळे त्यांनी गावामध्ये घनकचरा व्यवस्थापन राबविल्याचे दिसून येते.

**घनकचरा व्यवस्थापनामुळे गाव पातळीवर पडलेला सकारात्मक परिणाम :**

घनकचरा व्यवस्थापनामुळे गाव हे स्वच्छ झाले का? तसेच गावातील गावकऱ्यांच्या आरोग्यात सुधार झाल्यास गाव पातळीवर कशाप्रकारे सकारात्मक परिणाम पडले हे जाणून घेणे आवश्यक होते म्हणून या अध्ययनात या सारणीची निर्मिती करण्यात आली.

सारणी क्र. २

**घनकचरा व्यवस्थापनामुळे गाव पातळीवर पडलेला सकारात्मक परिणाम दर्शक सारणी**

| अ.क्र. | विवरण | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | गावातील परिसर स्वच्छ राखण्यास मदत | ६० (१००.००%) | ०० (००.००%) | ६० (१००%) |
| २ | गावपातळीवरची घाण कमी झाली | ६० (१००.००%) | ०० (००.००%) | ६० (१००%) |
| ३ | गावाचे आरोग्य सुदृढ | ६० (१००.००%) | ०० (००.००%) | ६० (१००%) |
| ४ | घनकचरा व्यवस्थानाबद्दल जागृकता निर्माण झाली | ६० (१००.००%) | ०० (००.००%) | ६० (१००%) |
| ५ | संपूर्ण गाव घनकचरा व्यवस्थापनात सहभागी झाले | ५९ (९८.३३%) | ०१ (०१.६७%) | ६० (१००%) |

**स्पष्टीकरण :**

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण ६० (१००%) उत्तरदात्यापैकी घनकचरा व्यवस्थापनामुळे गावपातळीवर गावातील परिसर स्वच्छ राखण्यासाठी मदत होते हा सकारात्मक परिणाम झाला असे होय म्हणणारे उत्तरदाते ६० (१००%) आहेत. गावपातळीवरची घाण कमी झाली हा सकारात्मक परिणाम झाला असे होय म्हणणारे उत्तरदाते ६० (१००.००%) आहेत. गावाचे आरोग्य सुदृढ झाले हा सकारात्मक परिणाम झाला असे होय म्हणणारे उत्तरदाते ६० (१००.००%) आहेत. घनकचरा व्यवस्थानाबद्दल जागृकता निर्माण झाली हा सकारात्मक परिणाम झाला असे होय म्हणणारे उत्तरदाते ६० (१००.००%) आहेत. संपूर्ण गाव घनकचरा व्यवस्थापनात सहभागी झाले हा सकारात्मक परिणाम झाला असे होय म्हणणारे उत्तरदाते ५९ (९८.३३%) आहे तर नाही असे म्हणणारे उत्तरदाते ०१ (०१.६७%) आहे.

**निष्कर्ष :**

उपरोक्त स्पष्टीकरणावरुन असा निष्कर्ष निघतो की, घनकचरा व्यवस्थापनामुळे गावातील परिसर स्वच्छ राखण्यास मदत, गावपातळीवरची घाण कमी झाली, गावाचे आरोग्य सुदृढ आणि घनकचरा व्यवस्थानाबद्दल जागृकता निर्माण झाली हा सकारात्मक परिणाम दिसून आला म्हणजेच नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पर्यावरण संरक्षण संदर्भात दृष्टिकोन विकसित झाल्याचे दिसून येते.

संदर्भग्रंथ सूची

घारपुरे विठ्ठल (२०१६). पर्यावरण शास्त्र. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं.

मेश्राम सुरेश (२०००). प्रात्याक्षिक सामाजिक संशोधन. नागपूर : कृष्णचंद्र एजन्सीज.

व्होरा वंदना. पर्यावरणीय समाजशास्त्र संक्षिप्त अध्ययन. नई दिल्ली : ओमेगा पब्लिकेशन.

दैनिक लोकमत वार्ता ५ मे २०१७

https://mnshuleprient

https://vikaspedia

https://youtube/७८KLHRKD३-E

https://youtube/FETTho९०Aug

https://youtube/OV२GMul५wvy


□□□

**34**

# बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील नाविण्यपूर्ण विज्ञान केंद्रातील प्रतिकृतीचा विद्यार्थ्यांच्या गुणात्मक दर्जा वाढीवर होणार्या परिणामाचा अभ्यास


**श्री राजकुमार तुकाराम राठोड**

संशोधक (सहशिक्षक), रिसर्च स्कॉलर, एम.ए.एम.एड, सेट(शिक्षणशास्त्र), पीएच.डी. (Pursuing)

जि.प.प्रा.शाळा, ता. माजलगाव, जि. बीड, महाराष्ट्र


**********

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेतील ८६ व्या घटनादुरुस्तीने (२००२) कलम २१ अ अन्वये प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क बनविण्यात आला. या कलमाच्या पूर्ततेसाठी बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ हा संपूर्ण देशभर (जम्मु व कश्मिर वगळून) १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला. त्यातील प्रकरण २ कलम ३ नुसार ६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करुन देईल. ठढए अउढ २००९ कलम ३८ ची पोटकलम (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम तयार करुन ११ ऑक्टोबर २०११ ला महाराष्ट्रभर लागू केला. भारतीय संविधानाच्या कलम ४५ अन्वये ६ ते१४ वर्ष वयोगटातील बालकांना प्राथमिक शिक्षण देणे राज्याचे कर्तव्य आहे.

शिक्षणाच्या हक्क कायद्यातील कलम २९(२) नुसार सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, आकलन आणि उपयोजन क्षमतांच्या पडताळणी करण्यासाठी कायद्यातील या अपेक्षा व तरतूदी लक्षात घेऊन दि. २० ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयानुसार राज्यात इयत्ता १ ते ८ साठी

H/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

International Multilingual Referred Research Journal

Issue-34, Vol-04 April to June-2020



Editor
Dr.Bapu G.Gholap

Dr. RAHUL




MAH/MUL/ 03051/2012

ISSN :2319 9318


आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™


**April To June, 2020**
**Issue-34, Vol-04**

**Date of Publication**
**1 May 2020**


**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**


❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड



"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At,Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) GROUND WATER RESOURCES IN MAHARAJGANJ DISTRICT- U.P.
DR. J. P. SINGH, Maharajganj - U.P. ||62

15) THEMES IN NATHANIEL HAWTHORNE'S THE SCARLET LETTER
Dr. Markas Laxman Sonawane, Dist. Aurangabad (Maharashtra) ||68

16) खानदेशातील आदिवासी लोकजीवनात मोह वृक्षाचे महत्व
प्रा.डॉ. रमाकांत अंबादास चौधरी, जि. धुळे ||71

17) कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा खून झालेल्या पिडीत कुटुंबाची वर्तमान जीवनशैली
डॉ. गणेश आर. गाडेकर, यवतमाळ ||73

18) अस्मिता योजनेमुळे किशोरवयीन मुलींच्या आरोग्यावर झालेला परिणाम
डॉ. राहुल जी. गोंडाणे, यवतमाळ ||78

19) मराठा घराण्यातील स्त्रियाचे लोकोपयोगी व सार्वजनिक हिताची कामे - एक दृष्टिक्षेप
प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव, जि. धुळे ||83

20) जागतिक परिप्रेक्षात होणारे बदल व भारतीय भाषांसमोरील आव्हाने
डॉ. श्रीकृष्ण काकडे, अकोला ||86

21) पर्यावरण रक्षणाचा प्रयत्न
प्राचार्य डॉ. एस. के. खंगार, गडचिरोली ||88

22) मानवी स्थलांतरामुळे निर्माण झालेल्या सामाजिक समस्यांचे मानसशास्त्रीय अध्ययन
प्रा.डॉ. मोरे रविंद्र विठ्ठल, जि. धुळे ||90

23) डॉ.बाबासाहेब आंबेडकर : लोकशाहीत विरोधी पक्षसंबंधी विचार
भगवान ईश्वरलाल परदेशी, जि. धुळे ||93

24) सोशल मिडीयामुळे जीवनाला मिळतोय सोशल टच
रमेश अर्जुन पवार, सोलापूर ||96

25) शिरपूर शहरातील अध्यापक विद्यालयातील छात्रअध्यापकांचा संगणक वापराविषयीच्या भितीचा ...
डॉ. पुराणीक विजेंद्र श्रीकृष्ण, जि. धुळे ||98

26) मराठी विषयाच्या माध्यमातून जीवन कौशल्ये विकसित करून परिणामकारकता ...
भीमसिंग बालुसिंग राठोड & डॉ. आशा धारस्कर (भावसार), अकोला ||100



www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

०१ उत्तरदाते असून त्याचे प्रमाण ०.१ सेमी आहे तर बदल झाला नाही म्हणणारे ५९ उत्तरदाते असून त्याचे प्रमाण ५.९ सेमी आहे. जबाबदारीत वाढ झाली म्हणणारे ६० उत्तरदाते असून त्याचे प्रमाण ६.० सेमी आहे.

**निष्कर्ष :**

वरील जोडस्तंभालेख विश्लेषणाच्या आधारे असा निष्कर्ष निघतो की, जबाबदारीत वाढ झाली म्हणणारे जास्तीत जास्त उत्तरदाते आहेत तर समाजाचा बघण्याचा दृष्टीकोनात बदल झाला नाही म्हणणारे जास्तीत जास्त उत्तरदाते आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

https://study.com The impact of murder an the family unit. Health and social issues following the mureler of a loed one

https://b.3cdn.net >neadp (Pdf) The Impact of homicide on Families of murder victims.

www.resourcesharingproject.org national organizations supporting crime victims > resource sharing project

https://link.springer.com.family survivors of homicide victims : Theoretical perspectives and an eriploratory stady

hhttps://law.jrank.org Crime Victims - The study of victims.

https:// psycnet.apa.org Journey of family members of homicide victims

https://en.m.wikipedia.org/wiki/Familicide[10/02, 12:05 PM] https://en.m.wikipedia.org/wiki/List_of_types _of_killing

https://books.google.co.in/books?id=Kpw0I4VVvUcC&pg=PA697&lpg=PA697&dq=homicide+murderfamily&source=bl&ots=JjK-HB3G7b&sig=ACfU3U3cgslwHknK577US7Qq7JOx12EmFw&hl=en&sa=X&ved=2ahUKEwiTuPaHkdHnAhVLaCsKHeoTALEQ6AEwDXoECAkQAQ#v=onepage&q=homicide%20murderfamily&f=false[10/02, 12:05 PM] PM]https://criminal.findlaw.com/criminal-charges/homicidra.com/wp-content/uploads/2017/01/SUBHASH-WARE-SIR-BOOK-1.pdf [10/02, 12:05 PM]

http://shodhganga.inflibnet.ac.in/jspui/bitstream/10603/205060/8/08_chapter%202.pdf

**18**

# अस्मिता योजनेमुळे किशोरवयीन मुलींच्या आरोग्यावर झालेला परिणाम

**डॉ. राहुल जी. गोंडाणे**
महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क यवतमाळ

**********

भारत हा खेड्यांचा देश आहे. अधिकत्तम लोकसंख्या ही खेड्यात वास्तव्यास आहे. प्राचीन काळी भारतीय खेडी ही स्वयंपूर्ण होती औद्योगिकरणानंतर लोक खेडी सोडून शहराकडे धाव घेऊ लागले. त्यामुळे शहरांचा विकास हा झपाट्याने होत गेला. जसा विकास होत गेला तशाच सोयी सुविधा सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढत गेल्या परंतु ग्रामीण भाग याउलट विविध सोयीसुविधेपासून वंचीत राहिला. परिणामतः मूलभूत गरजा सुध्दा पूर्ण होणे कठीण बाब झाली. विशेषतः ग्रामीण समुदायामध्ये पूर्वी पासूनच आरोग्यविषयक समस्या असल्याचे दिसून येते. तसेच शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भाग हा आता पण आरोग्य विषयक मागासलेल्या अवस्थेमध्ये असल्याचे दिसून येते. तसेच मुलीच्या व महिलांच्या अनेक समस्या आजही ग्रामीण भागात पाहायला मिळते कारण किशोरवयीन मुलींची समस्या म्हटले तर ते एका विशिष्ट वयात त्यांना मासिक पाळी येते व त्यामध्ये ग्रामीण भागात त्यावर सहसा बोलले जात नाही. कारण त्यांना त्याची लाज वाटत असते व त्यामुळे आरोग्याला धरुन अनेक समस्या ह्या गंभीर स्वरुप धारण करतात. पूर्वी मासिक पाळी दरम्यान मुली व महिला ह्या ५ दिवस कापड वापरत होत्या त्यामुळे अनेक आजार होत होते व त्यामुळे पद बिजपवद सुध्दा होत होते व त्यामुळे ते त्या कापडावरील विषारी जंतू हे त्या मासिक पाळी दरम्यान आपल्या शरीराच्या आत प्रवेश करीत होते पण आजही अनेक गावात शहरात कापड वापरतात पण तो कापड नॅपकीन म्हणून बाजारात उपलब्ध आहे. त्यामुळे त्या कापडाची निगा कशी राखावी हे आता सांगण्यात येत आहे. तसेच पूर्वीपेक्षा मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्याचे दिसून येते. कारण पूर्वी संशोधन हे कोणत्याच गोष्टीवर होत नव्हते. तसेच औद्योगिक विकास जेव्हापासून होत गेला तेव्हापासून नवनवीन शोध लागले तसेच त्यामध्ये नंतर सरकारच्या नवीन नवीन योजना

अंमलात आणल्या तसेच शासनाला महिला व मुलींसाठी ते दुर्बल घटक असल्यामुळे त्यांच्यावर विशेष लक्ष द्यावे असे वाटले तेव्हा त्यामधून काही सर्वेक्षण करण्यात आले व त्यामध्ये असे दिसून आले की पूर्वी मुलींच्या पाळी दरम्यान शाळेत ५ दिवस जात नव्हत्या कारण कापड वापरत असल्यामुळे ते सुरक्षित वाटत नव्हते. शाळेमध्ये जाताना जी धावपळ व्हायची त्यामुळे त्यांच्या कपड्याला रक्ताचे डाग लागण्याची भीती होती. तसेच गावामध्ये कंपनीचे पॅड तर उपलब्ध तर आहे मात्र ते महाग असल्या कारणास्तव त्याचा वापर करणे शक्य नव्हते. तेव्ही ही बाब शासनाच्या लक्षात आली व अस्मिता योजनेचा उदय झाला. ही योजना ८ मार्च २०१८ जागतिक महिला दिन या दिवशी ग्रामीण विकास मंत्री पंकजा मुंडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाली. तसेच अक्षयकुमार सुध्दा ही योजना चालू होण्याच्या वेळी उपस्थित होते. ग्रामीण भागात अद्यापही मासिक पाळी संदर्भात मोठ्या प्रमाणात गैरसमज आणि अंधश्रध्दा आहेत. महागडे पर्याय परवडत नसल्याने महिला मुली आजही मासिक पाळी दरम्यान अस्वच्छ कापड, कागद, प्लास्टीक अशा गोष्टींचा वापर करतात. त्यातून संसर्ग आणि जनन आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होतात या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील महिला आणि मुलींसाठी स्वस्त दरात सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध करुन देणाऱ्या अस्मिता योजनेला राज्य मंत्रीमंडळाने मंजुरी दिली. ग्रामीण महिलांच्या आरोग्याचे आणि मुलींच्या शिक्षणाचे चित्र मुळातून टाकण्याची क्षमता असणाऱ्या या योजनेविषयी ग्रामविकास तसेच महिला आणि बालकल्याण मंत्री पंकजा मुंडे यांच्याशी केलेली बातचीत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात केलेली वेगवेगळी सर्वेक्षण आणि अभ्यास तपासले. आरोग्य विभागाची आकडेवारी काही तपासली, शिक्षण विभागामधून मुलींच्या गळतीची कारणे मागवली त्यातून समोर आलेले वास्तव कल्पनेपेक्षाही गंभीर होते. राज्याच्या ग्रामीण भागात फक्त १७ टक्के महिला आणि मुली सॅनेटरी नॅपकीन वापरतात हे समोर आले या महिला आणि मुलींना जनन आरोग्याचे प्रश्न आहे. मुली वयात आल्या की त्यांच्या शाळा बंद केल्या जातात. ग्रामीण भागात मुलींच्या गळतीचे ते महत्त्वाचे कारण आहे. मासिक पाळीच्या काळात मुली गैरहजर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. पाळीच्या कारणामुळे पूर्ण शैक्षणिक वर्षात मुली तब्बल ४० ते ५० दिवस शाळेत गैरहजर राहतात. त्यातून होणारे शैक्षणिक नुकसान खुप मोठे असते. स्वच्छा गृहाचा मुद्दा जितका महत्त्वाचा तेवढाच मुलींना मासिक पाळी दरम्यान स्वस्त आणि दर्जेदार आरोग्यदायी पर्याय उपलब्ध करुन देणे गरजेचे वाटते. त्यातून अस्मिता योजनेची कल्पना समोर आली. अस्मिता योजना ही महिलांना सॅनेटरी नॅपकीन्स पुरविण्यासाठीची महाराष्ट्र सरकारने सुरु केलेली योजना आहे. २०१८ साली सॅनेटरी नॅपकीन परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध करण्यासाठी किशोरी मुली, महिला बचत गट यांच्यासाठी रोजगार उपलब्ध आहेत. सॅनेटरी नॅपकीन्सच्या विक्रीसाठी आवश्यक मोबाईल ॲप नोंदणी करण्यासाठी बचत गटाकडून भरपूर प्रतिसाद मिळाले. योजना महाराष्ट्र शासनामार्फत चालविली जाणारी योजना आहे. माफक किंमतीमध्ये शालेय विद्यार्थ्यांना व महिलांना सॅनेटरी नॅपकीन विकत घेणे शक्य व्हावे म्हणून ही योजना बचत गटाच्या माध्यमातून चालविली जाते. बचत गटांनी शाळकरी मुलींना शाळेमार्फत उपलब्ध केलेली अस्मिता कार्ड मिळवणे व ती बचत गटाकडून नॅपकीन खरेदी करताना बचत गटाच्या प्रतिनिधीला दाखविणे आवश्यक आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील महिला व किशोरवयीन मुली तसेच जिल्हा परिषद शाळामधील ११ ते १९ या वयोगटातील किशोरवयीन मुलींमध्ये सॅनेटरी नॅपकीन व वैयक्तिक स्वच्छतेसंदर्भात जाणीव जागृती करणे व त्यांना माफक दरात सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध करुन देण्याकरिता राज्यात अस्मिता योजना राबविण्याच्या बाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे.

उमेद अभियानांतर्गत स्थापन झालेल्या स्वयंसहायता समुह यांच्यामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. त्यामुळे उमेद पुरस्कृत स्वयंसहायता समुह यांच्यासाठी या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधारीन होती.

परिपत्रक :

अस्मिता योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या. शाळेतील मुलींसाठी सॅनेटरी नॅपकिनची खरेदी व विक्री किंमत खालीलप्रमाणे

| अ. क्र. | लाभार्थी | सॅनेटरी नॅपकीनचा आकार | उमेद पुरस्कृत स्वयंसहायता समुहासाठी खरेदी किंमत | स्वयंसहायता समुहाचा प्रशासकीय खर्च | विक्री किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ग्रामीण सामान्य महिला | २४० मि. मी. | रु. १९.२०/- | रु. ४.८०/- | रु. २४ |
| 2 | ग्रामीण सामान्य महिला | २८० मि. मी. | रु. २३.२०/- | रु. ५.८०/- | रु. २९ |

| अ. क्र. | लाभार्थी | सॅनेटरी नॅपकीनचा आकार | उमेद पुरस्कृत स्वयंसहायता समुहासाठी खरेदी किंमत | स्वयंसहायता समुहाचा प्रशासकीय खर्च | विक्री किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा परिषद शाळेतील ११ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुली | २४० मि. मी. | रु. ४.००/- | रु. १.००/- | रु. ५ |

या योजनेअंतर्गत उमेद पुरस्कृत स्वयंसहायता समुहाची

(SHG) सॅनेटरी नॅपकीनची मागणी नोंदविण्यासाठी व त्यांचा पुरवठा करण्यासाठी अस्मिता (ASMITA) या नावाच्या स्वतंत्र मोबाईल ॲपचा वापर करावा.

**स्वयंसहायता समुह यांनी अनुसरण्याची पध्दत**

**नोंदणी प्रक्रिया :**

१. स्वयंसहायता समुह यांनी नोंदणीसाठी सर्वप्रथम Play Store वरुन ASMITA App Download करावे.

२. त्यानंतर स्वयंसहायता समुहाचे APP वर NIC कोड टाकावा त्यानंतर नोंदणीसाठी आवश्यक असलेला OTP स्वयंसहायता समुहाच्या नोंदणीकृत मोबाईलवर येईल व नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल.

३. जर एखाद्या स्वयंसहायता समुहाचा मोबाईल क्रमांक NIC च्या SHG Portal वर नोंदणीकृत नसेल तर त्या स्वयंसहायता समुहाची Asmita App वर नोंदणी करणे शक्य होणार नाही. त्यांनी NIC च्या SHG Portal वर त्यांच्या मोबाईल क्रमांकाची प्रथम नोंदणी करणे आवश्यक राहिल.

**सॅनेटरी नॅपकिनची ऑनलाईन मागणी नोंदविणे :**

स्वयंसहायता समुहांनी नॅपकिनची मागणी ॲपवर नोंदवावी ही मागणी करताना Asmita App मध्ये असलेल्या वॅलेटमध्ये पुरेशी रक्कम असणे आवश्यक आहे. यासाठी स्वयंसहायता समुहांनी वेळोवेळी या वॅलेटमध्ये पुरेशी रक्कम रिचार्ज करणे आवश्यक आहे. हा रिचार्ज कोणत्याही आपले सरकार सेवा केंद्रात करता येईल किंवा क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, रुपे कार्ड इत्यादीचा वापर करुन करता येईल.

सदर मागणी नोंदविताना प्रत्येक नॅपकीनची १४० पॅकेटच्या पटीत मागणी नोंदविणे आवश्यक आहे. उदा. ग्रामीण भागातील महिलांसाठी २४० मि. मी. चे किमान १४० पॅकेट किंवा २८० मि. मी. चे किमान १४० पॅकेट किंवा किशोरवयीन मुलीसाठी २४० मि. मी. चे किमान १४० पॅकेटची मागणी नोंदवावी.

**साहित्य परिक्षण :**

ग्रामीण भागातील फक्त १७ टक्के महिला ह्या मासिक पाळीच्या वेळी सॅनेटरी नॅपकीनचा वापर करतात उर्वरित मुलींना सॅनेटरी नॅपकीनच्या वापराअभावी विविध आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागते. मासिक पाळीविषयी समाजात असलेले गैरसमज दूर करणे गरजेचे आहेत. तसेच मुली आणि महिलांना स्वस्तात सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध होणे गरजेचे आहे. यासाठीच ग्रामविकास विभागामार्फत अस्मिता योजना जाहीर करण्यात आली. ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना फक्त ५ रुपयामध्ये ८ सॅनेटरी नॅपकीन देण्याची योजना ग्रामविकास विभागांतर्गत उमेद अभियानामार्फत राबविली जात आहे. या योजनेची सुरुवात महिला दिनापासून म्हणजे ८ मार्चपासून अस्मिता योजना सुरु करण्यात आलेली आहे. (https://mr.vikaspedia.in ०९/०३/२०१८)

**मुलींना मिळणार अस्मिता कार्ड :**

अस्मिता योजनेतून जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलींना २४० मीमीच्या ८ पॅडचे पॉकीट ५ रुपयामध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यासाठी किशोरवयीन मुलींची आपले सरकार सेवा केंद्रामार्फत नोंदणी करुन त्यांना अस्मिता कार्ड देण्यात येणार आहे. अस्मिता कार्डधारक किशोरवयीन मुली बचत गटाकडून सॅनेटरी नॅपकीन खरेदी करतील. पहिल्या टप्प्यात राज्यातील ७ लाख मुलींना अस्मिता कार्ड देण्यात येणार आहेत. अस्मिता कार्डधारक किशोरवयीन मुलींना ५ रुपयाप्रमाणे विक्री केलेल्या पॅकच्या संख्येच्या प्रमाणात प्रती पॅकेट १५.२० रुपयाप्रमाणे अनुदान शासन बचतगटांना देणार आहे. किशोरवयीन मुलींना वर्षभरात १३ पॉकीटे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. (https://maharashtratime.com ०७/१०/२०१८)

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मोबाईल ॲप तयार करण्यात आला असून नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते त्याचे अनावरण करण्यात आले. या ॲपच्या माध्यमातून महिला बचतगट हे नॅपकीनची मागणी ऑनलाईन नोंदवतील, नोंदवलेल्या मागणीनुसार वितरक त्यांना पुरवठा करतील. या योजनेचा लोगो आणि डिजिटल अस्मिता कार्ड यांचेही अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात करण्यात आले. ॲप, अस्मिता कार्ड, वेबपोर्टल हे येस बँक महाऑनलाईन व केपीएमजी यांच्या सहाय्याने तयार करण्यात आले आहे.

**महिलांनाही मिळणार माफक दरात सॅनेटरी पॅड :**

अस्मिता योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांनाही माफक दरात सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. महिलांना २४० मिमिच्या ८ पॅडचे एक पॉकीट २४ रुपयांना तर २४२ मिमिच्या ८ पॅडचे पॉकीट २९ रुपयांना उपलब्ध होणार आहे. बचतगट हे वितरकांकडून सॅनेटरी नॅपकीनचे पॉकीट खरेदी करुन परस्पर विक्री करणार आहे.

मुख्यमंत्री ठरले पहिले अस्मिता प्रायोजक अस्मिता फंडाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला आहे.

(https://mahaasmitamahaonline.gov.in)

या वेबपोर्टलद्वारे ग्रामीण भागातील मुली व महिलांना सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध होण्यासाठी लोक अस्मिता स्पॉन्सर (अस्मिता प्रायोजक) होऊ शकतील. या निधीतून ग्रामीण भागातील मुलींना सॅनेटरी नॅपकीन मिळण्यासाठी लोकसहभागातून मोठी मदत उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्री अस्मिता फंडाचा शुभारंभ करताना ५० मुलींना १२ महिने सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध करुन देण्यासाठी ऑनलाईन रक्कम वर्ग करुन त्या ५० मुलींची अस्मिता स्पॉन्सरशीप स्वीकारली. अस्मिता स्पॉन्सरशीप स्वीकारणारे मुख्यमंत्री श्री फडणवीस हे पहिले ठरले. ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी १५१ मुलींना १२ महिने सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध करण्यासाठी ऑनलाईन रक्कम वर्ग करुन या १५१ मुलींची अस्मिता स्पॉनरशीप स्वीकारली. (https://www.yojananaschemehindi.co १७ नोव्हेंबर २०१८)

**अध्ययनाचे उद्देश :**

१. अस्मिता योजनेबद्दल शासनाद्वारा करण्यात आलेल्या जनजागृतीचे अध्ययन करणे.

२. किशोरवयीन मुलींच्या सॅनेटरी नॅपकीनच्या वापरामुळे आरोग्यावर झालेल्या परिणामाचे अध्ययन करणे.

**क्षेत्र :**

सदर अध्ययनासाठी क्षेत्र म्हणून कुंभारी, देवधरी व येरणगाव ता. घाटंजी जि. यवतमाळ या गावांची निवड करण्यात आलेली होती.

**तथ्य संकलनाचे स्त्रोत :**

प्रस्तुत अध्ययन करण्यासाठी तथ्य संकलन करताना उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून अध्ययनासंबंधित तथ्य गोळा करण्यात आली तसेच दुय्यम स्त्रोतामध्ये लिखित व अलिखित साहित्यांचा समावेश करण्यात आला. तसेच त्यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, इंटरनेट, पुस्तके, दैनंदिन वृत्तपत्रे इत्यादींपासून जमा करण्यात येणाऱ्या तथ्यांचा समावेश करण्यात आला.

**अस्मिता योजनेबद्दल माहितीचा स्त्रोत :**

अस्मिता योजना ही मुलींसाठी सुरु करण्यात आली जेणेकरुन गरीब मुली किंवा ज्या मुली महागड्या पॅडस वापरु शकत नाही त्यांच्याकरिता सुरु करण्यात आली. ही योजना सुरु झाल्यानंतर गावखेड्यामधून या योजनेचा प्रसार होणे गरजेचे आहे. याकरिता अशावर्कर, दाई यांनी हे कार्य करणे अपेक्षित आहे. सदर अध्ययनात अस्मिता योजनेबद्दल मुलींना कुणाकडून माहिती झाली हे पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. १**

**अस्मिता योजनेबद्दल माहितीचा स्त्रोत दर्शक सारणी**

| अ.क्र. | विषय | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | आई | ३० (४६.८८%) | ३४ (५३.१२%) | ६४ (१००%) |
| २ | बहिण | ३० (४६.८८%) | ३४ (५३.१२%) | ६४ (१००%) |
| ३ | मैत्रिण | ४८ (७५.००%) | १६ (२५.००%) | ६४ (१००%) |
| ४ | शिक्षक | ०७ (१०.९४%) | ५७ (८९.०६%) | ६४ (१००%) |
| ५ | दाई | १३ (२०.३१%) | ५१ (७९.६९%) | ६४ (१००%) |
| ६ | अशावर्कर | १० (१५.६२%) | ५४ (८४.३८%) | ६४ (१००%) |
| ७ | अंगणवाडी सेविका | १५ (२३.४४%) | ४९ (७६.५६%) | ६४ (१००%) |
| ८ | वृत्त पत्रातून | १९ (२९.६९%) | ४५ (७०.३१%) | ६४ (१००%) |
| ९ | प्राथमिक आरोग्य केंद्रातून | ०९ (१४.०६%) | ५५ (८५.९४%) | ६४ (१००%) |
| १० | डॉक्टर/नर्स | ०० (००.००%) | ६४ (१००.००%) | ६४ (१००%) |

**निष्कर्ष :**

प्रस्तुत स्पष्टीकरणावरुन असा निष्कर्ष निघतो की, शासनाने किशोरवयीन मुलींकरिता सुरु केलेल्या अस्मिता योजनेबद्दल माहिती मैत्रिणीकडून मिळालेली दिसून येते कारण ते इतरांपेक्षा मैत्रिणीसोबत अधिक मोकळेपणाने चर्चा करतात.

**सॅनिटरी नॅपकीन वापरात वाढ :**

शासनाने राबविलेल्या सदर योजनेअंतर्गत सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धी होत आहे. या नॅपकीच्या वापरामध्ये वाढ झाली काय हे जाणून घेण्याकरिता सदर प्रश्न अध्ययनात समाविष्ट करण्यात आलेला आहे.

**सारणी क्र. २**

**शासनाद्वारे करण्यात आलेल्या जनजागृतीमुळे सॅनिटरी नॅपकीन वापरात वाढ झाली या विधानाशी सहमती दर्शक सारणी**

| अ.क्र. | विवरण | उत्तरदाता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्णतः सहमत | २८ | ४३.७५ |
| २ | अंशतः सहमत | ३६ | ५६.२५ |
| ३ | पूर्णतः असहमत | ०० | ००.०० |
| एकूण | | ६४ | १०० |

**स्पष्टीकरण :**

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण ६४ (१००%) उत्तरदात्यांपैकी शासनाद्वारे करण्यात आलेल्या जनजागृतीमुळे सॅनिटरी नॅपकीन वापरात वाढ झाली या विधानाशी

पूर्णतः सहमत असणारे उत्तरदाते २८ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४३.७५ आहे तर शासनाद्वारे करण्यात आलेल्या जनजागृतीमुळे सॅनिटरी नॅपकीन वापरात वाढ झाली या विधानाशी अंशतः सहमत असणारे उत्तरदाते ३६ असून त्यांचे शेकडा प्रमाण ५६.२५ आहे.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत स्पष्टीकरणावरुन असा निष्कर्ष निघतो की, शासनाद्वारे जनजागृती करण्यात आल्यानंतर सुध्दा अस्मिता योजनेअंतर्गत मिळणा-या पॅडच्या वापरात अंशतः वाढ झाल्याचे दिसून येते म्हणजेच जनजागृती हवी त्याप्रमाणात करण्यात आली नाही.

**सारणी क्र. ३**

**पॅड वापरामुळे आरोग्यावर झालेले सकारात्मक परिणाम दर्शक सारणी**

| अ.क्र. | विषय | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | पॅड वापरल्यामुळे सुरक्षित वाटते [illegible] | ५४ (८४.३८%) | १० (१५.६२%) | ६४ (१००%) |
| २ | इजा होत नाही | ३४ (५३.१२%) | ३० (४६.८८%) | ६४ (१००%) |
| ३ | डाग लागण्याची भीती नसते [illegible] | २८ (४३.७५%) | ३६ (५६.२५%) | ६४ (१००%) |
| ४ | [illegible] भीती नसते | ४० (६२.५०%) | [illegible] | ६४ (१००%) |
| ५ | दैनंदिन काम करण्याच्या क्षमतेत वाढ झाली | २८ (४३.७५%) | ३६ (५६.२५%) | ६४ (१००%) |
| ६ | | ३९ (६०.९४%) | २५ (३९.०६%) | ६४ (१००%) |
| ७ | | २६ (४०.६२%) | ३८ (५९.३८%) | ६४ (१००%) |

**निष्कर्ष :**

प्रस्तुत स्पष्टीकरणावरुन असा निष्कर्ष निघतो की, मासीक पाळीदरम्यान इतर परंपरागत साधनापासून मिळणाऱ्या सुरक्षिततेबाबत त्यांच्यामध्ये भीती असते ती भीती अस्मिता पॅडचा वापर केल्यामुळे दूर होण्यास मदत झाली आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

माडीवाले लीला (२००७). वैयक्तिक आणि सामाजिक आरोग्य. नागपूर : अनंत प्रकाशन.

कतरणी स्फुर्ती (जुन २०१२). मानसशास्त्र मानवी वाढ व विकास. नागपूर : साईनाथ प्रकाशन.

लांजेवार ज्योती (२८ मार्च २००५). भारतीय समाज आणि स्त्री. पुणे : सुगावा प्रकाशन.

दैनिक लोकमत वार्ता ५ मे २०१७

https://abpmajha.in

https://vikaspedia.in ०४/०१/२०२०

https://maharashtratime.com ७ Oct. २०१८

https://muhausmitamahaonline.gov.in

https://www.yodunanaschemehindi.co

१७ Nov. २०१८

□□□

# 2021-22

| | | | |
|---|---|---|---|
| 58 | संविधाननिर्मितीच्यामाध्यमातूनभारतीयराष्ट्रउभारणीतीलडॉ.बाबासाहेबआंबेडकरांचेयोगदान<br>डॉ.होमराजटी.राठोड | 293-298 | Download |
| 59 | समताधिष्ठितसमाजाच्यानिर्मितीतडॉ.बाबासाहेबआंबेडकरांचे योगदान<br>डॉ.बी.एच.किर्दक | 299-305 | Download |
| 60 | "भारतीय समाजषास्त्राच्याविकासातडॉ. जी. एस. घुर्ये यांचे योगदान एक समाजशास्त्रीय अध्ययन"<br>प्रा. किशनकाशिनाथ घोगरे | 306-310 | Download |
| 61 | 19व्याशतकातीलमहाराष्ट्रातीलसामाजिकचळवळीचेऐतिहासिकअध्ययन<br>प्रा. नितिननागनाथमुंडलोड | 311-316 | Download |
| 62 | डॉ.बाबासाहेबआंबेडकरांचेराष्ट्र उभारणीत योगदान<br>डॉ.पुरूषोत्तमरा. बांडे | 317-320 | Download |
| 63 | लोकशाहीतीलसर्वातमोठाअडसर.....जातिवाद<br>डॉ.राजेंद्रश्री.कोरडे | 321-325 | Download |
| 64 | डॉ. पंजाबरावदेशमुखयांचेराष्ट्रउभारणीसाठीयोगदान-एकआढावा<br>सहा.प्रा.स्मितारामेश्वरदेवर | 326-337 | Download |
| 65 | राष्ट्रनिर्मितीमध्ये महिलांचा अविरत संघर्ष आणि योगदान<br>डॉ. तक्षशिला मोटघरे | 338-341 | Download |
| 66 | राष्ट्र निर्माणामध्ये भारतीय महिलांचासहभाग<br>डॉ. अस्मिताआर. ठोंबरे | 342-344 | Download |
| 67 | भारतरत्नडॉ. बाबासाहेबआंबेडकरयांचेराष्ट्रउभारणीतीलयोगदान : एकसमाजशास्त्रीयअभ्यास<br>प्रा.लक्ष्मणबापूरावनैताम | 345-349 | Download |
| 68 | श्स्त्रीमुक्तिचळवळीश<br>प्रा. पांडुरंगरुस्तुमपाचपुते | 350-352 | Download |
| 69 | डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांचेसमाजसुधारणाबाबतचेविचार<br>डॉ. आर. एम. सरपाते | 353-356 | Download |
| 70 | राल्ट्रउभारणीमध्ये महिलाचळवळीचे योगदान<br>विषेशसंदर्भः स्वातंत्र्यपुर्वकाळातीलचळवळी | 357-360 | Download |

वर्तणुकीत घडवून आणावे लागेल. तरच कुठे आदर्श समाजाची पाने- मुळे हे रुजतील व भविष्यात त्याचे सकारात्मक फळ दिसतील.

भारतातील महिलांची सद्यस्थिती :

सद्यस्थितीत महिला म्हणजे चूल आणि मूल ही संकल्पना बदलत चाललेली दिसून येते. पण तरीही पुरुषवर्गानी महिलांची शक्ती आणि सामर्थ्याची दखल घेऊन कौटुंबिक व सामाजिक स्तरावर त्यांना समानता प्रदान केली पाहिजे . सोबतच महिलांनी स्वतःच्या कार्यशक्तीबद्दलची जाणीव ठेवून, आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि आपल्या राष्ट्रासाठी काय करावयास हवे? हे देखील विचारात घेणे महत्त्वाचे आहे.

मार्टिन ल्यूथर यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास,"महिला म्हणजे कुटुंबातील मातृशक्ती म्हणून जरी पाहिले जात असले, तरी त्यांचे स्थान घरात आहे परंतु महिलांनी स्वतः लक्षात घ्यावयास हवे की, त्यांच्यापासून निर्मिती झालेले अपत्य, भविष्यात त्यांची कार्य, राष्ट्राच्याबांधणीकरिता, भवितव्य घडविण्याकरिता महत्त्वाची भूमिका बजावत असते, त्यामुळे जरी सामान्यपणे त्यांच्याकडे दुय्यम दर्जाच्या दृष्टीकोनातून बघत असले तरीतिची पाल्य, घडण्यामागील भूमिका व आदर केलाच पाहिजे."

परंपरेने महिलांवर वर्षानुवर्षे कौटुंबिक व धार्मिक निर्बंध लावून त्यांना सिमित वातावरणात ठेवले, पण आता मात्र त्या त्यांच्या परीसीमेच्या बाहेर निघत आहेत तरीही.हे सत्य नाकारता येत नाही की अशा महिलांची संख्या अल्प आहे. आजही मूठभर महिला अत्युच्च ठिकाणी पोहोचल्या आहेत.

भारतीय समाजात स्त्रीयाकरिता स्त्री पुरुष समानतेच तत्व मान्य करून अनेक क्रांतिकारी ,पुरुष प्रस्थापित व्हावी - पाऊलशासनाने उचललेले आहेत्यात स्त्रियांना कोणत्याही क्षेत्रात शिक्षण व नोकरी करण्याचे स्वातंत्र्य व संधी उपलब्ध . राजकीय व सामाजिक दृष्ट्या प्रभावरित्या आपले मत प्रकट करून आपली योग्यता ,महिलांनी आर्थिक .करून दिलेली आहे सिद्ध करता यावी याकरिता आपले सरकार प्रयत्नशील दिसून येतेया अनुषंगाने स्त्रियांनी विविध क्षेत्रात आपली प्रगती . .साधून घेतलेली आहे

निष्कर्ष :

१भारतीयस्वातंत्र्यलढ्यातराष्ट्रीयत्वाची भावना जपत महिलांचेराजकीयवसामाजिकस्तरावरील आंदोलनातयोगदान हे . .विशेषहोते

२. देशातील महिलांनात्यांच्या मुलभूत अधिकार◌ासोबत मतदानाचाअधिकारप्राप्तकरण्यासाठीदेखीलसंघर्षकरावालागला.

३. देशविकासामध्ये महिलांचेराजकीयक्षेत्रातीलप्रतिनिधीत्वामुळेत्यांना नेतृत्वकरण्याचीसंधी मिळाली असून आता त्यांना महिलाअत्याचार निर्मुलानाविषयीबाजूमांडता येऊ शकत आहे.

In the Globalized world Identity of Nation is getting blurred due to globalization process and rise of International level organization like United Nation, WTO. Further making this task easier. Countries are rapidly merging and has become Global village, upsurge in the technological development, advancement in communication and business expansion has brought rest of the world much more closure, world is sinking very fast hence it is very essential to have separate, distinct independent identity of each nation, sovereignty of country should be given topmost priority. National identity should not get submerged with world that should remain intact and it is better for whole world to maintain diversity and existence of Nation.

Foreign and colonial Invasion has disturbed the fabric of Nation Outside elements further tried to create havoc and change the very course of nation, slowly due to this foreign invasion nationalism movement began to take shape and rise strong adverse condition has force people to gather and be a part of movements and fight for their rights. In this way strong form of Nationalism has taken shape in history

In the context of India Invasion of colonial rule was instrumental in the rise of strong form of nationalism, their exploitative and brutal policy force India to come together and unite for their freedom, irrespective of various differences like culture, religion, caste, region, concept of nation surfaced, whole country gathered for the common problem they faced and began to work towards single goal i.e. Independence. Social movement all over India taken shape in their respective region for Independence and this led to rise of nationalism Indian people dreamed about separate nation and this national movement resulted in Independence. After independence freedom fighter and Nation builders tried to build nation of their dream through process like making of constitution . Constitutional provision was framed in such manner that detailed description of territory land, people was incorporated, and other provision was inserted to make assure that no one could not get scope to secede.

Constitution holds whole country together to build nation and this was the foundation for nation building process and nation began to take shape, but was this steps enough to a build Nation? If we look at post- independence history many separatist movements has taken place, movement of khalistan is one of such examples, then question arise what makes such separatist movement to rise? What makes this types movement to surface or upsurge? If we try to look at the reason behind this we probably find several reasons behind that for instances religious

fundamentalism, regionalism, underdevelopment, etc. were the reason which has disturbed very fabrics of nation. This has made India to rethink about National unity. Then question arises Do we have Concept of nation in India in actual sense? Patriotic Feeling towards our country is not as strong as we find in other country, serious measures need to be taken towards Nation building then another question surface, What needs to be done to make convert country into nation?

Developing country like India surrounded by various problems like Corruption, Unemployment, illiteracy, Population, Poverty, cast and religious issues, communal riots, economical backwardness, weak health system, these problems weakens nation building process, Country like India having several challenges are more prone and susceptible to deteriorate national fabric and further detrimental to nation building process.

Nation building requires strong foundation and strict implementation of law, support of citizens, patriotic feeling, balance development, any nation to form requires skilled and educated population, socio-economic development, physical development merely infrastructural development will not suffice, Quality and value-base education, strong health system, environmental protection, economic growth, nation character, Overall development is necessary for nation to develop, Nation building is a crucial process requires proper planning and implementation of policy. Constitutional provisions are not sufficient proper functioning of machinery or agency, controlling mechanism, and mission oriented approach, sustainable development approach are necessary. Nation building is a multidimensional concept holistic development is prerequisite in nation building process. Country like India having Multi-religious, Multicultural, Multi-linguistic, Multi-caste, Multi-class, and regional groups structure to bind such a diverse section together is a difficult task, Makers of Constitution have carefully drafted provision to build India together (Article 3) with specifying boundaries and detailed provisions and adoption of strong center, but in real sense have we achieved nation building is question need to be asked again and again. We are far behind to achieve nation building in actual sense. Development from various corners is necessary various vulnerable sections like women, backward sections needs to be incorporated. Sustainable and inclusive development is the need of hour then only national & patriotic feeling will gets inculcated in every citizens mind else nation building will be superficial without gravity. Citizens must feel proud identifying with Nation and that will come with overall development and prosperity. India must strive towards Nation building through emotional and psychological level too then only it will persist lifelong and strong form of nation building will be visible.

Maintenance of national identity is a serious challenge now a day due the process of Globalization, Special effort need to be taken of Nation building for existence.

## II. REFERENCES


[1]. Ackerman, B., We the People, Volume 1: Foundations (Cambridge, MA: Harvard University Press, 1993)

[2]. Austin, R., ‘Constitutional Reform Processes’, in Sachs, A. et al., Writing Autobiographies of Nations: A Comparative Analysis of Constitutional Reform Processes (The Hague: Netherlands Institute for Multiparty Democracy, 2009)

[3]. Eric Martin, "Nation building in Bosnia and Herzegovina: Cooperation, coordination and collaboration." South East European Journal of Economics and Business 2.2 (2007): 7-22

[4]. Ignatieff, Michael. Empire lite: nation building in Bosnia, Kosovo, Afghanistan. Random House, 2003.

[5]. Paul Dibb, "The Soviet experience in Afghanistan: lessons to be learned?" Australian Journal of International Affairs 64.5 (2010): 495-509

PRINT ISSN : 2395-6011
ONLINE ISSN : 2395-602X

CONFERENCE PROCEEDINGS

IJSRST

# International Multidisciplinary E-Conference On Contribution of Various Aspects In Nation Building

Date : 11th to 13 th October 2021

Organised by

Department of [ English, Marathi, Sociology, History, Commerce, Home Economics, Chemistry, Botany and Mathematics ]
Shetkari Shikshan Sanstha's
Arts, Commerce & Science College, Maregaon Dist. Yavatmal, Maharastra, India

# INTERNATIONAL JOURNAL OF SCIENTIFIC RESEARCH IN SCIENCE & TECHNOLOGY

VOLUME 9 - ISSUE 5 , SEPTEMBER-OCTOBER-2021

Email : editor@ijsrst.com Website : http://ijsrst.com

| | | | |
|---|---|---|---|
| 58 | संविधाननिर्मितीच्यामाध्यमातूनभारतीयराष्ट्रउभारणीती लडॉ.बाबासाहेबआंबेडकरांचेयोगदान<br>डॉ.होमराजटी.राठोड | 293-298 | Download |
| 59 | समताधिष्ठितसमाजाच्यानिर्मितीतडॉ.बाबासाहेबआंबेडकरांचे योगदान<br>डॉ.बी.एच.किर्दक | 299-305 | Download |
| 60 | "भारतीय समाजषास्त्राच्याविकासातडॉ. जी. एस. घुर्ये यांचे योगदान एक समाजशास्त्रीय अध्ययन"<br>प्रा. किशनकाशिनाथ घोगरे | 306-310 | Download |
| 61 | १९व्याशतकातीलमहाराष्ट्रातीलसामाजिकचळवळीचेऐ तिहासिकअध्ययन<br>प्रा. नितिननागनाथमुंडलोड | 311-316 | Download |
| 62 | डॉ.बाबासाहेबआंबेडकरांचेराष्ट्र उभारणीत योगदान<br>डॉ.पुरूषोत्तमरा. बांडे | 317-320 | Download |
| 63 | लोकशाहीतीलसर्वातमोठाअडसर.....जातिवाद<br>डॉ.राजेंद्रश्री.कोरडे | 321-325 | Download |
| 64 | डॉ. पंजाबरावदेशमुखयांचेराष्ट्रउभारणीसाठीयोगदान-एकआढावा<br>सहा.प्रा.स्मितारामेश्वरदेवर | 326-337 | Download |
| 65 | राष्ट्रनिर्मितीमध्ये महिलांचा अविरत संघर्ष आणि योगदान<br>डॉ. तक्षशिला मोटघरे | 338-341 | Download |
| 66 | राष्ट्र निर्माणामध्ये भारतीय महिलांचासहभाग<br>डॉ. अस्मिताआर. ठोंबरे | 342-344 | Download |
| 67 | भारतरत्नडॉ. बाबासाहेबआंबेडकरयांचेराष्ट्रउभारणीतीलयोगदान : एकसमाजशास्त्रीयअभ्यास<br>प्रा.लक्ष्मणबापूरावनैताम | 345-349 | Download |
| 68 | ॠस्त्रीमुक्तिचळवळीॠ<br>प्रा. पांडुरंगरुस्तुमपाचपुते | 350-352 | Download |
| 69 | डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांचेसमाजसुधारणाबाबतचेविचार<br>डॉ. आर. एम. सरपाते | 353-356 | Download |
| 70 | राल्ट्रउभारणीमध्ये महिलाचळवळीचे योगदान विषेशसंदर्भ: स्वातंत्र्यपुर्वकाळातीलचळवळी | 357-360 | Download |

International Multidisciplinary E- Conference On Contribution of Various Aspects In Nation Building
In Association with International Journal of Scientific Research in Science and Technology
Volume 9 | Issue 5 | Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# संविधान निर्मितीच्या माध्यमातून भारतीय राष्ट्र उभारणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

डॉ. होमराज टी. राठोड
समाजशास्त्र विभाग महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, यवतमाळ

**गोषवारा :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे खऱ्या अर्थाने शिल्पकार आहेत. अनेक विषयाच्या त्यांच्या चिंतनशील अभ्यासातून या देशातील सामाजिक, आर्थिक, भौतिक आणि वैज्ञानिक या सर्वच ज्ञानशाखांना एक नवी दिशा मिळाली. डॉ. आंबेडकर हे एक द्रष्टे शिक्षणतज्ञ, अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक समाजशास्त्रज्ञ तत्ववेत्ते, राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक कायदेतज्ञ अशा अनेक अंगांनी त्यांचे जीवन कार्य व्यापले आहे. या देशात प्रस्थापीत झालेली व रुजलेली जातीव्यवस्था त्याला आधारभूत ठरलेली धर्मव्यवस्था व त्यातून उद्भवलेली जाचक अस्पृश्यता व त्यातून माणसांचे शोषण याविरुध्द डॉ. आंबेडकरांचा लढा हा जागतिक संदर्भ लाभलेला वर्णमुक्तीचा, शोषणमुक्तीचा व मानवतेच्या प्रस्थापनेचा महत्त्वाचा भाग ठरला आहे.

राष्ट्र म्हटले की राष्ट्रात लोक अंतर्भुत असतात आणि भारतीय समाज व्यवस्थेत लोकांमध्ये अनेक अडथळे आहेत जसे विकोपाला गेलेली जातीव्यवस्था होती म्हणजे जातीभेद, लिंगभेद, आर्थिक विषमता ह्या सर्व बाबी राष्ट्राला मारक ठरतात. परंतु भारतीय संविधानाने या सर्व बाबींवर मात करुन समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्वाचा स्वीकार करुन सगळयांना संधी निर्माण करुन प्रवाहात आणण्याचे काम करुन राष्ट्रउभारणीला हातभार लावला आहे आणि म्हणून संविधानाची वैशिष्ट्ये लक्षात घेता भारतीय संविधान जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे. लोकांची सार्वभौमत्ता हे संविधानाचे ब्रिद असून गणतंत्र लोकशाही प्रणाली आपण स्वीकारली आहे. लोकशाही समाजाभिमुख करण्यासाठी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व प्रसार माध्यमे हे चार मजबूत स्तंभ आहेत. संपूर्ण जगाने स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाकारलेला असताना एक व्यक्ती एक मत एक मूल्य हा महामंत्र देऊन भारतीय स्त्रीला मतदानाचा अधिकार देऊन व समान संधी देऊन राष्ट्राची अर्धी शक्ती उपयोगात आणली तसेच शिक्षणामुळेच वंचितांचा विकास होतो हे लक्षात घेऊन प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. नागरिकांच्या जीवनात पूर्ण सुरक्षितता असल्याशिवाय त्यांना लोकशाहीच्या जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडता येत नाही. स्वत:चा आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रत्येकाला संधी प्राप्त झालीच पाहिजे म्हणून भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम 12 ते 35 पर्यंत मूलभूत अधिकार संविधानाने प्रत्येकाला बहाल केले आहे म्हणून संविधान निर्मितीच्या माध्यमातून भारतीय राष्ट्र उभारणीला डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मोठे योगदान आहे.

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेच्या इतिहासाचा आढावा घेताना आपल्या असे लक्षात येते की, भारतीय समाजव्यवस्था ही अतिशय गुंतागुंतीची असल्याचे सहज आपल्या लक्षात येते. वेगवेगळया कालखंडातून ही समाजव्यवस्था जात असताना वेगवेगळया समस्या असल्याचे दिसते. परंतु मध्ययुगीन समाज व्यवस्थेत असणारी जातीव्यवस्था आणि स्त्रियांची स्थिती पाहिली असता भारतीय संस्कृती ही केविलवाणी वाटल्याशिवाय राहात नाही. जातीव्यवस्थेत उच्च जातीला सगळया सवलती व कनिष्ठ जातीला त्या सगळया सवलतीपासून वंचित ठेवणारी व्यवस्था तसेच स्त्रियांच्या बाबतीत स्त्रियांकडे एक तर देवता किंवा दासी अशा परस्पर विसंगत दृष्टिकोनातून बघण्यात येऊन तिचे माणूसपण निकाली काढण्यात आले. या दोन्ही वर्गाला सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक अधिकार नाकारुन गुलामीच्या दास्यात अडकविल्यामुळे ही दलित रुपी व स्त्री रुपी शक्ती उपयोगात न आल्यामुळे समाज व्यवस्थेत अनेक अडथळे निर्माण झाले. या शोषणकारी व्यवस्थेमुळे समाजात आर्थिक विषमता निर्माण होऊन राष्ट्राच्या विकासाला बाधा निर्माण झाली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्वतंत्र भारताच्या संविधानानुसार संविधानिक धोरणे राबवून समता, स्वातंत्र्य व बंधुता यावर आधारीत मूलभूत अधिकाराची संकल्पना राबविल्या गेली तसेच समाजाभिमुख अर्थव्यवस्थेचा स्वीकार करुन व सगळयांना समान अधिकार देऊन सर्वसमावेशक विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला यामुळे संविधान निर्मितीनंतर सकारात्मक परिणाम आज पाहावयास मिळतो. चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या जोखडातून सोडवून माणसाला महानायक करणारा त्याच्या सामर्थ्याची आणि त्याच्या सौंदर्याची नवनिर्मिती करु इच्छिणारा सिध्दांत बाबासाहेबांच्या महान प्रतिभेचे अपत्य आहे हा एकूण मानवी जिवनाच्या स्वास्थाचा, समृध्दीचा आणि सभ्यतेचा सिध्दांत आहे जो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीय समाजाला दिला आणि म्हणूनच

संविधान निर्मितीच्या माध्यमातून भारतीय राष्ट्र उभारणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अतिशय मोलाचे आहे असे म्हणणे योग्य ठरेल.

**उद्देश :**

1. भारतीय राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अभ्यासणे.
2. राष्ट्र उभारणीत अडथळे, उपाययोजना व सकारात्मक परिणामांचा तुलनात्मक विवेचन करणे.

**भारतीय राष्ट्र उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्राच्या उभारणीत फार मोठे योगदान आहे. कारण भारत हा देश मुळातच वेगवेगळ्या जातीत, धर्मात, पंथात अशा वेगवेगळ्या गटात आणि उपगटात विभाजीत झालेला समुदाय आहे. अशा विविधतेने नटलेल्या समाजाला एकसंघ करणे सोपे काम नव्हते. परंतु डॉ. आंबेडकरांच्या दुरदृष्टी धोरणाने संविधानाच्या माध्यमातून ही किमया डॉ. आंबेडकरांनी साधली. समता, स्वातंत्र्य व बंधुता आणि सुरक्षितता असल्याशिवाय समाज व प्रामुख्याने राष्ट्राची प्रगती होणार नाही ही बाब हेरुन डॉ. आंबेडकरांनी सगळयाच क्षेत्रात न्याय देण्याचे काम केले. जसे सामाजिक,आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात महिलांना आणि दलितांना प्रवाहात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात समानतेची संधी संविधानाच्या माध्यमातून निर्माण करुन दिली. म्हणून स्वातंत्र्याच्या या 75 वर्षात समाज व्यवस्थेत आमुलाग्र बदल पाहावयास मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हे अखिल मानव जातीच्या सर्वांगीण उन्नती व उत्थानासाठी उपयोगी सिध्द झाले आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक विचारांचा उल्लेख तर महत्त्वाचा ठरतोच पण राष्ट्राची अर्धी शक्ती असणारी महिलांच्या प्रगतीच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, स्त्रियांची गुणवत्ता वाढली तर समाजाला आणि पर्यायाने राष्ट्राला त्याचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले त्यामुळेच आज स्त्रीया सगळयात क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवीत आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानवी विकास व कल्याणाच्या प्रक्रियेतील सर्वोच्च व्यक्तीमत्त्व होय. भारताच्या एकता व अखंडतेला धक्का न लावता सर्व जाती, धर्म आणि राष्ट्राच्या विकासाला प्राधान्य दिले. मानवाच्या सर्वांगीण विकासाकरिता सामाजिक, आर्थिक विषमता नष्ट करुन राष्ट्राच्या विकासाचा पाया घातला आणि म्हणूनच समताधिष्ठित समाजरचना निर्माण करुन राष्ट्राच्या उभारणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अधिक मोलाचे आहे.

**राष्ट्र म्हणजे काय राष्ट्राचा अर्थ :**

Nation राष्ट्र हा शब्द Natus ह्या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे. नेशन या शब्दाचा अर्थ 'जन्म' अथवा 'वंश' असा होतो. याचाच अर्थ राष्ट्र या संकल्पनेचा संबंध वंशाशी वा जन्माशी असतो. ऐतिहासिक परंपरा, भाषा, वंश, धर्म, समान हितसंबंध व समान राजकीय आकांक्षा ह्यामुळे इतर लोकसमुदायापासून स्वत:ला वेगळा समजणारा समाज म्हणजे राष्ट्र होय. थोडक्यात भूभाग, लोकसंख्या, सार्वभौमत्व या सगळयाच मिळून बनणाऱ्या घटकाला तसेच आपला इतिहास एक आहे. संस्कृती एक आहे. तसेच आपले भवितव्य देखील एकच आहे असे जेव्हा तेथील लोकसमुदायाला वाटते तेव्हा त्याला राष्ट्र असे म्हणतात.

**राष्ट्राच्या प्रगतीतील अडथळे अर्थात संविधान निर्मिती पूर्वी :**

**धर्मांधता :** आपल्या देशाच्या समाज जीवनात आज विविध प्रकारच्या रुढीरवादी कृती शक्ती इतक्या व्यापक प्रमाणात सक्रीय झालेल्या आहेत की हा देश उभा कसा आहे याचेच आश्चर्य समाज चिंतकांना वाटते आहे. धर्मांधतेने पछाडलेल्या शक्तींनी केवळ लोकांच्या ऐक्य भावनेवर प्रहार केले आहेत तर भारताच्या जवळपास सर्वच भागात राष्ट्रीय ऐक्य धोक्यात आणले आहे. म्हणूनच धर्मांधता हे राष्ट्राच्या विकासात बाधा आणणारे घटक ठरले आहे.

**शोषणकारी व्यवस्था :**

भारतावर हजारो वर्षे परकीय शक्तीच्या अमलाखाली असलेला समाज स्वातंत्र्याच्या वेळी लोकांना मिळाला तो असमानता व भेदभावावर आधारीत होता व ही असमानता काही लोकाद्वारे दुसऱ्या लोकांवर जन्मोजन्मीसाठी थोपविल्या गेली होती म्हणून भारतीय समाजव्यवस्था ही अन्यायपूर्ण समाजव्यवस्था आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. भारतीय समाजाची संरचना हिंदू समाजाची

श्रेणीबद्ध रचना असमानतेच्या सिद्धांतावर झाली आहे. त्यात ब्राह्मण सर्वात श्रेष्ठ व शूद्र सर्वात कनिष्ठ आहेत *** आणि दोघांच्यामध्ये भारतात अदमासे हजारो जाती अस्तित्वात आहेत. त्यात प्रत्येक जात ही जन्माच्या आधारावर आरोपीत व अपरिवर्तनीय आहे. तसेच असमानता केवळ जातीच्या सामाजिक स्थितीमध्येच नाही तर त्यांच्यातील सुखसोई व अधिकारांच्या वितरणामध्ये सुद्धा आहे. वरच्या जातीना त्यांच्या श्रेणीक्रमानुसार विशेष अधिकार व सवलती मिळाल्या आहेत तर खालच्या जातीवर त्यांच्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने निर्योग्यता व निर्बंध लादविल्या गेल्या आहेत. त्यामुळे खालच्या जातीच्या वाट्याला हालअपेष्टा, अपमान, उपसर्ग व हीन वागणूक आल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक अशा सर्वच स्तरात शोषण झाले अशा स्वरूपाची शोषणकारी व्यवस्था ही राष्ट्र विकासाला बाधा ठरते.

**लिंगभेद :**

जाती प्रमाणेच लिंगाच्या आधारावर सुद्धा स्त्री-पुरुष अशी विषमता पाळली जाते. लिंगानुसार पुरुषांचा दर्जा श्रेष्ठ तर स्त्रीचा कनिष्ठ मानला जातो. अशा प्रकारची स्त्री आणि पुरुषामध्ये असलेली विषमता म्हणजे लिंगभेद होय. अशा प्रकारच्या लिंगभेदामुळेच स्त्रीयांवर सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक अपात्रता लादण्यात आल्या होत्या. या अपात्रतेमुळे स्त्रियांना त्यांच्या व्यक्तीत्वाचा विकास करण्याची संधी नाकारण्यात आली होती. त्यामुळे स्त्री रूपी ही अर्धी शक्ती उपयोगात न आणता आल्यामुळेच राष्ट्राच्या विकासाला बाधा निर्माण होते.

**जातीभेद :**

जातीच्या नावावर अस्पृश्यांना आणि अपवित्रतेच्या नावावर स्त्रियांना हजारो वर्ष प्रवाहापासून वंचित ठेवल्या गेल्यामुळे राष्ट्राच्या विकासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. भारताचा इतिहास हा जातीव्यवस्थेचा, वर्णव्यवस्थेचा इतिहास आहे. ब्राह्मणी समाजाची रचना ही चातुर्वर्णावर आधारीत होती त्यामुळे एक वर्ग दुसऱ्या वर्गाच्या हक्काचा व हिताचा बळी घेऊन समाज रचनेतील फायदे लुबाडीत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या हिंदू समाज व्यवस्थेला मानवी शोषणाची एक व्यवस्था म्हटले आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात चातुर्वर्ण्यव्यवस्था, जातीव्यवस्था, जातीभेद आणि अस्पृश्यता ह्या वेगवेगळ्या बाबी नसून त्या एकच आहे हा सिद्धान्त मांडला. ते म्हणतात की, चातुर्वर्ण्य व्यवस्थेतूनच जातीव्यवस्थेचा जन्म झाला आणि जाती व्यवस्थेमध्येच जातीभेदाचे मूळ होते आणि त्यामुळेच समाजात अस्पृश्यता निर्माण झाली व ही समाजव्यवस्था असमानतेवर आणि विषमतेच्या सिद्धांतावर आधारीत आहे व टिकून आहे. त्यामुळे जातीभेद हे राष्ट्रविकासाला बाधक आहे.

**आर्थिक विषमता :**

भारतामध्ये दोन भारत अस्तित्वात आहे. एक श्रीमंतांचा इंडिया आणि कामगारांचा, कष्टकऱ्यांचा शेतकरी व शेतमजुरांचा जे आर्थिक दृष्ट्या खूपच मागास आहेत असा जो वर्ग भारतात राहतो. असे भारताचे आर्थिक विषमतेवर आधारीत एकाच भारतात दोन भारत पहावयास मिळते. एकीकडे खूप श्रीमंती तर दुसरीकडे विकासाला मुकलेली गरिबी अशा स्वरूपाच्या आर्थिक विषमतेला भारतीय समाज व्यवस्था जबाबदार आहे. कारण भारतीय समाज एक प्राचीन आणि परंपरावादी समाज आहे. या व्यवस्थेचा आधार चातुर्वर्ण्य व्यवस्थेत आहे त्यामुळे येथील जन्म आधाराची कार्यकुशलता आणि श्रमविभाजनाच्या पवित्र सिद्धांताला इतके पंगु बनवून टाकले की सामाजिक व्यवस्था धर्म आधारीत बनून गेली आणि त्याच्या विरुद्ध जर कोणी एक शब्दही उच्चारला तर त्याला पाप आणि पुण्याची जोड दिल्या गेली. परिणामस्वरूप समाजाच्या एका मोठ्या वर्गाला अंधारात ढकलून देऊन त्यांना एका कोपऱ्यात बसण्यास मजबूर केल्या गेले. त्यामुळे संपत्तीचे असमान वितरण झाल्यामुळे भारतीय समाज व्यवस्थेत मोठी आर्थिक विषमता निर्माण झाली ती राष्ट्राच्या विकासाला बाधा ठरून जगाच्या तुलनेत आपण शेकडो वर्ष मागे फेकल्या गेलो.

**उपाययोजना :**

**संविधानिक धोरण राबविणे :**

राष्ट्राचा विकास साधायचा असेल तर संविधानात जी धोरणे सांगितली आहेत त्याची अंमलबजावणी सुव्यवस्थीत पद्धतीने राबविणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे महान उपासक होते. भारतीय लोकशाही बलशाली झाल्याशिवाय भारतीय समाज आणि राष्ट्र बलशाली होणार नाही. लोकशाही हा एक प्रकारचा जीवन मार्ग आहे. खरी लोकशाही ही राजकीयच नसून ती आर्थिक आणि सामाजिकही असली पाहिजे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि समाजवादी

अर्थव्यवस्थेच स्वीकार केला त्यामुळे भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात श्रेष्ठ घटना ठरली. विज्ञानवाद व मानवतावाद हे घटनेच्या केंद्रस्थानी आहे. म्हणूनच घटनेला मानव मुक्तीचा पवित्र ग्रंथ म्हणून जागतिक दर्जा प्राप्त झाला आहे. भारतीय समाजाचा विचार करता भारतात जात, पोटजात, प्रथा, परंपरा, स्त्री, धर्म, भाषा, संस्कृती या सर्वच आधारावर विषमता प्राचीन काळापासून आहे. त्यामुळे भारतीय जनता हजारो वर्ष राजकीय मानसिक गुलामगिरीत असल्याने समाजातील फार मोठा वर्ग सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या विकासापासून वंचित राहिला. त्यामुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या. जसे निरक्षरता, जातीयता, अंधश्रद्धा, आर्थिक विषमता, स्त्रियांना कमी लेखने म्हणून या वंचित समाजाला विकास व्हावा त्यांना संधी प्राप्त व्हावी म्हणून भारतीय संविधानात अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत त्याची योग्य पध्दतीने अंमलबजावणी आपल्या राज्यकर्त्यांनी केल्यास राष्ट्राचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

**मूलभूत अधिकाराची संकल्पना स्वीकारणे :**

व्यक्तीचा आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास योग्य पध्दतीने होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला योग्य संधी प्राप्त झाली पाहिजे म्हणून मूलभूत अधिकार महत्त्वाचे आहेत. भारतीय संविधानाने प्रत्येकाला काही मूलभूत अधिकार दिले आहेत. जसे समानतेचा हक्क कलम 14 ते 18 मध्ये दिले आहे. स्वातंत्र्याचा हक्क कलम 19 ते 358 मध्ये दिले आहे. शिक्षेविरुध्द संरक्षणाचा हक्क कलम 20 मध्ये दिले आहे. शोषणाविरुध्दचा हक्क कलम 23 व 24 मध्ये दिले आहे. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार कलम 25 ते 28 मध्ये दिले आहे. सांस्कृतिक व शिक्षणाबाबत अधिकार कलम 29 ते 30 मध्ये दिले आहे. हे सगळे मूलभूत अधिकार घटनेने दिले आहे. अधिकारासोबतच कर्तव्य सुध्दा महत्त्वाचे आहे. म्हणून अधिकार व कर्तव्य एकाच नाण्याचा दोन बाजू आहेत. म्हणून राज्यघटनेचा आदर करुन त्याचे पालन करणे भारताच्या सार्वभौम एकात्मतेला कायम ठेवण्यासाठी योग्य वर्तन करणे, मानवतावाद, विज्ञानवाद, सुधारणावाद इत्यादीचा विकास घडवून आणने. पर्यावरणाचे संरक्षण करुन राष्ट्राच्या विकासाला हातभार लावणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते.

**समाजाभिमुख अर्थव्यवस्था :**

भारतातील परंपरागत धर्मव्यवस्थेने दलित पिडीत समाजाचे आर्थिक शोषण शतकानुशतके अव्याहतपणे केले. कार्ल मार्क्सने श्रमशक्तीतून शोषण क्रिया कशी होते आणि भांडवलशाहीचे इतिहासातील स्थान नष्ट होणे कसे अपरिहार्य आहे ह्याचे विवेचन केले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक विषमता ही खालच्या जातीच्या लोकांना वरच्या जातीचे व्यवसाय करण्यास बंदी असल्यामुळे त्यांच्यासाठी विकासाची दारे बंद करण्यात आली त्यामुळे ते आर्थिक विकासात मागे राहिले. डॉ. आंबेडकरांनी स्टेटस ॲन्ड मायनॉरिटीज या ग्रंथात भारताच्या विकासासाठी अर्थनीती काय असावी याचे अभ्यासपूर्ण विवेचन मांडले आहे. या बाबतीत त्यांनी गरिबी हटविणे विषमतेच निर्मूलन करुन शोषणमुक्त समाजाची संकल्पना मांडली आहे. शिवाय खाजगी उद्यमशीलतेला धक्का न लावता जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त राहिल आणि संपत्तीचे वाटप समानशील होईल अशा पध्दतीने आर्थिक व्यवहाराचे नियोजन करणे ही शासनाची जबाबदारी राहिल तसेच आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सरकारी उपक्रमाची निर्मिती करुन उद्योगधंदे काढावेत. भूमिहीनांना जमिनी द्याव्यात जेणेकरुन आर्थिक विषमता कमी होऊन सगळेच विकासाच्या प्रवाहात सामील झाल्यास राष्ट्राच्या विकासाला हातभार लागेल अशी समाजभिमुख अर्थव्यवस्था असावी.

**सर्वसमावेशक विकास :**

सर्वसमावेशक विकास साधायचा असेल तर आपल्याला समाजवादी समाजरचना स्वीकारावी लागेल. कारण समाजवादी समाजरचनेचा आर्थिक समानता हा गाभा असतो. सर्वांचा विकास हा या व्यवस्थेमध्ये होतो. समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी क्रांतीकारक उपाय सुचविले आहेत. उत्पादन साधनावर जनतेची मालकी, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण टाळून संपत्तीचे योग्य वाटप, शेतजमनीचे राष्ट्रीयकरण करणे, शेतजमीनीचे वाटप करताना जात, धर्म, वंश इ. आधार घेण्यात येऊ नये. पायाभूत उद्योगाचे राष्ट्रीयकरण करावे. समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षण, व्यापार इ. समानतेचे अधिकार देण्यात यावे. जेणेकरुन समाजातील सर्व घटकांचा सर्वसमावेशक विकास होईल व राष्ट्राची प्रगती होईल.

**संविधाननिर्मिती नंतर सकारात्मक परिणाम :**

**धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना :**

भारत हा विविध जातीत, धर्मात, पंथात विभाजीत झालेला देश आहे. प्रत्येक जाती धर्मांचे वेगवेगळे झेंडे आहेत. जगु वाऱ्याच्या दिशाप्रमाणे आपण वागत आहोत एवढा जातीभिमान आणि धर्माभिमान भारतीयामध्ये ठासून भरलेला आहे. परंतु तरीही राष्ट्रभक्तीच्या प्रेरणेने विसरवायचाची आपण आलो की आम्ही भारतीय आहोत अशी धारणा सर्वांची होते ही किमया खऱ्या अर्थाने भारतीय संविधानामुळे साधल्या गेली. कारण संविधानाच्या कलम 25, 26, 27, 28 नुसार प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिल्या गेलेला आहे. तसेच राष्ट्राचा कुठलाच धर्म नसून भारत हा देश धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे अशी तरतुद केल्यामुळे व धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना स्वीकारल्यामुळे आपण एकसंघ राहू शकलो यातच राष्ट्राचा विकास अभिप्रेत आहे.

**शोषणकारी व्यवस्थेला घटनेच्या विविध कलमामुळे आळा बसला :**

विषमतेच्या आधारावर निर्माण झालेली दरी मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी व दलितांना व दुबळ्यांना प्रवाहात आणण्यासाठी संविधानातील लोककल्याणकारी महत्त्वपूर्ण कलमामुळे शोषणकारी व्यवस्थेला आळा बसला. घटनेच्या कलम '17' नुसार अस्पृश्यता नष्ट झाली. कलम '21' नुसार जिवित व व्यक्तीगत स्वातंत्र्याचे संरक्षण कलम '24' नुसार बालकामगार ठेवण्यास मनाई कलम '45' नुसार बालकाकरिता मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतुद तसेच कलम '12 ते 35' नुसार मूलभूत अधिकार दिलेत यात समानता हे तत्व महत्त्वपूर्ण ठरले. कलम '340' नुसार मागासवर्गीयांचा सर्वांगीण विकास व्हावा त्यांना समान संधी मिळावी म्हणून आरक्षण दिले आहे. कलम '341 व 342' नुसार अनु. जाती, जमाती, विमुक्त भटक्या जमाती, विशेष मागास वर्ग यांच्या सर्वांगीण विकासासाठी आरक्षण दिल्या गेल्यामुळे हा वर्ग मोठ्या प्रमाणात शोषणाच्या बाहेर येऊन प्रवाहात येण्यास सिद्ध झाला आहे.

**संविधानाने महिलांना समतेचा अधिकार दिल्यामुळे राष्ट्राची ही अर्धी शक्ती कामी आली :**

पुरातन, प्राचीन, मध्ययुगीन आणि स्वातंत्र्यपूर्व या सर्व कालखंडात स्त्रियांची अतिशय दयनीय व दुय्यम स्वरूपाची स्थिती होती. स्त्रियांना कोणतेही अधिकार नव्हते. धर्माचरणानुसार त्यांना फक्त पुरुषांची सेवा करणे समाजातील रुढी, प्रथा, परंपरा यांचे पालन करणे म्हणजे स्त्री धर्म अशी संकल्पना समाजात रुढ झाली होती. महिलारुपी अर्धी शक्तीवर ही विविध बंधने असल्यामुळे व शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवल्यामुळे या अर्ध्या शक्तीचा उपयोग राष्ट्राच्या विकासासाठी करता आला नाही. परंतु भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर नवभारताच्या निर्मितीमध्ये संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना समतेचा व स्वातंत्र्याचा अधिकार दिला. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून भारतीय महिलांना त्यांचे सर्व अधिकार मिळवून दिले. तसेच भारतीय संविधानात स्त्रियांच्या अधिकाराबाबत विविध कलमा अंतर्गत तरतुदी करून स्त्रियांना कायद्याने भक्कम संरक्षण दिले आहे. घटनेच्या कलम '14' नुसार समतेचा अधिकार स्त्रियांना दिला. कलम '15' नुसार धर्म, वंश, जात, लिंगानुसार भेदभाव करता येणार नाही. कलम '16' नुसार समान संधी देण्यात आली आहे. कलम '39' 'ख' नुसार समान कामासाठी समान वेतनाची तरतुद करण्यात आली आहे. कलम '42' नुसार प्रसुतीविषयक सहायता साठी तरतुद करण्यात आली आहे. कलम '51' (क) भाग '5' (ड) नुसार महिलांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या सर्व प्रथांचे निर्मूलन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य राहिल असे म्हटले आहे. मूलभूत अधिकार निर्देशक तत्वे व राज्य धोरणाच्या भाग III व भाग IV मध्ये महिलांना पुरुषाच्या बरोबरीने नागरिक म्हणून गणण्यात आले आहे. महिलांना मिळालेल्या या सर्व अधिकारामुळे ती आज सर्वच क्षेत्रात स्वाभीमानाने जिवन जगताना दिसते आहे व राष्ट्राच्या विकासासाठी पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात कार्य करीत आहे.

**संविधानिक तरतुदीमुळे जातीभेदाला आळा बसला म्हणून राष्ट्राचा विकास झाला :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, भारतात प्रत्येक जात हे स्वतंत्र राष्ट्र आहे. जातीची विषमता पाचऱ्याची धेवीविरुद्ध विषमता आहे ती घालवायची असेल तर राष्ट्रीय निर्धाराची गरज आहे. हा निर्धार करू शकलो तर भारताचा एकोपा असलेले राष्ट्र बनण्यापासून आणि जगाची महासत्ता बनण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. डॉ. आंबेडकरांनी आपल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक चळवळीत 'माणूस' हा केंद्रबिंदू मानला दुर्दैवाने आपल्या भारतात माणसाला कधीचे कोणत्याच कालखंडात

केंद्रबिंदू मानलेले नव्हते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत धर्मकर्त्यांनी जातीला महत्त्व दिले. धर्माला व जातीला केंद्रबिंदू मानले. रुढी, परंपरेला श्रेष्ठ मानले त्यामुळे माणसाची किमत माणसाचे महत्त्व याला मातीमोल केले. भारतात माणसांची त्यांच्या गुणांची कर्तृत्वाची पूजा करण्यापेक्षा दगड, पशू, पक्षी, झाडे यांची पूजा धर्माने आणि रुढी परंपरेने करायला शिकविले आणि म्हणूनच धर्मापुढे व धर्मशास्त्रापुढे रुढी परंपरेमुळे अस्पृश्य म्हणून मानलेला माणूस पशुपेक्षाही हीन झाला. माणसासारख्या माणसाला अस्पृश्य म्हणून हीन लेखल्यामुळे भारताची पिछेहाट झाली. या सर्व बाबी लक्षात घेऊन जाती निर्मुलनासाठी बाबासाहेबांनी पोटजाती नष्ट करणे, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे, धर्मशास्त्राची पवित्रतेची भावना नष्ट करणे अशा काही तरतुदी सांगितल्या आहेत. तसेच कलम '17' अंतर्गत अस्पृश्यता हा सामाजिक गुन्हा ठरविण्यात आला. जे लोक अस्पृश्यता पाळतील त्यांना शिक्षेची तरतुद करण्यात आली. कलम 25 अंतर्गत धर्म, जात व लिंग यात भेद करता येणार नाही सर्वांना मंदिरात प्रवेशाचा अधिकार देण्यात आला. कलम '29' अंतर्गत शाळा महाविद्यालयात सगळयांना प्रवेश द्यावा. कलम '275' अंतर्गत अनु. जाती जमातीच्या कल्याणासाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी विशेष निधीची तरतुद करण्यात आली. कलम 164(1) नुसार अनु. जाती जमाती इतर मागासवर्गाच्या कल्याणासाठी स्वतंत्र मंत्री नेमण्याची तरतुद करण्यात आली. कलम 330, 332, व 334 नुसार लोकसभा व विधानसभेच्या मतदार संघात अनु. जाती, जमातीच्या उमेदवारासाठी राखीव ठेवण्याची तरतुद करण्यात आली. या सर्व तरतुदीमुळे जातीभेद कमी होण्यास मदत झाली व ही अर्धी शक्ती उपयोगात आणता आल्यामुळे आपल्या राष्ट्राची विकासाकडे वाटचाल सुरु झाली.

**सारांश :**

आधुनिक भारताच्या सर्वांगीण उभारणीमध्ये ज्या नेत्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहेत त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अग्रस्थानी आहेत. स्त्री पुरुष समानता, जातीनिर्मूलन, संसाधनाचे फेरवाटप, सर्वांना शिक्षण, धर्मचिकित्सा ही मूलभूत विषयपत्रिका घेऊन त्यांनी लढे उभारले. संविधानिक हक्क, समाज प्रबोधन, संघटन, संघर्ष याद्वारा राज्यसत्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता, प्रशासन, न्यायव्यवस्था, ज्ञानसत्ता, सांस्कृतिक सत्ता यात अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्व मिळवून दिले. म्हणून खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आज सामाजिक न्यायाचे प्रतिक बनले आहे.

भारताच्या संविधान निर्मात्याकडे देशातील सर्वसामान्याच्या उज्वल भवितव्याकडे बघण्याची दुरदृष्टी होती. म्हणून राज्यघटना लिहिताना भारताचा प्रदीर्घ इतिहास, चालिरिती, धर्म, पंथ, सर्वमान्य भावना व लहान मोठ्यासह सर्व घटकांचा विचार करुन घटनेला जे रुप बाबासाहेबांनी दिले त्यामुळे आजही भारत एकाच सुत्रात बांधलेला आहे. जगात ठिकठिकाणी अनेक स्थित्यंतरे झालीत. मोठमोठी साम्राज्ये कोलमडलीत पण आपल्या संविधानाची चौकट भविष्याचा वेध घेऊन सामाजिक बांधीलकी आणि बुध्दीमत्तेच्या पायावर सुरक्षित आहे. आपले संविधान म्हणजे लाखो करोडो सामान्य भारतीयांच्या मनाची स्पंदन आहे, श्वास आहे. आपल्या देशात स्वाभीमानाने, निर्भयपणे जगण्याचा विश्वास आहे. आपली घटना बहुमोल देणगी समजून ती अबाधीत राहिल ही आजच्या व उद्याच्या पिढीची जबाबदारी आहे. संविधान अबाधीत ठेवण्यातच राष्ट्राचा विकास आहे.

**संदर्भ :**

नरके, हरी (संपादन). डॉ. आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 20
पानतावणे, गंगाधर (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख. पुणे : प्रतिमा प्रकाशन.
लांजेवार, ज्योती. फुले आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ. नागपूर : संकेत प्रकाशन.
गणवीर, रत्नाकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोडबील. नेहा प्रकाशन. नागपूरी 17
भारतीय संविधान. समता प्रकाशन.
क्रांतीसूर्य विशेषांक.
सकाळ विशेषांक.